VOLUME 5 ISSUE 9 OCTOBER 2020

*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**

**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra**

# MODLIB *E-Bulletin of Library and Information Centre*

*New Feature*

**Report of Institutional Repository @ MCASC Pg. 15-16**

**Published by :**
**Dr. Rajendra S. Zunjarrao,**
**Principal,**
**MCASC (Autonomous) ,**
**Shivajinagar, Pune-05.**

**Editor :**
**Dr. Shantashree Sengupta,**
**Librarian.**

**Editorial Assistant :**
**Mrs. Sarika Sable**

**Website :**
http://www.mcasclib.com/




**'*मना मनांची भरारी*'- Marathi Poem penned down by Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir on the occasion of *'World Mental Health Day'* on 10th October 2020.**

# Table of Contents


| Sr.No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 1 | **Interview of Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir** | |
| | - कोरोनाबाबत चिंता नको: काळजी आवश्यक | 4 |
| | - शिक्षणात अडचणींची प्रश्नपत्रिका | 5 |
| 2 | **Congratulations Prof.Dr.Nivedita G. Ekbote Madam** | 6-13 |
| 3 | **Marathi Poem by Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir** | |
| | -मना मनांची भरारी- *On World Mental Health Day* | 1 |
| | -मनातला झुला झुलता ठेवा | 14 |
| 4 | **Report of the Institutional Repository@MCASC** | 15-16 |
| 5 | **Event conducted by NSS** | |
| | *-Mahatma Gandhi Jayanti and Lal Bahadur Shastri Jayanti* | 18 |
| 6 | **Events conducted by Library and Information Centre** | |
| | *-Mahatma Gandhi Jayanti and Lal Bahadur Shastri Jayanti* | 19-20 |
| | *-Dr.A.P.J Abdul Kalam Jayanti and Vachan Prerna Din in association with Department of Marathi* | 21-23 |
| | *-Maharshi Valmiki Jayanti* | 24-25 |
| | *-Indira Gandhi Punyatithi and Rashtriya Sankalp Diwas* | |
| | *-Vallabhbhai Patel Jayanti and Rashtriya Ekta Diwas* | |
| 7 | **Activities conducted by Modern Media Station** | 26-27 |
| | *-Modern Vyakhyanmala* | |


....contd....

# Table of Contents


| Sr.No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 8 | **Events organised by Departments and Committees** | |
| | -*Department of Hindi* | **29-31** |
| | -*Department of German* | **32 and 38** |
| | -*IQAC and E-content Development Centre* | **33** |
| | -*Department of Psychology* | **34-36** |
| | -*Department of Animation* | **37 and 39** |
| | -*Department of Mathematics* | **40** |
| | -*IPR Committee and Department of Biotechnology* | **41-42** |
| | -*Library and Information Centre* | **43-46** |
| | -*Value Education Committee* | **47** |
| | -*Institutional Social Responsibility (ISR) Committee* | **48** |
| 9 | **Faculty Members invited as Resource Persons** | |
| | -*Prof.Dr.P.G.Dixit* | **50** |
| | -*Prof.Dr.Prerna Ubale* | **51** |
| 10 | **Modern Achievements** | |
| | -*Sania Rathod, XII D Student* | **52-53** |
| | -*Shri. Raju Jadhav, Clerk,MCASC,Pune-5* | **54** |
| 11 | **Newly Added Books during October 2020** | **55** |
| 12 | **Books received on Gratis during October 2020** | **56** |
| 13 | **Newspaper Clippings** | **57-179** |
| 14 | **Upcoming Events** | **180** |

# *Interview of Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir*



## कोरोनाबाबत चिंता नको; काळजी आवश्यक

**कोरोना आजाराबाबत गंभीर होणे गरजेचे आहे. ठरावीक वेळाने हात धुणे आवश्यक आहे. स्वयंशिस्त पाळल्यास कोरोनातून बचाव होऊ शकतो. या आजाराबाबत वारंवार विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी दिलेली उत्तरे.**

**कोरोना विषाणू हवेतूनच पसरतो का?**

उत्तर : हा विषाणू हवेतूनही पसरत असल्याचे जागतिक आरोग्य संस्थेने जाहीर केले आहे. तो जड असल्याने चार-पाच मिनिटेच हवेत राहतो. या काळात त्या विषाणूचा दुसऱ्या व्यक्तीशी संपर्क आल्यास तो त्याच्या शरीरात शिरू शकतो. हवेत जास्तीत जास्त ४ मिनिटे राहत असल्याने खुल्या ठिकाणी हा धोका फारसा नसतो.

**आता सर्वच पातळीवर अनलॉकची प्रक्रिया सुरू झाली असल्याने कोणती काळजी घ्यावी?**

उत्तर : ऑफिसमध्ये एकापेक्षा जास्त व्यक्ती असल्यास पूर्णवेळ मास्क लावून बसा. सकाळी व्यायामाला जाताना, बाजारात जाताना सुरक्षित अंतर ठेवायचेच. घरी आल्यावर कपडे साबणाच्या पाण्यात भिजवून ठेवायचे. शक्यतो गरम पाणी प्यायचे. फ्रीजमधील पदार्थ बाहेर काढून त्याचे तापमान सामान्य झाल्यावरच खायचा.

**कायम घरात असतात त्यांनाही कोरोना कसा होतो?**

उत्तर : दूध, भाजी, सामान आणायला घरातील काही सदस्य बाहेर जात असतो. तो कोरोना संसर्ग घरात घेऊन येतो. त्यामुळे विनाकारण बाहेर फिरणे टाळावेच.

**कोरोना झाल्यानंतर त्या व्यक्तीला पुन्हा कोरोना होण्याची शक्यता असते का ?**

उत्तर : एकदा कोरोना होऊन गेल्यावर त्या व्यक्तीमध्ये निर्माण झालेल्या अँन्टिबॉडीज तीन महिने राहतात. त्यामुळे एकदा कोरोना होऊन गेल्यावर त्या व्यक्तीस पुढील तीन महिने कोरोना होण्याची शक्यता कमी असते.

**घरातील एखाद्या व्यक्तीस कोरोना झाल्यास कोणती काळजी घ्यावी?**

- संबंधित व्यक्तीचे तावडतोब वेगळ्या खोलीत विलगीकरण करावे.
- तज्ज्ञ डॉक्टरांना संबंधित व्यक्तीविषयी सर्व माहिती कळवावी.
- संबंधित व्यक्तीच्या खोलीमध्ये थर्मामीटर, ऑक्सिजन मीटर ठेवावे.
- संबंधित व्यक्तीच्या खोलीमध्ये कोणीही जाऊ नये. फोनवरून संपर्क करावा.
- संबंधित व्यक्तीस श्वास घेण्यास त्रास होत असल्यास तावडतोब तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या. ही काळजी किमान दहा दिवस घेणे आवश्यक आहे.

**कोरोना आजारातून बरे झाल्यानंतर अनेकांना खूप थकवा जाणवतो?**

उत्तर : कोरोनातून बरा झालेल्या रुग्णाला पुढे चार आठवडे थकवा जाणवू शकतो. याचे कारण हा विषाणू फुफ्फुसावर हल्ला करतो. त्यामुळे फुफ्फुसाची क्रिया कमकुवत होते आणि हवेतून ऑक्सिजन घेऊन ते शरीरभर पोचविण्याचे त्याचे कार्य कमी होते. या काळात फिजिओथेरपी व्यायाम करणे महत्वाचे आहे.

**कोरोनातून बरे झालेल्या रुग्णाला प्लाझ्मादान करण्याचे आवाहन केले जात आहे...**

उत्तर : प्लाझ्मा दुसऱ्या रुग्णाला दिल्याने त्याच्या रक्तात अँटीबॉडीज जातात आणि त्या कोरोना विषाणूशी लढतात.

**चाळ, वाडा अथवा वस्तीतील एखाद्या कुटुंबाला कोरोनाची लागण झाल्यास कोणती काळजी घ्यावी?**

उत्तर : संबंधित कुटुंबाचे विलगीकरण करावे. त्यांच्या वापरात असलेले बाथरूम, टॉयलेट, पिण्याचा व वापराच्या पाण्याचे नळ, टाकी वेगळे करावे. या कुटुंबाशी प्रत्यक्षऐवजी फोनवर संपर्क करावा.

Sakaal: 8.10.2020

# Congratulations Prof. Dr. Nivedita G. Ekbote Madam

## शहर भाजपचे पदाधिकारी जाहीर

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** भारतीय जनता पक्षाच्या शहर कार्यकारिणीवरील उपाध्यक्ष, चिटणीस जाहीर करण्यात आले असून विविध आघाड्यांच्या अध्यक्षपदांची घोषणा करण्यात आली आहे. चार उपाध्यक्ष, सहा चिटणीस, दहा आघाडी अध्यक्ष आणि सरचिटणीस पदांवर सहा कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सुनील पांडे, धनंजय जाधव यांची उपाध्यक्षपदी तर भारतीय जनता पक्ष महिला आघाडीच्या अध्यक्षपदी अर्चना पाटील आणि युवा मोर्चा युवती आघाडीच्या अध्यक्षपदी निवेदिता एकबोटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षाचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी या नावांची घोषणा केली आहे. रमेश आढाव, धनंजय जाधव, बाळासाहेब आमराळे, सुनील पांडे यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. चिटणीसपदी पप्पू गरूड, शशिकांत कुलकर्णी, आनंद पाटील, अरूण राजवाडे, उद्धव मराठे, विश्वास ननावरे यांची नेमणूक करण्यात आली आहे.

महिला अध्यक्ष म्हणून अर्चना पाटील यांच्याबरोबरच युवा मोर्चा अध्यक्षपदी राघवेंद्र मानकर, ओबीसी आघाडी अध्यक्षपदी योगेश पिंगळे, एससी आघाडी अध्यक्षपदी भीमराव साठे, अल्पसंख्याक आघाडी अध्यक्षपदी अन्वर पठाण यांची नियुक्ती झाली आहे. महेंद्र व्यास यांची व्यापारी आघाडी अध्यक्षपदी, ईशानी जोशी यांची वकील आघाडी अध्यक्षपदी, विद्यार्थी आघाडी अध्यक्षपदी अंकिता तिवारी, झोपडपट्टी आघाडी अध्यक्षपदी विशाल पवार, भाजयुमो युवती आघाडी अध्यक्षपदी निवेदिता एकबोटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. युवा मोर्चाच्या सरचिटणीसपदी प्रतीक देसरडा, अरविंद गोरे, निहाल घोडके, अक्षय वायाळ, ओबीसी सरचिटणीसपदी हरीश परदेशी आणि एससी आघाडी सरचिटणीसपदी शैलजित बनसोडे यांना संधी देण्यात आली आहे. अली दारूवाला अल्पसंख्याक तर उल्का मोकासदार यांची सेवा प्रकोष्ठ संयोजक या पदावर नियुक्ती झाली.

लोकसत्ता Fri, 02 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55377619

## शहर भाजपा युवती की अध्यक्ष बनीं एकबोटे

### शहराध्यक्ष ने की उनकी नियुक्ति

नवभारत न्यूज नेटवर्क



**पुणे.** सामाजिक व शिक्षा क्षेत्र में काम करनेवाली डॉ.निवेदिता एकबोटे को पुणे शहर भाजपा युवती प्रधान के रूप में चुना गया है. पुणे शहर भाजपा अध्यक्ष जगदीश मुलिक ने इस चयन के संबंध में नियुक्ति पत्र सौंपा. इस अवसर पर दीपक पोटे, महासचिव दीपक नागपुरे, महासचिव गणेश घोष और अन्य शहर के पदाधिकारी उपस्थित थे.

### शिक्षा व सामाजिक क्षेत्र में अच्छा काम

प्रोफेसर डॉ. निवेदिता एकबोटे प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी की उप कार्यकारी हैं. इसी तरह, अवनी इस संगठन की अध्यक्ष हैं. आज के कोरोना युग में भी, उन्होंने सामाजिक संगठनों, समाज के विभिन्न क्षेत्रों में काम करने वाले संगठनों की मदद की है. उनके पास कई समस्याओं को हल करने का अनुभव है जो युवा महिलाओं के पास है. उन्होंने कौशल विकास कार्यक्रमों के माध्यम से समुदाय की हजारों युवतियों को अपने दो पैरों पर खड़े होने में मदद की है. इसी तरह, कई छात्रों की शिक्षा उनके माध्यम से पूरी हुई है. उन्होंने शहर के कई छात्रों की शिक्षा संबंधी समस्याओं को हल किया है. सामाजिक क्षेत्र में, वह अवनी संगठन के माध्यम से बडे पैमाने पर काम कर रहा है. इसी तरह प्रतियोगिता परीक्षा के छात्रों के पास कोरोना अवधि के दौरान या यहां तक कि घर जाने के लिए सभी सरकारी अनुमति के साथ दोनों भोजन की व्यवस्था होगी.

Navbharat: 2.10.2020

लोकमत

## भाजप मोर्चा युवती आघाडी अध्यक्षपदी डॉ. निवेदिता एकबोटे



धनकवडी : डॉ. निवेदिता एकबोटे यांची भारतीय जनता युवा मोर्चा युवती आघाडी, पुणे शहर अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून नियुक्तीचे पत्र नुकतेच शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी डॉ. एकबोटे यांना दिले आहे. डॉ. एकबोटे ह्या शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात गेल्या दहा वर्षापासून कार्यरत आहेत. अनेक सामाजिक संस्था आणि उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

Hello Pune
Page No. 2 Oct 02, 2020
Powered by: erelego.com

## डॉ. निवेदिता एकबोटे भाजप युवती प्रमुख



डॉ. निवेदिता एकबोटे

पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांची पुणे शहर भारतीय जनता पक्षाच्या युवती प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शहर भाजपच्या पहिल्या युवती शहराध्यक्ष म्हणून त्यांना संधी मिळाली आहे.

भाजपचे शहराध्यक्ष माजी आमदार जगदीश मुळीक यांनी त्यांना निवडीबाबतचे नियुक्ती पत्र नुकतेच दिले. आयआयएम, अहमदाबाद येथून व्यवस्थापनशास्त्राचे शिक्षण घेतलेल्या एकबोटे या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉक्टरेट आहेत. त्या 'अवनी' या स्वयंसेवी संस्थेच्या अध्यक्षाही आहेत.

Maharashtra times:4.10.2020

## शहर भाजप युवती अध्यक्षपदी डॉ. निवेदिता एकबोटे



पुणे, दि. ३ (प्रतिनिधी) – प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांची पुणे शहर भाजप युवती शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. भाजपचे पुणे शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी त्यांना निवडीबाबतचे पत्र दिले.

यावेळी नगरसेवक, सरचिटणीस राजेश येनपुरे, नगरसेवक दीपक पोटे, सरचिटणीस दीपक नागपुरे, सरचिटणीस गणेश घोष आदी उपस्थित होते. प्रा.डॉ. एकबोटे या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह म्हणून कार्यरत आहेत.

Saamana: 4.10.2020

# *Congratulations Prof. Dr. Nivedita G. Ekbote Madam*

**कोरोना योद्धा**

## जनसेवेचे हाती बांधून कंकण, प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे सदैव कार्यतत्पर

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी देशाला एक महामंत्र दिला 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'. मुलगी जेव्हा शिकते, तेव्हा केवळ ती स्वयंप्रकाशित होते असे नाही, तर ती कुटुंब आणि समाजालाही प्रकाशित करते. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भाजपा पुणे शहर युवा आघाडी मोर्चाच्या नवनिर्वाचित अध्यक्षा प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे होय.

डॉ. निवेदिता एकबोटे यांनी कठोर परिश्रमाने उच्च शिक्षण घेतले. स्वत: प्राध्यापिका बनून आज त्या अध्यापनाच्या माध्यमातून असंख्य विद्यार्थ्यांचे जीवन उजळवून टाकत आहेत. इतकेच नाही तर जनसेवेचे कंकण हाती बांधून त्या सदैव कार्यरत आहेत. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय कार्य पाहिल्यानंतर कुसुमाग्रजांची कविता आठवते, 'अनंत अमुचि ध्येयासक्ती अनंत अन् आशा किनारा तुला पामराला...!'

**शब्दांकन : पांडुरंग मरगजे**

प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांच्या घराण्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा समृद्ध वारसा लाभला. त्यांचे वडील सुप्रसिद्ध डॉक्टर गजानन एकबोटे यांच्याकडून त्यांना रुग्णसेवेचा वारसा मिळाला, तर आई व विद्यमान नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे यांच्याकडून जनसेवेचा वारसा लाभला. त्यातच बुद्धिमान असल्याने निवेदिता एकबोटे यांनी 'मार्केटिंग व्यवस्थापन' या विषयात उच्च शिक्षण घेऊन प्राध्यापिका व डॉक्टरेट अशा पदव्या मिळवल्या. आपण मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग तळागाळातील विद्यार्थ्यांना झाला पाहिजे, या भूमिकेतून त्यांनी पुण्याच्या नामांकित मॉडर्न इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस



मॅनेजमेंट या महाविद्यालयात सुमारे १० वर्षे 'मार्केटिंग' या विषयात अध्यापनाचे कार्य केले. आज त्या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह म्हणून कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे अवनी या संस्थेच्या अध्यक्षा आहेत. तसेच, त्या अनेक संस्थांवर सल्लागार,

> पुण्यासारख्या महानगरात माझी भाजपा युवा मोर्चा युवती अध्यक्षपदी निवड करून भारतीय जनता पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखवला, त्याबद्दल मी पक्षाची खूप आभारी आहे. खरे तर हे पद केवळ सन्मानाचे नसून मोठ्या जबाबदारीचे आहे. पक्षाला लोकांच्या हृदयात कायमचे स्थान मिळावे, यासाठी जनसेवेचे हाती कंकण बांधून मी सदैव कार्यरत राहण्याचा निर्धार केला आहे. मला आशा आहे.
> कमल और खिलेगा, अस्मान चुमेगा, देश का नाम रोशन होगा...!
> **प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे**

हितचिंतक म्हणून काम पाहात आहेत.

कोरोना महामारी विरुद्ध जनसामान्यांची निकराची लढाई सुरु आहे. विशेषत: महिलावर्गाला तर एकीकडे प्रापंचिक जबाबदाऱ्या, तर दुसरीकडे कोरोना विरुद्धची लढाई अशा दुहेरी संघर्षाला तोंड द्यावे लागत आहे. अशावेळी महिलांना धीर देणारं कोणीतरी 'मायेचं माणूस' हवं असतं. प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांनी अवनी संस्थेच्या माध्यमातून महिला वर्गाला मदत केली. तर दिव्यांग इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज (डिकाई) संस्थेच्या माध्यमातून दिव्यांगांना आधार दिला आहे. कोरोनाच्या कहरापुढे भले भले गर्भगळीत झाले असताना प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांनी मात्र तळागाळातील महिलावर्ग, दिव्यांग व्यक्ती व सर्वसामान्यांमध्ये असामान्य आत्मविश्वास निर्माण केल्यामुळे त्यांना **कोरोनायोद्धा ही उपाधी देणे, यथार्थ ठरेल.**

कोरोनाचा प्रादुर्भाव आणि लॉकडाउनचा फटका गोर, गरीब, कष्टकरीवर्ग व विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात बसला. यामुळे व्यथित झालेल्या प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांनी डिकाई, अवनी, सिद्धी कर्मयोगी फाउंडेशन, तसेच इस्कॉन संस्थेच्या सहकार्याने दिव्यांग, वृद्ध, अनाथ, शेतकरी, कष्टकरी, मजूर यांना अन्नधान्य व जेवण वाटपाचे अविरत सेवाकार्य केले. या कार्यात त्यांना डिकाईचे अध्यक्ष रघुनाथ येमुल गुरुजी, कार्याध्यक्ष राजश्री गागरे, राजेंद्र गायकवाड, निलीमा येमुल, धोर्डे पाटील चॅरिट ट्रस्टचे राजेंद्र धोर्डे पाटील, डिकाईचे सल्लागार सी. ए. ललित पोफळे या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आजच्या कोरोनाच्या काळातही डॉ. निवेदिता एकबोटे समाजाच्या विविध क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संघटना, संस्था यांना मदत करत आहेत. युवतींचे अनेक प्रश्न सोडविण्यात त्यांचा पुढाकार आहे. समाजातील हजारो युवतींना त्यांनी कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी मदत केली आहे. अनेक विद्यार्थी युवक-युवतींचे शिक्षण त्यांच्या माध्यमातून पूर्ण झाले आहे. तसेच त्यांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी डॉ. एकबोटे सदैव तत्पर असतात. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेची तयारी करत असलेल्या विद्यार्थ्यांना कोरोना काळात दोन वेळेच्या जेवणाची व्यवस्था असेल किंवा त्यांना घरी परतण्यासाठी सर्व शासकीय परवानग्या मिळवणं असेल, अशा विविध आघाड्यांवर त्यांची नेहमीच मदत झाली आहे. शैक्षणिक क्षेत्रातही त्या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर काम करीत आहे.

(RCI)

**Lokmat: 4.10.2020**

# *Congratulations Prof. Dr. Nivedita G. Ekbote Madam*

## डॉ. निवेदिता एकबोटे यांची निवड



**पुणे :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांची पुणे शहर भारतीय जनता पक्षाच्या युवती प्रमुखपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली. शहर भाजपच्या पहिल्या युवती शहराध्यक्ष म्हणून त्यांना संधी मिळाली आहे. आयआयएम, अहमदाबाद येथून व्यवस्थापनशास्त्राचे शिक्षण घेतलेल्या डॉ. एकबोटे या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉक्टरेट आहेत. त्या अवनी या स्वयंसेवी संस्थेच्या अध्यक्षाही आहेत.

**Kesari: 5.10.2020**

**लोकमत**

## भाजप युवती आघाडीच्या शिलेदार डॉ. निवेदिता एकबोटे यांच्याशी संवाद

### डिक्काईच्या माध्यमातून महिला व मुलींसाठी राबविले उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**धनकवडी :** भाजप पुणे शहर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या नुकत्याच जाहीर करण्यात आल्या. डॉ. निवेदिता एकबोटे यांची युवती आघाडीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. युवती आघाडीच्या शिलेदार डॉ. निवेदिता एकबोटे यांच्याशी 'लोकमत'ने संवाद साधला.

यावेळी डॉ. एकबोटे म्हणाल्या, भारतीय जनता पक्षाने संघटनेच्या पातळीवर माझ्यावर मोठी जबाबदारी सोपविली असून पक्षाचा विश्वास सार्थ ठरविण्याचा प्रयत्न मी निश्चितपणे करेन. प्राध्यापिका म्हणून काम करतानाच शिक्षण संस्था चालविण्यासाठीसुद्धा हातभार लावण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, शिक्षण क्षेत्राच्या बाहेर युवती आघाडी अध्यक्षपदाच्या निमित्ताने मी प्रथमच काम करणार आहे. शिक्षण क्षेत्रातला अनुभव असला तरी सार्वजनिक क्षेत्रात काही काम करण्याची संधी प्रथमच या निमित्ताने मिळणार आहे.

पुणे शहरातील महिलांसाठी अवनी व डिक्काई संस्थेच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबविले जात असून महिला मुलींनी स्वतःच्या पायावर उभे राह स्वावलंबी बनव्यात यासाठी नेहमी प्रयत्न केला आहे. यापुढे देखील उपक्रम सुरूच राहील. महिलांच्य मागण्या व प्रश्नांसाठी मी सदैव तत्प राहिन, असे प्रतिपादन डॉ. एकबो यांनी केले.

### व्यापक स्वरुपात काम करण्याची संधी



◆ डॉ. एकबोटे पुढे म्हणाल्या युवती व महिलांच्या अनेक समस्या आहेत. त्यांच्यासाठी वैयक्तीक पातळीवर काम सुरु होते. मात्र, आता संघटनेच्या माध्यमातून समाजासाठी व्यापक स्वरुपाचे काम करण्याची संधी मिळाली आहे.

◆ महिलांवरील अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहे. या परिस्थितीत कधी पोलीस यंत्रणा तर कधी राजकीय पक्षांना दोष दिला जातो. परंतु, कोणाला दोष देण्याऐवजी महिलांनी स्वतःचे संरक्षण करण्यास स्वतः सक्षम व्हावे यासाठी प्रशिक्षण तसेच 'मार्शल आर्ट'चे धडे देणार आहे. महिला सबलीकरणा बरोबरच महिलांना आत्मनिर्भर बनविण्याचा निश्चय आगामी काळात करणार आहे.

Hello Pune
Page No. 3 Oct 09, 2020
Powered by: erelego.com

# *Congratulations Prof. Dr. Nivedita G. Ekbote Madam*

## प्रोग्रेसिव एजुकेशन सोसायटी : प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे का सत्कार

नवभारत न्यूज नेटवर्क

**पुणे.** प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी की उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे का हाल ही में भाजयुमो के युवती आघाडी पर चयन हुआ. इस नियुक्ति के उपलक्ष्य में शुक्रवार 9 अक्टूबर को संस्था के सभागृह में प्रा. डॉ. निवेदिता का सत्कार किया गया. सत्कार समारोह की अध्यक्षता प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे ने की. सत्कार समारोह में स्वागत एवं प्रास्ताविक संस्था के सचिव शामकांत देशमुख ने किया. पूर्व आईएएस ऑफीसर अविनाश धर्माधिकारी ने प्रा. डॉ. निवेदिता का सत्कार किया.



### बेहतर प्रशासकीय अनुभव

सत्कार समारोह में निवेदिता ने कहा कि, उनपर जो जिम्मेदारी सौंपी गई है, उसका वे पूरी निष्ठा से निर्वहन करेंगी. प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी में काम करते समय उन्हें एडमिनिस्ट्रेशन का काफी अच्छा अनुभव प्राप्त हुआ है. अविनाश धर्माधिकारी के 'चाणक्य मंडल' से मैनेजमेंट का बेहतरीन ज्ञान प्राप्त हुआ. पार्टी की ओर से जताए गए विश्वास को सार्थ बनाने का मैं प्रयास करूंगी. अविनाश धर्माधिकारी ने अपने मंतव्य में प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे को जिम्मेदारी की इस नयी इनिंग के लिए शुभकामनाएं दी.

प्रा. डॉ. गजानन एकबोटे ने मार्गदर्शन करते हुए प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के इतिहास और कामकाज की जानकारी दी. उन्होंने कहा कि, राजनीति में करते समय समाज के सभी घटकों को साथ में लेकर काम करें.

## डॉ. निवेदिता एकबोटे यांचा सत्कार

**पुणे :** भारतीय जनता युवा मोर्चाच्या युवती आघाडीच्या शहराध्यक्षपदी प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांची निवड झाल्याने प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. एकबोटे या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह आहेत. संस्थेच्या सभागृहात हा कार्यक्रम आयोजित केला होता. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, सचिव शामकांत देशमुख, सहकार्यवाह, नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे आदी यावेळी उपस्थित होते.

Maharashtra times: 11.10.2020

## डॉ. निवेदिता एकबोटे यांचा सत्कार



डॉ. निवेदिता एकबोटे

**पुणे :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह डॉ. निवेदिता एकबोटे यांची नुकतीच भाजप पुणे शहर युवती आघाडी मोर्चाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली. यानिमित्ताने संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते डॉ. एकबोटे यांचा सत्कार करण्यात आला.

'अनपेक्षितपणे राजकीय जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली आहे , याचा मला फार मोठा आनंद झाला आहे,' असे डॉ. एकबोटे यांनी सांगितले. धर्माधिकारी यांनी डॉ. एकबोटे यांची वाटचाल उत्तम दिशेने होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी मनोगत व्यक्त केले. सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी आभार मानले.

# *Congratulations Prof. Dr. Nivedita G. Ekbote Madam*

## डॉ. निवेदिता एकबोटे यांचा सत्कार



**पुणे** : पुणे शहर भारतीय जनता युवा मोर्चा युवती आघाडीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे प्रा.डॉ. निवेदिता एकबोटे यांचा सत्कार करण्यात आला. माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते हा सत्कार झाला.

डॉ. निवेदिता एकबोटे म्हणाल्या, मला प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीकडून प्रशासनाचे, तर अविनाश धर्माधिकारी यांच्या चाणक्य मंडलकडून व्यवस्थापनाचे धडे शिकायला मिळाले! डॉ. गजानन एकबोटे व प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांचा वारसा आपण पुढे नेऊ, तसेच पक्षाने दाखवलेला विश्वास सार्थ करू.

संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले, राजकारणात काम करताना तळागाळातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करावे, प्रामाणिकपणा आणि कष्ट व नम्रता महत्त्वाची आहे.

यावेळी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सहकार्यवाह प्रा. सुरेश तोडकर उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक संस्थेचे सचिव प्रा. शामकांत देशमुख यांनी केले. प्रा.ज्योत्स्ना एकबोटे यांनी आभार मानले.



**Kesari: 11.10.2020**

## युवती आघाडी अध्यक्षपदी प्रा. निवेदिता एकबोटे

**पुणे, दि. १०** - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वतीने प्रा. निवेदिता एकबोटे यांची पुणे शहर भारतीय जनता युवा मोर्चा युवती आघाडी अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, संस्थेचे सचिव प्रा. शामकांत देशमुख उपस्थित होते. प्रा. निवेदिता एकबोटे या संस्थेचे उपकार्यवाह म्हणून कार्यरत आहेत. 'अनपेक्षितरित्या ही राजकीय जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली आहे. शिक्षणक्षेत्र व राजकीय क्षेत्र यांची सांगड घालून मी काम करणार आहे. युवती व महिलांच्या उन्नतीसाठी मला काम करण्याची संधी मिळाल्याचे प्रा. एकबोटे म्हणाल्या. डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, राजकारणात काम करताना तळागाळातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करावे. प्रामाणिकपणा, कष्ट व नम्रता महत्त्वाची आहे. तसेच काहीवेळेस मौनम सर्वार्थ साधनम हे लक्षात ठेवले पाहिजे, असा कानमंत्र दिला.



**Prabhat: 11.10.2020**

# *Congratulations Prof. Dr. Nivedita G. Ekbote Madam*



## भाजप युवती आघाडी अध्यक्ष डॉ. निवेदिता एकबोटे यांचा सत्कार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** भाजपच्या युवा मोर्चा युवती आघाडी अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षण क्षेत्र आणि राजकीय क्षेत्राची सांगड घालून काम करण्यात येईल, असे याप्रसंगी डॉ. निवेदिता एकबोटे यांनी सांगितले.

माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते डॉ. निवेदिता एकबोटे यांचा सत्कार करण्यात आला. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे, सचिव प्रा. शामकांत देशमुख यावेळी उपस्थित होते. डॉ. निवेदिता म्हणाल्या की, पक्षाने माझ्यावर जबाबदारी सोपविली आहे. पक्षाच्या नेत्यांनी दाखविलेला विश्वास कामातून सिद्ध करेन. युवती आणि महिलांच्या उन्नतीसाठीही प्रयत्न करेन. राजकीय क्षेत्रात सन २०१४ पासून नवी नांदी सुरू झाली आहे. नव्या ऐतिहासिक काळाची ही सुरुवात आहे, असे अविनाश धर्माधिकारी यांनी सांगितले. तर राजकारणात काम करताना तळागाळातील लोकांना बरोबर घ्यावे, अशी सूचना डॉ. प्रा. गजानन एकबोटे यांनी केली.

लोकसत्ता Tue, 13 October 2020 https://epaper.loksatta.com/c/



# Poetry by Principal Dr. R. S. Zunjarrao Sir

**मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र एस. झुंजारराव सर यांनी केलेले हे काव्यपुष्प.**










# Report of the Institutional Repository @ MCASC


Home Browse Help Search DSpace Sign on to:

Progressive Education Society's
Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous)
Shivajinagar, Pune - 411005
DSPACE INSTITUTIONAL REPOSITORY

DSpace @ P.E.Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5

*From Chairman's Desk-*

*Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce, Shivajinagar, Pune -5 was established in the year 1970 as the first senior college of Progressive Education Society. Right from the establishment of the college, library has been an integral part of the academic development. With the implementation of 'modern' technologies, the college library has been 'progressing' in the right direction. I am proud to mention that as a part of the Golden Jubilee Celebrations of the College, we are launching the 'Institutional Repository' which will showcase digital content of the intellectual output of our faculty, staff and students. I express my best wishes to the Principal, all LMC Members, all staff members, and students of this college.*

*With Best Regards,*
*Prof. Dr. Gajanan R. Ekbote,*
*M.S. M.N.A.M.S.*
*Chairman, Business Council,*
*P. E. Society, Shivajinagar, Pune -5*

*From Principal's Desk-*

*Library and education share an inseparable bond where one cannot exist without the other. Even in era of digital world, college library shall remain as a primary learning resource and a 'higher end support'. In the 50th Year of the establishment of the college, we are launching the 'Institutional Repository' which can be regarded as 'Institutional Curriculum-Vitae'. I express my deep sense of gratitude to the Chairman, Business Council of Progressive Education Society, Prof. Dr. G. R. Ekbote, for his valuable guidance and continuous encouragement. Prof. P. S. Chirputkar, Dr. A. K. Pande and Prof. Mrs. Jyotsna Ekbote (Chairperson, LMC) and members of LMC for always been a source of support and inspiration. I am also thankful to Prof. Shamkant Deshmukh, Secretary, Progressive Education Society, for his support and encouragement. I express my best wishes to all those who are involved in the development of Institutional Repository and hope it will serve its purpose.*

*With Best Regards,*
*Dr. Rajendra S. Zunjarrao*
*Principal*

The ***Institutional Repository (IR)*** of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 was digitally inaugurated by Hon'ble MLA Shri. Udayji Samant (Higher and Technical Education Minister, Govt. of Maharashtra) in presence of Hon'ble Vice Chancellor of SPPU, Pune Prof.Dr.Nitin Karmalkar, Joint Director Higher Education Pune Dr.Mohan Khatal, Hon'ble Prof.Dr.Gajanan Ekbote Sir (Chairman, Progressive Education Society, Shivajinagar Pune-5), Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam, LMC Members and other dignitaries on 12th February 2020 as one of the Innovative Programs in the Golden Jubilee Celebrations of our college.

The open access repository has been receiving good response from the faculty members and students. Especially, in the COVID-19 pandemic situation, when students are not able to access the library physically, the MCASC, Pune-5 Library and Information Centre has found out several ways in which the syllabi related reading materials, lecture notes, online lecture recordings, webinars, open educational resources etc. will be reaching to the students at their

door steps totally free of cost. All this was made possible by the progressive thinking of the Respected Members of Management of Progressive Education Society and Principal Dr. Rajendra Zunjarrao Sir.

In the month of **October 2020**, **the total items uploaded in various categories of the Institutional Repository has crossed 695 Items.**

We are thankful to the students who are extensively using the Institutional Repository and the Teachers who have been contributing their Online Lecture Recordings, YouTube Videos, PPTs, Lecture Notes and other Reading Materials.

As a new addition from the October 2020 MODLIB Issue, with suggestion and due permission from Respected Principal Dr. Rajendra Zunjarrao Sir we are introducing this section which will showcase the Monthly Report of the Contributions of Items in IR@MCASC.

***Name of the Faculty Members who have contributed the E-contents in IR@MCASC in October 2020:***

- Prof. Dr. Amruta S. Oke, Head, Department of Psychology
- Prof. Sharad R. Chaudhari, Head, Department of Electronic Science
- Prof. Sneha Mahajan, Head, Department of German
- Prof. Dr.Ashok Bhavale, Head, Department of Mathematics
- Prof. Pooja Paratne, Department of Mathematics
- Prof. Sanket Gogte, Department of Physics
- Prof. Pratul Gadagkar, Department of Mathematics
- Prof. Smita Vaidya, Department of Psychology
- Prof. Dr. Shraddha Sakaktkar, Department of Psychology




- Prof. Prachi Atre, Department of German
- Prof. Ashwami Patil, Department of German
- Prof. Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi
- Prof. Dr.Vaijayanti Jadhav, Department of Marathi
- Prof. Vinod Pawar, Department of Marathi
- Prof. Pratap Patil, Department of BBA(CA)
- Prof. Shreya Vaidya, Department of Commerce (Self-financed)
- Prof. Dipti Gaonkar, Department of Commerce (Self-financed)
- Prof. Shridevi Pawar, Department of BBA(CA)
- Prof. Sonali Raut, Department of BBA(CA)




*We request all to help us in enriching IR@MCASC*

# Event Conducted by National Service Scheme (NSS) in October 2020

# *Celebration of Birth Anniversaries of Mahatma Gandhiji and Lal Bahadur Shastriji 2nd October 2020*

On Friday, 2nd October 2020, NSS Volunteers of Modern College, Shivajinagar, Pune-5 organized online program on the occasion of Mahatma Gandhi Jayanti and Lal Bahadur Shastri Jayanti. The program was carried out under the guidance of Honorable Principal of MCASC Dr. Rajendra Zunjarrao Sir and Dr. Prabhakar Varade Sir (NSS Program Officer of MCASC). This Day is also known as "Non Violence Day.

The beginning of the program was carried out by Bhajan by NSS Volunteers Amruta Diwate. Principal Dr. Rajendra Zunjarrao Sir in his speech motivated the students with the life changing incidences that took place in Mahatma Gandhiji's life and Lal Bahadur Shastriji's life. Principal Sir's online motivational speech was followed by NSS Program Officer Prof. Dr. P.S.Varade Sir, who also presented some unknown facts about the two legends. NSS Volunteer Vaishnavi Surve delivered the speech on *"Life Story of Gandhiji"*. Rutuja Sable recited a poem written by her on Gandhiji. NSS Volunteer Gauri Khairnar gave the speech on Lal Bahadur Shastri. Volunteer Sukanya Aru recited poem on Shastriji. One Act Play, *"Notevarche Gandhiji"* was performed online by Volunteer Tanaya Mondhe. NSS Volunteer Shyamsundar Kasbe recited heart touching poem on Gandhiji. NSS Volunteer Rutuja Galande delivered the speech on *"History of Gandhiji"*. NSS Volunteer Afsha Mashayak recited *"Gandhi Mahntale Aste..."* , a marathi poem on Gandhiji. The online program was concluded with another heart touching poem recited by Mrunal Pawar on Gandhiji.

NSS Volunteer Purva Sankpal did the anchoring of the poem. In this way, the NSS Volunteers of MCASC,Pune-5 celebrated Gandhi Jayanti and Lal Bahudur Shastri Jayanti with full enthusiasm.









# *Events Conducted in the Library During October 2020*

## 1. Mahatma Gandhi Jayanti & Lal Bahadur Shastri Jayanti: 2nd October 2020

The Library and Information Centre and NSS Unit of Progressive Education Society's Modern college of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated the Birth Anniversaries of Father of the Nation Mahatma Gandhiji and 2nd Prime Minister of India Lal Bahadur Shastriji on Google Meet Online Platform in the COVID-19 Pandemic Situation on 02nd October 2020.

Respected Principal Dr.Rajendra S. Zunjarrao Sir, College NSS Programme Officer, Prof. Dr. Prabhakar S. Varade, College Librarian Dr. Shantashree Sengupta, Library Staff and Office Non-teaching Staff were present during the programme. Books on Mahatma Gandhiji and Lal Bahadur Shastriji were also displayed by the library on the occasion of the birth anniversaries.

All the rules of physical distancing were followed during the programme. The programme was attended on online platform by all the Vice Principals, HoDs, Teaching and Non-teaching Staff and our dear students.



# *Events Conducted in the Library During October 2020*






















# Events Conducted in the Library During October 2020

## 3. Dr. A.P.J. Abdul Kalam Jayanti and Vachan Prerna Din

**वाचन प्रेरणा दिन** (दिनांक १५ ऑक्टोबर २०२०)

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे -०५ येथील ग्रंथालय विभागाने आणि मराठी विभागाने मा. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ***वाचन प्रेरणा दिन*** दिनांक १५ ऑक्टोबर २०२० रोजी आयोजित केला.





कार्यक्रमाची सुरुवात भारताचे लोकप्रिय माजी राष्ट्रपती मा. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी पुष्पहाराने अभिवादन करून केली.






वाचन प्रेरणा दिनाच्या निमिताने महाविद्यालयाच्या ग्रंथालात प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्या हस्ते पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.राजेंद्र झुंजारराव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. वाचनाने मनुष्याचा विकास होतो,जेव्हा संधी मिळेल तेव्हा आपण वाचन केले पाहिजे असे ते म्हणाले. महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग वाचन संस्कृतीतील अतिशय महत्वाचा दुवा आहे असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांच्यामध्ये वाचन संस्कृती रुजावी म्हणून दोन उपक्रमाचे उदघाटन

## *Events Conducted in the Library During October 2020*

यावेळी मा.प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले.पदवी पातळीवरील विद्यार्थ्यांसाठी संदर्भ ग्रंथाचे परीक्षण आणि पदव्युत्तर पातळीवर संशोधन पत्रिकांचे परीक्षण असे दोन उपक्रम यावेळी नव्याने सुरु करण्यात आले.

या वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमाचे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आकर्षण ठरले ते म्हणजे मराठी विभागाने ऑनलाईन आयोजित केलेल्या मराठी साहित्याचे वाचन. कविता वाचन, कथावाचन, निबंध वाचन, नाट्य वाचन असा सुमारे दोन तासांचा ऑनलाईन सादरीकरणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. **वाचन संस्कृती** या विषयावर कवी प्रा. डॉ. अरविंद हंगरगेकर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन आयोजित केले. याप्रसंगी पन्नासहून अधिक विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते. या कार्यक्रमात महाविद्यालयातील इतर प्राध्यापक सहकाऱ्यानी सहभाग नोंदवला.हिंदी विभागप्रमुख डॉ.प्रेरणा उबाळे यांनी बालपणीच्या आठवणी संदर्भात एक कविता सादर केली. अनिमेशन विभागाचे समीर नेर्लेकर, वाणिज्य विभागाचे रुपेश बनसोडे यांनी सहभाग घेतला.




ऋतुजा चिंचपुरे, कविता देवकर, समीर गायकवाड, रजनी तांबे, पूजा गोतारणे, आफसा, खालिद रहमानी, अरुण गावडे, धनश्री मोरे, सुनील वानखेडे. ऐश्वर्या शास्त्री, राजेश रिठे, सुकन्या आरु, सायली रौंदवाल, विद्या मारकड, ऋतुजा साकोरे, कृष्णा पिंगळे, रवींद्र शिंदे, आदिनाथ जवेर इत्यादी नवोदित कलावंत विद्यार्थ्यांनी आपले सादरीकरण उत्स्फूर्त सादर केले.यावेळी महाविद्यायाच्या कला विभागाच्या उपप्राचार्या डॉ. अमृता ओक, मराठी विभागातील प्रा. डॉ. गजानन अपीने, प्रा. विनोद पवार ह्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# वाचन प्रेरणा दिन- १५ ऑक्टोबर २०२०







कार्यक्रमाच्या संयोजक डॉ. वैजयंती जाधव यांनी यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. निशा भंडारे यांनी केले. आभार प्रा. सुरेश रासकर यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. एन.एस.एस विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला.कार्यक्रम अधिकारी श्री.प्रभाकर वऱ्हाडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जिल्हा समन्वयक श्री.शिवाजी पाचर्णे उपस्थित होते. साक्षी बिरादार हिने एक कविता सादर केली. स्वप्नील पवार या विद्यार्थ्याने ए. पी.जे ,अब्दुल कलाम यांच्या सोबत घालवलेले काही क्षण आठवणींच्या रूपाने विद्यार्थ्यांसमोर मांडले. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात भाग घेतला.ऐश्वर्या शास्त्री,धीरज राऊत, निकिता कट्टीमनी ,आफ़शा माशयाक ,मृणाल पोवार ,ऋषिकेश राऊत या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपने सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र झुंजारराव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.




Image Courtesy: Google Images

# *Events Conducted in the Library During October 2020*

## 2. Maharshi Valmiki Jayanti, Indira Gandhi Punyatithi and Rashtriya Sankalp Diwas ; Sardar Vallabhbhai Patel Jayanti and Rashtriya Ekta Diwas– 31st October 2020

On 31.10.2020 as per the Government of Maharashtra Circular, the Library and Information Centre under the guidance of Respected Principal Dr.R.S.Zunjarrao Sir organised program on Maharshi Valmiki Jayanti, Indira Gandhi Punyatithi and Rashtriya Sankalp Diwas ; Sardar Vallabhbhai Patel Jayanti and Rashtriya Ekta Diwas.

College NSS Programme Officer Prof.Dr.Prabhakar Varade and Prof.Dr.Vaijayanti Jadhav, Department of Marathi were also present during the event in the library. Principal Sir started the programme with Rashtriya Ekta Diwas Pledge. In his speech, Principal Sir mentioned the points which we can learn from Maharshi Valmiki, Iron Man Sardar Vallabhbhai Patel and Iron Lady & India's first and only Woman Prime Minister Mrs.Indira Gandhi.

The program was conducted in the Library by following the Physical Distancing principle in the COVID-19 situation.







RASHTRIYA EKTA DIWAS PLEDGE

I solemnly pledge that I dedicate myself to preserve the unity, integrity and security of the nation and also strive hard to spread this message among my fellow countrymen, I take this pledge in the spirit of unification of my country which was made possible by the vision and actions of Sardar Vallabhbai Patel I also solemnly resolve to make my own contribution to ensure internal security of my country.





राष्ट्रीय एकात्मता शपथ

" मी गांभीर्यपूर्वक शपथ घेतो/ घेते की, देशाचे स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय एकात्मता अबाधित राखण्यासाठी व दृढ करण्यासाठी मी निष्ठापूर्वक काम करीन"

• मी अशीही प्रतिज्ञा करतो/करते की, मी कधीही हिंसाचाराचा अवलंब करणार नाही. तसेच मी सर्व धार्मिक, भाषिक किंवा प्रादेशिक मतभेद व तंटे किंवा इतर राजकीय वा आर्थिक गाऱ्हाणी शांततामय आणि सांविधानिक मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न चालू ठेवीन.



# *Events Conducted in the Library During October 2020*









# Activities conducted by Modern Media Station

# मॉडर्न व्याख्यानमाला २०२०

*Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 in association with Rotary Club, Shivajinagar, Pune conducted a Webinar Series as an ***Online Co-curricular Activity*** for all students and staff of Modern College, Shivajinagar, Pune-5.

The activity commenced on every Thursday and Saturday through **Modern Media Station** (the official YouTube channel of Modern College, Pune 5. ) the online sessions will be streamed.

In the Inaugural session on 11th July 2020, Principal Dr. R. S. Zunjarrao Sir said -

*"We are at home due to COVID 19 Pandemic and lockdown. We have to take care of our physical as well as emotional health, come of negativity (if any), cherish ourselves, make ourselves happy and energize thereby...... Here is an opportunity brought to you from Modern College, Pune-5. All may please visit Modern Media Station on You Tube. The session will be live on this station. Like, Share and Subscribe the official YouTube channel of our College. Feel Happy....Be Happy".*







**Modern Media Station Channel Link** :- https://www.youtube.com/channel/UCrbSMrkl_zYoARiZEZ6TfXA

# Events organized by Departments and Committees during October 2020

# ऑनलाईन राष्ट्रीय हिंदी निबंध प्रतियोगिता: सितंबर २०२०: पुरस्कार वितरण

## मॉडर्न महाविद्यालय (स्वायत्त) में हिंदी माह समारोह संपन्न

हिंदी विभाग, मॉडर्न महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे -05 की ओर से आयोजित ***हिंदी माह समारोह तथा ऑनलाईन राष्ट्रीय हिंदी निबंध-लेखन प्रतियोगिता का पुरस्कार वितरण समारोह*** दि. 03 अक्टूबर 2020 को संपन्न हुआ। इस कार्यक्रम का आयोजन ऑनलाईन प्रणाली से, गूगल मीट के माध्यम से किया गया था।

— डॉ. प्रेरणा उबाळे, हिंदी विभागाध्यक्षा






प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटी का

मॉडर्न कला, विज्ञान और वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे-05

हिंदी विभाग द्वारा आयोजित

'ऑनलाइन हिंदी माह समारोह'

तथा

'ऑनलाइन राष्ट्रीय हिंदी निबंध -लेखन प्रतियोगिता : सितंबर 2020' पुरस्कार वितरण समारोह

शनिवार, दि. 03 अक्तूबर 2020 को मनाए जानेवाले हिंदी माह समारोह के अवसर पर अतिथि डॉ. ओंकारनाथ शुक्ल, हिंदी अधिकारी, आई.आई.टी.एम., पुणे जी का सरकारी कार्यालयों में हिंदी का अनुप्रयोग : विभिन्न दिशाएँ में व्याख्यान आयोजित किया गया है। साथ ही इस कार्यक्रम में 'ऑनलाइन राष्ट्रीय हिंदी निबंध लेखन प्रतियोगिता : सितंबर 2020' के पुरस्कार ऑनलाइन घोषणा की जाएँगी। प्रतियोगिता में सफल सभी विद्यार्थी हिंदी दिवस के कार्यक्रम हेतु सुबह 11. 30 बजे ऑनलाइन उपस्थित रहें।

- स्नातक विभाग (U.G.) -
  1. प्रथम - आफशाँ कलीम पाशा मशायक (मॉडर्न क.वि. और वाणिज्य (स्वायत्त), पुणे)
  2. द्वितीय - अशोक नारायण माने (मॉडर्न क.वि. और वाणिज्य (स्वायत्त), पुणे)
  3. तृतीय - उर्जा अंब्रे (सेंट जोसेफ कॉलेज, बैंगलरू)
  4. चतुर्थ - यति मिश्रा (सेंट झेवियर्स कॉलेज, मुंबई)
- स्नातकोत्तर एवं अनुसंधान विभाग (P.G. and Research Section) -
  1. प्रथम - नम्रता रणसिंग राठोड (कर्वे समाज सेवा संस्था, पुणे)
  2. द्वितीय - दिनकर शंकर चौगुले (मॉडर्न क.वि. और वाणिज्य (स्वायत्त), पुणे)
  3. तृतीय - जया बालकृष्ण उभे (प्रतिभा कॉलिज, चिंचवड, पुणे)
  4. चतुर्थ - माधुरी महादेव सूर्यवंशी (शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज)

  सभी पुरस्कारार्थी छात्रों का हिंदी विभाग की ओर से अभिनंदन। सभी छात्र कृपया हिंदी विभागाध्यक्षा डॉ. प्रेरणा उबाळे जी (संपर्क नं. 7028525378) से संपर्क करें।
- महाविद्यालय के सभी विषयों के प्राध्यापक और विद्यार्थी प्रस्तुत समारोह के लिए सादर निमंत्रित हैं।

P. Ubale 01/10/2020
डॉ. प्रेरणा उबाळे
संयोजिका, हिंदी विभागाध्यक्षा

1/10/2020
डॉ. राजेंद्र झुंजारराव
प्राचार्य

# ऑनलाईन राष्ट्रीय हिंदी निबंध प्रतियोगिता: सितंबर २०२०: पुरस्कार वितरण


























# ऑनलाईन राष्ट्रीय हिंदी निबंध प्रतियोगिता: सितंबर २०२०: पुरस्कार वितरण



## मॉडर्न महाविद्यालयामध्ये ऑनलाईन हिंदी माह समारंभ संपन्न

Posted By: Admin on: October 06, 2020
In: क्रीडा, शिक्षण, आरोग्य No Comments
Print Email

Share this post:

पुणे (महाराष्ट्र ब्रेकिंग)- हिंदी विभाग, मॉडर्न महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे -05 द्वारे आयोजित हिंदी माह समारंभ आणि आॅनलाईन राष्ट्रीय हिंदी निबंध लेखन स्पर्धेचा पुरस्कार वितरण समारंभ 03 आॅक्टोबर रोजी संपन्न झाला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाचे आयोजन प्रत्यक्ष न करता आॅनलाईन पध्दतीने, गूगल मीटच्या माध्यमातून केले गेले.

हिंदी माह समारंभाच्या सुरुवातीला हिंदी विभागप्रमुख डॉ. प्रेरणा उबाळे यांनी प्रास्ताविक केले. 1970 पासून हिंदी विभागाच्या वाटचालीचे आणि हिंदी विभागामध्ये हिंदी दिवस साजरा करण्याच्या परंपरेबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच 2016 पासून हिंदी विभागामध्ये चालवल्या जाणाऱ्या "अरुणिमा" नामक भित्तिपत्रिका व यावर्षीपासून त्याच्या स्वरूपातील झालेल्या बदलाची माहिती दिली. हिंदी दिवसानिमित्त हिंदी विभागाच्या विद्यार्थ्यांनी लिहलेल्या "अरुणिमा" भित्तिपत्रिकेचे प्रस्तुतीकरण डॉ. प्रेरणा उबाळे यांनी केले.

हिंदी विभागातील विद्यार्थ्यांच्या स्वरचित कविता वाचनाने या कार्यक्रमाला आणखी हिंदीमय बनवले. हिंदी माह समारंभ आणि निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरणानिमित्त प्रमुख वक्ता म्हणून डॉ.ओंकारनाथ शुक्ल (हिंदी अधिकारी, भारतीय उष्णदेशीय हवामान विज्ञान विभाग, पुणे) उपस्थित होते. त्यांनी "हिंदी भाषेतील रोजगाराच्या विविध संधी" या विषयावर मार्गदर्शन करताना म्हटले, "हिंदी ही वैश्विक भाषा असून हिंदी भाषेच्या वाढत्या वापरामुळे विद्यार्थ्यांसमोर नवनवीन क्षेत्रे सुरु होत आहेत ज्यांचा योग्य लाभ विद्यार्थ्यांनी घेणे आवश्यक आहे."

या कार्यक्रमामध्ये "आॅनलाईन राष्ट्रीय हिंदी निबंध लेखन स्पर्धा : सप्टेंबर 2020" च्या पुरस्कार विजेत्यांची घोषणा करण्यात आली.निबंध स्पर्धेचे परीक्षण मूळजी जेठा महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील प्राध्यापक विजय लोहार यांनी केले. प्रा. लोहार तसेच सर्व पुरस्कार विजेतेदेखील या कार्यक्रमामध्ये सहभागी झाले होते. यासर्वांनी राष्ट्रीय हिंदी निबंध लेखन स्पर्धेच्या आयोजनाबद्दल अत्यंत आनंद व्यक्त केला आणि विद्यार्थ्यांच्या सृजनशक्तीला यातून वाव मिळत असल्याचे स्पष्ट केले.

मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी हिंदी विभागातील विविध उपक्रमांची प्रशंसा केली. प्रस्तुत कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय हिंदी निबंध लेखन स्पर्धेतील सहभागी निबंध लेखक, अनेक विद्यार्थी, हिंदीचे इतर महाविद्यालयातील प्राध्यापकदेखील उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागातील प्राध्यापक असीर मुलाणी यांनी केले तर संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन हिंदी विभागप्रमुख डॉ. प्रेरणा उबाळे यांनी केले. आॅनलाईन पद्धतीने साजरा झालेला हांदी माह समारंभ अत्यंत नियोजनबद्धतेने पार पडला. "अरुणिमा" भित्तिपत्रिकेचे प्रस्तुतीकरण, स्वरचित हिंदी कविता वाचनामुळे त्याला निराळे साहित्यिक स्वरूप प्राप्त झाले.



# Department of German

October 3rd, 2020 marks the 30th ***ANNIVERSARY OF REUNIFICATION OF GERMANY***
To celebrate this important and symbolic day of Germany, the German Special students of Department of German hosted three different online competitions for the students of Modern College, S.P. College Pune and Fergusson College Pune (These are the 3 colleges where German Special is offered at the Bachelor level) thereby virtually reuniting the students as well as teachers of all three colleges in a fun learning way.
The competitions - Quiz, Poster Presentation and Debate - were held throughout the day and the virtual Prize Declaration Ceremony was conducted in the evening.
All the students, organizers as well as participants excelled at their tasks and made this historic day of Germany a historic event for the Department of German and the College.

- Prof.Sneha Mahajan, Head, Department of German.

**Snapshot from the Prize Declaration Ceremony**



# One Week Online Faculty Development Program on Microsoft Teams

IQAC and e-Content Development Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 organised ***One Week Online Faculty Development Programme on Microsoft Teams*** from 05th October to 10th October 2020 on Google Meet Platform.

Prof.Dr.Anjali Sardesai, IQAC Co-ordinator was the Resource Person for the Faculty Development Programme. All the teaching faculty members of Senior and Junior College attended the FDP.

We are thankful to Progressive Education Society, Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir and Prof.Dr.Anjali Sardesai for introducing yet another advanced Learning Management System beneficial for Online Learning and Evaluation System.












# *Department of Psychology—World Mental Health Day*

The Department of Psychology, Modern College of Arts, Science and Commerce, Shivajinagar, celebrated ***World Mental Health Day,*** its first online programme, amidst the COVID Pandemic on 10th October, 2020. The programme commenced with an address from Honorable Principal Sir, Prof. Dr. Rajendra Zunjarrao. Sir spoke about importance of mental health for society as a whole and initiatives of the college including the Counselling cell and other projects in the pipeline by college aimed towards enhancing the availability of mental health care for public. This was aligned with this year's theme "Mental Health for All Greater Investment – Greater Access. Everyone, everywhere".

This was followed by invaluable words of wisdom for students from Vice Principal (Arts) and HOD (Psychology), Dr. Amruta Oke Madam, and our beloved teachers Ms. Smita Vaidya and Mrs. Shraddha Sakatkar.

Then it was time for fun activities– "Myth or Fact" to create awareness; "Art Therapy" to destress while appealing to your creative side; "Ian", a short movie, emphasized the need to create a more inclusive world. At the game of "Taboo", M.A. 1st& 2nd year students locked horns to answer questions about Psychology. "Elephant in the Room", where students shared their own struggles with mental health highlighted the importance of empathy & compassion towards those around us. After all the merriment it was imperative to part ways by giving few coping techniques for better mental health – Mindfulness activity and Drum Circles were just these tools. The program ended with a video containing messages from 2nd year students on mental health.

Overall, this program provided a good platform to have honest conversations about mental health with 60+ participants and helped everyone bond virtually for a common cause despite the COVID times.













## Department of Psychology—World Mental Health Day

### जागतिक मानसिक आरोग्य दिन

मित्र - मैत्रिणींनो जागतिक मानसिक आरोग्य दिना निमित्त तुमच्याशी थोडे बोलायचे आहे. या फील्ड मध्ये असल्यामुळे मानसिक आरोग्याविषयी जागृती निर्माण करणं आणि आपले आरोग्य कसे जपावे हे सांगणे ही माझी जबाबदारी आहे असे मी समजते म्हणून हा छोटासा प्रयत्न. विशेषतः ह्या कोरोनाच्या काळात ते खूप महत्त्वाचे वाटते.

आपण शारिरीक आरोग्याच्या बाबतीत जेवढे जागरूक आहोत तेवढे मानसिक आरोग्या विषयी नसतो असे दिसून येते .खरतर शारिरीक आरोग्य हा मानसिक आरोग्याचा एक भाग आहे.

शारिरीक,मानसिक आणि सामाजिक हे तीनही घटक मानसिक आरोग्या मध्ये येतात किंवा हे एकमेकांवर अवलंबून असतात. त्यापैकी आपण शारिरीक दृष्ट्या फिट राहण्यासाठी बरेच काही करतो उदरणार्थ- व्यायाम करणे, चांगला आहार घेणे, नियमित डॉक्टर कडे जाणे, तपासण्या करणे इत्यादी.

आता जर मी तुम्हाला विचारले तुम्ही मानसिक दृष्ट्या फिट राहण्यासाठी काय काय करता तर कदाचित एक दोन पर्याय तुमच्या कडून येतील किंवा काही चे उत्तर काहीच नाही असेही असेल. आत्ता ह्या कारोनाच्या काळात आपण दक्षता म्हणून 'सी' व्हिटॅमिन, 'डी' व्हिटॅमिन घेत आहोत पण आपले मन फिट राहण्यासाठी काय करतो आहोत ? आपल्या मनाला पण व्हिटॅमिन ची गरज असते बरं! मग हे व्हिटॅमिंस कुठले आहेत?

१. नेहमी धनात्मक विचारांचे टॉनिक घेणे.

२. स्वतःच्या विचार,भावना, कृती ह्याबद्दल जागरूक असणे. जसे मनात सतत वाईट विचार येत आहेत त्यामुळे भीती किंवा राग येतो आहे, प्रेरणा, ऊर्जा न जाणवणे इत्यादी.

३. वरीप्रमाणे काही नेहमी पेक्षा वेगळे आणि जास्त तीव्रता जाणवत असल्यास प्रोफेशनल कडून मदत घेणे गरजेचे आहे जसे आपण आपल्या शारिरीक लक्षणांचे व शंकांचे निरसन आपल्या फॅमिली डॉक्टर कडून करून घेतो अगदी तसे. (सायकॉलॉजीस्ट, सायकियाट्रिस्ट हे तुम्हाला मदत करू शकतात)

४. आपल्याला कशामुळे ताण येतो आहे हे शोधणे आणि तो कमी करण्यासाठी प्रयत्न करणं. (त्यासाठी शास्त्रीय पद्धती असतात त्यालाच स्ट्रेस मॅनेजमेंट म्हणतो आपण)

५. आपल्यातल्या लहान मुलाला जपणे. आपण कितीही मोठे झालो तरी आपल्यात एक लहान मूल असते जे आपल्याला एनेर्जी देत असते, हसवत असते ,ज्याला हवे दावे नसतात , एकदम स्वच्छंदी आणि निरागस असते.

६. स्वतःच्या दोषांसकट स्वतःचा स्वीकार करा, आपण माणूस आहोत चुकू शकतो हे मान्य करा पण त्याच बरोबर त्या चुकांमधून शिकणं पण महत्त्वाचं. हे शिकणं म्हणजेच सुधारणा किंवा बदल जो तुम्हाला पुढे जाण्यासाठी प्रेरणा देतो.

७. आपले मन मोकळे करा . आपल्या मित्र मैत्रिणींशी बोला, आपले मन डस्टबिन नाहीये त्यात सगळे दाबून टाकले तर ते कुजणार आणि त्याचा त्रास होणार हे लक्षात घ्या.

८.आपल्याला काय आवडते काय केल्यावर छान वाटते ते करा.

## Department of Psychology—World Mental Health Day

९. वेग वेगळया जबाबदाऱ्या पार पाडत असताना त्यात स्वतःला विसरू नका. तुमच्या जबाबदाऱ्या हे तुम्ही निभावत असलेल्या भूमिका आहेत त्या पलीकडचे तुमचे अस्तित्व समजून घ्या. स्वतःशी कनेक्ट व्हा. ही कनेक्टिव्हिटी तुम्हाला खूप येनेर्जी देते त्यामुळे आपण संकटांवर मात करू शकतो.

१०. भूतकाळ सतत उगाळत बसणं आपल्याला फक्त दुःख ही भावना देते बाकी काही नाही. त्यापेक्षा तो अनुभव काय शिकवून गेला ह्यावर फोकस करा आणि 'लव यू जिंदगी ' म्हणत पुढे चला वर्तमानात जगा.

मानसिक आरोग्याचा तिसरा पैलू म्हणजे व्यक्तीची सामाजिक बाजू म्हणजे आपले इतरांशी असलेले संबंध. असे दिसून येते की आपल्याला येणाऱ्या बऱ्याचश्या समस्या याची कारणे ह्या पैलू मध्ये असतात जसे, त्याने मुद्दामच असे केले ,तो मला असे बोलला, कधी कधी तर दुसऱ्याने दिलेले negative strokes आपण खूप मनाला लावून घेतो आणि निराश पण होतो. आपली तिसरी बाजू ही सुदृढ करण्यासाठी काय करता येईल?

१. 'First impression is always last impression' हे विसरून revise perception असते त्यावर विचार करा आणि स्वताला तशी विचार करण्याची सवय लावा.

२. दुसऱ्याच्या भावना समजून घेणे, मान्य करणं इतकेच नाही तर तसे त्या व्यक्तीला सांगणे हे सुद्धा महत्त्वाचे आहे ज्यामुळे समोरच्याला तुम्ही त्याला समजून घेत आहात ह्याची जाणीव होते व संबंध सुधारण्यास मदत होते.

३. व्यक्ती बाबतीत पूर्वग्रह न ठेवता त्याला ऐकुण घेणे हे ही महत्वाचे.

ह्या आणि ह्या सारख्या बऱ्याच गोष्टी आपण करू शकतो आणि आपला PR वाढवू शकतो. हा PR आपली ताकद बनतो जो आपल्याला अनेक संकटापासून वाचवतो आणि आपले मानसिक आरोग्य चांगले राहते.

कोरोनाच्या काळात जसे शरीर फिट राहण्यासाठी आपण व्हिटॅमिन घेत आहोत तसेच मन निरोगी राहण्यासाठी वरील व्हिटॅमिनस घेत रहा ज्याचे प्रोडक्शन तुम्हीच करणार आहात त्यामुळे ते कोणाकडून विकत घ्यावे नाही लागणार . मग स्वतःला ह्या मानसिक आरोग्य दिना निमित्त एक प्रॉमिस करा मी माझ्या मानसिक आरोग्याची काळजी घेईन.

धन्यवाद!

**डॉ. श्रध्दा साकतकर**
**मॉडर्न महाविद्यालय**
**शिवाजीनगर**

# *Department of Animation- Creative Talk: Lecture Series 2020 (1st Day)*

Department of Animation organized a program ***Creative Talk*** for B. Sc. Animation students on 13th October 2020. Mr. Dipak Chaudhari, a renowned cinematographer and editor guided the students about the current industry trends. Session was inaugurated by Dr. Anjali Sardesai. Program was concluded by the question-answer session followed by the vote of thanks









# Department of German—An Orientation Session / A Virtual Welcome

The Department of German organised ***An Orientation Session/ A Virtual Welcome*** for all the German learning students of First Year (F.Y.B.A and F.Y.B.Com) on Friday, 16th October 2020 at 2:00 PM.

The aim of this orientation was to have a common platform for teachers and students to get to know each other and to inform the students about the German department of Modern College and various activities conducted by the department, about association with various German organisations like Geothe Institute, PASCH, BKD, DAAD etc and Scholarship opportunities to Germany!

The session was well received and during the Q and A round, a lot of students expressed their pleasure of having chosen German as a subject in their First Year and told us that they are enjoying learning a Foreign Language and would like to continue learning German further on.

It was indeed quite motivating for us teachers to hear words of praise from our students.

https://www.youtube.com/watch?v=g0qK8YxCZh8






# Department of Animation- Creative Talk: Lecture Series 2020 (2nd Day)

Department of Animation organized a program ***'Creative Talk 2020'*** on 20th October 2020 in which the topic was ***'Mural Art'***. Renowned Mural artist Girish Mahamuni guided the students on this topic. Mrs. Sujata Chaphekar, Principal, Modern primary school was present as a chief guest. The program was concluded by the question answer session followed by the vote of thanks.














# Department of Mathematics —'Guest Lecture Series'

*Progression Education Society's*
**Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous),**
**Shivajinagar, Pune-5**
**Department of Mathematics**
**Guest Lecture Series, October, 2020**
**For M.Sc.(Mathematics) Students**
**A Schedule**

**Time: 10.00AM To 12.00 Noon**

| Sr. No. | Date | Name of Subject | Topic | Name of Guest |
|---|---|---|---|---|
| 1 | 22/10/2020 | Commutative Algebra | Going up theorem, Going down theorem and related topics | Dr. Ganesh Kadu |
| 2 | 23/10/2020 (11:30AM to 1:30PM) | Ring Theory | Euclidean domain, Principle ideal domain, Unique factorization domain and related topics | Dr. A. S. Khairnar |
| 3 | 24/10/2020 | Complex Analysis | Cauchy theorem and integral formula, power series representation, classification of singularities and related topics | Prof. Dr. Prof. Y. M. Borse |
| 4 | 27/10/2020 | Functional Analysis | Open mapping theorem, Principle of Uniform Boundedness and related topics. | Dr. R. B. Sonawane |
| 5 | 28/10/2020 (12.00 Noon to 2.00PM) | Topology | Tychonoff's theorem and related topics | Prof. Dr. S. A. Katre |
| 6 | 29/10/2020 | Linear Algebra | Bilinear form, Hermitian form, Quadratic form and related topics | Dr. Smita Kandekar |
| 7 | 02/11/2020 | Field Theory | Radical Extension and related topics | Prof. Dr. B. N. Waphare |

Department of Mathematics has organized a 'Guest Lecture Series' during 22/10/2020 to 02/11/2020 for post graduate students of Mathematics. Most of the resource persons were from the Department of Mathematics, Savitribai Phule Pune University, Pune. All professors tried their best to deliver subject knowledge interestingly as well as enthusiastically. Also they were discussed some applications related to the subjects. All sessions were interactive and students participated actively in it. Students got motivated from this series of lectures.

Prof. K. R. Shinde
PG-Coordinator
(Mathematics)

Dr. A. N. Bhavale
Head,
Dept. of Mathematics

# *Online Inauguration of 'Patent, Consultancy and IPR Committee 2020-21'* and *Webinar on IPR : 'Intellectual Property Rights'*

Department of Biotechnology in association with **'Patent, Consultancy and IPR Committee'** organised Webinar on ***'Intellectual Property Rights'*** on 23rd October 2020 for students of all streams. Shri.Shridhar Parundekar was invited as Resource Person for the Webinar.

Respected Principal Dr. R.S.Zunjarrao virtually inaugurated the Webinar which commenced with the Online Inauguration of the 'Patent, Consultancy and IPR Committee 2020-21'.

Prof. Dr. Shilpa Mujumdar, Chairperson, IPR Committee; Prof. Dr. Sangita Bhagat, Head, Department of Biotechnology and Prof. Mrs. Radhika Oke organised the programme and managed the complete session which ended with fruitful two way interaction of the Speaker with the webinar attendees.



# *Online Inauguration of 'Patent, Consultancy and IPR Committee 2020-21'* and *Webinar on IPR : 'Intellectual Property Rights'*












# *Display of New Books by Library and Information Centre*

The Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 organised ***'Display of New Books'*** for Teaching and Non-teaching Staff Members on Saturday, 24th October 2020 under the guidance of Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir.

The display was inaugurated by Respected Principal Sir along with Vice Principal Prof.S.R.Chaudhari, Vice Principal Prof.Mrs.Dr.A.S.Oke, Vice Principal Prof.Dr.P.S.Dixit, IQAC Co-ordinator Dr.A.S.Sardesai, Prof.S.Thengadi, Registrar Shri.Ganesh Sathe and various teaching and non-teaching staff.

We are thankful to all the teaching and non-teaching staff members from various units of the college like Office, Accounts Section, Junior College Office, Laboratories, House Keeping Personnel and Security Personnel for paying their visit to library following physical distancing. The melodious Saraswati vandana 'Jai Sharda Vagheshwari' is sung by Mrs.Swati Patwardhan,Clerk,MCASC,Pune-5.




The display was organised following the rules of COVID19 and physical distancing was maintained.

I am thankful to my library team for their efforts in organizing the display and following all the rules to be taken during this pandemic regarding continuous sanitization of library, use of hand sanitizers and face masks.

- Dr. Shantashree Sengupta
Librarian









# *Display of New Books by Library and Information Centre*





# *Display of New Books by Library and Information Centre*



# *Display of New Books by Library and Information Centre*











***Thank you all for visiting the display of new books***



# Online Lecture Series on Importance of Values in Life

**Value Based Education Committee** of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar Pune 5 in Association with Ramakrishna Math, Pune organized ***5 Days online lecture Series on Importance of Values in Life.***

Date : 26th October 2020 to 31st October 2020

Time : 4.30 pm to 5.30 pm

Link to join : Modern Media Station Channel :

https://www.youtube.com/channel/UCrbSMrkl_zYoARiZEZ6TfXA

Progressive Education Society's

Modern College of Arts, Science and Commerce (AUTONOMOUS)

Shivajinagar, Pune-5

Value Based Education Commitee

IN ASSOCIATION WITH

**Ramkrishna Math, Pune**

Organize a 5 days Day lecture series on

"Importance of Values in life"

Date: 26th to 31st October 2020

Time: 4.30 pm To 5.30 pm(Online)

Audience: UG, PG students and staff members

Objectives of the Workshop:

- To acquaint students with the core values such as physical, mental and spiritual aspects of personality
- Developing respect for the dignity of individual and the society
- Inculcation of spirit of patriotism and national integrity and
- Developing tolerance towards understanding different religious faiths as well
- The course will help students to be a better human being and become strong pillar of society.

..nedule:

| Day And Date , | Time | Speaker | Topic |
|---|---|---|---|
| 26th October 2020 | 4 - 4.25Pm | Inauguration | |
| 26th October 2020 | 4.30-5.30pm | Dr. Shirish Limaye | Exploring self |
| 27th October 2020 | 4.30-5.30pm | Mr.Prashant Lele | Personal and professional values |
| 28th October 2020 | 4.30-5.30pm | Mr.Prashant Puppal | Family Values |
| 29th October 2020 | 4.30-5.30pm | Mr.Mahesh Gaikwad | Positive Attitude |
| 31st October 2020 | 4.30-5.30pm | Swami Buddhananda | Stressfree life |

Note: Participants will get link for the session half an hour before.

Contact:
Prof. Sonali Dehmukh , Dept. Computer science,
deshmukhcompsci@moderncollegepune.edu.in

Prof. Raghu Vidap
Chairperson VBE Committee

Prof. R.S. Zunjarrao
Principal






# *Institutional Social Responsibility*

One of our NCC Cadets and Sportsman, Navnath Ravindra Pawshe, student of TYBA who belongs to a financially weak family and is not able to attend the online classes in the COVID-19 pandemic situation, received help from Shri. Sandeep Kamble, Pune who presented him an Android Smartphone which will be useful for the student to attend the online classes. This benefit to the needy student was rooted through the Institutional Social Responsibility (ISR) Activity of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 under the guidance of Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir and Prof.Dr.Shubhangi Puranik, Chairperson of ISR Committee on 08.10.2020.



नागनाथ रविंद्र पावशे
TYBA
मॉडर्न कॉलेज
पुणे - 5

प्राचार्य,
मॉडर्न कॉलेज
पुणे - 5

विषय - शिक्षणासाठी मदत मिळण्याबाबत आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्या कारणास्तव

मी नागनाथ रविंद्र पावशे TYBA मॉडर्न कॉलेज, पुणे -5 येथे शिकत आहे.

माझी आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्याने Digital शिक्षण घेण्यास माझ्याकडे mobile नसल्याने अडचण येत आहे यासाठी मदत मिळावी.

मी सध्या sports मध्ये असून NCC चा cad. होतो.

9762214491
श्री. संदिप कांबळे

आपला विश्वासू
नागनाथ रविंद्र पावशे

मो. नं. - 7071451010







धन्यवाद



# *Faculty Members Invited as Resource Persons during October 2020*

# Prof.Dr. P.G.Dixit, Head, Department of Statistics Invited as Resource Person

## पी.व्ही.पी. महाविद्यालयात राष्ट्रीय वेबिनार

**कमवठेमहांकाळ :**

येथील पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयामध्ये जागतिक संख्याशास्त्र दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यानिमित्ताने नुकतेच 'चित्ताकर्षक संख्याशास्त्र' या विषयावर राष्ट्रीय वेबिनार संपन्न झाले. या वेबिनार चे प्रमुख पाहुणे आणि साधन व्यक्ती पुणे येथील मॉडर्न कॉलेज चे उपप्राचार्य आणि संख्याशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी.जी.दिक्षित यांनी याप्रसंगी संख्याशास्त्र विषयातील रोजगाराच्या संधी सांगून दैनंदिन जीवनातील अनेक समस्या सोडविण्यासाठी सांख्यिकीय तंत्रेआणि पद्धतींचा होणारा उपयोग अनेक मजेशीर उदाहरणे देऊन स्पष्ट केला. यावेळी डॉ. दिक्षित यांनी रोजच्या जीवनातील संख्याशास्त्रीय पद्धतीवर आधारित उदाहरणे सोप्या आणि ओघवत्या भाषेत सांगितली. वेबिनारचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एम. के. पाटील यांनी केले. वेबिनारचे तांत्रिक संयोजन ग्रंथपाल महेश कांबळे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. विजय कोष्टी यांनी केले. सदर वेबिनारास यूट्यूब लाइव्ह माध्यमातून अनेक संख्याशास्त्रप्रेमी शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदवीली. सद्यस्थितीत कोरोनामुळे शाळा, महाविद्यालये लॉकडाऊन असल्याने आंतरजाल माध्यमाच्या सहाय्याने दर पाच वर्षांनी साजऱ्या केल्या जाणाऱ्या संख्याशास्त्र दिनाचे औचित्य साधून सर्व सामान्यांना संख्याशास्त्राची ओळख व्हावी यासाठी एक दिवशीय राष्ट्रीय वेबिनार आयोजित केले असल्याचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे आणि प्रभारी प्राचार्य डॉ.एम.के.पाटील यांनी सांगितले.

अभिनंदन

# *Prof.Dr. Prerana Ubale, Head, Department of Hindi Invited as Resource Person*




अभिनंदन

# *Modern Achievements*

***Sania Rathod, XII D*** Student of MCASC, Pune-5 is the ***Winner of Pune Young Chef (Senior) Competition India 2020.*** She is awarded Rs.20,000, winners trophy and Certificate of Appreciation.

These are the pictures of her preparation and presentation from her house live on zoom with breakaway rooms, very interesting technology. Sania Rathod did everything in her house which was judged online.

*Hearty Congratulations Sania!!! We are proud of you*

(Inputs received from Dr.Manisha Mandhare)








**PUNE YOUNG CHEF INDIA 2020**

| WINNERS | NAME OF THE STUDENT | SCHOOL NAME |
|---|---|---|
| THIRD | BHAKTI DRESSWALA | GOPI BIRLA MEMORIAL SCHOOL MUMBAI |
| SECOND | SAMPADA JAMBHALE | NOWROSJEE WADIA COLLEGE |
| FIRST | SANIA VIJAY RATHOD | MODERN COLLEGE OF ARTS & COMMERCE |

**HYDERABAD YOUNG CHEF INDIA 2020**

| WINNERS | NAME OF THE STUDENT | SCHOOL NAME |
|---|---|---|



Image Courtesy: Google Images

# *Modern Achievements*













# *Modern Achievements*







Image Courtesy: Google Images

# *NEWLY ADDED BOOKS DURING OCTOBER 2020*

| Author | Title |
|---|---|
| Sakurai, J. J. | Advanced Quantum Mechanics |
| Rana, N. C. / Joag, P. S. | Classical Mechanics |
| Pradeep, T. | Nano: The Essentials Understanding Nanoscience and Nanotechnology |
| Cao, Guozhong / Wang, Ying | Nanostructures and Nanomaterials: Synthesis, Properties, and Applications |












# Books received on Gratis During October 2020

## *Prof. Dr.Gajanan R. Ekbote Sir donated 8 Volumes of*

## संपूर्ण महाभारत (Sampoorna Mahabharat Edited by Bhalabha Kelkar) to the MCASC, Pune-5 Library.






























# News Paper Clippings During October 2020




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time.

As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service.

The E-Newspaper Clippings Section is divided into ***Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous .***

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## सात ऑक्टोबरपासून सराव परीक्षा

### अंतिम परीक्षेची कल्पना येण्यासाठी आयोजन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा १२ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत 'एमसीक्यू' पद्धतीने होणार असून, परीक्षेची पूर्वकल्पना येण्यासाठी ७ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत सराव परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. या परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक कोणत्याही क्षणी विद्यापीठाच्या वेबसाइटवर जाहीर होण्याची शक्यता आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून ऑनलाइन पद्धतीने 'एमसीक्यू' परीक्षा घेण्यासाठी निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून एजन्सीची निवड करण्याची प्रक्रिया बुधवारी सायंकाळपर्यंत सुरू होती. रात्री उशिरा एजन्सीची निवड झाली असून, काही तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्यावर, वेळापत्रक जाहीर करण्यात येईल. विद्यार्थ्यांना 'एमसीक्यू' पद्धतीच्या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेचा अनुभव येण्यासाठी सराव परीक्षा घेतल्या जाणार आहेत. या सराव परीक्षा ७ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत घेण्यात येतील. विद्यार्थ्यांनी परीक्षेबाबत कोणतीही काळजी करू नये; तसेच कोणताही मानसिक ताण न घेता परीक्षा द्याव्यात, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

विद्यापीठातील काही शैक्षणिक विभागांनी त्यांच्या सराव व प्रत्यक्ष परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले असून, त्याचे प्रसिद्धीपत्रक विभागात लावण्यात आले आहे, अशी माहिती विद्यार्थ्यांनी दिली आहे. परीक्षा दिलेल्या वेळापत्रकानुसार पार पडल्या, तर सर्व निकाल १० नोव्हेंबरपर्यंत जाहीर होण्याची शक्यता आहे.

### 'ई-मेल व मोबाइल क्रमांक अचूक हवा'



'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी, त्यांच्या स्टुडंट प्रोफाइलमध्ये योग्य मोबाइल नंबर आणि ई-मेल आयडी नोंदवला आहे का, याची तपासणी करावी. त्यात काही चुका असतील, तर त्या तातडीने दुरुस्त कराव्यात. परीक्षांबाबतची सर्व माहिती व सूचना त्याद्वारे कळविण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्टुडंट प्रोफाइलमधील माहिती तपासून घ्यावी,' असे आवाहन डॉ. महेश काकडे यांनी केले आहे.

**Maharashtra times 1.10.2020**

## अंतिम वर्षाच्या परीक्षा बारगळल्या

### शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आंदोलन : वेळापत्रक कोलमडले

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : 'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर लांबलेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षा विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या लेखणी बंद आंदोलनामुळे बारगळल्या असून, सर्वच अकृषी विद्यापीठांनी तयार केलेले परीक्षांचे वेळापत्रक पूर्णपणे कोलमडले आहे. त्यामुळे ऑक्टोबर महिन्यापूर्वी परीक्षा घेण्याचे मोठे आव्हान राज्यातील विद्यापीठासमोर आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांसह मुंबई विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ, अमरावती विद्यापी[ठ] कोल्हापूर विद्यापीठ, (पान ७ वर)

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील परीक्षा सुमारे आठवडाभर पुढे ढकलल्या आहेत; मात्र एजन्सी निवडण्याचे काम सुरु आहे. तसेच, नागपूर विद्यापीठाने अनिश्चित काळापर्यंत परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. आंदोलनानंतर परीक्षेबाबत विचार करणार असल्याच[े] स्पष्ट केले आहे.
- अमरावती विद्यापीठाने ऑक्टोबर महिन्यापासून सुरु होणाऱ्या परीक्षांना स्थगिती दिली असून, मनुष्यबळाशिवाय परीक्षा घेता येणार नसल्याचे सांगितले. नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा येत्या ७ ऑक्टोबरपासून ऑनलाइन पद्धतीने होणार आहेत, तर आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या ऑगस्ट महिन्यात झाल्या. पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा २६ ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर दरम्यान होणार आहेत.

## अंतिम वर्षाच्या परीक्षा बारगळल्या

(पान १ वरुन) सोलापूर विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ आदी विद्यापीठांनी सर्वोच्च न्यायालय व राज्य शासनाच्या आदेशानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षेची तयारी जोमात सुरु केली.

बहुतांश सर्व विद्यापीठांनी ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी एजन्सी नेमण्याची किंवा स्वत:चे सॉफ्टवेअर तयार करण्याची प्रक्रिया सुरु केली; मात्र ऐन परीक्षांच्या तोंडावर विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलनाचे हत्यार उपसले. त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या परीक्षा पुढे ढकलण्याची नामुष्की विद्यापीठावर आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑक्टोबर महिन्यापर्यंत घेऊन या परीक्षांचा निकाल लावणे अपेक्षित आहे. उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत व राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांच्याबरोबर शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या झालेल्या बैठका निष्फळ ठरत आहेत.

**Lokmat: 1.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

# अंतिम वर्ष परीक्षेचा मार्ग सुकर

## निविदा मंजूर; वेळापत्रक जाहीर करण्यास सुरूवात



**पुणे, ता. ३० :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाची ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा घेण्यासाठी सुरक्षा, क्षमता आणि प्रतिविद्यार्थ्यांसाठी येणारा खर्च लक्षात घेऊन खासगी कंपनीची निविदा विद्यापीठाच्या खरेदी समितीच्या (पर्चेस कमिटी) बैठकीत मंजूर केली. पुढील एक ते दोन दिवसात कंपनीला वर्कऑर्डर मिळणार असल्याने परीक्षेचा मार्ग सुकर झाला आहे.

यासाठी कंपनीला प्रति प्रश्नपत्रिका १५ रुपयांचा दर निश्चित केला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइन व ऑफलाइन माध्यमातून बहुपर्यायी प्रश्न पद्धतीने घेतली जाणार आहे.

### कुलगुरूंनी घेतला परीक्षेचा आढावा

अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरळीत पाडण्याचे आव्हान विद्यापीठावर आहे. त्यापार्श्वभूमीवर कुलगुरू डॉ. नितीन करकळमकर यांनी परीक्षा विभागाला भेट दिली. प्र- कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार हे देखील यावेळी उपस्थित होते.

### शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आजपासून आंदोलन

शिक्षकेतर कर्मचारी, अधिकाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी गुरुवार (ता. १) पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचे जाहीर केले आहे. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागात अंतिम वर्षाच्या परीक्षेची तयारी सुरू असताना आक्रमक झालेल्या कर्मचाऱ्यांनी आजच (बुधवारी) काम बंद पाडून कार्यालयातून बाहेर पडण्यास भाग पाडले.

**परीक्षा घेण्यासाठी एजन्सी निश्चित करण्यात आली आहे. कामाची ऑर्डर एक दोन दिवसात मिळेल. एजन्सीने परीक्षा घेतल्यानंतर सर्व डेटा विद्यापीठाला द्यावा लागेल. २४ तास हेल्पलाइन सुरू करावी. मोबाईलवर सहजपणे परीक्षा घेता येईल अशा सुविधा त्यामध्ये असाव्यात अशा सूचना केल्या आहेत.**

**- राजेश पांडे, सदस्य, व्यवस्थापन परिषद**

**Sakaal: 1.10.2020**

# ‘अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रश्नसंच उपलब्ध करून द्या’

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी प्रश्नसंच उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र स्टुडंट युनियनने (मासू) बुधवारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे केली आहे.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी राज्यातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रश्नसंच उपलब्ध करून देण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार त्यांनी सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंना याबाबत आदेशसुद्धा दिला होता. मात्र अजूनही प्रश्नसंच उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांमधून चिंता व्यक्त करण्यात येत आहे. यंदा प्रथमच: बहुपर्यायी परीक्षा होत असून, विद्यार्थ्यांसमोर अनेक शंका व अडचणी आहेत. विद्यार्थ्यांना नियमित परीक्षा प्रक्रियेऐवजी बहुपर्यायी परीक्षेसाठी तयारी करणे खूप कठीण होत आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी जळगाव विद्यापीठाच्या कुलगुरूंनी आमची मागणी पूर्ण करून विद्यार्थ्यांना प्रश्नसंच उपलब्ध करून दिले आहेत. तसेच, औरंगाबाद विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ, नांदेड विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ इत्यादींनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, अशी माहिती मासूचे विभाग प्रमुख सिद्धार्थ तेजाळे यांनी दिली. याच धर्तीवर पुणे विद्यापीठातील सर्व शाखेच्या विद्यार्थ्यांना व कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सूचक पद्धतीने प्रश्नसंच तत्काळ स्वरूपात उपलब्ध करून द्यावेत. यामुळे विद्यार्थ्यांचा मानसिक ताण कमी होण्यात मदत होईल व ते परीक्षेला सामोरे जातील, अशी मागणी तेजाळे यांनी केली आहे.

**Kesari: 1.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## विद्यापीठाने परीक्षेसाठी एजन्सी निवडली

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेसाठी दिल्ली येथील एका खाजगी कंपनीची निवड केली आहे. बुधवारी विद्यापीठाच्या खरेदी समितीच्या (पर्चेस कमिटी) बैठकीत दिल्ली येथील एका खाजगी कंपनीची निविदा मंजूर केली. या कंपनीला एका विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन ऑफलाइन परीक्षेसाठी प्रत्येकी १५ रुपयांचा दर निश्चित केला आहे.

विद्यापीठाने परीक्षेसाठी ऑनलाइन निविदा मागविल्या होत्या. त्यात चार कंपन्यांनी सहभाग घेतला. निविदा मंजूरीसाठी मंगळवारी बराच वेळ बैठक झाली. मात्र, मात्र गुरुवारी पुन्हा पर्चेस कमिटीच्या बैठकीत निविदेबाबत चर्चा करून 'पीपल्स स्ट्रॉंग टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड' या गुडगाव येथील कंपनीची निवड केली. गुरुवारपासून परीक्षेच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

**Lokmat: 1.10.2020**

## विद्यापीठात नरेंद्र मोदी यांचे व्याख्यान

पुणे: लोकमान्य टिळक यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना व्याख्यान देण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मोदी यांचे व्याख्यान होण्याची शक्यता आहे. पुणे विद्यापीठ व पंतप्रधान कार्यालय यांच्यात याबाबत पत्रव्यवहार सुरु आहे. येत्या ७ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी नवीन शैक्षणिक धोरण आणि आत्मनिर्भर भारत या विषयावर ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन करण्यासाठी वेळ देणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

**Lokmat: 1.10.2020**

## विद्यापीठात आजपासून कामबंद आंदोलन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : उच्च व तंत्रशिक्षणमंत्री यांच्यासह झालेल्या चर्चेतून काहीच निर्णय न झाल्याने विविध प्रलंबित मागण्यांसाठी विद्यापीठ कर्मचाऱ्यांकडून आता गुरुवारपासून (१ ऑक्टोबर) विद्यापीठ बंद आंदोलन करण्यात येणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये होणाऱ्या या आंदोलनामुळे अंतिम वर्ष परीक्षांच्या नियोजनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्य महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय सेवक संयुक्त कृती समितीतर्फे विद्यापीठांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यांसाठी गेल्या काही दिवसांपासून लेखणीबंद आंदोलन सुरू आहे. या आंदोलनामुळे विद्यापीठांतील अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन अडचणीत आले आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी संघटनेच्या शिष्टमंडळाशी झालेल्या चर्चेत आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले होते. मात्र, लेखी निर्णय होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याची संघटनेची भूमिका आहे. दरम्यान, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्या मान्य करून संप मिटवण्याची मागणी स्वप्नील बेगडे, दयानंद शिंदे यांनी केली.

### परीक्षांचे वेळापत्रक टप्प्याटप्प्याने उपलब्ध

अंतिम वर्षाच्या विविध विद्याशाखांच्या परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाकडून टप्प्याटप्प्याने जाहीर केले जाणार आहे. त्यानुसार विधी, औषधनिर्माणशास्त्र, वणिज्य अशा अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाने संकेतस्थळावर जाहीर केले असून, पुढील दोन दिवसांत अन्य वेळापत्रकही जाहीर करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

लोकसत्ता Thu, 01 October 2020 https://epaper.loksatta.com/c/55333807

पुढारी

# आजपासून विद्यापीठ बंद आंदोलन

## अंतिम वर्ष परीक्षांचे नियोजन आणखी कोलमडणार

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात महाविद्यालयीन व विद्यापीठीय सेवक संयुक्त कृती समितीच्या माध्यमातून विविध मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी गुरुवारपासून लेखणीबंद आंदोलन सुरू केले आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याशी सोमवारी झालेल्या चर्चेतूनदेखील कोणतेही लेखी आश्वासन समितीला मिळाले नाही. त्यामुळे आज (दि.१) ऑक्टोबरपासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासोबत राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये विद्यापीठ बंद आंदोलन करण्याचा निर्णय कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. त्यामुळे अंतिम वर्ष परीक्षांचे नियोजन आणखी कोलमडणार आहे.

सातव्या वेतन आयोगाची अधिसूचना जाहीर करून तो तातडीने लागू करावा, आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळावा, पदोन्नतीबाबत तत्काळ निर्णय घ्यावा आदी प्रमुख मागण्यांसाठी राज्य महाविद्यालयीन व विद्यापीठीय सेवक संयुक्त कृती समितीच्या सदस्यांनी आंदोलन पुकारले आहे. त्यामुळे राज्यातील विद्यापीठांचे कामकाज विस्कळीत झाले आहे. त्याचा परिणाम म्हणजे विद्यापीठांना अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत.



त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आयोजित बैठकीत उदय सामंत यांनी कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाच्या सदस्यांशी चर्चा करून, आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. मात्र, लेखी निर्णय होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याची भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतली आहे.

दरम्यान, उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तयार करण्यात आलेल्या इतिवृत्तात मागण्यांच्या कार्यवाहीच्या कालावधी व्यतिरिक्त कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी विद्यापीठ बंद आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला असून, त्याअंतर्गत कोणतेही शैक्षणिक कामकाज करण्यात येणार नाही. कार्यालयेसुद्धा बंद राहतील, अशी माहिती समितीच्या वतीने डॉ. सुनील धिवार यांनी दिली.

### मागण्या मान्य करून संप मिटवावा

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या कार्यालयात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) शिष्टमंडळाने प्रतिनिधींशी चर्चा केली. या वेळी रास्त असलेल्या मागण्यांना पाठिंबा दिला; तसेच परीक्षेचे कामकाज सुरू ठेवण्यासाठी विनंती केली. सरकार हा विषय असंवेदनशील पद्धतीने हाताळत असल्याने, विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत व प्राजक्त तनपुरे यांनी कर्मचाऱ्यांच्या रास्त असलेल्या मागण्या त्वरित मान्य करून संप मिटवावा, अशी मागणी अभाविपतर्फे करण्यात आली.

Pune Edition
Oct 1, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

## शाळा-महाविद्यालयांना केंद्राची १५ ऑक्टोबरपासून परवानगी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

नवी दिल्ली : टाळेबंदी शिथिलीकरणाच्या पाचव्या टप्प्यासाठी केंद्र सरकारने बुधवारी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या. त्यानुसार शाळा-महाविद्यालये तसेच, अन्य शैक्षणिक संस्था १५ ऑक्टोबरपासून सुरू करण्यास मुभा देण्यात आली असून, निर्णयाची जबाबदारी राज्य सरकारांकडे सोपविण्यात आली आहे.



शाळा, महाविद्यालये, शिकवण्यांचे वर्ग १५ ऑक्टोबरनंतर टप्प्याटप्प्याने सुरू करता येऊ शकतील. पण त्यापूर्वी शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापकांची सहमती गरजेची असेल. तसेच, विद्यार्थ्यांनी पालकांच्या लेखी परवानगीनेच शाळा-महाविद्यालयांमध्ये जावे, असे केंद्रीय गृहमंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

शैक्षणिक संस्था प्रत्यक्ष सुरू होत नाहीत तोपर्यंत ऑनलाइन शिक्षणालाच प्राधान्य देण्याची सूचनाही करण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शाळेत किंवा महाविद्यालयात न येता घरी राहून ऑनलाइन पद्धतीनेच शिक्षण घ्यायचे असेल, त्यांना तशी परवानगी दिली जावी. विद्यार्थ्यांना हजेरीची सक्ती करू नये, असेही त्यात नमूद करण्यात आले आहे.

महाविद्यालये आणि उच्चशिक्षण संस्था नियमितपणे सुरू करण्याचा निर्णय केंद्रीय गृहमंत्रालयाशी चर्चा करून शिक्षण मंत्रालयाने घ्यायचा आहे. पीएचडी वा विज्ञान व तंत्रज्ञान शाखेच्या *(पान २ वर)*

लोकसत्ता Thu, 01 October 2020 https://epaper.loksatta.com/c/55347560

## शाळा-महाविद्यालयांना केंद्राची १५ ऑक्टोबरपासून परवानगी

***(पान १ वरून)*** प्रयोगशाळांचा वापर होणारे पदव्युत्तर अभ्यासक्रम १५ ऑक्टोबरपासून सुरू केले जाऊ शकतील. शैक्षणिक संस्था सुरू करण्यासाठी राज्य सरकारांनी स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना तयार कराव्यात, असेही केंद्रीय गृहमंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

चित्रपटगृहे, प्रदर्शन सभागृहे, मनोरंजन संकुलेही सुरू करण्यास केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. चित्रपटगृहांवर ५० टक्के आसनक्षमतेने सुरू करण्याची अट घालण्यात आली आहे. जलतरणपटूंच्या प्रशिक्षणासाठी पोहण्याचे तलावही खुले करण्यास १५ ऑक्टोबरपासून परवानगी देण्यात आली आहे. व्यापारविषयक प्रदर्शनांनाही मुभा असेल.

सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, मनोरंजन, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय आणि अन्य कार्यक्रमांना परवानगी देण्यात आली असली, तरी कमाल १०० व्यक्तींनाच सहभागी होता येईल. त्यानंतर १०० पेक्षा अधिक व्यक्तींसाठी काही अटींवर परवानगी दिली जाऊ शकते. बंदिस्त सभागृह ५० टक्के आसनक्षमतेने वापरता येईल. त्यासाठी कमाल मर्यादा २०० व्यक्तींची असेल. मुखपट्टी व अन्य नियमांचे पालन सक्तीचे असेल. खुल्या मैदानात कार्यक्रम आयोजित करता येणार असले तरी मैदानाची क्षमता पाहून सहभाग व नियमांचे पालन अत्यावश्यक असेल. या संदर्भातही राज्य सरकारांना मार्गदर्शक सूचना तयार कराव्या लागतील.

लोकसत्ता Thu, 01 October 2020 https://epaper.loksatta.com/c/55347

### विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मार्गदर्शिका प्रसिद्ध

## संशोधन नियमासाठी संस्थांतर्गत प्रणालीची शिफारस

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** संशोधनाचा दर्जा राखणे, सर्व संशोधने एकत्रितपणे जतन करणे, गैरप्रकारांवर कारवाई करणे, यासाठी प्रत्येक विद्यापीठ किंवा संशोधन संस्थेत कायमस्वरूपी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याची कल्पना विद्यापीठ अनुदान आयोगाने मांडली असून देशातील संशोधनाच्या नियमनासाठी आयोगाने मार्गदर्शिकेची निर्मिती केली आहे.

संशोधनाबाबत येणाऱ्या तक्रारींची शहानिशा करून कारवाईचे अधिकारही या संस्थेकडे असावेत अशी शिफारस करण्यात आली आहे.

देशातील संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी एकीकडे योजना आखण्यात येत असताना प्रत्यक्षात संशोधनाचा दर्जा खालावत असल्याचे वारंवार समोर आले आहे. वाङ्मयचौर्य, दर्जाहीन किंवा बोगस संशोधन नियतकालिकांमध्ये शोधनिबंध प्रसिद्ध करणे असे गैरप्रकार सातत्याने समोर येत असतात. आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारतातील संशोधनाच्या खालावत जाणाऱ्या दर्जाबाबत चर्चा झाल्या आहेत. म्हणून संशोधन कसे असावे, त्यासाठी कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी, कोणत्या निकषांची पूर्तता झालीच पाहिजे याची मार्गदर्शिका विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केली आहे. 'इम्पॅक्ट फॅक्टर' या संकल्पनेची जनक असलेली 'क्लॅरी वॅट' या संस्थेने यासाठी सहकार्य केले आहे. आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, आनंद देसाई, अनामिका चौरासिया, सुबश्री नाग, राकेश भटनागर यांनी ही मार्गदर्शिका तयार केली आहे.

### स्वतंत्र कक्ष

प्रत्येक विद्यापीठ किंवा संस्थेत संशोधनाच्या नियमनासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली आहे. आयोगाच्या मार्गदर्शिकेनुसार संशोधन होते हे पाहण्याची जबाबदारी या कक्षाची असेल. संशोधनाचे प्रस्ताव, प्रकल्प, शोधनिबंध यांची छाननी, व्यवस्थापन, योग्यप्रकारे पूर्तता यांकडे या कक्षाने लक्ष ठेवायचे आहे. संशोधकांना प्रशिक्षण देण्याची, संशोधन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्याची जबाबदारीही या कक्षाची राहील. प्रक्रियेबाबत स्वतंत्र मागदर्शिका तयार करण्याचे स्वातंत्र्य या कक्षाला असेल. संशोधनातील गैरप्रकारांना आळा घालणे, गैरप्रकार निदर्शनास आल्यास त्याची चौकशी करणे आणि कारवाई करणे, त्याची प्रक्रिया निश्चित करणे या कक्षाच्या जबाबदाऱ्या असतील. 'संशोधनाचा दर्जा राखणे, वाङ्मयचौर्य न करणे, गैरप्रकार घडत असल्यास ते समोर आणणे ही संशोधकांचीही जबाबदारी असेल,' अशी सूचनाही या मार्गदर्शिकेत करण्यात आली आहे.

> जगात सगळीकडे संशोधनाबाबत मार्गदर्शिका आहेत. आपल्याकडेही विविध विषयांच्या मार्गदर्शिका आहेत. संशोधनाच्या जागतिक परिमाणांनुसार हा दस्तावेज तयार करण्यात आला आहे. या मार्गदर्शिकेच्या आधारे नियम तयार होतील किंवा नियमात बदल होतील.
>
> डॉ. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग

लोकसत्ता Thu, 01 October 2020 https://epaper.loksatta.com/c/55344039

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

पुढारी

## विद्यापीठाची अंतिम वर्ष सराव परीक्षा ७ ते ९ ऑक्टोबरदरम्यान

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा १२ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत एमसीक्यू पद्धतीने होणार असून, परीक्षेची पूर्वकल्पना येण्यासाठी ७ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत सराव परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. या परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या वेबसाइटवर लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून ऑनलाइन पद्धतीने एमसीक्यू परीक्षा घेण्यासाठी एजन्सीची निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून निवड करण्याची प्रक्रिया बुधवारी संध्याकाळपर्यंत सुरू होती. रात्री उशिरा एजन्सीची निवड झाली असून, काही तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्यावर, वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना एमसीक्यू पद्धतीच्या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेचा अनुभव येण्यासाठी या सराव परीक्षा घेतल्या जाणार आहेत. या सराव परीक्षा ७ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत घेण्यात येईल. विद्यार्थ्यांनी मानसिक तणाव न घेता परीक्षा द्याव्यात, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

### ई-मेल व मोबाईल क्रमांक अचूक हवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न कॉलेजांमधील विद्यार्थ्यांनी, त्याच्या स्टुडंट प्रोफाईलमध्ये योग्य मोबाईल नंबर आणि ई-मेल आयडी नोंदवला आहे का, याची तपासणी करावी. त्यामध्ये काही चुका असतील, तर त्या तातडीने दुरुस्त कराव्यात, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळामार्फत करण्यात आले आहे.

My Pune Edition
Oct 1, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

लोकमत

## बारावीच्या शिक्षकांना मिळणार ऑनलाइन प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** इयत्ता बारावीचा अभ्यासक्रम चालू शैक्षणिक वर्षापासून बदलण्यात आला आहे. या पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या मूल्यमापन आराखड्याबाबत व त्याच्याशी निगडीत बाबींवर महाराष्ट्र राज्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विषय शिक्षकांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यासाठी येत्या ८ ऑक्टोबरला शिक्षकांना नोंदणी करता येणार आहे. हे प्रशिक्षण घेणे शिक्षकांना अनिवार्य आहे.

राज्य शिक्षण मंडळातर्फे काही दिवसांपूर्वी इयत्ता बारावीचा पुनर्रचित मूल्यमापन आराखडा जाहीर केला होता. मूल्यमापन पद्धतीत बदल केल्यामुळे विद्यार्थ्यांना कोणता घटक कसा शिकवावा तसेच विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन कसे करावे, याबाबत शिक्षकांना ऑनलाइन प्रशिक्षण दिले जाणार आहे.

राज्य मंडळाने कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना १ ते ८ ऑक्टोबर या कालावधीपर्यंत नोंदणी करण्यास मुदत दिली आहे. शिक्षकांना evaluation.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे.

Pune Main
Page No. 2 Oct 02, 2020
Powered by: erelego.com

## शिक्षकांना ऑनलाइन प्रशिक्षण

**पुणे, दि. १ -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता बारावीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या मूल्यमापन आराखड्याबाबत उच्च माध्यमिक शिक्षकांना ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

यासाठी १ ते ८ ऑक्टोबर या कालावधीत ऑनलाइन नाव नोंदणी करावी लागणार आहे. यासाठी राज्य मंडळाच्या evaluation.mh-hsc.ac.in या वेबसाइटवर नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

**Prabhat:2.10.2020**

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आंदोलन स्थगित

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्यातील महाविद्यालय व विद्यापीठांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी सुरू केले होते. हे आंदोलन येत्या १७ ऑक्टोबरपर्यंत स्थगित करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन व विद्यापीठीय सेवक संयुक्त कृती समितीतर्फे घेतला आहे. मात्र, कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास येत्या १९ ऑक्टोबरपासून पुन्हा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा संयुक्त कृती समितीने दिला आहे.

ऐन परीक्षांच्या तोंडावर राज्यातील सर्व विद्यापीठांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सुरु केलेल्या लेखणी बंद आंदोलनामुळे राज्यातील विद्यापीठांवर परीक्षा पुढे ढकलण्याची वेळ आली. काही विद्यापीठांनी आठवडाभर परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय जाहीर केला. मात्र, गुरुवारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री याबाबत अंतिम निर्णय घेतील, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. मात्र, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांना कोरोनाचा संसर्ग झाल्यामुळे त्यांनी संयुक्त कृती समितीला काही दिवसांचा अवधी मागितला. त्यावर कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी येत्या १७ ऑक्टोबरपर्यंत आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव व वित्त विभागाचे सचिव यांच्याबरोबर संयुक्त कृती समितीची बैठक आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले. राज्य शासनाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर येत्या १७ ऑक्टोबरपर्यंत निर्णय न घेतल्यास १९ ऑक्टोबरपासून तीव्र आंदोलन करण्यास असल्याचे संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले.

### परीक्षेच्या तयारीला येणार वेग

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आंदोलन स्थगित झाल्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या कामाला गती मिळणार आहे. परीक्षेसाठी एजन्सी नेमली आहे. गुरुवारी परीक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांनी या एजन्सीच्या कर्मचाऱ्यांना बरोबर प्राथमिक चर्चा केली. कर्मचारी पुन्हा कामावर रुजू होणार असल्यामुळे आता परीक्षेच्या तयारीला वेग येईल.

**Lokmat: 2.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# प्रश्नसंचातील प्रश्न व्हॉट्सअ‍ॅपवर

## अंतिम वर्ष परीक्षेतील मराठी विषयाबाबतचा प्रकार

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांसाठी बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नपत्रिकांसाठी प्रश्नसंच तयार करण्याचे काम सुरू आहे. मात्र, पदवी अंतिम वर्ष आणि पदव्युत्तर पदवी द्वितीय वर्षाच्या मराठी विषयाच्या प्रश्नसंचातील काही प्रश्न व्हॉट्सअ‍ॅपद्वारे विद्यार्थ्यांना दिल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे या प्रकाराची दखल घेऊन व्हॉट्सअ‍ॅपवर देण्यात आलेले संबंधित प्रश्न अंतिम प्रश्नसंचातून वगळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

विद्यापीठाकडून १२ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. त्यात बहुपर्यायी स्वरूपाची प्रश्नपत्रिका असेल. या परीक्षेचे स्वरूप विद्यार्थ्यांना कळण्यासाठी ६ ते १० ऑक्टोबर दरम्यान सराव चाचण्यांची सुविधा देण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने जाहीर केले आहे. बहुपर्यायी प्रश्नपत्रिके साठी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळ सदस्यांकडून प्रत्येक विषयाचे वेगवेगळे प्रश्नसंच तयार केले जाणार आहेत.



असे असतानाही एका नामांकित महाविद्यालयातील प्राध्यापिकेने पदवी अंतिम वर्ष आणि पदव्युत्तर पदवी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या प्रश्नसंचातील काही प्रश्न व्हॉट्सअ‍ॅपद्वारे पाठवल्याचा प्रकार समोर आला आहे.

> परीक्षांसाठी प्रश्नसंच तयार करण्याचे काम अजून सुरु आहे. व्हॉट्सअ‍ॅपद्वारे पाठवले गेलेले प्रश्न अंतिम प्रश्नासंचातून वगळले जातील. अंतिम वर्षाच्या परीक्षा अतिशय काळजीपूर्वक आणि निष्पक्षपणे घेतल्या जातील. कोणताही गैरप्रकार होणार नाही.
>
> – डॉ. शिरीष लांडगे, मराठी अभ्यास मंडळ प्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> प्रश्नसंचाच्या गोपनीयतेची विद्यापीठाकडून पूर्ण काळजी घेतली जाईल. आवश्यकतेनुसार नवीन प्रश्नसंच तयार केले जातील. गैरप्रकार झाला असल्यास संबंधित घटकांवर विद्यापीठ कायद्यानुसार कारवाई केली जाईल.
>
> – डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विशेष म्हणजे संबंधित प्राध्यापिकेचा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाशी संबंध नसतानाही हा प्रकार झाला आहे. तसेच अभ्यास मंडळाच्या सदस्यांनी प्रश्नसंच मोबाइलमध्ये ठेवणे चूक असून, हा घडलेला संपूर्ण प्रकार गंभीर असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

लोकसत्ता Sat, 03 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55391937

# पीएच.डी.च्या मौखिक परीक्षांमुळे विद्यापीठाची आर्थिक बचत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** ऑनलाइन पद्धतीने होत असलेल्या पीएच.डी.च्या मौखिक परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासाठी लाभदायी ठरल्या आहेत. ऑनलाइन मौखिक परीक्षांमुळे विद्यापीठाची जवळपास दोन ते अडीच कोटी रुपयांची बचत झाली आहे.

करोना संसर्गामुळे यंदा विद्यापीठांच्या परीक्षा प्रक्रियेवर मोठा परिणाम झाला. पीएच.डी.साठी मौखिक परीक्षा हा अखेरचा टप्पा असतो. संशोधनाच्या विषयातील तज्ज्ञ उमेदवाराने केलेल्या संशोधनासंदर्भात सखोल चर्चा केली जाते. त्यानंतर उमेदवाराला पीएच.डी. दिली जाते. त्यामुळे हा मौखिक परीक्षा हा महत्त्वाचा टप्पा असतो. मार्चमध्ये आलेल्या करोना संसर्गामुळे पीएच.डी.च्या नियोजित मौखिक परीक्षा अडचणीत आल्या होत्या. मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठांना ऑनलाइन पद्धतीने मौखिक परीक्षा पार पाडण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून ऑनलाइन पद्धतीने मौखिक परीक्षा घेतल्या जात आहेत.

मौखिक परीक्षांसाठी विद्यापीठाला खर्च करावा लागतो. परीक्षा घेण्यासाठी बोलावल्या जाणाऱ्या विषयतज्ज्ञांना मानधन, प्रवास खर्च द्यावा लागतो. मात्र यंदा ऑनलाइन पद्धतीने झालेल्या परीक्षांमुळे केवळ मानधन द्यावे लागले. त्यामुळे विद्यापीठाची दोन ते अडीच कोटींची बचत झाली आहे.

### ऑनलाइन परीक्षांसाठी कायमस्वरूपी धोरण

करोना संसर्गामुळे यंदा पीएच.डी.च्या मौखिक परीक्षा ऑनलाइन पद्धतीने झाल्या. त्यातून आर्थिक बचतही झाली. विद्यापीठाने उभारलेल्या स्टुडिओच्या माध्यमातून या परीक्षा घेण्यात आल्या. मात्र ही पद्धत केवळ यंदापुरती न ठेवता कायमस्वरूपीही करता येऊ शकेल. विद्यापीठाने यापूर्वीच पीएच.डी.च्या मानधनासंदर्भातील काही नियमांमध्ये बदल करून ऑनलाइन पद्धतीने देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच मौखिक परीक्षेसाठी विषयतज्ज्ञांना प्रवास करावा लागत असल्याने अनेक जण ते टाळतात. त्यात वेळही जातो. ऑनलाइन परीक्षेतून हे टाळता येऊ शकेल. त्या दृष्टीने येत्या काळात पीएच.डी.च्या मौखिक परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यासाठी एक धोरण निश्चित केले जाईल, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

लोकसत्ता Sat, 03 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55394260

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# UGC guidance to promote good research practices, curb plagiarism

Chandan.Chatterjee
@timesgroup.com

**Pune:** The UGC this week e-released a guidance document to boost quality academic research and curb plagiarism.

Titled Good Academic Research Practices (GARP), the University Grants Commission (UGC) published it in partnership with Clarivate's Web of Science indexing over 34,000 journals. The document provides a general framework for enhancing research integrity with focus on potential threats and best practices. It addresses how plagiarism, misrepresentation and fabrication can be checked.

E-releasing the document on Tuesday, K Vijay Raghavan, the principal scientific adviser of Government of India, said, "As the number of researches conducted in the domain of science, technology, humanities and social science grows in India every year, the country should take measures to ensure that good ethical practices are in place. This document will help create a strong foundation for research culture and integrity."

GARP would help researchers plan and design their research subjects, besides executing the work through proper documentation and protected data storage. The 56-page document is designed to provide researchers with the right mentorship, help them choose the right journal for publication and restrain them from falling for predatory journals.

During the e-release of the document, UGC vice-chairman Bhushan Patwardhan said, "At the UGC, we felt that there was a need for a document outlining good academic research practices with focus on potential threats. GARP will help bring in integrity in academic research in the country."

So, what is good practice? Patwardhan said, "A practice that has been proven to work better than other methods over time is the best practice. When this practice becomes a part of life, it becomes a good practice. In other words, when a best practice is followed over a period, it becomes a good practice."

GARP provides a general framework for enhancing research integrity by focusing on potential threats. It illustrates good practice at each stage in the research cycle, including ideation, research planning, design, conduct, dissemination, management and training.

"I hope GARP, prepared by the UGC in collaboration with Clarivate Web of Science as a knowledge partner, will be useful not only to the Indian academia but will be referred globally to promote academic ethics and research integrity," said Patwardhan.

Clarivate is a global leader in providing trusted insights to accelerate the pace of innovation. It has built some trusted brands across the innovation lifecycle, including the Web of Science.

D P Singh, the UGC chairman, in the concluding remarks said, "GARP has been developed as a part of the quality mandate of the UGC."

The UGC has been focusing on the quality of research works over the past few years. It came up with a list of 39,111 national and international journals indexed in Scopus — an international database of journals — in June 2019 to recognize only quality research works. It had issued a public notice to follow the UGC-CARE (Consortium for Academic and Research Ethics) list of journals with immediate effect.

## e-GUIDE TO BOOST QUALITY

**HISTORICALLY, ALL "GOOD PRACTICES" EMERGE DURING CRISIS, ESPECIALLY WHEN THE PROBLEM PEAKS**

### CLINICAL EFFECT

- The development of GCP (good clinical practice) began at the end of World War II
- The Nuremberg Trials, leading to **"Nuremberg Code"** and **"Helsinki Declaration"**, evolved as the foundation of GCP

### MANUFACTURING FIELD

Another tragedy in 1941, where nearly 300 people were killed by a sulfa drug tainted with sedative phenobarbital, prompted Food and Drug Administration (FDA) to revise manufacturing and quality control requirements drastically, leading to good manufacturing practice (GMP).



### ... AND THE GARP

"While the world is facing a crisis because of the Covid-19 pandemic, the academic world is facing a major epidemic of academic misconduct and predatory publishing. India is no exception, in fact, here its intensity and complexity is much higher. At the UGC, we felt that there is a need for a guidance document on Good Academic and Research Practices — **Bhushan Patwardhan** | UGC VICE-CHAIRMAN

### PUNE CONNECTION

- **UGC vice-chairman Bhushan Patwardhan**, one of the contributing authors of GARP, had a long association with Savitribai Phule Pune University (SPPU)
- **Shridhar R Gadre**, distinguished professor, Interdisciplinary School of Scientific Computing, SPPU, is one of the expert group members of GARP
- **Raghunath Mashelkar**, former director-general of CSIR, is one of the expert peer reviewers of GARP

**The Times of India: 3.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## परदेशी विद्यार्थ्यांना पुण्याची ओढ

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये ६०० जणांचे अर्ज



संग्रहित छायाचित्र.

**पुणे, ता. २ :** कोरोनामुळे पुण्यात शिक्षणासाठी विद्यार्थी येणार का, असा प्रश्न संस्थाचालक, प्राध्यापक यांना पडलेला असतानाच थेट परदेशी विद्यार्थ्यांना पुण्यात येण्याची ओढ लागली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह संलग्न महाविद्यालयांमध्ये २०२०-२१ या वर्षासाठी ६०० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरू असून, ती पूर्ण झाल्यानंतर त्यांना ऑनलाइन अध्यापन सुरू केले जाणार आहे.

शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुण्यात उच्च शिक्षणासाठी येण्याची ओढ विद्यार्थ्यांना कायम असतेच. ज्यांना गुणवत्तेच्या जोरावर प्रवेश मिळत नाही असे विद्यार्थी व्यवस्थापन कोट्यातून अतिरिक्त शुल्क मोजून प्रवेश घेण्यासाठी तयार असतात. पुण्यात२०१९-२० या वर्षामध्ये ७० देशातील ३३८ विद्यार्थी आणि २३१ विद्यार्थिनी असे एकूण ५६९ जणांनी विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला होता.

मार्च महिन्यापासून कोरोनामुळे सर्व महाविद्यालये बंद आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून ऑनलाइन अध्यापन सुरू आहे. लॉकडाउन काळात घरी न जाऊ शकलेली व विद्यापीठात शिकणारे सुमारे १२० विद्यार्थी वसतिगृहात आहेत. त्यांच्यापैकी जवळपास ४० जण अंतिम वर्षाची परीक्षा देणार आहेत. एकीकडे अशी स्थिती असताना पुणे विद्यापीठाने २०२०-२१ या वर्षातील प्रवेशाची प्रक्रिया सुरू केली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर त्यास अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळाला आहे.

पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राचे प्रमुख डॉ. विजय खरे म्हणाले, "पुणे विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी परदेशी विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद आहे. यंदा सुमारे ४० देशातील ६०० जणांचे प्रवेश होण्याची शक्यता आहे. ऑक्टोबर अखेरपर्यंत या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी पूर्ण होऊन, नोव्हेंबरमध्ये त्यांचे ऑनलाइन शिक्षण सुरू होईल."

**गतवर्षी प्रमाणेही यंदाही परदेशी विद्यार्थ्यांनी स. प. महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी अर्ज केले असून, प्रवेशाची प्रक्रिया सुरू आहे. कोरोनाची स्थिती पाहता आढावा घेऊन पुढील निर्णय होतील.**

**- डॉ. दिलीप सेठ,**
प्राचार्य, स. प. महाविद्यालय.

**Sakaal: 3.10.2020**

## अंतिम वर्ष परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाकडून जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने १२ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे विद्यापीठाने जाहीर केले होते. मात्र विद्यार्थ्यांना वेळापत्रकाची प्रतीक्षा होती. अखेरीस विद्यापीठाने अंतिम वर्ष आणि विषय राहिलेल्या (बॅकलॉग) विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

करोना विषाणू संसर्गामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षांचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर अंतिम वर्ष आणि बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या परीक्षा १२ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान घेतल्या जाणार आहेत. ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने बहुपर्यायी स्वरुपाची ही परीक्षा असेल. त्यामुळे विद्यार्थ्यांना वेळापत्रकाची प्रतीक्षा होती. मानव्यता, वाणिज्य आणि व्यवस्थापन, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आंतरविद्याशाखीय या चार विद्याशाखांमधील एकूण ३१६ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. ऑफलाइन परीक्षा ११४ केंद्रांवर होणार असून, सराव परीक्षा ७ ते १० ऑक्टोबर दरम्यान होतील.

लोकसत्ता Sun, 04 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55419612

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

पुढारी

# विद्यापीठाची अंतिम वर्ष परीक्षा १२ ऑक्टोबरपासून

## ऑनलाइन, ऑफलाइन परीक्षा एकाच वेळी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. १२ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान परीक्षा घेण्यात येणार असून, ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही पध्दतीने एकाच वेळी परीक्षा होणार आहे. मानव्यता, वाणिज्य आणि व्यवस्थापन, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आंतरविद्याशाखीय या चार विद्याशाखांमधील एकूण ३१६ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

पुणे विद्यापीठातर्फे पुणे, नगर आणि नाशिक या जिल्ह्यांमधील अंतिम वर्षाच्या सुमारे २ लाख ५० हजार विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार आहे. त्यापैकी १ लाख ९३ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन, तर ४० हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाइनचा पर्याय निवडला आहे. तर उर्वरित सुमारे



१७ हजार जणांनी कोणताही पर्याय निवडलेला नाही. ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ११४ परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. विद्यापीठातर्फे शुक्रवारी जवळपास सर्व अभ्यासक्रमांचे वेळापत्रक जाहीर केले असून, बी.एस्सी.च्या काही अभ्यासक्रमांचे वेळापत्रक जाहीर करणे बाकी आहे. ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयातून हॉल तिकीट मिळणार आहे. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाने एजन्सी निश्चित केली असून, या एजन्सीकडून विद्यापीठात स्वतंत्र कक्ष स्थापन केला जाणार आहे. दरम्यान विद्यार्थ्यांना एमसीक्यू पद्धतीच्या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेचा अनुभव येण्यासाठी सराव परीक्षा घेतल्या जाणार आहेत. या सराव परीक्षा ७ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत घेण्यात येईल. परीक्षा दिलेल्या वेळापत्रकानुसार पार पडल्या, तर सर्व निकाल १० नोव्हेंबरपर्यंत जाहीर होण्याची शक्यता आहे.

### ई-मेल व मोबाईल क्रमांक अचूक हवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न कॉलेजांमधील विद्यार्थ्यांनी, त्यांच्या स्टुडंट प्रोफाइलमध्ये योग्य मोबाईल नंबर आणि ई-मेल आयडी नोंदवला आहे का, याची तपासणी करावी. त्यामध्ये काही चुका असतील, तर त्या तातडीने दुरुस्त कराव्यात. परीक्षांबाबतची सर्व माहिती व सूचना त्यामार्फत कळविण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्टुडंट प्रोफाइलमधील माहिती तपासून घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळामार्फत करण्यात आले आहे.

Pune Edition
Oct 4, 2020 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

# अंतिम वर्ष विद्यार्थ्यांसाठी मोफत सराव चाचण्यांची सुविधा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र ज्ञान महामंडळातर्फे (एमकेसीएल) विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षांचा सराव होण्यासाठी मोफत ऑनलाइन सराव चाचण्यांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. आतापर्यंत राज्यातील २६ हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे.

अकृषी विद्यापीठातील अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन आणि बहुपर्यायी (एमसीक्यू) पद्धतीने होणार आहेत. या परीक्षा संगणक किंवा मोबाइलद्वारे घरच्या घरी देता येणार आहेत. मात्र बऱ्याच विद्यार्थ्यांना संगणक किंवा मोबाइलवरून बहुपर्यायी स्वरूपाची परीक्षा देण्याचा अनुभव नसल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेचे दडपण आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे दडपण दूर

विद्यार्थ्यांना सराव करण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्याची माहिती एमकेसीएलकडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली.

विद्यार्थ्यांना सराव चाचण्या mockexams.mkcl.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विद्यार्थी संकेतस्थळावर नोंदणी करून लॉगिन, पासवर्डद्वारे ३१ ऑक्टोबरपर्यंत कितीही वेळा ऑनलाइन परीक्षेचा

विद्यापीठनिहाय पदवी अभ्यासक्रमांतील विषयांसंबंधित नाहीत, तर आकलन, उपयोजन, विश्लेषण, संश्लेषण, निर्णयक्षमता, भाषिक आणि तार्किक कौशल्ये तपासणाऱ्या या चाचण्या आहेत. विद्यार्थ्यांनी संगणक किंवा मोबाइलचा कॅमेरा सुरू ठेवल्यास परीक्षेदरम्यान विद्यापीठाकडून पर्यवेक्षण कसे केले जाईल याचाही अनुभव घेता येईल,

लोकसत्ता
Sun, 04 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55414446

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## ऑनलाइन शिकविणाऱ्या शिक्षकांचीच आता दर आठवड्याला भरणार शाळा

**बारावीपर्यंतच्या** विद्यार्थ्यांचे ऑनलाइन वर्ग घेणाऱ्या शिक्षकांची आता दर आठवड्याला शाळा भरणार आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी आठवडाभर केलेल्या प्रयत्नांचा अहवाल तयार करून तो राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेला सादर करावा लागणार आहे. राज्यातील बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शाळा व शिक्षक करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती केंद्र सरकारला तसेच राज्यांसोबत होणाऱ्या बैठकांमध्ये सादर करावयाच्या दृष्टीने एमएससीईआरटीने सादर करण्याची सूचना दिली आहे. राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या आणि माध्यमाच्या बारावीपर्यंतच्या शिक्षकांकडून हा अहवाल मिळणे अपेक्षित असल्याचे शिक्षण संचालक दिनकर पाटील यांनी स्पष्ट केले आहे. दर आठवड्याच्या शेवटी म्हणजे शनिवार आणि रविवारी शिक्षकांनी आपला अहवाल सादर करावयाचा आहे. विद्यार्थ्यांच्या घरी भेट देणे, फोनच्या माध्यमातून कम्युनिटी क्लासेस चालविणे, शिक्षक मित्र तयार करणे, किती तास अभ्यास झाला याची माहिती द्यावी लागणार आहे

**Saamana: 4.10.2020**

## UGC guidance document to create ethical researchers

GAPR for pre-PhD students to sensitise them about the potential risks and ethics in research

Rajlakshmi.Ghosh
@timesgroup.com

ISTOCK



The University Grants Commission (UGC) has recently released the guidance document titled 'Good Academic Research Practice' (GAPR) to foster an ecosystem where academic ethics and research integrity count foremost. "Authoritative guidance for good practices is common in Good Clinical Practices (GCP), Good Manufacturing Practices (GMP), Good Laboratory Practices (GLP) etc. Historically, documents on good practices have emerged during crises especially when the problem reached its peak," says UGC vice-chairman Bhushan Patwardhan.

"Currently, with the world in the grips of the coronavirus pandemic, the academic world is facing a major epidemic of academic misconduct and predatory publishing. India is no exception, in fact here its intensity and complexity is much bigger. At the UGC, we realised the need for a guidance document to address the growing incidence of academic misconduct and research malpractices," he adds.

### Value-based research

The document has been prepared as part of the quality mandate of the UGC and contains the precautions that any researcher should follow to avoid misconduct at any stage of the research cycle. "The aim is to instil values in every researcher's work ethics and lay the foundations for a strong research culture. The document can also be a good resource for pre-PhD students to sensitise them about the potential risks in research before they embark on their research career," adds Patwardhan.

*Full report at educationtimes.com*




**The Times of India: 5.10.2020**

## विद्यापीठ ऑनलाइन परीक्षेचा सराव सुरू

**संकेतस्थळाची निर्मिती : घरच्या घरी परीक्षा**

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑक्टोबर महिन्यात बहुपर्यायी-वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या स्वरुपात संगणक किंवा स्मार्टफोनवर ऑनलाईन पद्धतीने घरच्या घरी घेतल्या जाणार आहेत. परंतु, बऱ्याच विद्यार्थ्यांना संगणक किंवा स्मार्टफोनवरील ऑनलाईन परीक्षांचा व बहुपर्यायी प्रश्न सोडविण्याचा पूर्वानुभव नाही.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी विनामूल्य 'अभिरुप (मॉक) ऑनलाईन सराव परीक्षे'ची परीक्षेची सुविधा kmockexams.mkcl.orgk या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

गेल्या तीन दिवसांत राज्यातील २६,००० विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे. इच्छुक विद्यार्थी संगणक किंवा स्मार्टफोनद्वारे या संकेतस्थळावर नोंदणी करुन मिळालेल्या लॉगीन व पासवर्डचा वापर करुन कितीही वेळा ऑनलाईन परीक्षेचा सराव करु शकतात.येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत विनामूल्य सरावाची सुविधा उपलब्ध आहे, असे एमकेसीएल नॉलेज फाउंडेशनचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर उदय पंचपोर यांनी सांगितले.

सध्या या संकेतस्थळावर विद्यापीठनिहाय पदवी अभ्यासक्रमातील विषयांसंबधित चाचण्या ठेवण्यात आलेल्या नसून आकलन, उपयोजन, विश्लेषण, संश्लेषण व निर्णयक्षमता तसेच भाषिक व तार्किक कौशल्ये तपासणाऱ्या सर्वसाधारण क्षमता-चाचण्या उपलब्ध आहेत. त्यामुळे सर्व विद्यापीठांच्या सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षा कशी असते. हे सहज समजेल.

**Lokmat 5.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

## Section: Education

# विद्यार्थ्यांना प्रमुख विषयाच्या वेळापत्रकाची प्रतीक्षा

## विद्यापीठ अंतिम वर्ष परीक्षा : कमी दिवसात परीक्षा संपवण्याचा प्रयत्न

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे येत्या १२ ऑक्टोबरपासून घेतल्या जाणाऱ्या अंतिम वर्षाच्या प्रमुख विषयाच्या परीक्षांचे वेळापत्रक अद्याप विद्यार्थ्यांना मिळाले नाही. विद्यापीठातर्फे सुमारे २८ दिवस चालणाऱ्या काही परीक्षा १८ दिवसांमध्ये संपविण्याचे नियोजन केले जात आहे. त्यामुळे वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी शाखेसह इतरही शाखेतील प्रमुख विषयाच्या परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध केले नाही. मात्र, सोमवारपर्यंत सर्व विषयांचे वेळापत्रक जाहीर होईल, असे परीक्षा विभागातील सूत्रांनी सांगितले.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिलेल्या सूचनांनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑक्टोबर महिन्यापूर्वी सर्व विषयांच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्याचे नियोजन केले जात आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या काम बंद आंदोलनामुळे १ ऑक्टोबरपासून सुरु होणाऱ्या विद्यापीठाच्या परीक्षा सुमारे दहा ते बारा दिवस पुढे गेल्या. परंतु, आंदोलन स्थगित झाल्यामुळे परीक्षेच्या कामाला पुन्हा वेग आला आहे.

विद्यापीठाने बी.ए., बीसीए, बीसीएस, बीएससी ॲनिमेशन, बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ फार्मसी, एल.एल.बी, एल.एल.एम., एम.बी.ए. बी.बी.ए, एम.कॉम, बी एड., एम. एड. पीजीडीएम आदी अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे विषयनिहाय वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले. परंतु, बी.एस्सी, बी.कॉम. यासारख्या प्रमुख अभ्यासक्रमांच्या विषयांचे वेळापत्रक अद्याप प्रसिद्ध झालेले नाही.

पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयांमध्ये वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. परीक्षा विभागाकडून १८ दिवसांमध्ये या परीक्षा घेण्याचे नियोजन केले जात आहे. त्यामुळे काही विषयांचे वेळापत्रक जाहीर करण्यास थोडा विलंब होत आहे. मात्र, येत्या सोमवारपर्यंत सर्व विषयांचे वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता आहे.

### ७ ते ९ ऑक्टोबरदरम्यान ऑनलाइन परीक्षेचा सराव



- अंतिम वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध केले असले तरी विद्यार्थ्यांना वेळापत्रक शोधताना अडचणी येत आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दर्शनी ठिकाणी वेळापत्रक प्रसिद्ध केले जाणार आहे.
- तसेच येत्या ७ ते ९ ऑक्टोबर दरम्यान विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षेचा सराव करता येईल.

**Lokmat: 5.10.2020**

# शिष्यवृत्ती योजना तातडीने राबवा

## उच्च शिक्षण संचालनालयाचे कॉलेजांना आदेश

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'केंद्र सरकारच्या अल्पसंख्याक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना, महाविद्यालय व विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाविद्यालय व विद्यापीठांनी तातडीने पावले उचलावीत. त्याचप्रमाणे या योजनेचा लाभ घेण्यासाठी महाविद्यालयांनी उच्चशिक्षण संचालनालयाच्या वेबसाइटवरून तत्काळ केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी,' असे आदेश संचालनालयाचे सहसंचालक डॉ. मोहन खताळ यांनी दिले आहे.

केंद्र सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी असणाऱ्या एनएसपी पोर्टलमार्फत विविध शिष्यवृत्तींसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर आहे. एनएसपी पोर्टलवर भरलेले अर्ज महाविद्यालय आणि विद्यापीठांनी नोंदणी करून, त्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही, तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अर्ज लॉग इनमध्ये दिसणार नाही. त्यामुळे शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता यावा यासाठी केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे केवायसी प्रक्रिया प्रलंबित असणाऱ्या महाविद्यालयांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह संचालनालयाच्या schol.dhepune@gov.in या ई-मेल आयडीवर तातडीने पाठवावेत, अशा सूचना खताळ यांनी केल्या आहेत. त्याचप्रमाणे या शिष्यवृत्तीच्या माहितीसाठी; तसेच मार्गदर्शक सूचनांसाठी www.schlolarships.gov.in, www.dhepune.gov.in, www.jdhepune.info या वेबसाइटला भेट देण्याचे आवाहन डॉ. खताळ यांनी केले आहे.

### योजनेच्या प्रसिद्धीची सूचना




अल्पसंख्याक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेला विद्यार्थ्यांनी अतिशय अल्प प्रतिसाद दिला आहे. या शिष्यवृत्ती योजनेत नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अतिशय कमी आहे. त्यामुळे या योजनेबाबत बॅनर आणि सूचनाफलकांच्या मार्फत प्रसिद्धी करण्यात यावी, अशा सूचनाही डॉ. खताळ यांनी दिल्या आहेत. एकही विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही, याची प्राचार्यांनी काळजी घ्यावी, असेही खताळ यांनी सांगितले.

**Maharashtra times: 5.10.2020**

# 'वाचन प्रेरणा दिन' ऑनलाइनच करावा लागणार

## शाळा, महाविद्यालयांना उच्च शिक्षण सहसंचालकांकडून सूचना

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ४ - करोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. त्यामुळे यंदा शाळा, महाविद्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' हा ऑनलाइन पद्धतीनेच विविध उपक्रम राबवून साजरा करावा लागणार आहे.

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने शासनाने सूचना दिलेल्या आहेत.

करोनाचे सावट असल्याने व शाळा, महाविद्यालये अद्यापही बंदच असल्याने आता उपक्रम राबविण्याच्या पद्धतीत बदल करावे लागणार आहेत. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शाळा, महाविद्यालयात बोलावून कार्यक्रम घेण्याऐवजी ऑनलाइनला प्राधान्य द्यावे लागणार आहे.



विद्यापीठांचे कुलसचिव, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी शासनाच्या सूचनांनुसार वाचन प्रेरणा दिन साजरा करून त्याचा अहवाल ई-मेल पाठवावा. उपक्रम राबविताना करोनाबाबतच्या शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे आदेशही पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. मोहन खताळ यांनी दिले आहेत.

**Prabhat: 5.10.2020**

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# अस्वस्थ मनाला ऊर्जा देणाऱ्या ग्रंथालयांची दारे अजून बंद का?

दृष्टिकोन

प्रा. मिलिंद जोशी। कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद

**कोरोनाचा प्रादुर्भाव** वाढल्यामुळे जाहीर झालेल्या टाळेबंदीमुळे मार्च महिन्यापासून राज्यातील सर्व ग्रंथालये बंद आहेत. टाळेबंदीनंतर आता सर्व व्यवहार हळूहळू सुरु होत आहेत. अनलॉक-५ची घोषणा करताना सरकारने हॉटेल्स, फूडमॉल्स, रेस्टॉरंट आणि बार हे पन्नास टक्के क्षमतेने सुरु करण्याची परवानगी दिली आहे. ती देत असताना राज्यातील ग्रंथालयांचा मात्र विचार केलेला नाही. यातून राज्यकर्त्यांची अनास्थाच दिसून येते.

शरीरासाठी आवश्यक असणारी जीवनसत्त्वे अन्नातून मिळतात; पण मन आणि बुद्धीच्या भरणपोषणासाठी *गरजेची असलेली सत्त्वे केवळ वाचनातूनच मिळतात. प्रगल्भ आणि जाणत्या वाचकांमुळेच समाजाची* सांस्कृतिक श्रीमंती वाढत असते. सर्वच वाचकांना ग्रंथ खरेदी करून वाचणे शक्य नसते. वाचनभूक भागविण्यासाठी ग्रंथालयांवरच अवलंबून असणारा मोठा वाचकवर्ग आहे. ग्रंथालये बंद असल्यामुळे त्यांची कुचंबणा होत आहे. अभ्यासक, संशोधक आणि स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी यांची गैरसोय होत आहे. ग्रंथालये कधी सुरु होणार? अशी विचारणा सातत्याने वाचकांकडून होत आहे. आजही महाराष्ट्रात असलेल्या वाचनालयांचा जो वाचक वर्ग आहे त्यात ज्येष्ठ नागरिकांची संख्या लक्षणीय आहे. वाचन हाच त्यांच्यासाठी विरंगुळा असतो. ज्येष्ठ नागरिक संघाचे आणि हास्य संघाचे नियमित होणारे कार्यक्रम आता होत नाहीत त्यामुळे त्यांचा भावनिक कोंडमारा होत आहे. त्यांनी वाचनालयात जाणे सद्य:परिस्थितीत हिताचे नसले तरी त्यांच्या वतीने कुटुंबातील सदस्य पुस्तकांची देव-घेव करण्यासाठी जाऊ शकतात. अनेक ग्रंथालयांची घरपोच सेवा आहे. शासनाच्या अटींचे पालन करीत आवश्यक ती खबरदारी घेत ही सेवाही कुरिअरप्रमाणे सुरु करता येऊ शकते. सार्वजनिक ग्रंथालयातील सेवक आधीच तुटपुंज्या वेतनावर काम करीत आहेत, त्यात टाळेबंदीमुळे त्यांच्या वेतनात मोठी कपात झाली आहे. वाचनालये अशीच बंद *राहिली तर त्यांचे जगण्याचे प्रश्न आणखी गंभीर होणार* आहेत.

वाचन संस्कृतीला आव्हान देणाऱ्या आणि वाचकांना वाचनापासून विचलित करणाऱ्या अनेक गोष्टी नव्या तंत्रज्ञानाने जन्माला घातल्या आहेत, अशा परिस्थितीत वाचकवर्ग टिकवून ठेवण्याचे काम ग्रंथालये निष्ठेने करीत आहेत. गेल्या सात महिन्यांपासून वाचक आणि वाचनालये यांचा संपर्क तुटला आहे. हे असेच चालू राहिले तर



वाचकांची पावले पुन्हा वाचनालयाकडे वळणे कठीण होणार आहे. ही बाब वाचनालये आणि वाचन संस्कृती या दोघांसाठीही घातक आहे. वाचनालयात १ एप्रिलनंतर वाचक नव्या वर्षासाठी सदस्य म्हणून नोंदणी करीत असतात. वाचनालये बंद ठेवल्यामुळे नोंदणी करणाऱ्या सदस्यांची संख्या घटली तर त्याचा परिणाम वाचनालयांच्या अर्थकारणावरही होईल. अगोदरच सरकारी अनुदान वेळेत मिळण्याची मारामार; या परिस्थितीत ते कधी मिळेल याची खात्री नाही. त्यात नोंदणी करणाऱ्या सदस्यांची संख्या कमी झाली तर वाचनालये मोठ्या आर्थिक संकटात सापडतील.

वाचनालये बंद आहेत म्हणून पुस्तकांची खरेदी थांबली आहे. त्याचा फटका प्रकाशन व्यवसायाला बसला आहे. प्रकाशक, ग्रंथवितरक आणि विक्रेते अडचणीत सापडले आहेत. वाचनालये सुरु होणार नसतील आणि पुस्तकांची खरेदी होणार नसेल तर नवी पुस्तके प्रकाशितच होणे कठीण आहे. असे घडणे भाषा आणि साहित्यासाठी हानिकारक आहे.

दिवाळी अवघ्या दीड महिन्यावर आलेली आहे. १११ वर्षांची समृद्ध आणि संपन्न परंपरा असलेले दिवाळी अंक हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभवच आहे. कोरोनाच्या संकटकाळात दिवाळी अंकांची समृद्ध आणि संपन्न परंपरा खंडित होऊ नये म्हणून सारे बळ एकवटून संपादकांनी दिवाळी अंक काढण्याचे ठरविले आहे. दिवाळी अंक वाचकांपर्यंत पोहोचवण्याच्या कामी ग्रंथालये महत्त्वाची भूमिका बजावत असतात. ती बंद राहिली तर या प्रयत्नांवर पाणी पडणार आहे.

पुस्तके जीवनावश्यकच आहेत. भाकरी ही पोटाची गरज; पण भावना जागवायला आणि स्वप्ने फुलवायला विचारच उपयोगी पडतात. ते केवळ पुस्तकांतूनच मिळतात. या कोरोनाच्या संकटकाळात निराशेने ग्रासलेली आणि भीतीने काळवंडलेली मने प्रज्वलित करून समाजाला सकारात्मक ऊर्जा देणारे काम केवळ पुस्तकेच करु शकतील. म्हणून पुस्तकांचे निवासस्थान आणि वाचन संस्कृतीचे प्रवेशद्वार असलेली ग्रंथालये उचित अटींसह त्वरित सुरु करा.

**Lokmat: 5.10.2020**

# विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा १२ ऑक्टोबरपासून

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या परीक्षा १२ ऑक्टोबरपासून

पुणे, दि. ४ (प्रतिनिधी) – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. १२ ऑक्टोबरपासून या परीक्षांना सुरुवात होणार आहे. ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही परीक्षा एकाच वेळी होणार आहेत.

पुणे विद्यापीठातर्फे पुणे, नगर आणि नाशिक या जिल्ह्यांमधील अंतिम वर्षाच्या सुमारे २ लाख ५० हजार विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार आहे. त्यापैकी १ लाख ९३ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन, तर ४० हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाइनचा पर्याय निवडला आहे. तर, उर्वरित सुमारे १७ हजारजणांनी कोणताही पर्याय निवडलेला नाही.

ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ११४ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. बीएससीच्या काही अभ्यासक्रमांचे वेळापत्रक जाहीर करणे बाकी आहे.

ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयातून प्रवेश पत्र (हॉल तिकीट) मिळणार आहे, असे विद्यापीठाद्वारे कळविण्यात आले आहे. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाने एजन्सी निश्चित केली असून, या एजन्सीकडून विद्यापीठात स्वतंत्र कक्ष स्थापन केला जाणार आहे.

**Saamana: 5.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

## आवाराचे, साहित्याचे निर्जंतुकीकरण आवश्यक

# शाळांबाबत केंद्राच्या मार्गदर्शक सूचना, राज्यात मात्र संदिग्धता

पीटीआय, नवी दिल्ली

**गेल्या सहा** महिन्यांपासून बंद असलेल्या शाळा १५ ऑक्टोबरपासून क्रमाक्रमाने पुन्हा सुरू करण्याबाबत केंद्र सरकारने सोमवारी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या. राज्यात मात्र शाळा कधी सुरू होणार, याबाबत संदिग्धता कायम आहे.

**विद्यार्थ्यांच्या हजेरीविषयी...**



- विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत लवचीकतेचे धोरण अवलंबवावे.
- विद्यार्थी किंवा शिक्षक आजारी असल्यास त्यांना घरीच थांबण्यास सांगावे.
- विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्यासाठी पालकांची लेखी संमती आवश्यक आहे.
- शाळा सुरू झाल्यानंतर दोन ते तीन आठवड्यांपर्यंत मूल्यांकन घेता येणार नाही.
- शाळेत उपस्थित राहण्याऐवजी विद्यार्थी ऑनलाइन वर्गाचा पर्याय निवडू शकतात, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

शिक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये, संपूर्ण शाळेची साफसफाई, परिसराचे निर्जंतुकीकरण, उपस्थितीत लवचीकता, तीन आठवड्यांपर्यंत मूल्यांकन टाळणे आणि टाळेबंदीच्या काळातील घरगुती शिक्षणातून बाहेर पडून सहजपणे औपचारिक शिक्षण सुरू करणे इत्यादी सूचनांचा समावेश आहे.

राज्यांनी आपापल्या गरजेनुसार आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी स्वतःची आदर्श कार्यपद्धती तयार करावी, अशी सूचनाही आरोग्य विभागाने केली आहे. शाळांनी संपूर्ण परिसराची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण करावे. त्याचबरोबर टेबल-खुर्च्या, कपाटे, साधनसामग्री, लेखन साहित्य, पाण्याच्या टाक्या, स्वयंपाकघरे, उपाहारगृहे, स्वच्छतागृहे, प्रयोगशाळा, ग्रंथालये यांचे निर्जंतुकीकरण करावे. वर्गखोल्यांसह सर्व ठिकाणी हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी, असे मार्गदर्शक सूचनांमध्ये म्हटले आहे.

राज्यांच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे शाळांनीही त्यांची 'आदर्श कार्यपद्धती' तयार करावी यासाठी त्यांना प्रोत्साहन (पान ४ वर)

लोकसत्ता Tue, 06 October 2020 https://epaper.loksatta.com/c/55462733

## केंद्राच्या सूचना, राज्यात मात्र संदिग्धता

(पान १ वरून) देता येईल. सुरक्षितता, शारीरिक किंवा सामाजिक अंतर पाळण्याचे निकष लक्षात घेऊन पालकांना तशा सूचना करणे, भित्तिपत्रके, संदेश, संवादाच्या माध्यमांतून माहिती देणे किंवा मार्गदर्शक सूचना ठळकपणे लावणे किंवा प्रसारित करणे आवश्यक असल्याचे केंद्राने म्हटले आहे. करोना विषाणूची साथ रोखण्यासाठी देशभरातील विद्यापीठे आणि शाळा १६ मार्चपासून बंद आहेत. केंद्र सरकारने २५ मार्चला देशव्यापी टाळेबंदी लागू केली होती.

८ जूनपासून टप्प्याटप्प्याने टाळेबंदीतील निर्बंध शिथिल करण्यात आले; परंतु शैक्षणिक संस्थांवरील निर्बंध मात्र कायम होते. केंद्राच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रतिबंधित क्षेत्रांत नसलेल्या भागांतील शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्था १५ ऑक्टोबरनंतर पुन्हा हळूहळू उघडू शकतात; परंतु शैक्षणिक संस्था पुन्हा सुरू करायच्या की नाहीत, याचा निर्णय राज्यांनी घ्यावा, असे केंद्र सरकाने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रातील शाळा नेमक्या कधी सुरू करण्यात येणार याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. नोव्हेंबरपासून टप्प्याटप्प्याने शाळा सुरू करता येतील का, याचा निर्णय शिक्षक, पालक अशा सर्व घटकांना विश्वासात घेऊन घेण्यात येईल, असे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

लोकसत्ता Tue, 06 https://

# शैक्षणिक वर्ष केव्हा सुरु होणार?

## शासनाने संभ्रम दूर करावा : विद्यापीठ, महाविद्यालयांना सूचना नाहीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष येत्या १ नोव्हेंबरपासून सुरु करावे, असे निर्देश दिले आहेत. परंतु, राज्य शासनाने याबाबत विद्यापीठ व महाविद्यालयांना कोणत्याही सूचना दिलेल्या नाहीत. त्यामुळे २०२०-२१ शैक्षणिक वर्ष केव्हा सुरु होणार, याबाबत संभ्रम कायम आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बारावीच्या परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. परिणामी, परीक्षांचा निकाल जाहीर करण्यास उशीर झाला. विद्यापीठ अनुदान आयोगाने शैक्षणिक वर्ष सुरु करण्याबाबत दोन वेळा मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या. त्यानुसार राज्य शासनाने व विद्यापीठाने ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यापासून संलग्न महाविद्यालयांना प्रथम वर्षाचे ऑनलाइन वर्ग सुरु करण्याबाबत कळविले. मात्र, यूजीसीने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकामध्ये येत्या १ नोव्हेंबरपासून २०२०-२१ या वर्षासाठी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सुरु करावे, असे स्पष्ट करण्यात आले.

> ऑनलाइन शिक्षण गृहीत धरले जाणार आहे किंवा नाही; तसेच प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष केव्हापासून सुरु केले जाणार, याबाबत शिक्षण संस्था, विद्यार्थी, पालकांमध्ये असणारा संभ्रम राज्य शासनाने दूर करणे गरजेचे आहे.
>
> – प्रा. नंदकुमार निकम, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर काही महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले जात आहे. मात्र, महाविद्यालयात प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी ऑनलाइन वर्गांना उपस्थिती लावत नसल्याचे दिसून येत आहे. त्यातच ऑनलाइन शिक्षण गृहीत धरले जाणार किंवा नाही; याबाबत पालक, विद्यार्थी व महाविद्यालयांमध्ये संभ्रम आहे. काही महाविद्यालयांनी प्रथम वर्षाचे वर्ग बंद करण्याचा निर्णय घेतला होता. तसेच मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्यामुळे प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया वादात सापडली आहे. यूजीसीने शैक्षणिक वर्ष सुरु करण्याबाबत परिपत्रक काढले असले, तरी राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने व विद्यापीठांनी याबाबत महाविद्यालयांना योग्य मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. परंतु, याबाबत कोणत्याही सूचना दिल्या गेल्या नाहीत.

**Lokmat: 6.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## ...तोपर्यंत एकही महाविद्यालय सुरू होणार नाही



पुणे, दि. ६ (प्रतिनिधी) – राज्यातील कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यादृष्टीने राज्य सरकार अनेक पावलं उचलत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे मागील सात महिन्यांपासून महाविद्यालय बंद असून, कोरोनाची परिस्थिती पूर्णपणे निवळत नाही तोपर्यंत राज्यातील एकही महाविद्यालय सुरू होणार नाही, अशी माहिती राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सामंत यांनी अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या तयारीचा आढावा घेतला. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते ● पान २

### डेव्हलपमेंट शुल्क घेऊ नये

■ कोरोनामुळे महाविद्यालय सुरू होणार नाहीत, अशा वेळी महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून केवळ शैक्षणिक शुल्क घ्यावे. डेव्हलपमेंट शुल्क, जिमखाना असे शुल्क स्वीकारू नये. महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून अशा प्रकारचे शुल्क वसूल करत असतील तर त्यांची तक्रार करावी, अशा संस्थांवर कारवाई केली जाईल. तसेच महाविद्यालयांनी शुल्कवाढ करू नये, याबाबत निर्देश दिले आहेत. पुणे विद्यापीठानेही प्रस्तावित केलेली शुल्कवाढ एका वर्षासाठी स्थगित केली आहे त्यामुळे संस्थांनी नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई करू, असेही सामंत यांनी सांगितले.

**Saamana: 7.10.2020**

## ...महाविद्यालय सुरू होणार नाही

(पान १ वरून) बोलत होते. उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. धनराज माने, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यावेळी उपस्थित होते.

महाविद्यालय कधी सुरू होणार, असे सामंत यांना विचारले असता ते म्हणाले, 'राज्यातील कोरोनाची स्थिती अद्याप सामान्य झाली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयात बोलवणे योग्य नसल्याने आत्ताच महाविद्यालय सुरू करता येणार नाहीत. त्यांचे ऑनलाइन शिक्षण सुरू राहील. हे ऑनलाइन शिक्षण त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये ग्राह्य धरले जाणार आहे.

पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेणार आहे. यातून एकही विद्यार्थी वंचित राहू नये, यासाठी त्यांना पुन्हा संधी दिली जाईल. ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना आठ ऑक्टोबरपासून सराव परीक्षा देता येतील. राज्यात आपत्ती व्यवस्थापन कायदा लागू असल्यामुळे संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांची परीक्षा घेण्यासाठी परवानगी आवश्यक आहे. त्यांचे प्रतिनिधी आजच्या बैठकीत उपस्थित होते. जिल्हा प्रशासन व पोलीस यासाठी सहकार्य करणार आहेत. परीक्षा केंद्रावर सॅनिटायझेशनची व्यवस्था करण्याचे आदेश संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. पुणे, नगर आणि नाशिक येथील विद्यार्थ्यांच्या परीक्षांसाठी अडचणी कक्ष स्थापन केला आहे. त्यात विद्यापीठ व प्रशासनाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

### 'सीएचबी'साठी नेट-सेट प्राध्यापकांना प्राधान्य

■ महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या रिक्त जागांवर तासिका तत्त्वावर (सीएचबी) प्राध्यापक नियुक्ती केली जाते. कोरोनामुळे राज्य सरकारने सर्व प्रकारच्या भरती प्रक्रियेवर बंदी घातली, त्यामुळे यंदाचे शैक्षणिक वर्ष सुरू होऊनदेखील या नियुक्त्या रखडल्या होत्या. शासनाने ही बंदी उठवावी, अशी मागणी केली जात होती. याबाबत शासनाने नुकताच निर्णय घेतला असून, भरतीसाठी लवकरच जाहिरात काढली जाईल. यामध्ये संबंधित विषयांच्या सेट-नेट पात्र प्राध्यापकांना प्राधान्य दिले जाईल, त्यानंतर इतर उमेदवारांचा विचार केला जाईल. प्राध्यापकांच्या भरतीसंदर्भात अर्थमंत्री अजित पवार यांच्यासोबत बैठक झाली. त्यात भरती बंदीमधून प्राध्यापकांना वगळावे, अशी मागणी केली आहे. त्यास त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. राज्य शासनाने यापूर्वी ४० टक्के रिक्त जागा भरण्यास परवानगी दिलेली आहे, त्यामुळे ही कोंडी सुटेल, असे सामंत यांनी सांगितले.

## प्राध्यापक भरतीचा मार्ग मोकळा



### महाविद्यालयांनी शैक्षणिक शुल्कच घ्यावे

करोना पार्श्वभूमीवर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून केवळ शैक्षणिक शुल्क घ्यावेत. डेव्हलपमेंट, जिमखाना असे शुल्क आकारू नये. अशा प्रकारचे शुल्क वसूल होत असल्यास त्यांची तक्रार करावी, अशा संस्थांवर कारवाई केली जाईल. तसेच महाविद्यालयांनी शुल्कवाढ करू नये, याबाबत निर्देश दिले आहेत. पुणे विद्यापीठाने प्रस्तावित केलेली शुल्कवाढ एका वर्षासाठी स्थगित केली आहे. त्यामुळे संस्थांनी नियमांचे उल्लंघन करू नये, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

भरतीसाठी राज्य शासन सकारात्मक असल्याची ग्वाही त्यांनी दिली. करोनामुळे राज्य सरकारने सर्व प्रकारच्या भरती प्रक्रियेवर बंदी घातली. त्यामुळे प्राध्यापक भरतीची प्रक्रिया रखडली होती. शासनाने ही बंदी उठवावी, अशी मागणी होत होती. त्या पार्श्वभूमीवर उदय सामंत म्हणाले, सीएचबी पद भरतीसाठी लवकरच जाहिरात काढली जाईल. संबंधित विषयाच्या सेट-नेट पात्र प्राध्यापकांना पहिले प्राधान्य राहणार आहे.

प्राध्यापकांच्या भरतीसंदर्भात वित्तमंत्री अजित पवार यांच्यासोबत बैठक झाली. त्यात शासकीय पदभरतीचा निर्णय प्राध्यापक भरतीसाठी स्थगित होणार आहे. त्यास त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. राज्य शासनाने यापूर्वी ४० टक्के रिक्त जागा भरण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे हा प्रश्न मार्गी लागेल, असे त्यांनी आश्वासन दिले.

**ग्रंथालये लवकर सुरू होतील**

सध्या विद्यार्थी परीक्षेची तयारी करीत आहेत. मात्र, त्यांना अभ्यास करण्यासाठी ग्रंथालय उपलब्ध होत नाहीत. ग्रंथालय बंद असल्याने त्यांची अडचण होत आहे. त्या पार्श्वभूमीवर ही ग्रंथालये लवकर सुरू करण्याची मागणी होत आहे. त्याबाबत उदय सामंत यांनी सर्व ग्रंथालये लवकरच सुरू होणार असल्याचे सांगितले.

**Prabhat: 7.10.2020**

## News Paper Clippings During October 2020

Section: Education

# Demand to cancel backlog exams, slash 25% syllabus

## Group Tells Samant To Address Host Of Problems

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Cancellation of backlog exams for non-final year students, a 25% reduction in the syllabus, a 50% fee cut, and low-cost meals like Shiv-Bhojan scheme on campuses were some demands put forth by students to higher and technical education minister Uday Samant who was at Savitribai Phule Pune University on Tuesday. The minister promised to look into their grievances.

"We have requested for a cancellation of backlog exams for non-final year students. In case they still decide to go ahead with the examination after 120 days as per the earlier notifications from the state as well as the university, we have appealed for these examinations to be taken in the multiple choice questions format instead of the regular pattern," Kuldeep Ambekar, a law student, who runs an organisation called Students' Helping Hands.

Students have demanded that colleges should give them a 50% concession in fees as parents are struggling.

Ambekar said, "Many colleges do not even have a proper e-learning portal that has been made available to the students, despite so many months since the pandemic. What we are trying to request from the university as well as the minister is to pass an order which does not allow colleges to collect fees on non-utilised heads such as parking, laboratory, library, mess and hostel at least for this semester."

### A MEAL SCHEME FOR ₹10

- Many students who come to SPPU belong to rural areas and are from poor economic backgrounds
- Pune being an expensive city, meals are one of the biggest necessary expenses while living in the city
- These are subsidised meals for ₹10 at each of the affiliated colleges and the SPPU campus
- Poor students can be helped to access at least one affordable meal through this effort

The letter submitted to the minister said the government must start a Shiv-Bhojan facility



Higher education minister Uday Samant (second from right) at the university

### 113 CENTRES FOR OFFLINE EXAM

- In Nashik, Ahmednagar and Pune
- 2.5 lakh students will appear for the exam starting from October 13
- 50,000 students have opted for offline mode
- Exam will be conducted in multiple choice questions
- Special arrangements for 571 physically challenged students
- They will be given 20 extra minutes to write the paper



## Minister reviews university's exam plans

SwatiShindeGole @timesgroup.com

**Pune:** Minister of higher education Uday Samant was at the Savitribai Phule Pune University on Tuesday to review the arrangements for the final semester examination.

Samant met representatives of the district administration and the district collectorate for coordination between them, and SPPU to conduct the final semester examination. A coordination cell has been set up.

If students fail in the exam, they will get another chance to take the exam. The minister said the district collector and police commissioner of the respective place will be involved in conducting exams of students who have opted for the offline exams.

Samant said, "The repeater exam for those who fail in this exam conducted by the university will be done immediately, and students do not have to wait for six months. The university will make arrangements to conduct the re-exam till the last student passes."

Samant said there will be enough flexibility for students to change from online to offline, but they will have to decide before the exam.

The Times of India: 7.10.2020

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## Edu minister visits SPPU; final-yr exams begin from Oct 12

Dheeraj Bengrut

dheeraj.bengrut@htlive.com

PUNE: Over two lakh students have opted to take online and 50,000 will appear offline for the final year exam conducted by Savitribai Phule Pune University (SPPU) beginning October 12.

To review the exam preparation, state higher and technical education minister Uday Samant visited the university campus on Tuesday and met the officials. Samant said that there will be no more delay in the exam schedule, which was postponed in light of other exams and strike by non-teaching staff. Samant, who was tested Covid positive a few days back, made his first official visit after completing the quarantine period.



State higher and technical education minister Uday Samant visited the SPPU campus on Tuesday. MILIND SAURKAR/HT

"All the arrangements are in place and we hope that the exams will be conducted smoothly. For offline students, 113 centres have been identified by SPPU in three districts and instructions have been given to follow Covid prevention measures. The police commissioner and district collector of all the three districts – Pune, Nashik and Ahmednagar – have been instructed by our department to coordinate for these exams," said Samant.

Gurudev Somani, director, Mastersoft Erp, which is working with various city-based colleges for online exams, said that students have reported about facing internet connectivity and devices/browsers competency issues.

"Using mobile phones with different application versions, different data plans, created certain compatibility issues. It is advisable for students to settle down 10 minutes prior to the exam, go through mock tests conducted by the college, watch training videos and follow instructions. Following these steps will help address 99 per cent issues," said Somani.

For the final year examination, a total of 2.5 lakh students of SPPU and its affiliated colleges are going to appear.

The written exams will start from October 12, while the mock test and question paper sets for practice will start from October 8. SPPU faculty are preparing question paper sets for around 3,300 different subjects.

### Fees and reopening of colleges

Talking about the college fee issue, Samant said, "We had instructed colleges earlier that there should be no increase in fees this year due to Covid-19 pandemic and students should not be forced to pay fees immediately. Development and gymkhana charges which are included in annual fees should not be charged this year. Action will be taken against colleges found not following the instructions."

"We have got the guidelines from the Union home ministry about re-starting colleges, but our stand is still the same that we will not allow colleges to reopen until the Covid situation normalises," he said.

### Issues faced by students

"Students are facing a lot of problems due to Covid-19 pandemic. Colleges are demanding full fees and students, mainly those coming from rural background, are unable to pay fees now. We requested the minister to reduce fees by 50 per cent," said Sandhya Sonawane, Pune division head of Nationalist Congress Party students' union.

Kuldeep Ambekar, president of students helping hand organisation said, "There are various issues which students are facing today due to Covid situation, right from paying fees, hostel of accommodation to appearing for the final year exams. Our demand is that the state education department should cancel the backlog exams for first and second-year students or else take their exams through MCQ method. The syllabus should be reduced by 25 per cent looking at the current online system of taking lectures. As most of the students come from rural part, there is connectivity issue and they cannot attend lectures regularly. College fees should be reduced by 50 per cent for this academic year."

**Hindustan Times: 7.10.2020**

## बारावीच्या प्रश्नपत्रिकेचा पेच

### परीक्षेचा आराखडाच नसल्याने विद्यार्थी, शिक्षक संभ्रमात

**पुणे, ता. ६ : बारावीचा अभ्यासक्रम यंदापासून बदलला आहे. एकमेकांशी चर्चा करून शिक्षक नवीन अभ्यासक्रमाचे अध्यापन करत आहेत. मात्र अद्याप बारावीच्या विषयांच्या प्रश्नपत्रिकांचा आराखडा प्रसिद्ध न झाल्याने विद्यार्थ्यांकडून सराव कसा करून घ्यायचा, असा प्रश्न शिक्षकांना पडला आहे.**

नव्या अभ्यासक्रमानुसार यंदा परीक्षा होणार आहेत. साधारणपणे अभ्यासक्रम बदलल्यानंतर शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते. मात्र ते कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लांबणीवर पडले. अभ्यासक्रम नवीन असल्याने आतापर्यंत शिक्षकांनी आपल्या सहकारी शिक्षकांच्या मदतीने अध्ययन सुरू ठेवले आहे. कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे या विद्यार्थ्यांना ऑनलाइनद्वारेच धडे दिले जात आहेत. अन्यथा दरवर्षी ऑक्टोबर महिन्यापर्यंत बारावीचा ७५ टक्के अभ्यास शिकवून पूर्ण झालेला असतो आणि झालेल्या अभ्यासाची उजळणी विद्यार्थी करू लागतात. मात्र यंदा सराव परीक्षा नेमकी कशी घ्यावी, याचा अंदाज येत नसल्याने शिक्षकांचा गोंधळ उडत आहे.

बारावीच्या नव्या अभ्यासक्रमात कृतिशीलतेला वाव देण्यात आला आहे. त्यामुळे सराव परीक्षा नेमकी घ्यायची कशी असा प्रश्न शिक्षकांना आणि परीक्षेची तयारी कशी करायची असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडला आहे. बारावी प्रश्नपत्रिकांचा आराखडा उपलब्ध करून द्यावा, म्हणजे सराव परीक्षा घेणे सोपे होईल, अशी मागणी आता शिक्षक करत आहेत.

**बारावीच्या एकूण ५८ विषयांपैकी २२ विषयांच्या प्रश्नपत्रिकांचा आराखडा राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. उर्वरित विषयांच्या प्रश्नपत्रिकांचा आराखडा मान्यता मिळाल्यानंतर येत्या आठवड्यापर्यंत संकेतस्थळावर अपलोड केला जाईल.**

**– डॉ. अशोक भोसले, सचिव,**
राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

**त्यामुळे नव्या अभ्यासक्रमाप्रमाणे विद्यार्थ्यांकडून परीक्षेसाठी सराव करून घेताना प्रश्नपत्रिकांचा आराखडा उपयुक्त ठरतो. हा आराखडा लवकरात लवकर उपलब्ध झाल्यास शिक्षकांना विद्यार्थ्यांकडून परीक्षेची तयारी करून घेणे आणि विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करणे सोपे जाणार आहे.**

**– पूजा जोग,** मुख्याध्यापक, रेणुका स्वरूप उच्च माध्यमिक विद्यालय

**Sakaal: 7.10.2020**

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

7/10/2020 Indian Express

# Minister reviews preparations for online-offline exam at SPPU



Higher Education Minister Uday Samant interacts with students and management at SPPU on Tuesday. *Ashish Kale*

**ALIFIYA KHAN**
PUNE, OCTOBER 6

EVERY STATE university is equipped to conduct final-year degree examinations in the next couple of weeks, assured state Higher and Technical Education Minister Uday Samant, who visited the Savitribai Phule Pune University (SPPU) on Tuesday. He also said that if a student is unable to take the exam, or fails in it, they will be given another chance soon.

Samant, who had tweeted on September 29 about testing positive for Covid-19, and tweeted again on October 4 that he tested negative, was on a visit to the university to review SPPU's preparations to conduct the final-year online-offline exam.

After the review meeting, he addressed a press conference where state Director of Higher Education Dhanraj Mane, SPPU Registrar Prafulla Pawar and Mahesh Kakade, director of examinations and evaluation, SPPU, were present.

"All state universities have completed preparations for the examinations but a few are facing technical difficulties... we will ensure no student is left out. Even at Pune University, 2 lakh students will take the online examination and 50,000 students will take the offline examination. Since currently, the state is under the Disaster Management Act, an independent cell is being set up to coordinate between the district administrations of Ahmednagar, Pune and Nashik under the university," he said.

The minister, who also reviewed online classes for newly-inducted students, said since colleges across the state can't be opened until the pandemic situation stabilises, students and universities should be prepared for online classes this year. Further examinations and assessments for this year would be planned accordingly, he said.

## No distancing norms followed

As a crowd of students, staffers and members of college management crowded the hall at SPPU to meet state Higher and Technical Education Minister Uday Samant over various issues, social distancing norms were thrown to the wind. It has barely been eight days since Samant had tested positive for the infection and only two days since he tweeted about his negative report.

**The Indian Express: 7.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

नवभारत

## स्टूडेंट के स्वास्थ्य का रखा जाएगा पूरा ख्याल

# 3 लाख विद्यार्थी देंगे अंतिम वर्ष की परीक्षा

**2.5** लाख छात्र ऑनलाइन बैठेंगे अंतिम वर्ष की परीक्षा में | **50,000** छात्र ऑफलाइन परीक्षा में शामिल होंगे | **113** केंद्रों पर ऑफलाइन परीक्षा की भी योजना

नवभारत न्यूज नेटवर्क

**पुणे.** सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के तहत अंतिम वर्ष की परीक्षा में कुल ढाई लाख छात्र उपस्थित होंगे. ऑनलाइन परीक्षा के लिए दो लाख छात्र दिखाई देंगे, जबकि 50,000 छात्र ऑफलाइन परीक्षा में शामिल होंगे. ऐसा उच्च और तकनीकी शिक्षा मंत्री उदय सामंत ने आज यहां कहा. उन्होंने यह विश्वास भी जताया कि कोई भी छात्र परीक्षा से वंचित नहीं रहेगा.

**समन्वय सेल का गठन**





### परीक्षा को लेकर समीक्षा

सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के सभागृह में, उच्च और तकनीकी शिक्षा मंत्री उदय सामत ने विश्वविद्यालय के माध्यम से आयोजित की जा रही अंतिम वर्ष की परीक्षा तैयारियों की समीक्षा की. वह उसके बाद आयोजित एक संवाददाता सम्मेलन में बोल रहे थे. सामंत ने कहा कि 113 केंद्रों पर ऑफलाइन परीक्षा की भी योजना है. यहां भी कोविड -19 की पृष्ठभूमि के खिलाफ आवश्यक सावधानी बरती जाएगी. उन्होंने यह भी कहा कि विकलांग छात्रों के स्वास्थ्य की देखभाल के लिए परीक्षा की योजना बनाई गई थी.

### छात्र परीक्षा से नहीं रहेंगे वंचित

पुणे विश्वविद्यालय द्वारा अंतिम वर्ष की परीक्षाओं के लिए की गई योजना पर संतोष व्यक्त करते हुए, उच्च और तकनीकी शिक्षा मंत्री उदय सामंत ने कहा कि विश्वविद्यालय और प्रशासन के बीच समन्वय सुनिश्चित करने के लिए एक समन्वय सेल की स्थापना की जाएगी.



विश्वविद्यालय और प्रशासन के बीच समन्वय सुनिश्चित करने के लिए एक समन्वय सेल की स्थापना की जाएगी.

-उदय सामंत, उच्च एवं तकनीकी शिक्षा मंत्री, महाराष्ट्र

साथ ही 8 अक्टूबर से प्रैक्टिस प्रश्न पत्र दिए जाएंगे. | छात्रों की समस्याओं से निपटने के लिए एक शिकायत निवारण केंद्र भी बनाया गया है. | परीक्षा के लिए प्रत्येक जिले के लिए प्राचार्य को नोडल अधिकारी नियुक्त किया गया है. | कोई भी छात्र परीक्षा से वंचित नहीं रहेगा

Pune Edition
07-october-2020 Page No. 8
epaper.enavabharat.com

लोकमत

# एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही

## उदय सामंत : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ऑनलाइन परीक्षेचा घेतला आढावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील सर्वच विद्यापीठांनी अंतिम वर्षाच्या परीक्षांची तयारी केली आहे. एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घेतली आहे. तसेच परीक्षा देऊ न शकलेल्या आणि परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुद्धा लवकर घेण्यात येईल, असे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी स्पष्ट केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या ऑनलाइन ऑफलाईन परीक्षांचा आढावा घेतल्यानंतर पत्रकार परिषदेत उदय सामंत बोलत होते. उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे उपस्थित होते.

सामंत म्हणाले, राज्यातील सर्वच विद्यापीठांनी परीक्षेची तयारी केली असून काही ठिकाणी तांत्रिक अडचणी येत आहेत. पुणे विद्यापीठातील सुमारे २ लाख विद्यार्थी ऑनलाइन तर सुमारे ५० हजार विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. सध्या राज्यात आपत्ती व्यवस्थापन कायदा लागू आहे.त्यामुळे परीक्षा घेताना अडचणी येऊ नयेत यासाठी पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा प्रशासन व विद्यापीठ प्रशासन यांच्यातील समन्वयासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करणार आहे. स्थानिक जिल्हा प्रशासनाला सॅनिटायझर व इतर सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सूचना दिल्या जातील.

### राज्यात महाविद्यालय आताच सुरू होणार नाही

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सुधारणा झाल्याशिवाय राज्यातील महाविद्यालय सुरु केली जाणार नाहीत. मात्र, सध्या विद्यापीठ व महाविद्यालयांकडून शिकवला जात असलेला ऑनलाइन अभ्यासक्रम ग्राह्य धरला जाणार आहे. तसेच या अभ्यासक्रमावरच पुढील परीक्षा घेतल्या जाणार आहेत, असेही सामंत यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 4 Oct 07, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना पाच वेळा करता येणार बहुपर्यायी प्रश्नांचा सराव



**पुणे** : अंतिम वर्षाची परीक्षा देण्यापूर्वी विद्यार्थ्यांना बहुपर्यायी प्रश्नांचा (एमसीक्यू) सराव करण्यासाठी पाच वेळा सराव करता येणार आहे. विद्यार्थ्यांना प्रश्नांचे आकलन होण्यासाठी ६० प्रश्नांची व ५० गुणांची एका तासाची सराव चाचणी घेतली जाणार आहे, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पदवी आणि पदव्युत्तर पदवीची अंतिम वर्षाची परीक्षा दि. १२ ऑक्टोबरपासून ऑनलाईन व ऑफलाईन माध्यमातून घेतली जाणार आहे. ही परीक्षा ऐन वेळी एमसीक्यू पद्धतीने घेतली जाणार असल्याने विद्यार्थ्यांचा त्यास विरोध होता. मात्र, विद्यापीठ आपल्या निर्णयावर ठाम असल्याने विद्यार्थ्यांनी या नवीन पद्धतीच्या प्रश्नांचा सराव करण्यासाठी प्रश्नसंच द्यावा, अशी मागणी केली होती. विद्यापीठाने ही मागणी देखील अमान्य करत परीक्षेच्या पूर्वी नमुना प्रश्नसंच याद्वारे सराव परीक्षा घेतली जाईल असे स्पष्ट केले होते. येत्या १२ ऑक्टोबरपासून परीक्षा होणार आहे. त्याआधी दि. ८ ते ११ऑक्टोबर दरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळात सराव परीक्षेसाठी वेळ उपलब्ध करून दिला आहे. प्रत्येक विद्यार्थ्यास किमान पाच वेळा एमसीक्यू प्रश्न सोडविण्याचा सराव करता येईल. विद्यार्थ्यांना प्रश्नांचे आकलन होण्यासाठी ६० प्रश्नांची व ५० गुणांची एका तासाची सराव चाचणी घेतली जाणार आहे, असे डॉ. महेश काकडे यांनी स्पष्ट केले आहे. या चाचणी देण्यासाठी संगणकीय प्रणालीत प्रवेश मिळवण्यासाठी https://sppu.wheebox.com/LOGIN-2/sppu.jsp या यूआरएलचा वापर करावा. विषयनिहाय प्रश्नसंच स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत. या संदर्भातील सर्व माहिती स्टुडन्ट प्रोफाइलवर उपलब्ध करून दिली आहे, असेही काकडे यांनी नमूद केले.

**Kesari: 8.10.2020**

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्यात होणार



**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी समिती तयार केली आहे. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली असून, नुकतीच पहिली बैठक विद्यापीठात झाली. त्यावेळी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्यात होईल, असे अध्यक्ष राजेश पांडे यांनी सांगितले.

पांडे म्हणाले, उच्च शिक्षणातील सर्व घटकांबरोबर संवाद साधला जाईल. विशेषतः विद्यार्थ्यांपर्यंत हे धोरण पोहोचविण्यासाठी विविध माध्यमातून प्रयत्न केला जाईल. तसेच, संस्थांचे प्राचार्य आणि संचालक यांच्याकडून सूचना मागवल्या जातील.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राजेश पांडे यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आलेल्या समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिरीष केदारे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, अधिष्ठाता प्रा. डॉ. संजीव सोनवणे, ज्येष्ठ पत्रकार राजीव साबडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, तसेच प्रकुलगुरू एस. एन. उमराणी यांच्या सूचना आणि मार्गदर्शनाखाली आणि ही समिती कार्यरत असेल.

डॉ. शिरीष केदारे म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना राज्य आणि केंद्र सरकारच्या अंमलबजावणी समितीशी संवाद साधला पाहिजे. डॉ राजीव सोन-वणे यांनी शिक्षक प्रशिक्षणावर भर देणे गरजेचे असल्याचे सांगितले, तर डॉ. संजय चाकणे यांनी प्राध्यापक आणि प्राचार्य यांचे प्रश्न ऐकून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करावा, असे सांगितले.

**Kesari: 8.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

## Section: Education

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यासपीठ : संलग्न महाविद्यालय एक हजारपेक्षा अधिक**

# दीडशे महाविद्यालयांनी दिली ऑनलाइन शिक्षणाला चालना

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाइन व्यासपीठाचा वापर करणाऱ्या महाविद्यालयांची संख्या आता दीडशेपर्यंत पोहोचली आहे. गेल्या काही महिन्यांपासून कासवगतीने सुरू असलेल्या कामास गती मिळाली असून शिक्षणापासून वंचित असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात घर बसल्या भर पडणार आहे.

> व्यासपीठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण देण्यासाठी सुमारे दीडशे महाविद्यालयांची निवड करण्यात आली आहे. त्यात टप्प्याटप्प्याने वाढ करून सर्व महाविद्यालयांपर्यंत पोहोचवण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.
>
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**केवळ १४ महाविद्यालयांकडून वापर : संलग्न महाविद्यालयांचे**

**ऑनलाइन व्यासपीठाकडे महावि[...]**

**३० ते ४० महावि[...]**

**लोकमत फोकस**

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने शिक्षण घेता यावे, या उद्देशाने विद्यापीठाने ऑनलाइन व्यासपीठाची निर्मिती केली. महाविद्यालयांनी या व्यासपीठाच्या माध्यमातून आपल्या विद्यार्थ्यांना शिकवावे यासाठी विद्यापीठाने वेळोवेळी आव्हान केले. परंतु, निवडक महाविद्यालयांनी त्यास प्रतिसाद दिला. सप्टेंबर महिना संपला तरी केवळ ३० महाविद्यालयांनी या व्यासपीठाचा वापर सुरु केला. 'लोकमत'ने सर्वप्रथम याबाबत वृत्त प्रसिद्ध करून ऑनलाइन शिक्षणाच्या सद्य परिस्थितीवर प्रकाश टाकला. त्यानंतर विद्यापीठ प्रशासन कामाला लागले. महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी विविध विषयाचे व्हिडिओ तयार करून विद्यापीठाच्या ऑनलाइन व्यासपीठावर प्रसिद्ध केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष सुरु झाले असून संलग्न महाविद्यालयांनी ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यापासूनच विविध अॅपच्या माध्यमातुन शिकवण्यास सुरुवात केली आहे. मात्र, दुर्गम व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या अभावामुळे ऑनलाइन शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. व्यासपीठाचा वापर केल्यास कमी इंटरनेट कनेक्टिव्हिटी असणाऱ्या भागातील विद्यार्थी चांगल्या पद्धतीने शिक्षण घेऊ शकतात.

एकदा डाऊनलोड केलेला व्हिडीओ कधीही पाहून विद्यार्थी आपला अभ्यासक्रम पूर्ण करु शकतात. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची संख्या सुमारे १ हजाराहून अधिक आहे. सध्या केवळ दहा टक्के महाविद्यालयापर्यंत ही यंत्रणा पोहोचली आहे. त्यास अधिक गती देण्याची आवश्यकता असल्याचे काही महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडून सांगितले जात आहे.

**Lokmat: 8.10.2020**

# परीक्षांचा निकाल नोव्हेंबरअखेरपर्यंत

**उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांची होणार तारेवरची कसरत**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विज्ञान शाखेची परीक्षा नऊ नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार असल्याने, सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर होईपर्यंत नोव्हेंबरअखेर उजाडणार आहे. त्यामुळे उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार असल्याचे चित्र आहे.



विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) निकाल जाहीर करण्यासाठी राज्यातील विद्यापीठांना नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्याची मुदत दिली आहे. मात्र, विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेच्या परीक्षा १२ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने पार पडणार आहेत. दोन लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली विज्ञान शाखेची परीक्षा मात्र ९ नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. त्यामुळे निकाल जाहीर होण्यास नोव्हेंबरअखेर उजाडण्याची शक्यता आहे.

त्याच वेळी इतर राज्यांत आणि परदेशांतील प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात असतात. उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी इतर राज्यात किंवा परदेशात जायचे असल्यास मोठी अडचण निर्माण होऊ शकते. शैक्षणिक वर्षही वाया जाण्याची शक्यता आहे. अशाच प्रकारची स्थिती राज्यातील इतर अकृषी विद्यापीठांत असल्याने, राज्य सरकारकडून निकाल जाहीर करण्याची मुदत वाढवून मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यात येतो का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

**सक्षम 'ऑनलाइन'साठी खबरदारी**

राज्यातील काही विद्यापीठांच्या अंतिम सत्रांतील परीक्षा घेण्यास सुरुवात झाली आहे. मुंबई विद्यापीठ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात अंतिम वर्षाची ऑनलाइन परीक्षा सुरू असताना, सर्व्हर डाउनची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही. ही समस्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात उद्भवू नये, अशी इच्छा विद्यार्थ्यांकडून व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यापीठाने नेमलेल्या आयटी कंपनीने खबरदारी म्हणून सुरुवातीपासून योग्य पाऊल आणि कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

**सराव चाचणी आजपासून**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांसाठीची सराव परीक्षा आजपासून (८ ऑक्टोबर) सुरू होणार आहे. ऑनलाइन परीक्षेची विद्यार्थ्यांना कल्पना यावी, यासाठी आयोजिण्यात आलेली ही सराव परीक्षा ११ ऑक्टोबरपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी सहा या दरम्यान होणार आहे. सराव परीक्षेत प्रत्येक विद्यार्थ्याला पाच वेळा एमसीक्यू प्रश्नांची चाचणी सोडविण्याचा सराव करता येईल. विद्यार्थ्यांना प्रश्नाचे आकलन होण्यासाठी ६० प्रश्नांची व ५० गुणांची एका तासाची सराव चाचणी घेतली जाणार आहे. ही चाचणी देण्यासाठी https://sppu.wheebox.com/LOGIN-2/sppu.jsp या लिंकचा वापर करावा. विषयनिहाय प्रश्नसंच स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध करून दिले आहेत. या संदर्भातील सर्व माहिती स्टुडंट प्रोफाइलवर उपलब्ध करून दिली असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली. ९७१७७९९६७९७ या हेल्पलाइन क्रमांकावर विद्यार्थी अडचण आल्यास संपर्क साधू शकतात.

**Maharashtra times: 8.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

## Section: Education

# विद्यार्थ्यांना ५ वेळा सरावासाठी संधी

## 'एमसीक्यू'बाबत विद्यापीठाचे स्पष्टीकरण

**पुणे, ता. ७ : अंतिम वर्षाची परीक्षा देण्यापूर्वी विद्यार्थ्यांना बहुपर्यायी प्रश्नांचा (मल्टिपल चॉइस क्वेश्चन-एमसीक्यू) सराव करण्यासाठी पाच वेळा संधी दिली जाणार असल्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बुधवारी स्पष्ट केले. विद्यापीठातर्फे पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षा १२ ऑक्टोबरपासून ऑनलाइन व ऑफलाइन घेतली जाणार आहे.**

परीक्षा 'एमसीक्यू' पद्धतीने घेण्यास विद्यार्थ्यांचा विरोध होता. मात्र, विद्यापीठ निर्णयावर ठाम असल्याने विद्यार्थ्यांनी या नवीन पद्धतीच्या प्रश्नांचा सराव करण्यासाठी प्रश्नसंच देण्याची मागणी केली. विद्यापीठाने ही मागणी देखील अमान्य करत परीक्षेच्या पूर्वी नमुना प्रश्नसंचाद्वारे सराव परीक्षा घेतली जाईल, असे स्पष्ट केले होते. विद्यापीठाने १२ ऑक्टोबरपासून नियमित व बॅकलॉगच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यापूर्वी ८ ते ११ ऑक्टोबर या कालावधीत



सकाळी दहा ते सायंकाळी सहा या दरम्यान सराव परीक्षेसाठी वेळ उपलब्ध करून दिला आहे.

प्रत्येक विद्यार्थ्यास किमान पाच वेळा या पद्धतीचे प्रश्न सोडविण्याचा सराव करता येईल. विद्यार्थ्यांना प्रश्नांचे आकलन होण्यासाठी ६० प्रश्नांची व ५० गुणांची एका तासाची सराव चाचणी घेतली जाणार आहे, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले.

**या 'यूआरएल'चा करा वापर**

सराव चाचणी देण्यासाठी संगणकीय प्रणालीत प्रवेश https://sppu.wheebox.com/LOGIN-2/sppu.jsp या 'यूआरएल'चा वापर करावा. विषयनिहाय प्रश्नसंच स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत. या संदर्भातील सर्व माहिती 'स्टुडन्ट प्रोफाइल'वर उपलब्ध करून दिली आहे, असेही काकडे यांनी सांगितले आहे.

**Sakaal: 8.10.2020**

**पुढारी**

# विद्यापीठाच्या कॅसअंतर्गत मुलाखतींत अनियमितता

## प्रत्येक महिन्यात कॅसच्या मुलाखती घ्या; अध्यापक संघटनेची (स्पुक्टो) मागणी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (कॅस) अंतर्गत होणाऱ्या पदोन्नती उपक्रमामध्ये अनियमितता असून, राज्य सरकारच्या नियमाची अंमलबजावणी केली जात नाही. त्यामुळे प्राध्यापकांना त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे प्रत्येक महिन्यात कॅसच्या मुलाखती घ्या, अशी मागणी विद्यापीठ व महाविद्यालयीन अध्यापक संघटनेद्वारे (स्पुक्टो) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्याकडे करण्यात आली आहे.

विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांना ठराविक कालावधीनंतर पदोन्नती घेण्यासाठी रिफ्रेशर कोर्स, फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम करावे लागतात त्याचप्रमाणे शोधनिबंधदेखील प्रकाशित करावा लागतो. यानंतर संबंधित प्राध्यापकाची पदोन्नतीसाठी कॅसअंतर्गत मुलाखत आयोजित करण्यात येते. परंतु, या मुलाखतींमध्ये अनियमितता असल्याने त्याचा फटका प्राध्यापकांना बसत आहे. असा आरोप स्पुक्टोकडून करण्यात आला आहे. या मागणीसोबतच नेट/सेटमुक्त प्राध्यापकांना न्याय देणे; तसेच अध्यापकांना निवृत्तीवेतन देणे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

१८ जुलै २०१८ च्या यूजीसी रेग्युलेशनमधील सर्व तरतुदी आहे तशा लागू करणे, सातव्या वेतन आयोगाच्या अन्यायकारक बाबी मागे घेण्यात याव्या, अर्धवेळ शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती करण्यात यावी, अशा मागण्या स्पुक्टोचे अध्यक्ष डॉ. के. एल. गिरमकर आणि सचिव डॉ. व्ही. एम. शिंदे यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्याकडे केल्या आहेत.

My Pune Edition
Oct 8, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## आजपासून सॉफ्टवेअरची चाचणी

मुंबई विद्यापीठात अंतिम वर्षाच्या परीक्षेत गोंधळ झाला होता. असा प्रकार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षेत होऊ नये, यासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळ सतर्क आहे. गुरुवार (ता. ८) पासून सुरू होणाऱ्या सराव परीक्षेत ऑनलाइन परीक्षेच्या सॉफ्टवेअरची चाचणी होणार आहे.

पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षेचे काम गुरूग्राम (गुडगाव) येथील कंपनीस दिले आहे. एक लाख ९७ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन तर ५० हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाइनचा पर्याय निवडला आहे. एकाच दिवशी एकाच सत्रात हजारो विद्यार्थी परीक्षा देत असताना सर्व्हरवर लोड येऊन संपूर्ण सिस्टिम हँग होण्याची शक्यता आहे. असाच प्रकार मुंबई विद्यापीठात मंगळवारी घडला होता. **पान ६ वर »**

- सुमारे २.५० लाख विद्यार्थी देणार परीक्षा.
- अडचणी सोडविण्यासाठी हेल्पलाइन क्रमांक ९७१७७९६७९७
- विद्यार्थी संख्येपेक्षा तीन पट क्षमता असलेले सर्व्हर.
- सराव परीक्षेतही सॉफ्टवेअरची चाचणी.
- मुख्य परीक्षेस अवधी असल्याने दुरुस्तीस वेळ.

## आजपासून सॉफ्टवेअरची चाचणी

**» पान १ वरून**

त्यामुळे फेरपरीक्षा घेण्याची नामुष्की विद्यापीठावर आली आहे. पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याने आपलीतरी परीक्षा व्यवस्थित पार पडणार का?, अशी शंका आहे. एमकॉमचा विद्यार्थी कमलाकर शेटे म्हणाला, "मुंबई, सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षेत तांत्रिक समस्या आली आहे. पुणे विद्यापीठाच्या परीक्षेत असा प्रकार घडू नये, यासाठी काळजी घ्यावी."

परीक्षा विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, "पुणे विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या तुलनेत तीन पट क्षमता असलेले सर्व्हर घेतले आहे. त्यामुळे तांत्रिक समस्या निर्माण होणार नाही. तरीही पुणे विद्यापीठ पूर्णपणे सतर्क आहे.

सराव चाचणीच्या वेळेसही याची चाचणी होईल. तसेच, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी ९७१७७९६७९७ हा हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध करून दिला आहे."

**Sakaal: 8.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## विद्यार्थ्यांच्या सराव चाचण्या आजपासून

### पुढील आठवड्यात विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने १२ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. मात्र, बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नपत्रिका, परीक्षेची संगणकीय प्रणाली याबाबत विद्यार्थ्यांना कल्पना येण्यासाठी ८ ते ११ ऑक्टोबर या कालावधीत सकाळी दहा ते सायंकाळी सहा या दरम्यान सराव परीक्षा देता येणार आहे.

विद्यापीठाने अंतिम वर्ष परीक्षांचे नियोजन केले आहे. ऑनलाइन परीक्षांसाठी कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच ११३ केंद्रांवर ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेतली जाणार आहे. सराव परीक्षेत प्रत्येक विद्यार्थ्याला पाच वेळा बहुपर्यायी प्रश्न सोडवण्याचा सराव करता येईल. विद्यार्थ्यांना प्रश्नाचे आकलन होण्यासाठी ६० प्रश्नांची आणि ५० गुणांची एका तासाची सराव चाचणी घेतली जाणार आहे. ही चाचणी देण्यासाठी https://sppu.wheebox.com/LOGIN—s/sppu.jsp या लिंकचा वापर करावा. दरम्यान, विषयनिहाय प्रश्नसंच स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध करून देण्यात येतील. या संदर्भातील माहिती स्टुडन्ट प्रोफाइलवर उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले. तर काही अडचणी आल्यास विद्यार्थ्यांनी ९७१७७९६७९७ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

**विद्यापीठाची कसोटी...**

ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेताना तांत्रिक अडचणी उद्भवण्याचे प्रकार मुंबई विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षांदरम्यान घडले आहेत. त्यामुळे या दोन्ही विद्यापीठांना परीक्षांचे पुनर्नियोजन करावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची कसोटी लागणार आहे.

लोकसत्ता Thu, 08 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55508213

## परीक्षा देऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोनाची लागण, एकाच वेळी दोन परीक्षा अशा कारणांनी परीक्षा देऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून विशेष परीक्षा घेतली जाणार आहे. त्यासाठीची आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांना परीक्षा समन्वय कक्षाला सादर करावी लागतील.

करोना संसर्गामुळे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने १२ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान होणार आहेत. काही कारणाने परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांची विद्यापीठाकडून स्वतंत्रपणे परीक्षा घेतली जाणार आहे. मात्र त्यासाठी सबळ कारण असणे आवश्यक आहे. परीक्षा न देण्याचे सुस्पष्ट कारण देणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जाणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने स्पष्ट केले आहे.

विद्यार्थ्याला करोनाची लागण झाली असल्यास, विद्यापीठाच्या परीक्षेच्या दिवशीच राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी), समकक्ष विषयामुळे अथवा अन्य कारणामुळे एकाच वेळी विद्यापीठाच्या दोन विषयाच्या परीक्षा अशा कारणाने परीक्षा देता न आलेल्या विद्यार्थ्यांना विशेष परीक्षा देता येईल. त्यासाठीची कागदपत्रे, प्रमाणपत्रे महाविद्यालय किंवा प्राचार्यांमार्फत परीक्षा समन्वय कक्षाला सादर करावीत, असे परीक्षा विभागाकडून नमूद करण्यात आले.

**पर्याय न निवडलेल्यांना ऑनलाइन परीक्षेची संधी**

विद्यापीठाने विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन असे दोन पर्याय दिले होते. त्यानुसार अडीच लाख विद्यार्थ्यांपैकी २ लाख विद्यार्थ्यांनी ऑनलाइन, तर सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा पद्धतीचा पर्याय निवडला. अद्यापही काही विद्यार्थ्यांनी पर्याय निवडलेले नाहीत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देता येऊ शकते. संबंधित विद्यार्थ्यांना त्यांची माहिती स्टुडंट प्रोफाइलमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

लोकसत्ता Fri, 09 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55533138

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## विद्यापीठाच्या सराव परीक्षेला १ लाख २१ हजार विद्यार्थी

### ऑनलाइन सराव परीक्षेत काही तांत्रिक अडचणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गुरुवारपासून सुरू केलेल्या सराव चाचण्यांमध्ये विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते. पहिल्याच दिवशी १ लाख २१ हजार विद्यार्थ्यांनी सराव चाचणी दिली असून, ऑनलाइन परीक्षेतील तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करण्यात येतील, असे विद्यापीठाने स्पष्ट केले.

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना बहुपर्यायी, ऑनलाइन परीक्षेची पद्धत समजण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने ८ ते ११ ऑक्टोबर या कालावधीत सराव चाचण्यांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यात प्रत्येक विद्यार्थ्याला पाच वेळा बहुपर्यायी प्रश्न सोडवता येणार आहेत. गुरुवारपासून सुरू झालेल्या परीक्षेत काही विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा देता आली नाही. काही विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लॉगइन पासवर्ड वेळेत मिळाला नाही, परीक्षेचे संकेतस्थळ सुरू होऊ शकले नाही अशा अडचणी आल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे दोन लाख विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेचा पर्याय निवडला आहे. त्यापैकी १ लाखांहून अधिक विद्यार्थी मोबाइलद्वारे परीक्षा देत आहेत.

> अंतिम वर्षाच्या १ लाख २१ हजार ५६ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली. परीक्षेदरम्यान किरकोळ तांत्रिक अडचणी आल्या. सराव परीक्षेचा पहिलाच दिवस असल्याने आलेल्या अडचणी समजून घेऊन त्या तातडीने दूर केल्या जातील. पण एकूण परीक्षेबाबत विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद आहे. प्रत्यक्ष परीक्षेदरम्यान कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही याची पूर्ण दक्षता घेतली जात आहे. विद्यार्थ्यांनीही काळजीपूर्वक परीक्षा द्यावी.
>
> – डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Fri, 09 October 2020 https://epaper.loksatta.com/c/

---

पुढारी

## अंतिम वर्ष सराव परीक्षा तांत्रिक अडचणीने सुरू

### १ लाख २१ हजार विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेपूर्वी 'मॉक टेस्ट प्लस' ऑनलाइन सिस्टीमची टेस्टिंग एकत्र घेतल्याने, मॉक टेस्टमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. मॉक टेस्ट सुरू होताना सर्व्हर हँग, लॉगइन आयडी व पासवर्ड चुकीचा दाखविणे, प्रश्नांची उत्तरे सबमिट करताना अडचण येणे अशा अनेक तांत्रिक अडचणींचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागला. मात्र, या अडचणींवर मात करीत १ लाख २१ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.**

दरम्यान, आज (दि. ९) ऑक्टोबरपासून अडथळा विरहित सराव परीक्षा सुरू होईल, असा दावा विद्यापीठाकडून करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना अंतिम वर्षाची ऑनलाइन एमसीक्यू परीक्षेची पद्धत माहिती व्हावी यासाठी ८ ते ११ ऑक्टोबर या कालावधीत सराव परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षेची लिंक खुली होत



नव्हती. काही विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी पासवर्ड मिळाला नाही.

सुमारे २ लाख विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देण्याचा पर्याय निवडला आहे. त्यातील १ लाखांहून अधिक विद्यार्थी मोबाईलद्वारे परीक्षा देत आहेत. त्यांनी ही सराव परीक्षा दिली. यामध्ये तांत्रिक अडचणी आल्यानंतर विद्यापीठाकडून तातडीने पावले उचलली जात असल्याचे दिसून आले. सायंकाळपर्यंत १ लाख २१ हजार विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली. त्यावरून सराव परीक्षा योग्य पद्धतीने होत आहे. मात्र, काही विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी आल्या आहेत. पहिलाच दिवस असून, त्याचा अतिरिक्त ताण यंत्रणेवर पडण्याची शक्यता आहे. रात्रीपर्यंत सर्व तांत्रिक अडचणी दूर केल्या जातील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

#### परीक्षा चुकणाऱ्यांसाठी वेगळी परीक्षा घेणार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची प्रस्तावित अंतिम परीक्षा झाल्यानंतर प्रकृती स्वास्थ्य, एकाच वेळी दोन परीक्षा, तांत्रिक अडचण, श्रेणीसुधार, बॅकलॉग अशा विविध कारणांसाठी पुन्हा परीक्षा द्यायची आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी नजीकच्या कालावधीमध्ये विशेष परीक्षेचे आयोजन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाने घेतला आहे. या विशेष परीक्षेबाबतची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध केली जाईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

परीक्षेची लिंक खुली झाली, पण संबंधित विषयाऐवजी केवळ सामान्य ज्ञानावर आधारित एमसीक्यू प्रश्न होते, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील प्रश्न अपेक्षित होते. मात्र, सामान्य ज्ञान, इंग्रजी व्याकरण, दैनंदिन जीवनावर आधारित प्रश्न विचारण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली.

My Pune Edition
Oct 9, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## परीक्षा हुकली तरी; पुन्हा मिळेल संधी

### पुणे विद्यापीठाचा निर्णय; कागदपत्रे लागणार

**पुणे, ता. ८ :** नुकत्याच झालेल्या 'यूपीएससी'च्या परीक्षेला जवळपास १५ हजारांपेक्षा अधिक जणांनी दांडी मारली. अनेकांना खरोखरच ही परीक्षा द्यायची होती. विद्यापीठाच्या अंतिम परीक्षेला सामोरे जाताना मलाही चिंता आहे. मला कोरोना झाला किंवा त्याच दिवशी माझी अन्य मुलाखत असेल तर ही परीक्षा देता येणार नाही आणि वर्ष वाया जाईल. पण, विद्यापीठाने बदललेल्या नियमामुळे मला पुन्हा संधी मिळणार आहे. हा निर्णय माझ्यासह सर्वांना उपयुक्त ठरेल, असे मत जयेश साळुंके याने व्यक्त केले.

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे येत्या १२ ऑक्टोबरपासून परीक्षा घेतली जाणार आहे. मात्र, सक्षम विषयामुळे किंवा इतर कारणांमुळे

**कोणत्याही कारणास्तव परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना विशेष परीक्षेत संधी दिली जाईल. अंतिम वर्षाची मुख्य परीक्षा झाल्यानंतर ही विशेष परीक्षा घेण्यात येणार असून, त्यासाठीची प्रक्रिया परीक्षेपूर्वी दहा-बारा दिवस आधी सुरू करण्यात येईल.**
– **डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

एकाच वेळी विद्यापीठाच्या दोन विषयांच्या परीक्षा आल्यास, सीईटी परीक्षा किंवा अन्य स्पर्धा परीक्षा एकाच दिवशी असल्यास किंवा विद्यार्थ्यांना कोरोनाची बाधा झाल्यास अशा

पान ४ वर »

## परीक्षा हुकली तरी; पुन्हा मिळेल संधी

» पान १ वरून

काही कारणांमुळे परीक्षा देणे अशक्य झाल्यास संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी दिली जाणार आहे. या विद्यार्थ्यांसाठी नोव्हेंबर अखेरपर्यंत विद्यापीठातर्फे विशेष परीक्षा घेतली जाणार आहे, असे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे सांगण्यात आले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार अंतिम वर्षाच्या नियमित व बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांची परीक्षा १२ ऑक्टोबरपासून घेण्यात येणार आहे. विद्यापीठाने विद्यार्थ्यांना ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे.

विद्यार्थ्यांना याबाबतची माहिती त्यांच्या स्टुडन्ट एक्झाम फॉर्म प्रोफाईलमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, या नियमाचा फायदा घेताना आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्राच्या प्रती महाविद्यालयांमध्ये किंवा संबंधित शैक्षणिक संस्थांच्या प्राचार्य, संचालकांमार्फत परीक्षा समन्वय कक्षात सादर करणे आवश्यक आहे.

## शैक्षणिक धोरणासाठी विद्यापीठाची समिती

**पुणे, ता. ८ :** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची योग्य अंमलबाजवणी आणि उच्च शिक्षणातील सर्व घटकांपर्यंत ते पोचविण्यासाठी संवादात्मक प्रयत्न विविध माध्यमांतून करण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या समितीने घेतला आहे.

**समिती सदस्यांच्या मते**

- विद्यार्थी संवाद महत्त्वाचा.
- शिक्षक प्रशिक्षणावर भर देणे आवश्यक
- प्राध्यापक, प्राचार्य यांचे प्रश्न ऐकून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करावा
- संस्था संचालकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करण्यात येईल
- धोरणाची अंमलबजावणी करताना सुसूत्रता असली पाहिजे.
- राज्य आणि केंद्राच्या अंमलबजावणी समितीशी संवाद साधला पाहिजे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार केली आहे. या समितीची पहिली बैठक नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झाली. त्यावेळी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी टप्प्या टप्प्यांत होईल. तसेच संस्थांचे प्राचार्य आणि संचालक यांच्याकडून सूचना मागवल्या जातील, असे पांडे यांनी 'सकाळ'ला सांगितले.

समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिरीष केदारे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, डॉ. सुधाकर जाधवर, डॉ. संजीव सोनवणे, ज्येष्ठ पत्रकार राजीव साबडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर तसेच प्र-कुलगुरू एस एन. उमराणी यांच्या मार्गदर्शनाखाली ही समिती कार्यरत असेल.

**Sakaal: 9.10.2020**

## शुल्कवाढ रद्द करण्याची शिवसेनेकडून मागणी

### आदेशाला केराची टोपली दाखविल्याचा आरोप

**कँटोन्मेंट, ता. ८ :** शहरातील काही प्रमुख महाविद्यालयांनी भरमसाट शुल्कवाढ केली आहे. ती तत्काळ रद्द करावी, अशी मागणी शिवसेनेचे शहरप्रमुख संजय मोरे यांनी शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली.

या महाविद्यालयांनी शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखविल्याचा आरोपही त्यांनी या वेळी केला. शिवसेनेच्या शिष्टमंडळाने या महाविद्यालयांशी चर्चा केली; मात्र कोणतीही सवलत देण्यास या महाविद्यालयांनी सहमती दर्शविली नाही. कोणत्याही प्रकारे शुल्क कमी करणार नसल्याचे सांगण्यात आले. सध्या कोरोनाचे संकट असल्यामुळे अनेकांच्या नोकरी-व्यवसायाचे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत या महाविद्यालयांनी मागील वर्षीप्रमाणेच शुल्क घेणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांवर दबाव निर्माण करून शुल्क भरून घेण्याचा प्रयत्न चालू आहे. या महाविद्यालयांवर तातडीने कारवाई करून शुल्कवाढ रद्द करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी मोरे यांनी मंत्री सामंत यांच्याकडे केली.

**Sakaal: 9.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## पन्नास टक्के विद्यार्थ्यांनी दिली मॉक टेस्ट

### पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा : एकूण विद्यार्थी संख्या अडीच लाख

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या सरावासाठी गुरुवारी मॉक टेस्ट घेण्यात आली. पुणे, अहमदनगर व नाशिक या जिल्ह्यांमधील सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांपैकी पन्नास टक्के विद्यार्थ्यांनी तीन तासांत ही मॉक टेस्ट दिली. परंतु, काही विद्यार्थ्यांना परीक्षा देताना अडचणी आल्या.

पुणे विद्यापीठातर्फे येत्या १२ ऑक्टोबरपासून अंतिम वर्षाची परीक्षा सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांना या परीक्षेचा सराव करता यावा; यासाठी गुरुवारी दुपारी ३ ते ६ या कालावधीमध्ये मॉक टेस्ट सुविधा उपलब्ध करुन दिली होती. त्यानुसार १ लाख २१ हजार १०७ विद्यार्थ्यांनी ही मॉक टेस्ट दिली. विद्यापीठातर्फे एजन्सीमार्फत सर्व विद्यार्थ्यांना सराव परीक्षेबाबत लॉगइन आयडी व पासवर्ड पाठविले होते. मात्र, त्यातील काही विद्यार्थ्यांना लॉगइन आयडी व पासवर्ड मिळाले नाहीत. एकाच वेळी एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट दिल्यामुळे विद्यापीठाचे संकेतस्थळ दहा ते पंधरा मिनिटांसाठी क्रॅश झाले होते, असे परीक्षा विभागातील सूत्रांनी सांगितले. विद्यापीठातर्फे ९ व १० ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते ६ या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा मॉक टेस्ट देता येणार आहे. एका विद्यार्थ्याला दिवसभरात किमान ५ वेळा मॉक टेस्ट देता येईल, असे परीक्षा विभागातर्फे स्पष्ट केले आहे. तसेच, गुरुवारी विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणी शुक्रवारी व शनिवारी येऊ नयेत, याची खबरदारी विद्यापीठाकडून घेतली जाणार आहे, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

**Lokmat: 9.10.2020**

## कोरोनाबाधितांसाठी विशेष परीक्षा होणार

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे येत्या १२ ऑक्टोबरपासून अंतिम वर्षाची परीक्षा घेतली जाणार आहे. मात्र, सक्षम विषयामुळे किंवा इतर कारणांमुळे एकाच वेळी विद्यापीठाच्या दोन विषयांच्या परीक्षा आल्यास सीईटी परीक्षा किंवा शासकीय स्पर्धा परीक्षा एकाच दिवशी असल्यास किंवा विद्यार्थ्याला कोरोनाची बाधा झाल्यास संबंधित विद्यार्थ्यांसाठी नजीकच्या कालावधीमध्ये विशेष परीक्षा घेतली जाणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमध्ये परीक्षेपासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे काही कारणास्तव परीक्षा देणे शक्य झाल्यास विद्यार्थ्यांना पुन्हा नजीकच्या काळात परीक्षा देता येऊ शकते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार अंतिम वर्षाच्या नियमित व बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांची परीक्षा १२ ऑक्टोबरपासून घेणार आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. परंतु, ज्या विद्यार्थ्यांनी कोणताही पर्याय निवडला नाही, असे सर्वजण ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देता येऊ शकतात. विद्यार्थ्यांना माहिती त्यांच्या स्टुडंट एक्झाम फॉर्म प्रोफाइलमध्ये उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांनी सर्व आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्राच्या प्रती महाविद्यालय प्राचार्यांमार्फत परीक्षा समन्वय कक्षात सादर करणे आवश्यक आहे.

**Lokmat: 9.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

६ || प्रभात पुणे, शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२०

## पहिल्याच सराव परीक्षेत तांत्रिक अडचणी

### सराव परीक्षा यशस्वी : विद्यापीठाचा दावा

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ८ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गुरुवारपासून सुरू केलेल्या सराव परीक्षेत विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले. लॉगिन होत नव्हते, वेळेत पासवर्ड मिळाला नाही, अशा तांत्रिक कारणाने विद्यार्थी हवालदिल झाले. दरम्यान, पहिल्याच दिवशी १ लाख २१ हजार विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली असून, यातील काही तांत्रिक



त्रुटी तातडीने दूर केले जाणार असल्याचे विद्यापीठाने सांगितले.

ऑनलाइन परीक्षेची माहिती व्हावी, यासाठी पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागामार्फत दि. ८ ते ११ ऑक्टोबर या कालावधीत सराव परीक्षा घेण्यात येत आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांना पाचवेळा एमसीक्यूद्वारे प्रश्न सोडविण्याचा सराव होण्यासाठी ही परीक्षा महत्त्वाची आहे. मात्र या सराव परीक्षेला बसताना काही विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी आल्या. परीक्षेची लिंक खुली होत नव्हती. काही विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी पासवर्ड मिळाला नाही. परीक्षेची लिंक खुली झाली, पण संबंधित विषयाऐवजी केवळ सामान्यज्ञानावर आधारित प्रश्न होते, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

> सायंकाळपर्यंत १ लाख २१ हजार विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली. त्यावरून सराव परीक्षा योग्य पद्धतीने होत आहे. मात्र, काही विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी आल्या आहेत. पहिलाच दिवस असून, त्याचा अतिरिक्त ताण यंत्रणेवर पडण्याची शक्यता आहे. रात्रीपर्यंत सर्व तांत्रिक अडचणी दूर केल्या जातील.
>
> - डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

#### विद्यापीठाने तातडीने पाऊले उचलली

सुमारे २ लाख विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देण्याचा पर्याय निवडला आहे. त्यातील १ लाखांहून अधिक विद्यार्थी मोबाइलद्वारे परीक्षा देत आहेत. त्यांनी ही सराव परीक्षा दिली. मात्र अनेक विद्यार्थ्यांना तांत्रिक कारणाने परीक्षा योग्य पद्धतीने देता आली नसल्याची तक्रार आहे. त्याची दखल घेत विद्यापीठाकडून तातडीने पाऊले उचलले जात असल्याचे दिसून आले.

## प्राध्यापकांच्या बढतीला उशीर

### राज्य सरकारच्या आदेशाकडे दुर्लक्ष; वर्षातून दोनदा मुलाखतींची मागणी

सकाळ EXCLUSIVE

पुणे, ता. ८ : 'अध्यापकांच्या सेवाअंतर्गत प्रगती योजने'तून (करिअर ॲडव्हान्समेंट स्किल-कॅस) बढतीसाठी माझी मुलाखत जुलै महिन्यात अपेक्षित होती. पण, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वर्षातून एक वेळेसच 'कॅस'च्या मुलाखतींसाठी वेळापत्रक जाहीर करत आहे. त्यामुळे नोकरीतील बढती आणि त्यापासून मिळणाऱ्या लाभासाठी माझे नुकसान होत आहे. विद्यापीठाने राज्य सरकारच्या आदेशांचे पालन करून प्राध्यापकांच्या प्रत्येक महिन्याला मुलाखती घेतल्या पाहिजेत,' असे पुण्यातील एका नामांकित महाविद्यालयातील प्राध्यापक सांगत होते.

अनुदानित किंवा विनाअनुदानित महाविद्यालयांमधील प्राध्यापकांना ठरावीक कालावधीनंतर बढती दिली जाते. त्यासाठी प्राध्यापकांना 'ओरिएंटेशन कोर्स', फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोगाम, रिफ्रेशर कोर्स करणे गरजेचे असते. तसेच, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध सादर

पान ४ वर »

#### काय केला आहे बदल?

सेवेत असलेल्या प्राध्यापकांच्या बढतीची तारीख वेगवेगळ्या महिन्यात येते. त्यामुळे वर्षातून एकदाच मुलाखती न घेता प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात 'कॅस'साठी मुलाखती घेऊन पात्र प्राध्यापकांना बढती द्यावी, असे आदेशात नमूद केले आहे. सरकारच्या नव्या आदेशानुसार, ज्या दिवशी बढती मिळेल त्या दिवसापासून सर्व लाभ व पदनामात बदल होतात. त्यामुळे या मुलाखतींना उशीर होत असल्याने अनेक प्राध्यापकांना किमान एका महिन्यापासून वर्षभरापर्यंतचा लाभ मिळत नसल्याने नुकसान होत आहे, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाविद्यालयीन अध्यापक संघटनेचे (स्पुक्टो) अध्यक्ष प्रा. डॉ. के. एल. गिरमकर यांनी सांगितले.

| | |
|---|---|
| १००० पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये | १२००० प्राध्यापकांची संख्या |
| ४५०० अनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापक | ४०० दरवर्षी बढती मिळणारे प्राध्यापक |



> राज्यातील इतर सर्व विद्यापीठांमध्ये 'कॅस'च्या मुलाखती दर महिन्याला होतात. फक्त पुणे विद्यापीठाने सुधारित नियमांची अंमलबजावणी केलेली नाही. प्रत्येक महिन्याला मुलाखती घेतल्यास प्राध्यापकांचे नुकसान होणार नाही, तसेच यंत्रणेवरील ताण कमी होईल, याबाबत प्रशासनाने निर्णय घ्यावा.
>
> - प्रा. डॉ. के. एल. गिरमकर, अध्यक्ष, स्पुक्टो

> प्रत्येक महिन्याला 'कॅस' शिबिर घेणे शक्य नसेल तर विद्यापीठाने किमान वर्षातून दोन वेळा तरी शिबिर घेऊन मुलाखतींचे आयोजन केले पाहिजे.
>
> - डॉ. श्यामकांत देशमुख, अधिसभा सदस्य

## प्राध्यापकांच्या बढतीला उशीर

» पान १ वरून

करावा लागतो. ज्यावेळी 'कॅस' शिबिरांमध्ये मुलाखत घेतली जाते, त्यात प्राध्यापकांना ही सर्व माहिती सादर करावी लागते. दरम्यान, यापूर्वी 'कॅस'मध्ये पात्र ठरल्यानंतर देय तारखेपासूनचा रकमेतील फरक व पदाचा लाभ मिळत होता. या प्रक्रियेबाबत अनेक तक्रारी येत असल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'कॅस'च्या नियमात सुधारणा करून, त्याबाबत राज्य सरकारला दिल्या होत्या. त्यानुसार ८ जुलै २०१९ रोजी राज्यातील कृषी, अकृषी विद्यापीठांनी अंमलबजावणी करावी, असे सरकारने आदेश दिले.

उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक कार्यालयाने पुणे विद्यापीठाला १२ डिसेंबर २०१९ रोजी पत्र पाठवून त्यानुसार मुलाखती घेण्याचे आदेश दिले होते.

**Sakaal: 9.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

## Section: Education

# Virus-hit students can appear for exams later

### Claims have to be authenticated by principals, say SPPU authorities

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

While final-year examinations at Savitribai Phule Pune University (SPPU) is all set to begin on October 12, the varsity has made a special allowance this year, allowing not just those who fail their pa- pers, but also those who miss the exams due to being afflicted by COVID-19 or the dates clashing with other entrance examinations. Of course, students will be allowed to sit for the repeat examination only if their claims are authenticated by their principals.




Announcing this, Mahesh Kakade, director, examination department, SPPU, informed, "The recent meeting of the management council has decided to schedule a special examination for only those students who might miss their examination. But, unlike the failed students, these student will have to follow a certain process to apply for the examination." Incidentally, this examination will coalesce with the re-examination offered to failed students.

The varsity made the allowance taking cognisance of the uncertainty created by the pandemic and the different schedule picked this year for the final examination, running the risk of it clashing with entrance examination of other universities, forcing students to miss their papers. However, the schedule for the re-examination is yet to be declared.

A student who will be appearing for his final year in BCom pointed out, "Many entrance examinations such as that of Jawaharlal Nehru University and several others are clashing with the dates SPPU is holding its examinations. Under the circumstance we would like to be given the opportunity to appear for the regular examination on a different date."

Pune Mirror 10/10/2020

---

लोकमत

मुंबई, पुणे, सोलापूर, नागपूर येथे विद्यार्थ्यांना अडचणी, अचानक सर्व्हर झाला क्रॅश

# विद्यापीठ परीक्षांमध्ये सायबर हल्ल्यांचा व्यत्यय

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई/सोलापूर :** आयडॉल आणि मुंबई विद्यापीठ विभागाच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाईन परीक्षांसाठी नेमलेल्या खासगी कंपनीच्या सर्व्हरवर सायबर हल्ला झाल्याने परीक्षाच कोलमडल्या. आयडॉलच्या पुढील सर्व परीक्षा १८ ऑक्टोबरपर्यंत रद्द करण्याची नामुष्की विद्यापीठावर ओढवली आहे. सायबर हल्ल्यामुळे सर्व्हर क्रॅश झाल्याने पुणे, सोलापूर व अन्य विद्यापीठांच्या ऑनलाईन परीक्षांमध्येही व्यत्यय आला. सायबर सेलकडे तक्रार करण्यात येईल, असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या दुसऱ्या दिवशीदेखील घोळ कायम राहिला.

### तांत्रिक अडचण आलेल्यांना पुन्हा संधी



अंतिम वर्षातील एखादा विद्यार्थी कोरोना पॉझिटिव्ह आढळल्यास, तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास अशा विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेतली जाईल. एटीकेटीधारक, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची परीक्षा सहा महिन्यांच्या आत घेतली जाईल, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत सांगितले. वाढीव आणि जबरदस्तीने शुल्क आकारणीची तक्रार झाल्यास संबंधित शैक्षणिक संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

Pune Main
Page No. 5 Oct 10, 2020
Powered by: erelego.com

---

# सरावातच प्रश्नांचे खरे स्वरूप

## अंतिम वर्ष परीक्षेच्या प्रत्येक विषयाचे २० प्रश्न संकेतस्थळावर

सकाळ

**पुणे, ता. ९ : सराव परीक्षेत अभ्यासक्रमाबाहेरील सामान्य ज्ञानाचे प्रश्न आल्याने अंतिम वर्षाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परीक्षेत येणाऱ्या खऱ्या प्रश्नांचे नमुने संकेतस्थळावर टाकण्याचा निर्णय घेतला आहे. हे प्रश्न शनिवारी (ता. १०) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असतील. त्यापैकी काही प्रश्न परीक्षेतही विचारले जाण्याची शक्यता आहे.**

पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी खासगी एजन्सी नेमली आहे. सराव परीक्षेदरम्यान अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न आल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी होती. तसेच अनेकांना लॉग इन होत नसल्याने, पूर्ण ६० प्रश्नांऐवजी ५८ प्रश्न दिसणे, हेल्पलाइन क्रमांकावर व्यवस्थित उत्तर न मिळणे यामुळे विद्यार्थी वैतागले होते. विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयाचा संपूर्ण प्रश्नसंच द्यावा अशी मागणी केली होती, ती विद्यापीठाने फेटाळून लावली. मात्र, आता विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी प्रत्येक विषयाचे २० प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जातील. मुख्य परीक्षेसाठी विद्यार्थी संख्येनुसार प्रत्येक विषयाचे किमान १०० ते ३०० प्रश्न निश्चित केले आहेत. त्यातून प्रत्येक विषयाचे २० नमुना प्रश्न सिस्टिममध्ये अपलोड करण्याचे काम सायंकाळनंतर सुरू झाले आहे. शनिवारी हे प्रश्न दुपारपर्यंत उपलब्ध होतील. मात्र, हे केवळ प्रश्नच असतील, त्यांचे उत्तरांचे पर्याय टाकले जाणार नाहीत. विद्यार्थ्यांनी व्यवस्थित प्रश्न वाचल्यास त्यांना उत्तर काय आहे ते समजू शकेल.

### तीन लाख जणांचा सराव

गेल्या दोन दिवसांत २ लाख ८३ हजार ५०१ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षेसाठी लॉगिन केले आहे. त्यापैकी गुरुवारी १ लाख २८ हजार १२५; तर आज शुक्रवारी १ लाख ५५ हजार ३६४ जणांनी लॉगिन केले आहे. यातील काही जण दोन वेळा लॉगिन करणारे देखील आहेत. १ लाख ९० हजार विद्यार्थी ऑनलाइन परीक्षा देणार आहेत, त्यांच्यापैकी १ लाख ३६ हजार जणांनी सराव परीक्षा दिली असल्याचे परीक्षा विभागातर्फे कळविण्यात आले आहे.

10/10/2020

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

# विद्यापीठाकडून अंतिम वर्ष विद्यार्थ्यांना दिलासा

**प्रत्येक विषयाचे २० प्रश्न**

## परीक्षा नमुना प्रश्न संकेतस्थळावर आजपासून उपलब्ध होणार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ९ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक विषयाचे २० नमुना प्रश्न संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. हे प्रश्न शनिवारपासून (दि.१०) संकेतस्थळावर उपलब्ध होतील. त्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षेचे स्वरुप प्राप्त होण्यास मदत होणार आहे.



पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी खासगी एजन्सी नेमली आहे. त्याद्वारे ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना बहुपर्यायी प्रश्न कसे असतात, हे माहिती होण्यासाठी गुरुवारपासून सराव परीक्षा घेण्यात येत आहे. त्यात सामान्य ज्ञान किंवा संबंधित अभ्यासक्रमाच्या बाहेरचे प्रश्न विचारले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी होती. त्यात सराव परीक्षा देताना अनेकांचे लॉगइन होत नव्हते. एकूण ६० प्रश्नांऐवजी ५८ प्रश्न दिसत होती, हेल्पलाइन क्रमांकावर व्यवस्थित उत्तर मिळत नसल्याने विद्यार्थी वैतागले होते.

दरम्यान, प्रत्येक विषयाचा संपूर्ण प्रश्नसंच द्यावा, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली होती. ती विद्यापीठाने फेटाळून लावली होती. मात्र, आता विद्यार्थ्यांच्या सोईसाठी प्रत्येक विषयाचे २० प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जातील. त्यादृष्टीने हे प्रश्न यंत्रणेत अपलोड करण्याचे काम सुरू झाले आहे. शनिवारी हे प्रश्न दुपारपर्यंत उपलब्ध होतील. मात्र, हे केवळ प्रश्नच असतील, त्यांचे उत्तरांचे पर्याय टाकले जाणार नाहीत. विद्यार्थ्यांनी व्यवस्थित प्रश्न वाचल्यास त्यांना उत्तर काय आहे ते समजू शकेल. तसेच यातील काही प्रश्न मुख्य परीक्षेतदेखील विचारण्याची शक्यता आहे.

### १ लाख ३६ हजार जणांकडून सराव परीक्षा

मागील दिवसात २ लाख ८३ हजार ५०१ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षेसाठी लॉगइन केले आहे. त्यापैकी गुरुवारी १ लाख २८ हजार १२५, तर शुक्रवारी १ लाख ५५ हजार ३६४ जणांनी लॉगइन केले. यातील काहीजण दोनवेळा लॉगइन करणारेदेखील आहेत. १ लाख ९० हजार विद्यार्थी ऑनलाइन परीक्षा देणार आहेत, त्यांच्यापैकी १ लाख ३६ हजार जणांनी सराव परीक्षा दिली असल्याचे परीक्षा विभागाने कळविले आहे.

प्रभात १०/१०/२०२०

### गोपनियता अबाधित ठेवण्यासाठी सहकार्य करा

अंतिम वर्ष परीक्षा ऑफलाइनद्वारे देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा केंद्राच्या ठिकाणी विद्यापीठ नियुक्त बहिःस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक अथवा भरारी पथकाची नेमणूक करण्यात येणार नसल्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला आहे. त्यामुळे परीक्षांचे पावित्र्य व गोपनियता अबाधित ठेवण्यासाठी महाविद्यालयांनी विद्यापीठास सर्वतोपरी सहकार्य करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी केले आहे. पुणे, नगर आणि नाशिक या कार्यक्षेत्रात सुमारे ४० हजार विद्यार्थी ऑफलाइन अर्थात प्रत्यक्ष लेखी परीक्षा देणार आहेत. करोना पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी केंद्रावर योग्य पद्धतीने दक्षता घेण्यात येणार आहे. ही परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. मात्र, ही परीक्षा होत असताना त्या ठिकाणी महाविद्यालयातीलच पर्यवेक्षक राहणार आहेत.

# कुलगुरूंकडून विद्यार्थ्यांना शुभेच्छा

## प्रथमच ऑनलाइन परीक्षा; व्यत्यय आल्यास पुन्हा संधी



डॉ. करमळकर

**पुणे, ता. १० :** पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षा सोमवारपासून (ता. १२) सुरू होत असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. तांत्रिक कारणांमुळे परीक्षेत व्यत्यय आल्यास घाबरून जाऊ नका, एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची काळजी घेतली जाईल असे आश्वासन विद्यार्थ्यांना दिले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुणे विद्यापीठाने अंतिम वर्ष परीक्षेचे नियोजन केले आहे. बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन-एमसीक्यू) पद्धतीने परीक्षा घेतली जाणार आहे. त्यासाठी ऑनलाइन व ऑफलाइन या माध्यमांचा पर्याय ठेवला आहे. पुणे, नगर आणि नाशिक या तीनही जिल्ह्यातून सुमारे २ लाख ५० हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

कुलगुरू नितीन करमळकर यांनी परीक्षांच्या एक दिवस आधी विद्यार्थ्यांसाठी संदेश दिला आहे. "पुणे विद्यापीठाच्या चारही विद्याशाखा मिळून सुमारे ३ हजार ३०० विषयांची परीक्षा घेतली जाणार आहे. कोरोनामुळे प्रथमच तंत्रज्ञानाचा वापर करून परीक्षा आयोजित केल्या जात आहेत. विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि त्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानाचा वापर करून अंतिम वर्षाची परीक्षा आयोजित करणारे आपले देशातील एकमेव विद्यापीठ आहे. परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा घेतली जाईल. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही. विद्यार्थी व पालकांनी विद्यापीठास सहकार्य करावे," असे आवाहन डॉ. करमळकर यांनी केले आहे.

### प्रश्नसंच उपलब्ध; पण काही विषयांचेच

**पुणे, ता. १० :** अंतिम वर्षाच्या परीक्षांचे विषयनिहाय प्रश्नसंच उपलब्ध करून देण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला. पण शनिवारी सायंकाळपर्यंत सुमारे १ हजार ७०० पैकी १ हजार १०० विषयांचे प्रश्नसंच उपलब्ध झाले. अनेक विद्यार्थ्यांच्या चार विषयांपैकी एक ते दोन विषयांचेच प्रश्नसंच मिळाले.

शुक्रवार सायंकाळपासून या प्रश्नसंचाच्या पीडीएफ फाइल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याचे काम सुरू करण्यात आले. विद्यार्थ्यांना एक ते दोन विषयांचेच प्रश्नसंच मिळाले. बॅंगलॉगच्या विषयांचा १०० टक्के अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकविण्यात आला आहे, त्यामुळे त्यांना प्रश्नसंच उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

**Sakaal: 11.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## काही विषयांचेच प्रश्नसंच उपलब्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षांचे विषय निहाय प्रश्नसंच उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असला तरी; शनिवारी सायंकाळपर्यंत १ हजार १०० विषयांचे प्रश्नसंच उपलब्ध झाले. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांना चार विषयांपैकी एक ते दोन विषयांचेच प्रश्नसंच मिळाले.

पुणे विद्यापीठाने विद्यार्थ्यांना प्रश्नांचे स्वरूप कळावे, यासाठी सुमारे १ हजार ७०० विषयांचे प्रश्न संच उपलब्ध करून दिले जाणार होते. प्रत्येक विषयाचे एकूण प्रश्नसंचातील २० प्रश्न उपलब्ध करून देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला होता. शुक्रवारपासून या प्रश्नसंचाच्या पीडीएफ फाइल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याचे काम सुरू होते.

शनिवार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी प्रश्नसंच पाहण्यासाठी लॉगइन केले. मात्र, त्यांना एक ते दोन विषयांचेच प्रश्नसंच मिळाले.

**Lokmat: 11.10.2020**

## ऑफलाइन परीक्षेसाठी भरारी पथकाला डच्चू

### महाविद्यालयातील परीक्षक नेमण्याची सूचना

पुणे, ता. १० : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात येणारी अंतिम वर्षाची परीक्षा ५० हजार विद्यार्थी ऑफलाइन माध्यमातून देणार आहेत. मात्र, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर भरारी पथक न नेमण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. त्याऐवजी महाविद्यालयातीलच परीक्षक नेमण्याच्या सूचना परीक्षा विभागाने केल्या आहेत.

पुणे विद्यापीठाच्या पुणे, नगर आणि नाशिक कार्यक्षेत्रात यंदा ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा घेतल्या जाणार आहेत, त्यामध्ये एक लाख ९० हजार विद्यार्थी ऑनलाइन तर सुमारे ५० हजार विद्यार्थी ऑफलाइन परीक्षा देणार आहेत. पुणे विद्यापीठ परीक्षांचे आयोजन करताना गैरप्रकार रोखण्यासाठी खास भरारी पथकांची नेमणूक करते, त्यातून कॉपी करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. मात्र, ही परीक्षा होत असताना तेथे महाविद्यालयातीलच पर्यवेक्षक राहणार आहेत. तीनही जिल्ह्यात सुमारे ११५ महाविद्यालयांमध्ये परीक्षा केंद्र निश्चित केले आहेत, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी आदेशात नमूद केले आहे.

**Sakaal: 11.10.2020**

### नियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा घेण्यात अडचणी

## दहावी-बारावीच्या परीक्षांबाबत पेच!

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : एक सत्र संपल्यानंतरही शाळा सुरू न झाल्यामुळे यंदा दहावी आणि बारावीच्या परीक्षांबाबतही पेच निर्माण झाला आहे. दरवर्षीच्या नियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा न घेता त्या पुढे ढकलता येतील का, याबाबत राज्य मंडळाची चाचपणी सुरू आहे.

दरवर्षीच्या नियोजित शैक्षणिक वेळापत्रकानुसार पहिल्या सत्राचा कालावधी संपत आला आहे. मात्र, अद्यापही प्रत्यक्ष शाळा सुरू झालेल्या नाहीत. ऑनलाइन वर्ग सुरू असले तरी त्यालाही मर्यादा आहेत. दरवर्षीच्या फेब्रुवारी-मार्च महिन्यात दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे आयोजन महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ (राज्यमंडळ) करते. या परीक्षांचे वेळापत्रक सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात जाहीर केले जाते. मात्र, यंदा या परीक्षांबाबत पेच निर्माण झाला असून, विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरून घेण्याची प्रक्रियाही अद्याप सुरू झालेली नाही.

दिवाळीनंतर शाळा सुरू करण्याबाबत शिक्षण विभाग विचार करत आहे. त्यानुसार नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा डिसेंबरमध्ये शाळा सुरू होतील असे गृहीत धरले तरी त्यानंतर बारावीच्या परीक्षेसाठी अवघे दोन महिने, तर दहावीच्या परीक्षेसाठी तीन महिन्यांचा कालावधी मिळणार आहे. राज्य मंडळाने सध्या अभ्यासक्रमातील २५ टक्के भारांश कमी केला आहे. मात्र, उर्वरित ७५ टक्के अभ्यासक्रमाची तयारी दोन किंवा तीन महिन्यांत कशी करून घेणार, असा प्रश्न शिक्षकांना पडला आहे.

त्याचप्रमाणे शाळा सुरू झाल्याशिवाय विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज भरून घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे अर्ज घेणे आणि पुढील प्रक्रियेसाठीही कालावधी आवश्यक आहे. यंदा बारावीचा अभ्यासक्रम आणि प्रश्नत्रिकेचे स्वरूपही बदलले आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी- मार्च महिन्यात परीक्षा घ्याव्यात का, असा पेच राज्य मंडळासमोर आहे.

### पुढे ढकलण्याचा पर्याय?

- नियोजित वेळापत्रकानुसार फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये परीक्षा न घेता त्या काही महिने पुढे ढकलण्याच्या सूचना शिक्षण विभागाकडे येत असल्याची माहिती विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. त्यानुसार राज्य मंडळही परीक्षा पुढे ढकलता येतील का, याची चाचपणी करत आहे.
- यंदा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षाही जुलै किंवा ऑक्टोबरमध्ये झालेली नाही. या



विद्यार्थ्यांचाही प्रश्न आहे. फेरपरीक्षा फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये आणि नियमित परीक्षा सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये घेण्याच्या पर्यायाचीही सध्या चर्चा सुरू आहे.

- परीक्षांचे नियोजन करताना सद्य:स्थिती, पुढील वर्षाच्या वेळापत्रकावर होणारा परिणाम, सण, उत्सव, पाऊस अशा अनेक बाबींचा विचार करावा लागतो. त्या सगळ्याचा आढावा घेऊन काय उपाय करता येईल याबाबत विचार करण्यात येत आहे, असे विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### शिक्षकांची मते...

विद्यार्थ्यांना तोंडी परीक्षेऐवजी प्रकल्प देण्यात यावेत, परीक्षा पुढे ढकलण्यात यावी, एकूण गुण कमी करावेत, सध्या राज्यमंडळाने अभ्यासक्रमाचा भारांश २५ टक्के कमी केला आहे तो आणखी कमी करावा, परीक्षा केंद्र शाळेतच असावे अशी मते शिक्षक, तज्ज्ञ, माजी अधिकारी यांनी व्यक्त केली. शिक्षण विकास मंच या गटातर्फे दहावी-बारावी या परीक्षांबाबत चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचे वय, साधनांची उपलब्धता हे मुद्दे लक्षात घेता परीक्षा पूर्णपणे ऑनलाइन घेण्यात येऊ नये असा सूर या चर्चेत होता. परीक्षा पद्धतीत बदल करण्यात येऊ नये. मात्र, परीक्षा पुढे ढकलण्यात यावी असे मत बहुतेक शिक्षकांनी व्यक्त केले. ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने परीक्षेचे पर्याय द्यावेत, असाही पर्याय सुचवण्यात आला.

लोकसत्ता Sun, 11 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55588180

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

पुढारी

# आता प्राध्यापक, शिक्षकेतरांना पाच दिवसांचा आठवडा?

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अकृषी विद्यापीठे आणि महाविद्यालयातील हजारो प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा लवकरच लागू होण्याची शक्यता असून, येत्या काही दिवसांत निर्णय जाहीर होणार आहे. पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबत, उच्च शिक्षण संचालनालयाने विद्यापीठांना विचारणा केली आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या सरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यांप्रमाणेच प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना कामाच्या ताणापासून थोडा दिलासा मिळणार आहे.

पुढारी विशेष

अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा लागू करावा, अशी मागणी शिक्षक हितकारणी संघटनेसोबतच इतर संघटनांनी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली होती. त्यानंतर

## लवकरच निर्णय जाहीर होणार

शिक्षकेतर संघटनेच्या शिष्टमंडळाने सामंत यांच्यासोबत पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यासोबतच इतर मागण्यांसाठी चर्चा केली होती. त्यानुसार उच्चशिक्षण संचालनालयाकडून कार्यवाही करण्यात आली आहे. संचालनालयाचे प्रशासन अधिकारी सुयश दुसाने यांनी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांना पत्र लिहून माहिती विचारली आहे. या पत्रामध्ये विद्यापीठ व महाविद्यालयांच्या कामकाजाच्या वेळा काय राहतील, पाच दिवसांचा आठवडा लागू झाल्यावर, शैक्षणिक वेळापत्रकात बदल होईल का, विद्यापीठाकडून नवे शैक्षणिक वेळापत्रक कसे राहील, अशा प्रश्नांद्वारे माहिती विचारण्यात आली आहे. या माहितीसोबतच विद्यापीठांकडून स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविला आहे. त्यामुळे राज्य सरकार येत्या काही दिवसांत पाच दिवसांच्या आठवड्याची घोषणा करण्याची शक्यता आहे.

> राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच शिक्षणातील कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा लागू व्हावा. त्यामुळे त्यांना मानसिक शांतता लाभेल. शनिवारी अर्धा दिवस काम केल्यामुळे खर्च वाढतो. तसेच शनिवारी विद्यार्थी उपस्थित राहण्याचे प्रमाण कमी असते. पाच दिवसांच्या आठवड्यामुळे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी घरी राहू शकतील. तसेच त्यांना वाढलेल्या शैक्षणिक कामकाजापासून थोडा आराम मिळेल.
> - **प्रा. प्रकाश पवार**, अध्यक्ष, शिक्षक हितकारणी संघटना

Pune Edition
Oct 11, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

### विद्यापीठे व महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना होणार लाभ

# उच्च शिक्षण संस्थांनाही पाच दिवसांचा आठवडा

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. १० - राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लवकरच पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यासाठी उच्च शिक्षण विभागाने हालचाली सुरु केल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून उच्च शिक्षण संचालनालयाने विद्यापीठांना विचारणा केली




असून, त्यांच्याकडून अभिप्राय मागविला आहे.

विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा लागू करावा, अशी मागणी शिक्षक हितकारणी संघटनेसोबतच अन्य संघटनांनी उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली होती. त्यानुसार उच्चशिक्षण संचालनालयाने कार्यवाही केली आहे. संचालनालयाचे प्रशासन अधिकारी सुयश दुसाने यांनी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांना पत्र लिहून माहिती विचारली आहे. त्यामुळे राज्य सरकार येत्या काही दिवसांत पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याची घोषणा करण्याची शक्यता आहे.

> पाच दिवसांचा आठवडा लागू केल्यास, राज्य सरकारची आर्थिक बचत होणार आहे. शनिवारी विद्यार्थी उपस्थित राहण्याचे प्रमाण कमी असते. पाच दिवसांच्या आठवड्यामुळे त्याचप्रमाणे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी घरी राहू शकतील. त्यांना वाढलेल्या शैक्षणिक कामकाजापासून थोडा आराम मिळेल.
> - **प्रा. प्रकाश पवार**, अध्यक्ष, शिक्षक हितकारणी संघटना

**Prabhat: 11.10.2020**

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# विद्यापीठ अंतिम वर्ष परीक्षा आजपासून : यंत्रणा सज्ज

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ११ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षांना सोमवारपासून (दि.१२) सुरुवात होणार आहे. यासाठी यंत्रणा सज्ज झाली आहे. दरम्यान, बॅकलॉग विद्यार्थ्यांनी ई-मेल आयडी न नोंदविल्यामुळे व त्यांनी मॉक टेस्ट न दिल्याने त्यांच्या परीक्षेचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार ही परीक्षा मंगळवारपासून सुरू होणार आहे.



अंतिम सत्र परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन किंवा ऑफलाइन असे दोन्ही पर्याय उपलब्ध आहेत. बहुपर्यायी प्रश्न पद्धतीने ही परीक्षा होणार आहे. त्यानुसार ऑनलाइन नोंदणीसाठी मुदतही दिली. त्यानंतर विद्यापीठाने पदवी व पदव्युत्तर परीक्षांचे वेळापत्रकही जाहीर केले.

परीक्षेसाठी पुणे, अहमदनगर, नाशिक या जिल्ह्यांतील एकूण २ लाख ५० हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातील २ लाख विद्यार्थी ऑनलाइनद्वारे परीक्षा देणार आहेत. सुमारे ३ हजार ३०० विषयांची परीक्षा होणार आहे. सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू होणार होत्या. मात्र, त्यात बदल केला आहे. केवळ बॅकलॉग परीक्षा १२ ऐवजी १३ ऑक्टोबरपासून नियोजित वेळापत्रकानुसार होणार आहे. नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या वेळापत्रकात कोणताही बदल झालेला नाही, असे विद्यापीठ परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

### बॅकलॉग विद्यार्थ्यांसाठी सुधारित वेळापत्रक

विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी सरावासाठी 'मॉक टेस्ट'ची सुविधा उपलब्ध करून दिली होती. मात्र, ती केवळ दीड लाख विद्यार्थ्यांनीच दिली. सुमारे ४० ते ५० हजार विद्यार्थ्यांनी 'मॉक टेस्ट'चा सराव केलाच नाही. यात प्रामुख्याने बॅकलॉगविद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांनी ई-मेल आयडीही नोंदविले नव्हते. त्यांनी मॉक टेस्टसाठी मुदत देण्याची मागणी केली होती. त्यानुसार त्यांना संधी देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. त्यामुळे १२ ऑक्टोबर रोजी बॅकलॉग विद्यार्थ्यांची विषय निहाय होणारी परीक्षा १७ ऑक्टोबर रोजी होणार आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना 'मॉक टेस्ट'साठी एक दिवस मिळणार आहे. १३ ऑक्टोबरपासून नियोजित वेळापत्रकानुसार बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येणार आहे.

**Prabhat: 12.10.2020**

# बारावीसाठी इंग्रजीची एकच प्रश्नपत्रिका

**मुंबई :** राज्य मंडळामार्फत बारावी परीक्षेच्या इंग्रजी विषयासाठी सुरू करण्यात आलेली बहुसंची प्रश्नपत्रिका पद्धती यंदापासून बंद करण्यात आली आहे. बारावीसाठी यंदापासून नवा अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. जुन्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मात्र बहुसंची प्रश्नपत्रिका संच देण्यात येणार आहे.

**Sakaal: 12.10.2020**

# संशोधनांचे व्यवसायात रूपांतर व्हावे

## पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचे मत

**पुणे, ता. ११ :** 'उद्योग आणि शिक्षण संस्थांमधील दरीविषयी नेहमीच बोलले जाते; ती दूर करण्यासाठी औद्योगिक संस्था आणि शिक्षण संस्था एकत्रित येत आहेत. उद्योगांसाठी आवश्यक आणि समाजाभिमुख संशोधनावर शिक्षण संस्थांनी भर देणे गरजेचे आहे,' असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या एसपीपीयू रिसर्च पार्क फाउंडेशन आणि टेक्नॉलॉजी ट्रान्स्फर असोसिएशन (टीटीए) यांच्यात सामंजस्य करार झाला. त्या वेळी ते बोलत होते. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. भारत आहुजा, एसपीपीयू रिसर्च पार्क फाउंडेशननचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अरविंद शाळिग्राम, टेक्नॉलॉजी ट्रान्स्फर असोसिएशनचे अध्यक्ष यशवंत घारपुरे, विलास रबडे, डॉ. आदित्य अभ्यंकर, डॉ. सुरेश गोसावी, उद्योजक विश्वास काळे आदी उपस्थित होते.

डॉ. करमळकर म्हणाले, 'विद्यापीठातील संशोधनांना बाजारपेठेत व्यावसायिक रूपात आणण्याच्या दृष्टीने एसपीपीयू रिसर्च पार्क फाउंडेशनची स्थापना झालेली आहे. या फाउंडेशनबरोबर टेक्नॉलॉजी ट्रान्स्फर असोसिएशनचा करार होणे ही चांगली बाब आहे. या संशोधकांचे तंत्रज्ञान कंपन्यांपर्यंत पोचले, तर त्यांना स्टार्टअप सुरू करण्यात, व्यवसाय उभारण्यात मदत होईल.'

**Sakaal: 12.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# दहावी-बारावी परीक्षांवर प्रश्नचिन्ह

## विद्यार्थ्यांपुढे पेच; अधिकृत माहिती नाहीच

मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा

सकाळ EXCLUSIVE

**पुणे, ता. ११ : शाळा बंद असल्या तरी ऑनलाइन वर्गातील पहिले सत्र संपत आले आहे. दहावी-बारावीचा ६० ते ७० टक्के अभ्यासक्रम पूर्ण झाला आहे. मात्र, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षांबाबत कोणताही निर्णय जाहीर केला नाही, त्यामुळे या परीक्षांची तयारी करणारे ३० लाखांहून अधिक विद्यार्थी आणि त्यांचे पालक चिंतेत पडले आहेत.**

राज्यात दरवर्षी १६ ते १७ लाख विद्यार्थी दहावीची, तर १४ ते १५ लाख विद्यार्थी बारावीची परीक्षा देतात. यात नियमित विद्यार्थ्यांबरोबरच पुर्नपरीक्षार्थींचाही सहभाग असतो. दरवर्षी नियोजित वेळापत्रकानुसार फेब्रुवारी-मार्चदरम्यान दहावी-बारावीची परीक्षा घेतली जाते. त्यासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याची प्रक्रिया परीक्षेपूर्वी तीन-चार महिने सुरू होते. त्यासंदर्भातील पहिले नोटिफिकेशन सप्टेंबरमध्ये काढण्यात येते. तसेच, या परीक्षांचे तात्पुरते वेळापत्रकही सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जाहीर केले जाते.

या परीक्षेला खासगीरीत्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करण्याची प्रक्रिया सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये सुरू होते.

पान ६ वर »



### राज्य मंडळाकडून अद्यापही सूचना नाही

दरवर्षीच्या नियोजित शैक्षणिक वेळापत्रकानुसार पहिले सत्र संपत आले आहे. मात्र अद्यापही शाळा सुरू झालेल्या नाहीत. ऑनलाइन वर्ग सुरू असले तरी त्याला मर्यादा आहेत. त्यामुळे दरवर्षी ऑक्टोबरपर्यंत दहावी-बारावीचा ८० ते ९० टक्के अभ्यासक्रम पूर्ण झालेला असतो. यंदा परिस्थिती वेगळी आहे. फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या परीक्षांबाबत राज्य मंडळाकडून कोणतीही सूचना आलेली नाही किंवा नोंदणी प्रक्रिया सुरू झालेली नाही, असे खराडीतील सुंदरबाई मराठे विद्यालयाचे (माध्यमिक विभाग) मुख्याध्यापक संजय सोमवंशी यांनी सांगितले.

**बोर्डाच्या परीक्षेबाबत विद्यार्थी आणि आम्ही संभ्रमात आहोत. दहावी-बारावीची परीक्षा नेमकी कधी होणार, कशी होणार, तात्पुरते वेळापत्रक याबाबत राज्य मंडळाने पूर्वसूचना द्यायला हवी. विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून मंडळाने आपली भूमिका जाहीर करावी, त्यामुळे विद्यार्थ्यांचा ताण कमी होईल.**

**- मुकुंद ढोकळे,** पालक

# दहावी-बारावी परीक्षांवर प्रश्नचिन्ह

» पान १ वरून

मात्र यंदा कोरोनामुळे फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेतलेल्या दहावी-बारावीच्या परीक्षांचे निकाल उशिरा लागले. आता ऑक्टोबर महिना सुरू झाला, तरी फेरपरिक्षेबाबत निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे यंदा फेब्रुवारी-मार्च २०२१ मध्ये होणाऱ्या बारावी आणि दहावीच्या परीक्षा लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

कोरोनाचा संसर्ग लक्षात घेऊन राज्य सरकारच्या निर्णयानुसार राज्य मंडळामार्फत पावले उचलली जातील. राज्य सरकारकडून दिल्या जाणाऱ्या सूचना विचारात घेऊन नियोजन केले जाईल, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. सध्या राज्य मंडळामार्फत दहावी-बारावीच्या फेरपरीक्षांचे नियोजन सुरू असून नियमित परीक्षा कशा घ्याव्यात याची चाचपणी सुरू आहे. याबाबत राज्य मंडळाच्या अध्यक्षा डॉ. शंकुतला काळे आणि सचिव अशोक भोसले यांच्याशी संपर्क केला; मात्र, त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

दरम्यान, परीक्षांबाबत शिक्षणमंत्र्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो होऊ शकला नाही.

### माजी शिक्षण संचालक डॉ. काळपांडे यांचे म्हणणे..

- दहावी-बारावीच्या नियमित परीक्षांबाबत कोणत्या दृष्टीने विचार सुरू आहे, हे राज्य मंडळ आणि राज्य सरकारने जाहीर करायला हवे. त्यामुळे पालकांची काळजी मिटेल.
- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या परीक्षांबाबत समोर येणारे पर्याय पालकांसमोर जायला हवे.
- आता परीक्षेबाबत किमान माहिती देऊन जानेवारीपर्यंत निर्णयही जाहीर करावा.
- परीक्षा उशिरा घ्यायला हरकत नाही, पण त्याबाबत पालक आणि विद्यार्थ्यांच्या शंका दूर केल्या पाहिजेत.
- फेरपरीक्षा आणि एटीकेटीच्या विद्यार्थ्यांचा प्रश्न सोडायला हवा.
- परीक्षेत काही बदल होणार असेल, तर ते आधीच कळविणे महत्त्वाचे.

**Sakaal: 12.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

## मुख्य परीक्षा आजपासून

### सरावाला विद्यार्थ्यांची दांडी; बॅकलॉगचे वेळापत्रक बदलले

**पुणे, ता. ११ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यार्थ्यांचे लॉगइन, ई-मेल आयडी, तसेच सॉफ्टवेअरची चाचपणी करण्यासाठी सराव परीक्षा घेतली. मात्र, तब्बल ५० हजार विद्यार्थ्यांनी लॉगइन केले नसल्याचे समोर आले आहे. अशा विद्यार्थ्यांचा शोध घेण्याचे आव्हान विद्यापीठासमोर निर्माण झाले आहे. या गोंधळामुळे बॅकलॉगची परीक्षा १२ ऐवजी १३ ऑक्टोबरपासून सुरू केली जाणार आहे, तर १२ तारखेचा पेपर १७ तारखेला होणार असल्याचे विद्यापीठाने कळविले आहे. दरम्यान, नियमित विषयांच्या मुख्य परीक्षेला सोमवार (ता. १२) पासून सुरुवात होणार आहे.**



पुणे विद्यापीठाने पुणे, नगर व नाशिक जिल्ह्यातील सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेचे नियोजन केले आहे. ही परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन - एमसीक्यू) पद्धतीने होणार आहे, त्यामुळे त्याचे स्वरूप कसे असेल हे जाणून घेण्यासाठी ८ ऑक्टोबरपासून सराव परीक्षेला सुरुवात केली. पुणे विद्यापीठाकडे नोंदणी केलेल्या बहुतांश विद्यार्थ्यांनी त्यासाठी लॉगइन करावे, अशी विद्यापीठाची अपेक्षा होती. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला पाच वेळा परीक्षेची संधीही दिली होती. पहिल्या दोन दिवसांत एक लाख ३६ हजार जणांनी सराव परीक्षा दिली. मात्र, रविवारी त्याची मुदत संपली असताना ५० हजार विद्यार्थ्यांनी लॉगइन व सरावही केला नाही. त्यामुळे बॅकलॉग विषयांची परीक्षा १२ ऐवजी १३ ऑक्टोबरला होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी लॉगइन केले नाही, अशांना सराव परीक्षा देण्याची संधी १२ ऑक्टोबर रोजी उपलब्ध होणार आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, "सोमवारपासून मुख्य परीक्षेला सुरुवात होत आहे. नव्या तंत्रज्ञानाच्या सरावासाठी परीक्षा घेतली; पण ५० हजार विद्यार्थ्यांनी ती दिलीच नाही. त्यांना एक संधी दिली आहे, त्यामुळे बॅकलॉगचे वेळापत्रक बदलले आहे."

**१८ टक्के ई-मेल बाउन्स**

अनेक विद्यार्थ्यांनी चुकीचे ई-मेल दिले आहेत, त्यामुळे त्यांना पाठविलेले ई-मेल बाउन्स झाले असून, त्याचे प्रमाण एकूण नोंदणीच्या सुमारे १८ टक्के आहे. तीन-चार दिवसांत एक हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विद्यापीठात येऊन त्यांचे सुधारित ई-मेल दिले आहेत. जे विद्यार्थी परीक्षा देऊच शकणार नाहीत, त्यांच्यासाठी पुढील महिन्यात परीक्षेचे आयोजन केले जाणार आहे, असे सूत्रांनी सांगितले.

**Sakaal: 12.10.2020**

**शिक्षणतज्ज्ञांचे मत : अनेक विद्यार्थ्यांकडे नाहीत सुविधा**

## ऑनलाइन शिक्षणाचा आढावा घेण्याची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** ऑनलाइन शिक्षण ग्राह्य धरले जाणार असल्याचे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी नुकतेच पुण्यात स्पष्ट केले. मात्र, ग्रामीण व आदिवासी भागातील अनेक विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणापासून कोसो मैल दूर आहेत, अशा परिस्थितीत केवळ ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला, असा विचार केला तर तो सयुक्तिक ठरणार नाही. त्यामुळे प्रथमतः ऑनलाइन शिक्षणाचा आढावा घेण्याची गरज आहे, असे मत तज्ज्ञांकडून मांडले जात आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने येत्या नोव्हेंबर महिन्यापासून प्रथम वर्षाचे शैक्षणिक वर्ष सुरु करावे, असे परिपत्रक प्रसिद्ध केले होते. परंतु, विद्यापीठाने यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी सध्या विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये ऑनलाइन पद्धतीने अभ्यासक्रम शिकवला जात असून हाच अभ्यासक्रम ग्राह्य धरला जाणार असल्याचे विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे. सध्या शहरातील व काही ग्रामीण भागातील महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना विविध ॲपच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले जात आहे. मात्र, या ऑनलाईन वर्गांना एकूण प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी ३० ते ५० टक्केच विद्यार्थी उपस्थित राहत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या ऑनलाइन अभ्यासक्रमांवर सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे योग्य ठरणार नाही.

ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या अडचणी आहेत. कोरोनामुळे रोजगार गेल्याने मोबाईलमध्ये रिचार्ज करण्यासाठीसुद्धा काही विद्यार्थ्यांकडे पैसे नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. मात्र, ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी एकच आहेत, असा समज अनेकांनी करून घेतला आहे.



> सर्व महाविद्यालयांमध्ये ऑनलाइन शिक्षण गांभीर्याने दिले जात असून त्यासाठी महाविद्यालयांकडे व विद्यार्थ्यांकडे सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत, असे गृहीत धरणे योग्य होणार नाही. बहुतांश महाविद्यालयांमध्ये 30 ते 40 टक्के सुद्धा विद्यार्थीच ऑनलाइन शिक्षण घेत आहेत. त्यामुळे ऑनलाइन शिक्षणाचा आढावा घेऊन त्याची गांभीर्याने तपासणी होणे गरजेचे आहे. अन्यथा अनेक पुढील काळात अनेक समस्या निर्माण होतील.
>
> - डॉ. अरुण अडसूळ, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

**Lokmat: 12.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## चाळीस हजार विद्यार्थ्यांचे मॉक टेस्टकडे दुर्लक्ष

म. टा. प्रतिनिधी, पुणे

### प्रोफाइल तपासण्याचे विद्यापीठाचे आवाहन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने देण्यासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांनी मॉक टेस्ट दिली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांनी 'स्टुडंन्ट एक्झाम प्रोफाइल' तपासण्याचे आवाहन विद्यापीठाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, आज सोमवारी (१२ ऑक्टोबर) परीक्षेला सुरुवात होणार असून, काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा १७ ऑक्टोबरला होणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने कळवले आहे.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या एमसीक्यू परीक्षेसाठी साधारण अडीच लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे दोन लाख विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने, तर उर्वरित साधारण ५० हजार विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना एमसीक्यू पद्धतीची माहिती व्हावी, यासाठी ८ ऑक्टोबरपासून मॉक टेस्टचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्यक्षात १ लाख ५२ विद्यार्थी मॉक टेस्ट दिली आहे. ही परीक्षा एका विद्यार्थ्याला पाच वेळा देण्याची संधी होती. त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी एकापेक्षा अधिक वेळ परीक्षा दिल्याने, साधारण ४ लाख ८० हजार ३६१ विद्यार्थ्यांनी मॉक टेस्ट दिल्याची आकडेवारी संगणकीय प्रणालीतून आली. 'बॅकलॉग विषय असणाऱ्या साधारण ४० हजार विद्यार्थ्यांनी मॉक टेस्टकडे दुर्लक्ष केले आहे. या विद्यार्थ्यांना आज, सोमवारी पुन्हा संधी देण्यात येणार आहे. त्यासाठी त्यांना प्रॉफाइलमध्ये आवश्यक कार्यवाही करावी लागेल,' असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

### काही परीक्षा १७ ऑक्टोबरला

बीए, बीएस्सी, एमबीए, एमए, एमएस्सी, बीकॉम आदी अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांना आज, सोमवारपासून सुरुवात होणार आहे. मात्र, काही तांत्रिक अडचणींमुळे काही अभ्यासक्रमांच्या विषयांच्या परीक्षा या १७ ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार आहेत, अशी माहिती डॉ. काकडे यांनी दिली.

**Maharashtra times: 12.10.2020**

## Exams for pupils with backlogs pushed to Oct 17

**Students had not appeared for mock tests, says SPPU**

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

While Savitribai Phule Pune University (SPPU) has scheduled its final-year examinations from October 12, the date for the backlog papers for various courses has been postponed to October 17. Earlier, it was set to start on Monday.

As per varsity sources, at least 35,000 to 40,000 students with backlogs, who were supposed to appear for the examinations from October 12, did not login to the portal or take the mock tests.

To avoid any technical problem during the examination, the varsity has given them a day's time to login and appear for the mock tests and ensure that there are no glitches during the actual examinations.

Mahesh Kakade, director, examination department, SPPU, said, "Only the date of the backlog examinations scheduled for October 12 has been shifted to October 17. Students appearing for backlog papers, who have still not completed their login process, need to check the same to avoid any last-minute hiccups."

Various backlog papers related to BSc, BBA, BArch and LLB have been pushed to October 17.

In view of the final-year examinations and technical problems faced by Mumbai University, SPPU has also taken care of cyber security.

Kakade added, "We have heightened cyber security so that chances of hacking the online exam process can be eliminated."

However, with SPPU postponing the exams at the last moment, students have raised questions over the varsity's planning.

A student from the varsity's commerce department said, "While the final-year examinations have already been delayed, SPPU should have planned better for the tests. Students have been informed that the exams are postponed a night before they are to sit for the papers, disturbing their preparation and mindset."

The regular examinations will, however, take place as scheduled from Monday, in which at least 2 lakh students are set to appear. Nitin Karmalkar, vice chancellor, SPPU, said, "SPPU is the only university in the nation to take the examination of more than 2 lakh students, taking the aid of technology due to the pandemic. If students face any technical problems, they should not panic as we will take due measures. We will not compromise with the health of the students."







Some 40,000 students with backlogs were supposed to take the exam on Monday

**Pune mirror: 12.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education



THE TIMES OF INDIA | PUNE | MONDAY | OCTOBER 12, 2020

## THINGS TO KEEP IN MIND

The final-year Savitribai Phule Pune University students will be appearing for the online examination from Monday. Given the change in the mode of examinations in the wake of coronavirus outbreak, following are some Do's and Don'ts for those taking the tests

- Laptops/desktops with Windows OS, Windows 7 and above are preferred. Students using a laptop with MAC-OS should open test in the Safari browser
- Specially-abled students will get 20 extra minutes for completing the tests
- Use of calculator is allowed
- Make sure to make your final submission only after completing the examination. The candidates will be asked to confirm in case you accidentally hit submit before the time-limit
- In case of an internet connection failure, the submission will not be possible and the test will have to be rescheduled. In the case of a temporary internet outage, please wait for some time and try to re-submit the test
- If the internet speed is unreasonably slow, images and tables in the questions might take a little longer to appear

### HELP AVAILABLE

- For any queries related to test, one can chat with the support team members using the Chat-bot on the right-hand side of the screen
- Candidate will get 15 minutes to read the instructions. Once the candidates have read all the instructions and waiting time is over, they can click on the 'Proceed Now' button on the screen. The candidates will have to click on the agreement

### TEST WINDOW INTERFACE

- On the left side, a panel will list all the questions. Questions answered will turn 'Green' in the panel, whereas those skipped will remain 'Gray' in colour
- Candidates can click on any question number on the panel to move directly to that question on the screen
- **Auto Next** - By clicking on this button, candidates will automatically move to the next question after clicking the answer to a question. Auto next can be unchecked any time to skip any question.
- **Clear Response:** If the candidates want to clear the response for any question, they can use this option. The button would be visible below the options
- **End test:** Candidates can end the test only when all questions are answered. If the test is ended in between, it will be considered as final submission and you will not be allowed another chance to give the test

### WARNINGS!

- During the assessment, if a candidate tries to navigate to another window, they will get navigation warnings. Post maximum warnings (30), the test will get automatically submitted
- Make sure that the pop-up blocker is disabled on your browser. Any notifications related to antivirus, windows update, email notifications will be counted as navigation
- Candidates taking the test on a cellphone should make sure that they don't get notifications, messages, calls during the assessment as this will be counted as navigation

### SYSTEM REQUIREMENTS

- The minimum required bandwidth is 512 Kbps - 1 Mbps
- **Machine configuration:** RAM - minimum 2GB (though 4GB is recommended); Processor speed-1.5 GHz and above
- **Preferred browsers:** For taking the test, recommended browsers are Google Chrome (Ver. 75 or above), Mozilla Firefox (Ver. 70 or above)
- If your internet disconnects during submission, contact the help centre on the given number and don't close your window

The times of India: 12.10.2020

## News Paper Clippings During October 2020

Section: Education

# 9k final-year students of SPPU still unreachable

## FAQs To Answer Queries On Website

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Over 9,000 of the 2.5 lakh students registered in the final year of various courses under Savitribai Phule Pune University (SPPU), are still unreachable, officials said. The examination will begin from Monday.

The students were told to choose from online or offline mode of examination but these students have not opted for any method despite many attempts to reach them.

"When the final count was taken, around 14,000 students had not chosen any mode of examination. We sent bulk SMSs and also tried to reach them through their colleges and were able to contact some of them. Of these, 5,000 chose online mode. But we have been unsuccessful in contacting 9,000 students. We have kept the option open for them in case they choose the online mode. If they are unable to appear for the exam now, they will be allowed to appear for it at a later stage," Mahesh Kakade, controller of the board of examinations and evaluation, said.

Meanwhile, considering that the maximum number of final-year students are facing problems in the mock tests as they could not remember their email id or passwords, Savitribai Phule Pune University has told them to write to the IT support team requesting for regeneration of a new password or registering a new email id.

Till now 1.90 lakh students have appeared for mock tests with many of them giving it multiple times, making the count go up to 2.80 lakh.

Students have been airing their grievances on social media platforms regularly and there have been complaints that the university has not provided question banks for all subjects. Some of the question banks provided had very few questions, the students said.

Kakade said the university has been able to upload the question banks for about 750 subjects.

"We will be uploading the question banks for about 2,500 subjects. The process is going on and within a day, all subjects would be covered. We have received several queries related to technical issues cropping up during the mock test and we have answered them in an FAQ format for all students to see and uploaded them on the website as well. Students are requested to go through the university website. Most of their questions are answered there. They can also contact the helpline number at 9717796797," he added.

### A BUILD-UP TO THE BIG DAY

Illustration: Aamir Shaikh

- The university decided on a centralised examination process and invited online bids
- Entities with a minimum **Rs 30 crore** annual turnover filed the tender
- Experience of conducting examination for at least three lakh students in a year was necessary
- Holding online examination for at least **20,000 students** in a single session or concurrently was mandatory
- Offline examinations for students who do not wish to opt for online examinations
- **50 centres identified for 50,000 students for offline mode**
- Students in Pune, Ahmednagar and Nashik affiliated to SPPU have opted for this mode
- Survey revealed that nearly 1.8 lakh students chose to give the exam online
- **From Pune district, 22,000 students have chosen offline mode**



#### MOCK TESTS

- Technical issues and manual errors were reported in the first mock test for the non-proctored online examination for final year students on Thursday
- **About 1.25L students appeared for the tests**

#### WATCH FOR POP-UPS

- **During the exam, students need to be careful about pop-up window like notifications, antivirus update, Windows update etc**
- During non-proctored examination, anything like an antivirus update, Windows update, email notifications will be counted as navigation
- Only 30 navigations per student post which the test will get auto-submitted

The times of India: 12.10.2020

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# शैक्षणिक क्षेत्रात पाच दिवसांचा आठवडा?

## राज्य सरकारने मागविले अभिप्राय; विद्यापीठ प्रशासन सकारात्मक

सकाळ EXCLUSIVE

**पुणे, ता. १२ : शासकीय कार्यालयाप्रमाणे विद्यापीठ आणि महाविद्यालयांना पाच दिवसांचा आठवडा करण्यासाठी राज्य सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत. शनिवारी सुटी दिली, तर शैक्षणिक व कार्यालयीन कामकाजावर काय परिणाम होईल, याचा सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना विद्यापीठांना दिल्या आहेत.**

राज्य सरकारने शैक्षणिक विभाग वगळता इतर विभागांना पाच दिवसांचा आठवडा जाहीर केला आहे. त्यामुळे या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दैनंदिन कामाचे तास वाढले असले तरी लागून दोन दिवसांची हक्काची सुटी मिळत आहे. हाच नियम शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ यांना लागू करावा अशी मागणी केली जात होती, परंतु अद्याप याबाबत सरकारने विचार केला नाही. सध्या नागरिकांच्या सोईसाठी महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी विद्यापीठातील कामकाज सुरु असते. पण प्रत्येक शनिवारी सुटी दिली तर बाहेर गावच्या विद्यार्थी, प्राध्यापकांची काही प्रमाणात अडचण येऊ शकते. यावर तोडगा काढणे गरजेचे आहे.

पाच दिवसांचा आठवडा केल्यास विद्यार्थी, प्राध्यापक यांचा प्रवास कमी होऊन रस्त्यावरील वर्दळ कमी होईल. शनिवारी तासांची संख्या कमी असल्याने शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी असते. या कारणांमुळे पाच दिवसांचा आठवडा करणे फायदेशीर ठरेल, असे मत शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

सप्टेंबर महिन्यात विद्यापीठ व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लेखणी बंद आंदोलन करताना त्यामध्ये पाच दिवसांचा आठवडा जाहीर करा, अशी प्रमुख मागणी केली होती. त्यामध्ये आंदोलनावर तोडगा काढताना याबाबत सकारात्मक विचार करू असा निर्णय घेऊ, असे आश्वासन सरकारतर्फे देण्यात आले होते. त्यानंतर उच्च शिक्षण विभागाने सर्व विद्यापीठांच्या कुलसचिवांना पत्र पाठवून पाच दिवसांचा आठवडा करण्यासाठी अभिप्राय कळविण्यास सांगितला आहे. तर पुणे विद्यापीठाने सर्व महाविद्यालयांनी त्यांचा अभिप्राय १४ ऑक्टोबरपर्यंत सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### असे आहेत फायदे

1. विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कुटुंबासोबत वेळ देता येईल
2. दोन दिवसांच्या सुटीमुळे छंद जोपासणे, नवे काहीतरी शिकणे शक्य होईल
3. मानसिक समाधान असल्याने काम करण्याची क्षमता वाढेल

### अशी आहेत आव्हाने

1. महाविद्यालयांना एका सत्रात ९० तास घेणे अनिवार्य आहे
2. वेळापत्रक बदलल्यास अभ्यासक्रम पूर्ण कसा होणार?
3. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू केल्यास शैक्षणिक कामात अडथळे

"कनिष्ठ महाविद्यालयापासून ते वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व विद्या शाखांचे (मल्टिफॅकल्टी कॉलेज) अभ्यासक्रम चालविणाऱ्या मोठ्या महाविद्यालयांना पाच दिवसांचे काम सहा दिवसांत बसविणे अडचणी येतील. हा निर्णय लागू केल्यास महाविद्यालयांचे रोजचे काम दोन तासांनी वाढू शकेल. त्यामुळे सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेसात असे महाविद्यालय सुरू राहील, दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना याची अडचण येऊ शकेल, याचा विचार झाला पाहिजे.

- डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, पुणे

"पाच दिवसांचा आठवडा केल्यास रोजच्या कामाचा एक तास वाढणार आहे. पण, त्याचा फायदा विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह सर्वांना होईल. कुटुंबासोबत वेळ देता येईलच, विद्यार्थ्यांना अभ्यासासह त्यांचे छंद जोपासण्यास व नव्या गोष्टी शिकण्यासाठी वेळ मिळेल. त्यामुळे सरकारने याबाबत निर्णय घेतला पाहिजे.

- प्रकाश पवार, अध्यक्ष, शिक्षक हितकारिणी समिती

"विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये पाच दिवसांचा आठवडा लागू व्हावा, यासाठी विद्यापीठ सकारात्मक आहे. या निर्णयामुळे विद्यापीठाच्या कामावर, शैक्षणिक वेळापत्रकावर काय परिणाम होईल, याचा सविस्तर अभिप्राय सरकारला सादर केला जाईल.

- डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Sakaal: 13.10.2020**

# ऑफलाइन, ऑनलाइन परीक्षेत त्रुटी

## एमएस्सी गणिताचा पेपर पुढे ढकलला : १७ ऑक्टोबरला परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही परीक्षांमध्ये काही त्रुटी असल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांना परीक्षा देताना अडचणींचा सामना करावा लागला, तर काही विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी वेळ पुरला नाही.

एमएस्सी गणिताची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रश्न योग्य पद्धतीने दिसत नव्हते. विद्यापीठाने हा पेपर पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. येत्या १७ ऑक्टोबर रोजी एमएस्सी गणिताचा पेपर होणार आहे.

२९ हजारांपैकी १७ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा दिली. तब्बल १२ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली नाही. सोमवारी ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही कमीच होती. ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या काही विद्यार्थ्यांना प्रश्नांचे पर्याय दिसत होते. प्रश्नच दिसत नव्हते. ऑनलाइन परीक्षा सुरळीतपणे पार पडली का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**Lokmat: 13.10.2020**

## News Paper Clippings During October 2020

Section: Education

# विद्यापीठ पहिल्याच पेपरला 'नापास'

## तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने पेपर पुढील तारखेला घेण्याची नामुष्की



प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १२ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष ऑनलाइन परीक्षेत तांत्रिक समस्या असल्याचे निदर्शनास आले. 'एमएसस्सी'च्या गणित विषयाच्या प्रश्नपत्रिकेत 'इमेजेस'च दिसत नव्हती. त्यामुळे ही परीक्षा पुन्हा दि. १७ तारखेला घेण्याचा निर्णय घेत विद्यापीठाने विद्यार्थ्यांना दिलासा दिला. दरम्यान, विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षा सुरळीत सुरू झाल्याचा दावा केला आहे.

सोमवारी सकाळच्या सत्रात ऑनलाइन परीक्षा सुरळीत सुरू झाली. विद्यार्थ्यांनी मोबाइल, टॅब, संगणकाद्वारे ही परीक्षा दिली. मात्र, एमएसस्सीच्या गणित विषयाचा ऑनलाइन पेपर देताना बहुतांश विद्यार्थ्यांना परीक्षेत प्रश्नच दिसत नव्हते. त्याऐवजी केवळ प्रश्न क्रमांक आणि पर्याय दिसत होते. त्या ठिकाणी अपेक्षित असलेली आकृतीच दिसत नव्हती. त्यामुळे विद्यार्थ्यांना काय उत्तर द्यावे, हेच कळत नव्हते. ही बाब विद्यार्थ्यांनी परीक्षा विभागाच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर विद्यापीठाने हा पेपर पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. ही परीक्षा १७ ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार आहे.

**अंतिम वर्ष ऑनलाइन परीक्षा**

सोमवारी दिवसभरात परीक्षा योग्य पद्धतीने सुरू झाल्याचे सांगत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, ऑनलाइन परीक्षेसाठी २९ हजार २३६ विद्यार्थी अपेक्षित होते. त्यापैकी दिवसभरात एकूण १७ हजार ११८ विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे ऑनलाइन पद्धतीने परीक्षा दिली. विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि त्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थीहित हेच ध्येय केंद्रस्थानी ठेवून सर्व व्यवस्था निर्माण केल्या आहेत. परीक्षेपूर्वी काही तांत्रिक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संयम बाळगून परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन त्यांनी केले.

### सामूहिकपणे विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाइन परीक्षा?

घरबसल्या अथवा कोणत्याही ठिकाणाहून ऑनलाइन परीक्षा देण्याची सुविधा आहे. ऑनलाइन परीक्षा विद्यार्थी कोणत्या पद्धतीने देत आहेत, त्याची शहानिशा करण्याची कोणतीच यंत्रणा नाही. त्यामुळे गुगलवरून उत्तरे शोधत अथवा अन्य मोबाइलवरून उत्तरे पाहत ऑनलाइन परीक्षा दिल्याची जोरदार चर्चा सोमवारी दिवसभर होती. त्याचप्रमाणे विद्यार्थी एकत्रित येत सामूहिकपणे ऑनलाइन परीक्षा सोडविल्याची चर्चा होती. दरम्यान, गुगलवरून उत्तरे शोधत परीक्षा देण्याचा प्रयत्न केल्यास त्या विद्यार्थ्यांची परीक्षा ब्लॉक होईल. मात्र, सामूहिकपणे विद्यार्थी एकत्र येत ऑनलाइन परीक्षा देत असतील, त्यावर अंकुश ठेवण्याची कोणतीच यंत्रणा विद्यापीठाकडे नसल्याचे स्पष्ट होत आहे.



**Prabhat: 13.10.2020**

पुढारी

# ऑफलाइन विद्यार्थ्यांवर पहारा, ऑनलाइनवाले मोकाट

## अंतिम वर्ष परीक्षेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अंतिम वर्षाची परीक्षा सोमवारपासून ऑनलाइन, ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने घेण्यास सुरुवात झाली. ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणारे केंद्रावर परीक्षा देत आहेत. ऑनलाइन परीक्षा देणारे प्रॉक्टर्ड पद्धतीने परीक्षा देत नसल्यामुळे त्यांच्यावर विद्यापीठाचे कोणतेही नियंत्रण नाही. त्यामुळे ऑफलाइन विद्यार्थ्यांवर दक्षतेचा पहारा व ऑनलाइन विद्यार्थी मोकाट, असेच चित्र परीक्षेदरम्यान पाहायला मिळत आहे. त्यामुळे अंतिम वर्ष परीक्षेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी साधारण अडीच लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे दोन लाख विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने, तर उर्वरित साधारण ५० हजार विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना एमसीक्यू पद्धतीने परीक्षा द्यायची आहे. ऑफलाइन परीक्षा देणारे विद्यार्थी परीक्षा केंद्रावरून परीक्षा देत असल्यामुळे त्यांच्यावर महाविद्यालय प्रशासनाचे नियंत्रण राहणार आहे. परंतु ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना, आहे त्या ठिकाणावरून परीक्षा द्यायची असून, तीदेखील प्रॉक्टर्ड पद्धतीने राहणार नाही. त्यामुळे त्यांची परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार केला तरी त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारी कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही.

पुढारी अँकर

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अंतिम वर्ष परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यानंतर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून विद्यार्थ्यांची आहे त्याच ठिकाणावरून परीक्षा घेण्याचा निर्णय झाला. त्यातही कोरोनामुळे विद्यार्थ्यांवर कोणताही ताण येऊ नये, यासाठी प्रॉक्टर्ड मेथडचा वापर टाळण्याचा निर्णय झाला. याचा पुरेपूर फायदा ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी घेतला असून, एकाच अभ्यासक्रमाचे विद्यार्थी समूहाने एकत्र येत एकमेकांना विचारून परीक्षा देत असल्याची माहिती काही विद्यार्थ्यांनी दिली.

### दहा हजार विद्यार्थ्यांची दांडी

परीक्षेच्या पहिल्या दिवशी ऑनलाइन परीक्षेसाठी २९ हजार २३६ विद्यार्थी, तर ऑफलाइनसाठी ४ हजार ८८१ विद्यार्थी अपेक्षित होते. प्रत्यक्षात १७ हजार ११८ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. तर १ हजार ८११ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा दिली. त्यामुळे जवळपास दहा हजार विद्यार्थ्यांनी परीक्षेकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले.

### प्रॉक्टर्ड पद्धती म्हणजे काय?

प्रॉक्टर्ड पद्धतीच्या परीक्षेमध्ये मोबाइल, लॅपटॉप, कॉम्प्युटर, टॅब अशा गॅजेटच्या स्क्रीनसमोर परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवण्यात येते. एखादा विद्यार्थी परीक्षेच्यादरम्यान गैरप्रकारांचा वापर करून किंवा संशयास्पद हालचाली करून परीक्षा देत असल्यास त्याला समज देण्यात येते. मात्र, तरीही विद्यार्थ्याने न ऐकल्यास त्याला परीक्षेतून बेदखल करता येते. परंतु अंतिम वर्ष परीक्षेत या मेथडचा वापर होत नसल्यामुळे विद्यापीठाला विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवणे जवळपास अशक्यच असल्याचे दिसून येत आहे.



### दोन्ही परीक्षांना तांत्रिक अडचण

विद्यापीठाने एकूण ११३ महाविद्यालयांमध्ये ऑफलाइन परीक्षेची व्यवस्था केली. परंतु पहिल्याच दिवशी विद्यापीठाकडून पाठवण्यात आलेल्या प्रश्नपत्रिका टंकाच्या (फॉन्ट) अडचणींमुळे वाचता येत नसल्याचे दिसून आले. त्यामुळे परीक्षा विलंबाने घेण्याचा निर्णय विद्यापीठाकडून घेण्यात आला. ऑनलाइन परीक्षेतील विज्ञान पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील संगणकीय बीजगणिताच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना प्रश्न न दिसता केवळ उत्तराचे पर्याय दिसत होते. जवळपास वीसहून अधिक प्रश्नांबाबतीत असा प्रकार घडला. त्यामुळे ऑफलाइन, ऑनलाइन दोन्ही परीक्षांना तांत्रिक अडचण आली.

"ऑनलाइन विद्यार्थ्यांना प्रश्नांचे क्रम बदललेल्या प्रश्नपत्रिका देण्यात आल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना तीस हालचालींची मुभा आहे. त्यापेक्षा जास्त हालचालींची नोंद झाल्यास प्रश्नपत्रिका आपोआपच बंद होते. त्यामुळे ऑनलाइन परीक्षेत विद्यार्थ्यांना गैरप्रकार करता येणार नाही. तरीदेखील विद्यार्थ्यांनी त्यांच्या सदसद्विवेक बुद्धिला स्मरून परीक्षा देणे आवश्यक आहे.

- **डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

My Pune Edition
Oct 13, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## ऑफलाइन परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. १२ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सोमवारपासून अंतिम वर्ष परीक्षा सुरू करण्यात आल्या. मात्र, पहिल्याच दिवशी ऑफलाइन परीक्षेत तांत्रिक समस्या निर्माण झाल्यामुळे दोन तासांचा विलंब झाला. सकाळी दहा वाजता सुरू होणारा ऑफलाइन पेपर दुपारी साडेबारा वाजता सुरू झाला. त्यामुळे विद्यापीठाच्या ऑफलाइन परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे ऑनलाइन आणि ऑफलाइन म्हणजेच प्रत्यक्ष लेखी परीक्षा असे दोन पर्याय देण्यात आले होते. त्यात जवळपास ४० हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाइनचा पर्याय निवडला. त्यानुसार सोमवारी सकाळी दहा वाजता पहिला पेपर होता. ऑफलाइन परीक्षेसाठी विद्यापीठाने महाविद्यालयांना प्रश्नपत्रिका (पान २ पहा) ▸▸

### व्यत्यय आल्यास घाबरून जाऊ नये

दिवसभरात एकूण १ हजार ८११ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा दिली. ऑफलाइन परीक्षा केंद्रावर काही ठिकाणी तांत्रिक समस्या आल्या. त्यावर उपाय करत असून, मंगळवारपासून ही अडचण येणार नाही. व्यत्यय आल्यास घाबरून जाऊ नये, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे.

### ...परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले

डाऊनलोड करण्यासाठी 'ओटीपी' पाठवला नाही. त्यामुळे महाविद्यालयांना प्रश्नपत्रिका डाऊनलोड करता येत नव्हती. त्यामुळे सकाळी दहा वाजता सुरू होणारा पेपर साडेबारा वाजता सुरू झाला. काही ठिकाणी तीन तासांनी परीक्षा सुरू करावी लागली. बहुतांश केंद्रांवर ऑफलाइन परीक्षेस विलंब झाल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांची बहुपर्यायी स्वरूपात अर्थात 'एमसीक्यू' पद्धतीने परीक्षा देण्याची पहिलीच वेळ होती. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये परीक्षेची धाकधूक होती. त्यात तब्बल दोन तासांनी प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिल्याने विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागला. तसेच, ऑफलाइनच्या सकाळच्या सत्रात उशिराने परीक्षा सुरू झाल्याने दुपारच्या सत्रातील परीक्षा वेळेत घेण्यासाठी महाविद्यालयांची धावपळ उडाली.

**Prabhat: 13.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education



## ऑनलाइन परीक्षेच्या सुरक्षिततेबाबत शंका

### रप्रकार शक्य नसल्याचा विद्यापीठाचा दावा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

णे : सावित्रीबाई फुले पुणे द्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या रीक्षांतील ऑफलाइन पद्धतीने परीक्षा णारे विद्यार्थी परीक्षा कक्षात र्यवेक्षकांच्या उपस्थितीत परीक्षा देत ाहेत. तर ऑनलाइन परीक्षा विद्यार्थी रबसल्या देत असल्याने ऑनलाइन रीक्षेवरील नियंत्रणाचा प्रश्न उपस्थित त आहे. मात्र विद्यार्थ्यांना रीक्षेदरम्यान गैरप्रकार करता न ण्याची दक्षता घेण्यात आल्याचा द्यापीठाचा दावा आहे.

करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर तिम वर्षाच्या परीक्षा विद्यापीठाकडून तल्या जात आहेत. ऑफलाइन रीक्षेसाठी विद्यार्थी परीक्षा केंद्रावर ात असल्याने त्यांना परीक्षेदरम्यान प्रकार करण्यास फारसा वाव नाही. ॉनलाइन परीक्षेसाठीच्या साधनातील मेऱ्याद्वारे विद्यार्थ्यांच्या हालचालींवर क्ष ठेवणाऱ्या प्रॉक्टर्ड पद्धतीला रोध करण्यात आला होता. या र्श्वभूमीवर विद्यापीठाकडून ॉनलाइन परीक्षा घेतली जात सल्याने परीक्षेदरम्यान काही प्रकार होण्याची शक्यताही नाकारता त नाही. या पार्श्वभूमीवर ऑनलाइन रीक्षेच्या सुरक्षिततेविषयी प्रश्नचिन्ह ाहे.

दरम्यान, ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या द्यार्थ्यांच्या ई मेल, मोबाइल मांकाची नोंद विद्यापीठाकडे आहे. ामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाइन रीक्षेदरम्यान काहीही गैरप्रकार करता णार नाही. त्या दृष्टीने विद्यापीठाने प्रणालीमध्ये दक्षता घेतली आहे, असे प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता Tue, 13 October 2020 https://epaper.loksatta.com/c/5



## विद्यापीठाच्या ऑफलाइन परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतलेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षा सोमवारपासून सुरू झाल्या आहेत. मात्र, पहिल्याच दिवशी ऑफलाइन परीक्षेत तांत्रिक समस्या निर्माण झाल्यामुळे दोन तासांचा विलंब झाला. विद्यापीठाने महाविद्यालयांना प्रश्नपत्रिका डाऊनलोड करण्यासाठी ओटीपी' उशीरा पाठविल्याने सकाळी दहा वाजता सुरु होणारा ऑफलाइन पेपर दुपारी साडेबारा वाजता सुरु झाला. त्यामुळे विद्यापीठाच्या ऑफलाइन परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे ऑनलाइन आणि ऑफलाइन प्रत्यक्ष लेखी परीक्षा असे दोन पर्याय देण्यात आले होते. त्यात जवळपास ४० हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाइनचा पर्याय निवडला. वेळापत्रकानुसार सोमवारी सकाळी दहा वाजता पहिला पेपर होता. ऑफलाइन परीक्षेसाठी विद्यापीठाने महाविद्यालयांना प्रश्नपत्रिका डाऊनलोड करण्यासाठी ओटीपी' पाठवला नाही. त्यामुळे महाविद्यालयांना प्रश्नपत्रिका डाऊनलोड करता येत नव्हती. त्यामुळे सकाळी दहा वाजता सुरु होणारा पेपर साडेबारा वाजता सुरु झाला. काही ठिकाणी तीन तासांनी परीक्षा सुरु करावी लागली. बहुतांश केंद्रांवर ऑफलाइन परीक्षेस विलंब झाल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांची बहुपर्यायी स्वरुपात अर्थात एमसीक्यू' पद्धतीने परीक्षा देण्याची पहिलीच वेळ होती. दोन तासांनी प्रश्नपत्रिका उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागला. तसेच, ऑफलाइनच्या सकाळच्या सत्रात उशिराने परीक्षा सुरु झाल्याने दुपारच्या सत्रातील परीक्षा वेळेत घेण्यासाठी महाविद्यालय प्रशासनाची धावपळ झाली.

दिवसभरात एकूण १ हजार ८११ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा दिली. ऑफलाइन परीक्षा केंद्रावर काही ठिकाणी तांत्रिक समस्या दिसून आल्या. त्यावर उपाययोजना करण्यात येत असून, मंगळवारपासून ही अडचण येणार नाही. काही व्यत्यय आल्यास विद्यार्थ्यांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे.

Kesari: 13.10.2020

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

**दहा वाजताचा पेपर १ वाजता झाला सुरु : ऑनलाइनमध्ये विद्यार्थ्यांकडून गुगलगुरुचा आधार**

# अंतिम वर्षाच्या परीक्षेत गोंधळ, ऑफलाइनचे वेळापत्रक कोलमडले

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑफलाइन परीक्षेत चांगला गोंधळ उडाला. परीक्षेची वेळ सकाळी दहा वाजताची असताना तब्बल तीन तास उशिराने म्हणजे एक वाजता सुरु झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांना चांगलाच मनस्ताप झाला.

ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आलेली परीक्षा सुरळीतपणे पार पडल्याचे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे. मात्र, ऑनलाइनमध्ये विद्यार्थ्यांनी चक्क गुगलवर पाहून उत्तरे दिल्याची खंत ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. आपणही ऑनलाइन परीक्षेचाच पर्याय स्वीकारायला हवा होता, अशी चर्चा परीक्षा केंद्रावर होती.

विद्यापीठाचे सुमारे ५० हजार विद्यार्थी ऑफलाइन परीक्षा देणार आहेत. पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील ११४ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे विद्यार्थी नऊ वाजल्यापासून परीक्षा केंद्रावर उपस्थित होते. परंतु, विद्यापीठाने परीक्षा केंद्रांना साडेबारा वाजले तरी प्रश्नपत्रिका पाठवल्या नाही. त्यामुळे दहा वाजता सुरु होणारा पेपर दुपारी १ वाजता, तर दुपारी १ वाजता सुरु होणारा पेपर ४ वाजता घ्यावा लागला. त्यामुळे सकाळी नाश्ता करून घराबाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर ताटकळत थांबावे लागले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जेवणाचे हाल झाले. परीक्षा केव्हा सुरु होणार याबाबत उत्तर मिळत नसल्याने अनेक विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला.

विद्यापीठातर्फे ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही परीक्षा घेण्यासाठी एजन्सीची निवड करण्यात आली. या एजन्सीला ऑफलाइन परीक्षेचे काम योग्य पद्धतीने करता आले नाही, अशी तक्रार करण्यात आली आहे.

## काही प्रश्नांची उत्तरे गुगलवरुन दिली

- पुणे विद्यापीठाशी संलग्न तीनही जिल्ह्यांमध्ये सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांची ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा सोमवारपासून सुरु करण्यात आली.
- सकाळच्या सत्रात ऑनलाइन परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या सुमारे ८ हजार विद्यार्थ्यांपैकी ५ हजार ७७३ विद्यार्थ्यांनी पेपर दिला.
- मात्र, घरी बसून परीक्षा देत असल्याने काही विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घेऊन प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्नांची उत्तरे गुगलवर शोधून दिल्याची चर्चा होती.



## परीक्षा सुरळीतचा विद्यापीठाचा दावा

**अंतिम वर्षाची परीक्षा : १७ हजार ११८ ऑनलाइन; तर १ हजार ८११ विद्यार्थ्यांची ऑफलाइन परीक्षा**

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : अंतिम वर्षाच्या परीक्षा सोमवारपासून सुरळीतरीत्या सुरु झाल्याचा दावा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे करण्यात आला आहे. ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या २९ हजार २३६ विद्यार्थ्यांपैकी १७ हजार ११८ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने तर ४ हजार ८८१ विद्यार्थ्यांपैकी १ हजार ८११ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा दिली, असे विद्यापीठातर्फे कळविण्यात आले आहे.

पुणे विद्यापीठातर्फे १४ विषयांची परीक्षा घेतली जाणार होती. कमी विषयांची परीक्षा असतानाही ऑफलाइन पद्धतीने घेतली जाणारी परीक्षा सुरळीतपणे पार पाडणे शक्य झाले नाही. मात्र, ज्या विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षेचा पर्याय निवडला, त्यांच्या परीक्षा संबंधित केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या, असा दावा विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केला आहे.

**विद्यार्थ्यांचे** आरोग्य आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थीहित हेच ध्येय केंद्रस्थानी ठेवून परीक्षेसाठी सर्व व्यवस्था निर्माण केल्या. ऑफलाइन किंवा ऑनलाइन परीक्षांमध्ये काही व्यत्यय आल्यास विद्यार्थ्यांनी घाबरून जाऊ नये. सदर परीक्षा त्याच दिवशी घेण्याचा विद्यापीठाचा पूर्ण प्रयत्न असणार आहे. तरीही परीक्षेपूर्वी काही तांत्रिक अडचणी येऊ शकतात, त्यामुळे विद्यार्थ्यांनी संयम बाळगून परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना केले आहे.

**Lokmat: 13.10.2020**

## News Paper Clippings During October 2020

Section: Education

# 1st day of SPPU exam plagued with snags



**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The first day of the final year students' exams at the Savitribai Phule Pune University (SPPU) and its affiliated colleges were loaded with technical snags and delays.

For the past month, students have been preparing for exams that began on Monday.

On the first day, among many other issues, students reported delays at the offline examination at centres, irrelevant questions, and various other problems.

According to students, the SPPU administration failed in operating and managing the exams well.

*A total of 2.5 lakh final year students are appearing for the exams conducted by SPPU, among which 2 lakh students have chosen the online option while 50,000 students appeared offline at 113 examination centres.*

On Monday, 29,236 students were expected to appear for the online exams and 4,881 students for offline exams among which 17,118 students successfully completed the online examination and 1,811 students appeared for the offline exams at various centres.

Meanwhile, several offline subject papers were delayed at the centres in Pune city. The first paper which was scheduled at 10am actually began at 12.30pm. While another scheduled paper at 1pm began at 2.30pm at various examination centres in the city.



**Final year students who chose the offline option appeared for the exam physically across 113 exam centres. A total of 2 lakh students gave the exams online.** PRATHAM GOKHALE/HT PHOTO

"Today's paper was quite tough, initially there was a problem in reading the questions as they were not clear. Only four options of the questions were seen on the screen, but the question was not there. Then the issue got resolved and I solved the questions, some of them were easy but some were tough," said Sandeep Mandave, a final year bachelor of arts student who gave the exam online.

For the offline exams, 113 centres have been identified where physical exams were conducted in Pune, Nashik, and Ahmednagar districts. The mock test and question paper sets for practice were released on October 8. The exams are of 50 marks with multiple-choice questions (MCQ) for a duration of one hour.

Ketaki Rathi, who appeared for the exam offline at the SP college said, "Our paper was scheduled at 10am in the morning and so I reached the college at 9am, whereas we had to wait till 12 noon when the actual process of the test started. There was complete mismanagement seen and it was already risky for students to come and give the exams in such a crisis situation. The SPPU should resolve all the technical and other issues for further exams."

SPPU vice-chancellor Nitin Karmalkar said, "There was no issue in the online exams and in the first half more than 5,000 students successfully appeared for the exam. But for the offline exams at some of the centres there were some technical issues due to which it got delayed. We have worked on solutions to the problems faced today and from tomorrow there won't be any problem."

**Hindustan times: 13.10.2020**

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# Varsity to fix offline mode glitches after rough patch

## Students Take Exam In 64 Subjects On Day One

Times News Network

Pics: Mandar Deshpande







(Anti-clockwise from top) Students opting for the offline mode in some centres had to wait for question papers; adequate precautions were taken by the authorities before allowing candidates inside; the online examination was taken by nearly 18,000 pupils on Monday

**Pune:** The first day of the final semester examination of Savitribai Phule Pune University (SPPU) was hit by delays especially for the students appearing for the offline examinations on Monday.

The exam started at 10am for those opting for the online mode, but the offline examinations were delayed by nearly 90 to 120 minutes. As many as 2.5 lakh students will be appearing for the final semester exams and on the first day about 18,000 appeared for the exam for nearly 64 subjects in various disciplines.

**MISSION ADMISSION**

Since one month, the SPPU has been preparing to conduct the exam and the final year students gearing up for the same. Of the 2.5 lakh students, two lakh have chosen the online option while 50,000 students decided on the offline mode at 113 examination centres.

On Monday, 29,236 students were expected to appear for the online exams and 4,881 students for the offline exams. Of these, 17,118 students successfully completed the online examination and 1,811 students appeared for offline exams at various centres.

Several offline subject papers were delayed at the centres in Pune city. The first paper which was scheduled at 10am started at 12.30pm. Another scheduled paper at 1pm started at 2.30pm at various examination centres in the city.

A student, who appeared for the examination, Viren Rathi, said, "The exam was a bit of confusion for all of us as some questions were unclear. There were some questions where only options were seen and the question was not there on the screen. After sometime it was cleared and I proceeded with the paper."

The students said that difficulty level was average to high depending on the questions.

For the offline exams, the 113 centres identified where the physical exams were conducted were in Pune, Nashik and Ahmednagar districts.

The mock test and question paper sets for practise started from October 8. These exams are of 50 marks with multiple choice questions (MCQ) for a duration of one hour.

A student, Vidya Ravi, who appeared for the exam from Sir Parshurambhau College, said she received the question paper late. "We had to sit for the papers for nearly two hours, and it was quite frustrating. The management did not look up to the mark, she added."

SPPU vice chancellor Nitin Karmalkar said, "There was no issue in the online exams and in the first half more than 5,000 students had successfully appeared. But, for the offline exams at some of the centres there were some technical issues due to which they got delayed. We have found solutions to the problems faced today, and from tomorrow there won't be any problem."

**The times of India: 13.10.2020**

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षेत ऑनलाइनला अडचणी कायमच!

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : ऑफलाइनमध्ये सुधारणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जात असलेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत काही प्रमाणात सुधारणा झाल्या आहेत. मात्र, तरी ऑनलाइन परीक्षा देताना अजूनही तांत्रिक अडचणी येत आहेत. मात्र, सोमवारच्या तुलनेत मंगळवारी ऑफलाईन परीक्षेत काही प्रमाणात सुधारणा पाहायला मिळाल्या. त्यामुळे पुढील दोन-तीन दिवसांनंतर परीक्षा सुरळीतपणे पार पडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पुणे विद्यापीठातर्फे पुणे,अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील अडीच लाख विद्यार्थ्यांची ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेतली जात आहे. मंगळवारी ३२८ विषयांची परीक्षा घेण्यात आली. तब्बल १ लाख २६ हजार विद्यार्थी ही परीक्षा देणार होते. त्यात केवळ ७ हजार विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने तर उर्वरित सर्व विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देणार होते. सकाळच्या सत्रातील ऑफलाईन परीक्षा सुरळीत पार पडली.तर सुमारे १३ हजार विद्यार्थ्यांनी सकाळी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा दिली. विद्यापीठातर्फे परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या एजन्सीकडून सोमवारी ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य वेळेत प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देता आल्या नाही. परिणामी विद्यापीठाकडून परीक्षा केंद्रांना प्रश्नपत्रिका पाठवण्यास उशीर झाला.

मंगळवारी ऑफलाइन परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी परीक्षा विभागातील स्ट्रॉग रुममध्ये बसून राहिले. त्यामुळे ऑफलाइन परीक्षेत काही सुधारणा पाहायला मिळाल्या. मात्र, एक पेपर उशिरा पाठविला गेल्याचे विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी सांगितले.



### बीसीएस ऑनलाइन पेपर मिळालाच नाही

◆ विद्यापीठातर्फे मंगळवारी दुपारी ४ वाजता बीसीएसच्या विद्यार्थ्यांचा 'थेअरॉटिकल कम्प्युटर सायन्स' या विषयाचा पेपर घेतला जाणार होता. परंतु, साडेपाच वाजले तरीही विद्यार्थ्यांना पेपरची लिंक मिळाली नाही. तर इतर विषयाच्या ऑनलाइन पेपरला काही विद्यार्थ्यांना इंग्रजी ऐवजी मराठी तर काहींना मराठी ऐवजी इंग्रजी प्रश्नपत्रिका मिळाल्या.

Lokmat: 14.10.2020

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## विद्यापीठाची अडचणींची 'परीक्षा' सुरूच

### पाच विषयांच्या परीक्षा पुढे ढकलल्या

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष परीक्षेतील तांत्रिक अडचणी दुसऱ्या दिवशीही सुरू असल्याने, पाच विषयांच्या परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या आहेत. विद्यार्थ्यांना दुसऱ्याचे लॉगइन आयडी व पासवर्ड मिळणे, परीक्षेचे वेगळ्याच विषयाचा पेपर येणे, इंग्रजी भाषा निवडणाऱ्याला मराठीत, तर मराठी भाषा निवडणाऱ्याला इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका येणे, इंजिनीअरिंगच्या प्रश्नपत्रिकेत सर्किट डायग्राम नसणे यामुळे विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागला.

पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेला ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने सोमवारी सुरुवात झाली. परीक्षेच्या पहिल्याच दिवशी ऑफलाइन परीक्षा नियोजित वेळेपेक्षा सुमारे तीन तास उशिरा सुरू झाली; तर काही ठिकाणी ऑनलाइन परीक्षेत अडचणी आल्या. मात्र, मंगळवारी ऑनलाइन परीक्षेच्या तांत्रिक अडचणीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. या परिस्थितीतही मंगळवारी ७९ हजार २५२ विद्यार्थ्यांपैकी ६२ हजार २३० विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे ऑनलाइन परीक्षा दिली. तर, ऑफलाइन पद्धतीने परीक्षेसाठी सहा हजार २६८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

अर्थशास्त्रच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देण्यासाठी इंग्रजी भाषा निवडली असताना, त्यांना मराठी भाषेतून प्रश्नपत्रिका आली. मेकॅनिकल इंजिनीअरिंगच्या हायड्रॉलिक्स आणि न्यूमॅटिक्स विषयाच्या प्रश्नपत्रिकेत दहा प्रश्नांमध्ये सर्किट डायग्राम नव्हती. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रश्नच सोडविता आले नाही. तर, एमएस्सीच्या विद्यार्थ्यांना बॅकलॉगचा इलेक्ट्रॉनिक्सऐवजी गणिताचा पेपर देण्यात आला, अशी तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे. त्याचप्रमाणे ऑफलाइन पद्धतीत विद्यार्थ्यांना काही परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका मिळाल्या नाहीत, अशी तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे.

**'हेल्पलाइनवर प्रतिसाद नाही'**

ऑफलाइन किंवा ऑनलाइन परीक्षांसंदर्भात विद्यार्थ्यांना काही अडचणी असल्यास ८८२६५८७५८८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. याशिवाय विद्यार्थी हेल्पलाइन क्रमांक ९७१७७९६७९७ वर सुद्धा संपर्क साधू शकतात. मात्र, या हेल्पलाइन क्रमांकावर कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. त्यामुळे हेल्पलाइन क्रमांक वाढवावे, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

**'...अन्यथा परीक्षा बंद पाडू'**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठीचे नियोजन ढिसाळ असून, यामुळे शेकडो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न उभा राहिला आहे. परीक्षा होत असताना प्रश्नपत्रिका मिळाल्या नाहीत; तसेच निवडलेल्या भाषेत प्रश्नपत्रिका न आल्यास, विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यायची कशी? अशा अनेक अडचणींमुळे विद्यापीठ परीक्षांचा गोंधळ समोर येतो आहे. विद्यार्थी या सर्व प्रकाराने त्रस्त असून यामुळे त्यांना मानसिक ताणाला सामोरे जावे लागत आहे. पुणे विद्यापीठ प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास विद्यापीठासमोर ठिय्या आंदोलन करून परीक्षा बंद पाडू, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष कल्पेश यादव यांनी दिला आहे.

पुढील विषयांची परीक्षा शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२० रोजी दुपारी ४ ते ५ दरम्यान होईल.

- एमएस्सी केमिस्ट्री - इनऑर्गेनिक रिॲक्शन मेकॅनिझम
- बीएस्सी - रिअल ॲनॅलिसिस
- एमएस्सी मॅथेमॅटिक्स ॲडव्हान्स्ड कॅलक्युलस
- बी.कॉम बिझनेस मॅनेजमेंट (मराठी)
- बीएस्सी सॉलिड स्टेट फिजिक्स

**अखेर रात्री नऊला पेपर**

पुणे विद्यापीठाच्या काही परीक्षा सायंकाळ सहानंतर म्हणजेच ४ ते ६ तास उशिरा सुरू झाल्या. बीसीएसचा थेरॉटिकल कम्प्युटर सायन्सचा पेपर ४ वाजता होता. मात्र, तो रात्री नऊच्या सुमारास विद्यार्थ्यांनी सोडवला.

**लॉगइन आयडी व पासवर्डचा घोळ**

ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना, लॉगइन आयडी आणि पासवर्ड पाठवण्यात येतो. मात्र, काही विद्यार्थ्यांना, त्यांच्या लॉगइन आयडी पासवर्डसोबतच इतर विद्यार्थ्यांचा लॉगइन आयडी आणि पासवर्ड विद्यार्थ्यांनी नोंदवलेल्या ई-मेलवर पाठविण्यात आला. या प्रकारामुळे परीक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**Maharashtra times: 14.10.2020**

## आणखी पाच विषयांची परीक्षा पुढे ढकलली

### अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेतील गोंधळ दुसऱ्या दिवशीही कायम

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १३** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेतील गोंधळ दुसऱ्या दिवशीही कायम आहे. तांत्रिक कारणाने विद्यार्थ्यांना परीक्षा देता न आल्याने पाच विषयांची परीक्षा पुढे ढकलण्याची वेळ मंगळवारीही विद्यापीठावर आली आहे.

विद्यापीठामार्फत मंगळवारी १३८ विषयांची परीक्षा घेण्यात आली. ७९ हजार २५२ विद्यार्थी ऑनलाइन आणि ६ हजार २६८ जण ऑफलाइन परीक्षेसाठी अपेक्षित होते. त्यापैकी आतापर्यंत ६२ हजार २३० विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. त्याचप्रमाणे दुपारच्या सत्रातील ऑनलाइन आणि ऑफलाइन परीक्षांमध्ये तांत्रिक अडचणी आल्याने या परीक्षा रात्रीपर्यंत सुरू होत्या.

तांत्रिक अडचणीमुळे पाच विषयांची परीक्षा पुढे ढकलली असून ती दि. १७ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ ते ५ या वेळेत घेण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

सकाळच्या सत्रात ऑनलाइन परीक्षा झाली. त्यात तांत्रिक अडचणी दिसून आल्या. अर्थशास्त्र विषयासाठी विद्यार्थ्यांनी इंग्रजी माध्यमाची निवड केली होती. त्यांना मराठीतून प्रश्न विचारले गेले. ज्या विषयांची परीक्षा होती, त्याऐवजी दुसऱ्या विषयाचा पेपर विद्यार्थ्यांना दिसत होता. काही विद्यार्थ्यांना मूळ प्रश्नपत्रिकाऐवजी सराव प्रश्नपत्रिका दिसत होती. दुपारच्या सत्रातही विद्यार्थ्यांना स्पष्टपणे प्रश्नपत्रिका दिसत नव्हती. ऑनलाइन परीक्षा सुकर असली तरी विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ऑनलाइनच्या तुलनेत मंगळवारी ऑफलाइनच्या परीक्षा काही तांत्रिक कारण वगळता सुरळीतपणे पार पडल्या.

ऑफलाइन अथवा ऑनलाइन परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना काही अडचण असल्यास टोल फ्री क्रमांक आणि हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन विद्यापीठाने केले आहे.
**टोल फ्री क्रमांक :** ८८२६५८७५८८
**हेल्पलाइन क्रमांक :** ९७१७७९६७९७

**या विषयांची परीक्षा पुढे ढकलली**

- १. एमएसस्सी केमिस्ट्री- इनऑरगॅनिक रिॲक्शन मेकॅनिझम
- २. टीवायबीएस्सी - रियल ॲनॅलिसिस पार्ट १
- ३. एमएसस्सी मॅथ्स् - ॲडव्हान्स्ड कॅल्क्युलस
- ४. बीकॉम - बिझनेस मॅनेजमेंट (मराठी)
- ५. टीवायबीएसस्सी - सॉलिड स्टेट फिजिक्स्

**Prabhat: 14.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

# अंतिम वर्ष परीक्षांमध्ये तांत्रिक अडचणी सुरूच

## लॉगइन आयडी, पासवर्ड चुकीचे; इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका मराठी माध्यमाला

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षांतील तांत्रिक अडचणी दुसऱ्या दिवशीही सुरूच राहिल्या. विद्यार्थ्यांना अन्य विद्यार्थ्यांचे लॉगइन आयडी आणि पासवर्ड मिळणे, अभियांत्रिकीच्या प्रश्नपत्रिकेत आकृती न दिसणे, इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना, मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका मिळणे असे प्रकार झाले. तसेच तांत्रिक अडचणीमुळे परीक्षेच्या वेळापत्रकावर परिणाम होऊन पाच परीक्षा पुढे ढकलण्याची वेळ विद्यापीठावर आली.

विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर पदवी अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने सोमवारी सुरू झाल्या. परीक्षेच्या पहिल्याच दिवशी ऑफलाइन परीक्षेत तांत्रिक अडचणी उद्भवल्या होत्या. तर मंगळवारी ऑनलाइन परीक्षेत अनेक तांत्रिक अडचणी आल्या. असे असतानाही ७९ हजार विद्यार्थ्यांपैकी ६२ हजार २३० विद्यार्थ्यांनी ऑनलाइन, तर ६ हजार २६८ पैकी ४ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा दिली.

अर्थशास्त्राच्या परीक्षेत इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना मराठी माध्यमाची प्रश्नपत्रिका आल्याने विद्यार्थ्यांना प्रश्नच समजले नाहीत. त्यामुळे अनेकांना प्रश्नपत्रिका पूर्ण सोडवण्यासाठी वेळ पुरला नाही. असाच प्रकार अन्य अभ्यासक्रमातील मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत झाला. त्यांना इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका आली. मेकॅनिकल इंजिनीअरिंगच्या हायड्रॉलिक्स आणि न्यूमॅटिक्स विषयाच्या प्रश्नपत्रिकेत दहा प्रश्नांमध्ये आकृत्या नसल्याने विद्यार्थ्यांना प्रश्न सोडवता आले नाहीत. विज्ञान पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्सऐवजी गणिताची प्रश्नपत्रिका मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.



### पाच परीक्षांच्या वेळापत्रकात बदल

तांत्रिक अडचणीमुळे विद्यापीठाला पाच परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या. एमएस्सी केमिस्ट्री इन ऑर्गनिक रिॲक्शन मेकॅनिझम, बीएस्सी रीअल एनॅलिसीस, एमएस्सी मॅथेमॅटिक्स ॲडव्हान्स्ड कॅलक्युलस, बी.कॉम बिझनेस मॅनेजमेंट (मराठी), बीएस्सी सॉलिड स्टेट फिजिक्स या परीक्षा १७ ऑक्टोबरला दुपारी ४ ते ५ या वेळेत होणार असल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली.

### विश्वासार्हतेबाबत प्रश्नचिन्ह

ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगइन आयडी, पासवर्डसह अन्य विद्यार्थ्यांचा लॉगइन पासवर्ड देण्याच आला आहे. त्यामुळे परीक्षेच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्नचिन्ह आहे. परीक्षेतील तांत्रिक गोंधळामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून या प्रकाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी युवासेनेचे राज्य विस्तारक सचिन बांगर यांनी केली.

### विद्यार्थ्यांना मनस्ताप

ऑफलाइन किंवा ऑनलाइन परीक्षांसंदर्भातील अडचणींबाबत विद्यार्थ्यांनी ८८२६५८७५८८, ९७१७७९६७९७ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन विद्यापीठाने केले आहे. मात्र या हेल्पलाइन क्रमांकावर प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे मनस्ताप होत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 14 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55651158

DAY 2 OF ONLINE-OFFLINE EXAMS AT SPPU

# Five subject papers rescheduled at last minute, to be held on Oct 17

ALIFIYA KHAN
PUNE, OCTOBER 13

AMIDST TECHNICAL glitches, the second day of online-offline examinations for college students continued, both online as well as at designated colleges under Savitribai Phule Pune University in Pune, Nashik and Ahmednagar districts.

Due to technical glitches in online exams, however, the early afternoon batch of students continued with their exams late into the evening. Owing to these glitches, exams of five subjects had to be pushed to another date.

The exams of following five subjects — MSc Chemistry: Inorganic Reaction Mechanism; TY BSc: Real Analysis Part 1; MSc Mathematics: Advanced Calculus; BCom: Business Management (Marathi); and TY BSc: Solid State Physics -- were pushed ahead to October 17, and will be held between 4 pm and 5 pm.

On Tuesday, 79,252 students were expected to appear for online exams, while 6,268 were to appear for offline exams. Of those, 62,230 students were able to appear for online exams till late on Tuesday. Besides technical glitches, some students complained of receiving question papers in another language of instruction than their preferred choice.

"During classroom exams, we would get both English and Marathi language question papers but in online exams, I didn't have an option. I am from English medium but paper was in Marathi. I still attempted my best, but I have requested my exam to be rescheduled," said a final-year BCom student.

Mahesh Kakade, director of examination and evaluation department, said such issues will be resolved.

The examination and evaluation department has released helpline numbers — 8826587588 — for problems in online-offline examinations. Besides, a student helpline number — 9717796797 — is also available.

The Indian Express: 14.10.2020

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

पुढारी

### पाच विषयांच्या परीक्षा लांबणीवर

# अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेचा अखेर बोजवारा



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने देणाऱ्या विद्यार्थ्यांना मंगळवारी तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले. त्यामुळे पाच विषयांच्या परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या. विद्यार्थ्यांना दुसऱ्यांचे लॉगइन आयडी व पासवर्ड मिळणे, वेगळ्याच विषयांचा पेपर येणे, इंग्रजी भाषा निवडणाऱ्याला मराठीत, तर मराठी भाषा निवडणाऱ्याला इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका येणे, इंजिनिअरिंगच्या प्रश्नपत्रिकेत सर्किट डायग्राम नसणे, अशा चुकांमुळे विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागला. त्यामुळे ऑनलाइन परीक्षेचा चांगलाच बोजवारा उडाल्याचे चित्र दिसून आले.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेला ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने सोमवारी सुरुवात झाली. परीक्षेच्या पहिल्याच दिवशी ऑफलाइन परीक्षा नियोजित वेळेपेक्षा सुमारे तीन तास उशिरा सुरू झाली. तर काही ठिकाणी ऑनलाइन परीक्षेत अडचणी आल्या. मात्र, मंगळवारी ऑनलाइन परीक्षेच्या तांत्रिक अडचणीत मोठ्या प्रमाणात वाढ

पान ३ वर

**शनिवारी होणारी परीक्षा**

- वेळ- दुपारी ४ ते ५
- एम.एस्सी. केमिस्ट्री - इनऑर्गनिक रिॲक्शन मेकॅनिझम
- बी.एस्सी. - रिअल एनॅलिसीस
- एम.एस्सी. मॅथेमॅटिक्स ॲडव्हान्स्ड कॅलक्युलस
- बी.कॉम. बिझनेस मॅनेजमेंट (मराठी)
- बी.एस्सी. सॉलिड स्टेट फिजिक्स



> काही विद्यार्थ्यांना मूळ प्रश्नपत्रिका मिळण्याऐवजी विद्यापीठाने तयार केलेल्या सराव प्रश्नपत्रिका विद्यापीठाने नेमून दिलेल्या ॲप्लिकेशन आणि वेबसाईटवर दिसत होत्या. भाषा निवड करताना इंग्रजी भाषा निवडली असली तरी, प्रश्नपत्रिका मात्र मराठीतच होत्या. अशा अनेक अडचणींना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत आहे. विद्यापीठाचे ऑनलाइन परीक्षा घेण्याचे नियोजन ढिसाळ असून, यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आहे. १२ तासांच्या आत विद्यापीठ प्रशासनाने योग्य कार्यवाही न केल्यास विद्यापीठासमोर ठिय्या आंदोलन करून परीक्षा बंद पाडणार आहे.
>
> **- कल्पेश यादव,** शहराध्यक्ष, म. न. विद्यार्थी सेना

My Pune Edition
Oct 14, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## हुश्श.. ऑनलाईन परीक्षेतील गोंधळ टळला

**पुणे :** ऑनलाइन परीक्षेतील गोंधळ टाळण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने अचूक नियोजनावर लक्ष केंद्रित केले आहे. कोणतीही तांत्रिक समस्या न उद्‌भवता उर्वरित परीक्षा पार पडावी, यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने एजन्सीला दम भरला आहे. तसेच खुद्द कुलगुरू परीक्षा विभागात थांबत असल्याने बुधवारी २४२ विषयांपैकी बहुतांश विषयांची परीक्षा निर्विघ्न पार पडल्या.

अंतिम वर्षाच्या परीक्षेला सुरूवात झाल्यापासून तांत्रिक कारणांमुळे गोंधळ निर्माण होत होता. त्याचा फटका मात्र विद्यार्थ्यांना सहन करावा लागत होता. तसेच तांत्रिक अडचणींचा सामना करताना विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत होता. मंगळवारी अनेक विषयांच्या परीक्षांमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने परीक्षा रद्द करावी लागली. तसेच या गोंधळाबाबत विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे तक्रारींचा पाडा वाचला. मात्र प्रशासनाकडून समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. परीक्षेतील गोंधळाबाबत सर्व क्षेत्रातून टीकेला सुरूवात झाल्यानंतर विद्यापीठ प्रशासनाला जाग आली आहे. परीक्षेतील तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी काल प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना त्यांना येणाऱ्या सर्व तांत्रिक व विषयासंदर्भातील अडचणी सोडविण्यासाठी दोन हेल्पलाइन नंबर देण्यात आले आहेत.

**Kesari: 15.10.2020**

## तिसरा दिवस 'निर्विघ्न'

**किरकोळ तांत्रिक अडचणी वगळता अंतिम वर्ष परीक्षा सुरळीत**

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १४ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षेला सुरुवात झाली आहे. बुधवारी तिसऱ्या दिवशी किरकोळ तांत्रिक अडचणी वगळता ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा सुरळीत झाल्या. परीक्षांमध्ये काहीच अडचणी येवू नयेत याची बारकाईने दक्षता घेण्याकडे विद्यापीठाने लक्ष केंद्रीत केले आहे.**



अंतिम वर्ष परीक्षा सुरू होण्यापूर्वीच बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या वेळापत्रकात बदल केला. त्यानंतर पहिल्याच दिवशी ऑफलाइन परीक्षेत गोंधळ उडाला. त्यानंतर मंगळवारी (दि.१३) ऑनलाइन परीक्षेत तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे दुपारच्या परीक्षांचे पेपर रात्री उशिरापर्यंत सुरु होते.

नियोजन कोलमडल्याने विद्यार्थी, पालक, संघटना यांच्याकडून टीका होत आहे. तांत्रिक चुका सुधारत बुधवारी (दि.१४) परीक्षा घेण्याचा प्रयत्न केला. यातही काही अडचणी आल्या होत्या. मात्र, पहिल्या दोन दिवसांच्या तुलनेत तिसऱ्या दिवशी फारशा तक्रारी नव्हत्या. काही विद्यार्थ्यांचे लॉगिन लवकर झालेच नाहीत. एमए मराठी भाग दोन (एक्सटर्नल) पेपर दुपारी एकऐवजी चारच्या सुमारास सुरू झाला. बीए इंग्रजीचा (अनिवार्य) पेपर पूर्ण सोडवला तरी तो सबमीट होत नव्हता. एमए अर्थशास्त्राचा पेपर दिसण्यास अडचणी आल्या. अनेक विद्यार्थ्यांचा पूर्ण पेपर सोडवून झाल्यानंतर तो सबमीट झाला नाही, पुन्हा पेपर सोडवावा लागला. विधीच्या पेपरलाही तांत्रिक अडचणी आल्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली.

दरम्यान, बुधवारी सर्व ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा वेळेत व विना व्यत्यय सुरळीत सुरु झाल्या. दिवसभरात ऑनलाइन परीक्षेसाठी एकूण ५८ हजार ८२७ विद्यार्थी, तर ऑफलाइनसाठी १९ हजार ७२४ विद्यार्थी अपेक्षित होते. यात ५० हजार ७९१ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन, तर १७ हजार ४३२ जणांनी ऑफलाइन परीक्षा दिली. सकाळच्या सत्रात ३६ हजार ३०२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, परीक्षा संचालक डॉ. महेश काकडे, अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर या सर्वांनी प्रामुख्याने आता परीक्षांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याला प्राधान्य दिले आहे. बैठकांचा धडाका लावला आहे. हेल्पलाईवरील तक्रारी सोडविण्यासाठी मनुष्यबळही वाढवले आहे.

### विद्यार्थ्यांना समस्या नोंदणी अर्ज भरता येणार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष व बॅकलॉग परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू झाल्या. विद्यार्थ्यांना परीक्षांबाबत काही अडचणी आल्यास त्याबद्दल समस्या नोंदणी अर्ज भरमन माहिती नोंदविण्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठाच्या http://www.unipune.ac.in या संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध आहे. यात नाव, पीआरएन नंबर, परीक्षा पद्धत, विषय, परीक्षा पेपरची तारीख, मोबाइल नंबर, परीक्षेबाबतची अडचण आदी माहिती नोंदविणे आवश्यक आहे.

**Prabhat: 15.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

## विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये सुधारणा

### अंतिम वर्षाची परीक्षा : वेळापत्रक आले रुळावर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जात असलेल्या अंतिम वर्षाच्या ऑफलाइन परीक्षेचे वेळापत्रक तिसऱ्या दिवशी रुळावर आले. ऑनलाइन परीक्षांमध्ये अजूनही विद्यार्थ्यांना काही अडचणी येत असल्या तरी गेल्या दोन दिवसांच्या तुलनेत बुधवारी विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीने परीक्षा देता आल्या.

विद्यापीठातर्फे सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांची अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने घेतली जात आहे. विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून महाविद्यालयांना ऑफलाइन परीक्षेसाठी पाठविला जाणारा ओटीपी क्रमांक उशिरा मिळत असल्याने ऑफलाइन परीक्षेचे वेळापत्रक कोलमडले होते. परंतु, बुधवारी सकाळी १० वाजता सुरु होणाऱ्या पेपरसाठी महाविद्यालयांना सकाळी ७.३० वाजता ओटीपी क्रमांक पाठविला; तर ४ वाजता सुरु होणाऱ्या पेपरचा ओटीपी क्रमांक महाविद्यालयांना २ वाजता मिळाला. ऑफलाइन परीक्षा सुरळीतपणे सुरु झाल्या. ऑनलाइन परीक्षेसाठी तयार केलेल्या प्रश्नपत्रिकांची गुणवत्ता तपासली गेली. प्रत्येक प्रश्नपत्रिकेची प्रिंट आउट काढून त्यात असणाऱ्या त्रुटी चारही अधिष्ठातांकडून व प्राध्यापकांकडून दूर केल्या.

> ऑफलाइन परीक्षा सुरळीतपणे सुरु व्हाव्यात यासाठी विद्यापीठाकडून पाठविला जाणाऱ्या ओटीपी क्रमांक एक ते दोन तास अगोदर महाविद्यालयांना पाठविला. तसेच ऑनलाइन परीक्षेतील त्रुटी दूर करण्यासाठी स्वतंत्र मनुष्यबळ उभे करून प्रश्नपत्रिकांची तपासणी करूनच त्या विद्यार्थ्यांना पाठवल्या. त्यामुळे बुधवारी ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षांना फारशा अडचणी आल्या नाहीत.
>
> \- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**या विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा**

बुधवारी ९४ हजार ८३० पैकी ५० हजार ७९१ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन तर १९,७२४ पैकी १७ हजार ४३२ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा दिली.

**Lokmat: 15.10.2020**

## SPPU almost gets it right on 3rd day: Exams held without major glitches

ALIFIYA KHAN
PUNE, OCTOBER 14

AFTER TWO days of major technical glitches, the final-year degree examinations of Savitribai Phule Pune University (SPPU) students took place without any significant problems, and even took place as per schedule, on the third day.

Over the last two days, several papers had to be rescheduled due to various glitches and the exams took place after a gap of several hours, but on Wednesday, some of the issues seemed to have been ironed out.

However, there were still some issues, such as students unable to view question papers for some time, server problems, email link not appearing, and the screen getting locked or blanking out during exams, among others. However, on Wednesday, SPPU officials took the help of professors who attended to students' queries on the helpline and assisted them in resolving the issues.

On Tuesday, five papers had to be rescheduled and nearly 1,500 students had registered their complaints on the helpline.

To ensure that such issues stop cropping up, the senior-most management of SPPU, including the vice-chancellor as well as a team of 15 professors, were present at the examination cell to oversee exam activities and the functioning of the helpline. Personnel of the IT agency appointed to conduct examinations were also present.

Mahesh Kakade, director of examinations and evaluation department, SPPU, said that students can fill online forms at the SPPU website, http://www.unipune.ac.in, for complaints.

Meanwhile, a total of 68,223 students wrote online-offline exams on Wednesday for over 200 subjects. Of the 58,827 students who had registered for the online exams, 50,791 took the exams while of 19,724 who were to take offline exams, 19,432 took the exams.



The final-year exams took place as per schedule on Wednesday. *File*

**The Indian Express: 15.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# विद्यापीठाचे अधिकारी मैदानात!

**विद्यापीठाची 'परीक्षा'**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षातील परीक्षांच्या तांत्रिक अडचणी कमी झाल्या असून, बुधवारी काही अडचणी वगळता परीक्षा वेळेत संपली. ऑनलाइन परीक्षांमध्ये काही विषयांचे पेपर दिसत नव्हते, सर्व्हर डाउन, ई-मेलवर लिंक न येणे, पेपर सोडवताना स्क्रीन ब्लँक होणे अशा तांत्रिक समस्या विद्यार्थ्यांना जाणवल्या. मात्र, विद्यापीठाने प्राध्यापकांच्या साह्याने हेल्पडेस्कच्या मदतीने अडचणी काही वेळेत सोडवण्यात आल्या.

पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन आणि ऑफलाइन परीक्षेमध्ये दोन दिवस तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. मंगळवारी झालेल्या परीक्षेत सुमारे पंधराशे विद्यार्थ्यांनी प्रशासनाकडे विविध प्रकारच्या तक्रारी नोंदवल्या होत्या. त्यांवर मात करण्यासाठी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्यासह विद्यापीठाचे पंधरा प्राध्यापक बुधवारी दिवसभर परीक्षेचे कामकाज चालणाऱ्या विशेष कक्षात कार्यरत होते. याशिवाय परीक्षा घेणाऱ्या आयटी एजन्सीचे १५ कर्मचारी कार्यरत होते.

**तक्रारींसाठी वेबसाइटवर अर्ज भरा**

विद्यापीठाच्या सोमवारपासून सुरू झालेल्या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना काही अडचणी आल्यास विद्यापीठाच्या वेबसाइटवर अंतिम वर्ष किंवा बॅकलॉग परीक्षा समस्या नोंदणी अर्जाची लिंक दिलेली आहे. विद्यार्थ्यांनी http://www.unipune.ac.in या वेबसाइटला भेट द्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

> **परीक्षेबाबत विद्यार्थ्यांनी आम्हाला ऑनलाइन अर्जाच्या माध्यमातून तक्रारी कळवाव्यात. त्यांची शहानिशा करून, पुन्हा परीक्षेला बसण्याची संधी देऊ. विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता शांतपणे परीक्षा द्यावी. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाणार नाही, याची काळजी विद्यापीठ प्रशासन घेत आहे.**
>
> – **डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**६८ हजार २२३ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा**

विद्यापीठाने ऑनलाइन आणि ऑफलाइन परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी पूर्ण ताकदीने प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामुळे बुधवारी ऑनलाइन परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या ५८,८२७ विद्यार्थ्यांपैकी ५०,७९१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली; तर ऑफलाइन परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या १९ हजार ७२४ विद्यार्थ्यांपैकी १७,४३२ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा दिली.

**Maharashtra times: 15.10.2020**

पुढारी

# अंतिम वर्ष ऑनलाइन परीक्षेचा तांत्रिक घोळ मिटेना



## परीक्षेत येणाऱ्या समस्यांची नोंदणी करण्याची सोय उपलब्ध

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात येत असलेल्या अंतिम वर्ष आणि बॅकलॉग परीक्षेमधील तांत्रिक अडचणी तिसऱ्या दिवशीदेखील कायम असल्याचे दिसून आले. काही विषयांचे पेपर न दिसणे, सर्व्हर डाऊन, ई-मेलवर लिंक न येणे, पेपर सोडवताना स्क्रिन ब्लँक होणे, अशा तांत्रिक समस्या विद्यार्थ्यांना जाणवल्या. ऑनलाइन परीक्षेचा तांत्रिक घोळ सुरूच असल्याचे दिसून आले. तर विद्यापीठाने प्राध्यापकांच्या साहाय्याने हेल्पडेस्कच्या मदतीने समस्या सोडवल्याचा दावा केला आहे.

मंगळवारी झालेल्या परीक्षेत सुमारे पंधराशे विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे विविध प्रकारच्या तक्रारी नोंदवल्या होत्या. या तक्रारींवर मात करण्यासाठी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्यासह विद्यापीठाचे पंधरा प्राध्यापक बुधवारी दिवसभर परीक्षेचे कामकाज चालणाऱ्या विशेष कक्षात कार्यरत होते. याशिवाय परीक्षा घेणाऱ्या आयटी एजन्सीचे १५ कर्मचारी कार्यरत होते. आगामी दिवसांत यामध्ये वाढ होणार असून, त्यांच्या टीम्स तयार करण्यात येणार आहेत.

**तक्रारींसाठी वेबसाइटवर अर्ज भरा**

विद्यार्थ्यांना काही अडचणी आल्यास त्याबद्दल समस्या नोंदणी अर्ज भरण्यासाठी विद्यापीठाच्या वेबसाइटवर अंतिम वर्ष किंवा बॅकलॉग परीक्षा समस्या नोंदणी अर्जाची लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी http://www.unipune.ac.in या वेबसाइटला भेट द्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**६८ हजार २२३ जणांनी दिली परीक्षा**

बुधवारी ऑनलाइन परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या ५८,८२७ विद्यार्थ्यपैकी ५०,७९१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर, ऑफलाइन परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या १९ हजार ७२४ विद्यार्थ्यपैकी १७,४३२ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा दिली.

Pune Edition
Oct 15, 2020 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# परीक्षा एजन्सीला विद्यापीठाची तंबी

## पेपर विनाअडथळा पार पाडण्यासाठी नियोजनाला यश




**पुणे, ता. १४ : ऑनलाइन परीक्षेतील अभूतपूर्व गोंधळातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पहिला धडा घेत, परीक्षा विनाअडथळा पार पाडण्यासाठी कंबर कसली. एजन्सीला व्यवस्थित काम करण्याची तंबी तर दिलीच; पण वेळापत्रक कोलमडणार नाही, सर्व प्रश्न व त्यांचे पर्याय अचूक दिसतील, हेल्पलाइनवर विद्यार्थ्यांना व्यवस्थित उत्तरे मिळतील, याचे नियोजन केले. या सुधारित व्यवस्थेमुळे बुधवारी (ता. १४) दिवसभरात झालेल्या २४२ पैकी बहुतांश विषयांची परीक्षा निर्विघ्नपणे पार पडली. दिवसभरात ६८ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.**

मंगळवारी अनेक विषयांच्या परीक्षांमध्ये तांत्रिक अडचणी आल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही. विद्यापीठाकडे तक्रारी केल्या तरी व्यवस्थित उत्तर मिळाले नाही किंवा दखलच घेतली गेली नाही. त्यामुळे विद्यार्थी व पालकांनी टीकेची झोड उठवली. विद्यापीठाच्या ऑनलाइन परीक्षेतील त्रुटी 'सकाळ'ने मांडल्या. त्याची दखल घेत विद्यापीठाला सुधारणा कराव्या लागल्या.

### हेल्पलाइनवर जादा मनुष्यबळ

विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक व विषयासंदर्भातील अडचणी सोडविण्यासाठी दोन हेल्पलाइन क्रमांक दिले आहेत. त्यासाठी परीक्षा विभागात दोन वेगवेगळ्या विभागात १२ प्राध्यापकांसह इतर १५ जणांची टीम काम करत आहे.त.

### सकाळीच पाठवला ओटीपी

महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या ऑफलाइन परीक्षा सुरळीत पाडण्यासाठी आज सकाळी आठ वाजताच महाविद्यालयांना ओटीपी पाठविला. त्यामुळे सकाळी १० वाजता पेपर सुरू झाला. त्यामुळे केंद्रावरील धावपळ टळली.

### कुलगुरू परीक्षा विभागात

मंगळवारी झालेल्या गोंधळामुळे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर हे सकाळपासूनच परीक्षा विभागात होते. ऐनवेळी निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर ते आदेश देत होते. अन्य पदाधिकारीही होते.

### आज काय अडचणी आल्या...

- एमए मराठी भाग दोन (एक्सर्टनल) पेपर दुपारी एकऐवजी चारला सुरू.
- बीए इंग्रजीचा (अनिवार्य) पेपर पूर्ण सोडवला; पण तो सबमीट झालाच नाही. पुन्हा परीक्षा द्यावी लागली.
- एमए अर्थशास्त्राचा पेपर दिसण्यास विद्यार्थ्यांना अडचणी.
- अनेक विद्यार्थ्यांनी पूर्ण पेपर सोडविल्यानंतर तो सबमीट झाला नाही. त्यामुळे पुन्हा पेपर सोडवावा लागला.
- विधीच्या पेपरला तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला

> पुणे विद्यापीठ अशा पद्धतीने पहिल्यांदाच परीक्षा घेत आहे. त्यामुळे काही तांत्रिक प्रश्न निर्माण होत असले तरी ते सोडविण्यावर आमचा भर आहे.
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, पुणे विद्यापीठ

### बुधवारी झालेल्या परीक्षेबाबत

| | |
|---|---|
| २४२<br>विषयांची संख्या | ५० हजार ७११<br>ऑनलाइन परीक्षेसाठी लॉगइन |
| १ लाख १४ हजार<br>दिवसभरात परीक्षेसाठी अपेक्षित विद्यार्थी | १७ हजार ४३२<br>ऑफलाइन परीक्षेसाठी लॉगइन |

### कामात सुधारणा करण्याचा आदेश

दोन दिवसांपासून परीक्षा घेताना अनेक अडचणी येत आहेत, पण त्या सोडविण्यासाठी खूप वेळ लागत होता. त्यामुळे परीक्षा पुढे ढकलण्याची नामुष्की विद्यापीठावर आली. मंगळवारी सायंकाळी विद्यापीठात एजन्सी आणि परीक्षा विभागाच्या झालेल्या बैठकीत कारभार सुधारण्यासाठी एजन्सीला तंबी दिली.

### तीन टप्प्यांतील परीक्षा रद्द

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील अंतिम वर्षाच्या परीक्षा ८ ऑक्टोबरपासून सुरू झाल्या. परीक्षेच्या पहिल्या दिवसापासून ॲप संदर्भातील तांत्रिक अडचणींचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागला. त्यानंतरही जवळपास ९५ टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असल्याचा दावा विद्यापीठाने केला आहे. विशेष म्हणजे दुसऱ्याच शुक्रवारी (ता.९) दिवशी विद्यापीठाला तीन टप्प्यातील परीक्षा रद्द कराव्या लागल्या होत्या. परीक्षेची नोंदणी करताना आणि उत्तरपत्रिका सबमिट करताना बराच त्रास झाला. प्रशासनाद्वारे परीक्षार्थींचे सर्व पेपर सबमिट झाल्याचे सांगण्यात आले.

### 'आयडॉल'साठी मागविल्या निविदा

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या अंतिम वर्षाच्या परीक्षा यंदा गोंधळाविना सुरू आहेत. दरवर्षी विद्यापीठाची परीक्षा म्हटले, की गोंधळ निश्चित असायचा, परंतु यंदा विद्यापीठाने परीक्षा घेण्याची जबाबदारी समूह महाविद्यालयांवर सोपवली आहे. त्यामुळे यंदा आतापर्यंत तरी परीक्षा सुरळीत पार पडल्या आहेत; मात्र मुंबई विद्यापीठाच्या आयडॉलच्या परीक्षेत गोंधळ झाल्याने उर्वरित परीक्षा घेण्यासाठी नव्याने निविदा मागवण्यात आल्या आहेत. या निविदा गुरुवारी (ता. १५) रात्री उघडणार आहेत.

### अंतिम परीक्षेला द्या मुदतवाढ

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने पावसामुळे येत्या १४ आणि १५ रोजी होणाऱ्या परीक्षा १९ व २० रोजी घेण्याचे नियोजन केले आहे. तर नैसर्गिक आपत्ती निर्माण झाल्यास परीक्षा पुढे ढकलावी लागेल, तशी मागणी सरकारकडे केली जाईल अशी माहिती प्र- कुलगुरु डॉ. देवेंद्रनाथ मिश्रा यांनी दिली.

### अमरावती विद्यापीठाला मुहूर्त सापडेना

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ऑनलाइन परीक्षा सोमवार (ता. १२)पासून सुरू होणार होत्या. विभागातील पाच जिल्ह्यांतील ७५ हजार विद्यार्थी परीक्षेला बसले होते. मात्र विद्यार्थ्यांना ऑनलाइन हॉल तिकीट मिळण्यात अनेक तांत्रिक अडचणी आल्या. विद्यापीठाने अखेर परीक्षा पुढे ढकलल्या. येत्या दोन दिवसांत नवे वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता आहे.

### परीक्षा अडथळ्यांची शर्यत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी लागणाऱ्या सॉफ्टवेअर खरेदीला बराच वेळ लागला. त्यानंतर लगेचच लेखणीबंद आंदोलन सुरू झाले. शनिवारी (ता.१७) परीक्षा सुरू होणार आहेत.

**Sakaal: 15.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

WWW.LOKSATTA.COM
पुणे, गुरुवार, १५ ऑक्टोबर २०२० ५

## नव्या शिक्षण धोरणासाठी 'स्टार्स' योजना

नवी दिल्ली : नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली असून केंद्र सरकारने सहा राज्यांसाठी 'स्टार्स' नावाची योजना प्रायोगिक तत्त्वावर राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

'स्टार्स' योजनेंतर्गत शिक्षकांना प्रशिक्षण देणे, परीक्षा पद्धतीत सुधारणा करणे, राज्या-राज्यांमध्ये अधिक समन्वय निर्माण करणे तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न करणे ही प्रमुख उद्दिष्टे असतील. ही योजना महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, केरळ आणि ओडिशा या सहा राज्यांमध्ये राबवली जाणार असून बुधवारी त्याला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याची माहिती केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या योजनेसाठी जागतिक बँकेने ३,७१८ कोटींचा निधी दिला असून राज्ये २ हजार कोटी देतील. गुजरात, झारखंड, उत्तराखंड, आसाम आणि तमिळनाडू या पाच राज्यांसाठीदेखील अशीच योजना राबवली जाणार असून त्यासाठी आशियाई विकास बँक साह्य करणार आहे. विद्यार्थ्यांनी पाठांतर न करता त्यांना विषय समजला पाहिजे. त्यासाठी भाषेवर लक्ष्य केंद्रित केले जाईल. इयत्ता तिसरीपर्यंत विद्यार्थ्यांना भाषेची जाण येईल व त्या आधारावर परीक्षेची रचना केली जाईल. परीक्षा पद्धतीत सुधारणा केल्या जातील. स्वतंत्र मूल्यमापन मंडळ वा संस्था स्थापन केली जाईल, असेही जावडेकर यांनी सांगितले.

लोकसत्ता Thu, 15 October 2020
https://epaper.loksatta.com/c

पुढारी

## 'नव्या शिक्षण धोरणासाठी स्टार प्रकल्प राबविणार'

नवी दिल्ली : नवे शिक्षण धोरण राबविण्यासाठी स्टार प्रकल्प अंमलात आणण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अन्यही काही निर्णय घेण्यात आले. नवे शिक्षण धोरण राबविण्यासाठी स्टार प्रकल्पाची आखणी केल्याचे केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी नंतर पत्रकार परिषदेत सांगितले.

केंद्राने नवे शिक्षण धोरण जाहीर केले होते. हे धोरण अंमलात आणण्यासाठी स्ट्रेंथनिंग टीचिंग लर्निंग अँड दि रिझल्ट फॉर स्टेटस (स्टार्स) प्रकल्प राबविला जाणार आहे. शिक्षणातून आपण काय शिकलो? हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. सहा राज्यांमध्ये जागतिक बँकेच्या सहकार्याने हा प्रकल्प राबविण्यात येईल. ज्या राज्यात प्रकल्प राबविण्यात येणार आहे, त्यात महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश, राजस्थान आदी राज्यांचा समावेश आहे.

Pune Edition
Oct 15, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## अधिसभा सदस्यांचा आंदोलनाचा इशारा

### परीक्षा सुरळीतपणे घेण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जात असलेल्या ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे विद्यापीठाने सर्व अडचणी दूर करून विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरळीतपणे घ्याव्यात. अन्यथा विद्यार्थ्यांसह आंदोलन केले जाईल, असा इशारा अधिसभा सदस्यांनी दिला आहे.

विद्यापीठातर्फे गेल्या तीन दिवसांपासून ऑनलाइन , ऑफलाइन पद्धतीने अंतिम वर्षाची परीक्षा घेतली जात आहे. परंतु, अनेक विद्यार्थ्यांना मोबाईल नेटवर्कची अडचण असणे, केवळ प्रश्नपत्रिका दिसणे, पर्याय न दिसणे, चुकीचा लॉगइन आयडी पाठवणे, उत्तर सबमिट न होणे, दुसऱ्या भाषेत प्रश्नपत्रिका मिळणे अशा अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. परीक्षा न देता आल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येणार आहे. तांत्रिक कारणामुळे परीक्षा न देता आलेल्या विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घ्यावी. तसेच सध्या सुरू असलेल्या परीक्षा सुरळीतपणे पार पाडाव्यात, अशी मागणी अधिसभा सदस्य संतोष ढोरे, शशिकांत तिकोटे, दादाभाऊ शिलकर या आधिसभा सदस्यांनी केली आहे.

**Lokmat: 15.10.2020**

## विद्यापीठाची अंतिम वर्षाची परीक्षा पावसामुळे लांबणीवर

### ३३५ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक लवकरच

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे, नगर आणि नाशिकमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बुधवारी घेतल्या जाणाऱ्या ३३५ परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाकडून जाहीर केले जाणार आहे.



विद्यापीठाकडून ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेतल्या जात आहेत. मात्र मंगळवारी दुपारनंतर सुरू झालेल्या पावसाने रौद्र रूप धारण केले. मात्र पावसामुळे अंतिम वर्षाच्या ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची अडचण झाली. तसेच मंगळवारी रात्री विद्यापीठाचे डेटा सेंटरमध्ये तांत्रिक अडचणी उद्भवल्या. तंत्रज्ञांनी काम करून बुधवारी दुपारी डेटा सेंटर पुन्हा सुरळीत सुरू केले. त्यामुळे बुधवारच्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले,'विद्यापीठाकडून बुधवारी पदवी, पदव्युत्तर पदवी स्तरावरील विविध अभ्यासक्रमांच्या ३३५ परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आलेहोते. मात्र पावसामुळे या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा लागला. या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल.'

लोकसत्ता Fri, 16 October 2020 https://epaper.loksatta.com/c/55699798

# News Paper Clippings During October 2020

## Section: Education

**नवभारत**

### तूफानी बारिश के चलते

## पुणे विवि की परीक्षाएं रद्द

नवभारत न्यूज नेटवर्क

**पुणे.** पुणे में गत रात तूफानी बारिश ने झकझोर कर रख दिया. इसका असर गुरुवार को पुणे के जनजीवन पर देखा गया.सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय ने अंतिम वर्ष की परीक्षा की घोषणा की थी. मगर भारी बारिश के कारण गुरुवार को होने वाली सभी ऑनलाइन व ऑफलाइन विषयों की परीक्षा रद्द कर दी गई. इसकी जानकारी विश्वविद्यालय की वेबसाइट पर भी जारी की गई. परीक्षा की संशोधित समय सारिणी जल्द जारी की जाएगी, यह भी विश्वविद्यालय की ओर से सूचित किया गया है.



राज्य के अधिकांश हिस्सों में अतिवृष्टि की चेतावनी होने की वजह से विद्यार्थियों की सुरक्षा का विचार करते हुए गुरुवार को होने वाली ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा आगे बढ़ाने का निर्णय लिया गया. बारिश के कारण अधिकांश जगहों पर बिजली सप्लाई ठप्प हो गई है. ऐसे में इंटरनेट कनेक्टिविटी की दिक्कत पैदा हो सकती है.

Pune Edition
16-october-2020 Page No. 4
epaper.enavabharat.com

## मुसळधार पावसामुळे विद्यापीठाच्या परीक्षा रद्द

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. १५ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मुसळधार पावसामुळे गुरुवारी (दि.१५) होणाऱ्या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. याचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर होणार आहे.

विद्यापीठामार्फत पदवी व पदव्युतरच्या अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येत आहे. ती घेत असताना विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी येत आहेत. त्या दूर करण्यासाठी विद्यापीठाने पाऊल उचलले आहे. परीक्षेतील अडचणी कमी करीत परीक्षा सुरळीत होत असतानाच आता पावसामुळे होणाऱ्या परीक्षा रद्द कराव्या लागल्या. राज्याच्या विविध भागांसह विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यांतही मुसळधार पाऊस होत आहे. त्यामुळे परीक्षा देताना विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी गुरुवारी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने घेतला.

" विद्यापीठाकडून गुरुवारी पदवी, पदव्युत्तर पदवी स्तरावरील विविध अभ्यासक्रमांच्या ३३५ परीक्षा घेण्याचे नियोजन होते. मात्र, पावसामुळे त्या पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा लागला. या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर होईल.

**- डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, पुणे विद्यापीठ

**Prabhat: 16.10.2020**

## विद्यापीठाची अंतिम वर्षाची परीक्षा पावसामुळे लांबणीवर

### ३३५ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक लवकरच

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे, नगर आणि नाशिकमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बुधवारी घेतल्या जाणाऱ्या ३३५ परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाकडून जाहीर केले जाणार आहे.

विद्यापीठाकडून ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेतल्या जात आहेत. मात्र मंगळवारी दुपारनंतर सुरू झालेल्या



पावसाने रौद्र रूप धारण केले. मात्र पावसामुळे अंतिम वर्षाच्या ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची अडचण झाली. तसेच मंगळवारी रात्री विद्यापीठाचे डेटा सेंटरमध्ये तांत्रिक अडचणी उद्भवल्या. तंत्रज्ञांनी काम करून बुधवारी दुपारी डेटा सेंटर पुन्हा सुरळीत सुरू के ले. त्यामुळे बुधवारच्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले,'विद्यापीठाकडून बुधवारी पदवी, पदव्युत्तर पदवी स्तरावरील विविध अभ्यासक्रमांच्या ३३५ परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आलेहोते. मात्र पावसामुळे या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा लागला. या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल.'

लोकसत्ता Fri, 16 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55699798

## SPPU POSTPONES EXAM DUE TO HEAVY RAINFALL

**PUNE:** The Savitribai Phule Pune University (SPPU) on Thursday cancelled its final year exams scheduled for the day due to heavy rains and flash floods that hit the city on Wednesday.

The varsity officials also told the agency appointed to conduct the exams that began on October 12 to address the technical and other issues faced by students.

"In view of the heavy rains on October 14 and district administration's alert for cyclone and heavy rains on Thursday, exams scheduled for Thursday have been cancelled. Fresh exam dates will be declared soon," said Mahesh Kakade, SPPU director of the board of examination and evaluation.

DHEERAJ BENGRUT

**Hindustan times: 16.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

## Rain puts off 335 final-year SPPU exams on Thursday

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Savitribai Phule Pune University (SPPU) postponed its final-year examinations scheduled for Thursday due to incessant rain.

Mahesh Kakade, director of examination and evaluation at SPPU, said the exams of 335 subjects were postponed and a decision on the examinations on Friday will be taken either late on Thursday night or on Friday morning.

A notification on the university's official website said, "A flood-like situation caused by heavy rain was experienced on October 14. The civic administration has issued an alert for a cyclone and heavy rainfall on October 15. Therefore, keeping in mind the safety of students and to avoid any inconvenience, the university authorities have decided to postpone the online as well as offline examinations of Savitribai Phule Pune University scheduled on October 15. The revised schedule of the postponed examinations will be declared soon."

Kakade said a revised timetable would be declared soon. "We are taking all measures to conduct the examinations as scheduled on Friday. We appeal to the students to go ahead with their preparations. However, if the rainfall increases late at night or depending upon the India Meteorological Department's late-night warning, we will take appropriate decisions on the examination on Friday either by Thursday evening or Friday morning."

He said students can use any digital platform to take the exam as long as the examinee attempts the question paper and submits it. "We appeal to students to once again read the guidelines issued so that there are no glitches," he added.

A decision on the result declaration would be taken in the next week. "A tentative date for results by the end of next week may be possible," Kakade said.

**The times of India: 16.10.2020**

## Varsity postpones online and offline exams due to rain

### Revised schedule for the missed tests will be announced later

The Savitribai Phule Pune University has postponed the online and offline examinations scheduled for today, due to heavy rainfall alert in the region. It will announce the revised schedule later.

"Final year exams scheduled for Wednesday have been postponed in view of heavy rain following an alert issued by IMD for Pune and adjoining districts. The exams were being conducted online for final year students by Savitribai Phule Pune University while those who could not attend it online were provided offline option as well. Hence, the exams scheduled have been postponed. The revised schedule to be declared later," the university said in a statement.

Meanwhile, as various parts of Maharashtra are on high alert following excessive rains, traffic movement halted at Sinhagad Road due to waterlogging.

A flood-like situation has occurred in the Baramati river following a rise in water level.

The National Disaster Relief Force (NDRF) has deployed two teams in Maharashtra—one each in Latur and Solapur for rescue operations. **ANI**

**Pune mirror: 16.10.2010**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## विद्यापीठाचे आजचे पेपर होणार

### गुरुवारचे मात्र रद्द; सुधारित वेळापत्रक लवकरच

**पुणे :** पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यामध्ये बुधवारी रात्री उशिरापर्यंत झालेल्या जोरदार पावसामुळे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गुरुवारी घेतल्या जाणाऱ्या ३३५ विषयांच्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाकडून येत्या काही दिवसांत जाहीर केले जाणार आहे. दरम्यान, आज शुक्रवारी १६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार होणार असून, त्यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

पुणे विद्यापीठाकडून विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने घेतल्या जात आहेत. मात्र, बुधवारी झालेल्या पावसाने अंतिम वर्षाच्या ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय झाली. विद्यापीठाच्या डेटा सेंटरमध्ये तांत्रिक अडचणी उद्भवल्या होत्या.

**Maharashtra times: 16.10.2020**

## रद्द परीक्षांचे सुधारित वेळापत्रक लवकरच

**पुणे, ता. १५ :** राज्यातील अतिवृष्टीमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या गुरुवारी होणाऱ्या सर्व ऑनलाइन आणि ऑफलाइन परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. तसेच, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर याबाबतची माहिती प्रसिद्ध केली आहे. गुरुवारी रद्द केलेल्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या असून, त्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर होईल, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

पावसामुळे पुणे, नगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांची तब्बल ३३८ विषयांची ऑनलाईन आणि ऑफलाईन परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे.

तसेच परीक्षेचे सुधारीत वेळापत्रक लवकरच प्रसिद्ध केले जाईल, असे विद्यापीठाने संकेतस्थळावर स्पष्ट केले.

विद्यापीठातर्फे शुक्रवारी (ता. १६) २५८ विषयांची परीक्षा घेतली जाणार असून जवळपास ८० हजार विद्यार्थी ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देणार असल्याची माहिती अधिकृत सुत्रांनी दिली आहे.

**Sakaal: 16.10.2020**

## परीक्षेतील कॉपीचा व्हिडिओ व्हायरल

### विद्यापीठाकडून चतुःश्रृंगी पोलिसांत तक्रार दाखल



**नेमके काय घडले?**

- साडेसात मिनिटांचा व्हिडिओ व्हायरल.
- यू-ट्यूबवर केला अपलोड.
- बुधवारी रात्रीपासून व्हॉट्सअॅपवर फॉरवर्ड.

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेत गैरप्रकार करून परीक्षेत गुण कसे मिळवावे, याचा व्हिडिओ यू-ट्यूबवर अपलोड करून व्हायरल झाला आहे. या प्रकाराची विद्यापीठ प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून, गुरुवारी पोलिसांत तक्रार दाखल केली. दरम्यान, या प्रकारात विद्यार्थ्यांचा समावेश असण्याची शक्यता तपासून पाहण्यात येत आहे.



**विद्यापीठाची 'परीक्षा'**

विद्यापीठाच्या परीक्षेत प्रॉक्टर्ड मेथडऐवजी आय एजन्सीकडून ऑनलाइन परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षेसाठी साधारण दोन लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या परीक्षा घरबसल्या मोबाइल, टॅब, लॅपटॉप, कम्प्युटरवर देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, या ऑनलाइन प्रणालीत सिक्युरिटी फीचर्स कमी आहेत. त्याचाच फायदा विद्यार्थ्यांकडून घेण्यात येत आहे. एकापेक्षा अधिक साधनांचा वापर करून परीक्षा देणे, समूहाने पेपर सोडविणे, कॅमेरा बंद ठेवून कॉपी करून पेपर सोडविण्यासारखे पेपर सुरू आहेत. या प्रकारांमध्ये भरीस भर म्हणून एका व्यक्तीकडून ऑनलाइन परीक्षेत कॉपी कशी करावी, याचा साडेसात मिनिटांचा व्हिडिओ तयार करून यू-ट्यूबवर अपलोड केला आहे. हा व्हिडिओला व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून बुधवारी रात्रीपासून व्हायरल करण्यात येत आहे.

या व्हिडिओद्वारे विद्यापीठ आणि विद्यापीठासाठी काम करणाऱ्या सेवा पुरवठादारांची आणि संबंधितांची बदनामी करण्याचा प्रयत्न आहे. यामुळे प्रचलित कायद्याचा भंग झाला आहे. ही बाब गंभीर स्वरूपाची असून, दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी तक्रार विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी चतुःश्रृंगी पोलिस ठाण्यात नोंदविली आहे.

**Maharashtra times: 16.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

City | Pune Times Mirror | Friday, October 16, 2020 | 4

## SPPU exam hacks go on YouTube

### Exam department takes cop help to ban the video, which explains ways of cheating during online tests

Sukhada.Khandge@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

Savitribai Phule Pune University's (SPPU) examination department has written an application to the Chaturshringi police station, demanding the removal of a YouTube video on exam cheating hacks.

The video, 'SPPU Cheating Mantra 2020', is 7.32-min long. It gives information on the hacks that students can use to clear their online exam. The video starts with few dos and don'ts and later gives step-by-step instructions on cheating. The suggestions involve finding answers in books or the internet.

The video uploaded on October 14 tags higher education minister in it. Youtuber Sarpanch HD has uploaded the video which has garnered 1.2k views so far. It has received many comments, and the uploader has answered a few of them that pose a query.

Mahesh Kakade, director of the examination department, said, "The video uploaded on YouTube purports a wrong image of the university and also misguides students. Since the video has the SPPU main building picture, there more so the risk for malignant ion. Thus, we have given an application to Chaturshringi police station. Based on the letter, we expect the cops to register a complaint and take action accordingly."

Students received this video on various WhatsApp groups. A few claim they have refrained from forwarding it.

A final-year student said, "We received this video on a group. It gives details on cheating. Since it is unethical, many of us have decided not to circulate it. They do not retain the seriousness of exam."

Another student added, "If such videos go viral, academic degrees will not be taken seriously. Even if the examinations are taking place in a different mode, they are being done for the degrees. The cheating videos will only raise a doubt on the credentials. SPPU has taken the right decision by involving the police."

Police inspector Anil Shewale of Chaturshringi police station confirmed to have received the letter on Thursday evening. "We would forward the same to cybercrime cell for the further inquiry and accordingly take action," he said.




In the 7.32-min long video, the uploader has detailed some dos and don'ts. Then, the user has answered queries posed in comments

## 'व्हिडिओ'द्वारे विद्यापीठाची बदनामी

### पुणे विद्यापीठाची पोलिसांत तक्रार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १५ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये गैरप्रकार करून अवैधरित्या परीक्षा कशी द्यावी, याबाबत सोशल मीडियाद्वारे व्हिडिओ प्रसारित करून विद्यापीठास बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करावी, अशी तक्रार पुणे विद्यापीठाने चतु:शृंगी पोलीस ठाण्यात दिली.

पुणे विद्यापीठामार्फत ऑनलाइन आणि ऑफलाइन परीक्षा घेण्यात येत आहे. सुमारे अडीच लाख विद्यार्थी पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाची परीक्षा देत आहेत. त्यातील दोन लाखांहून अधिक विद्यार्थी ऑनलाइनद्वारे परीक्षा देत आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाकडून योग्य ती काळजी घेत परीक्षा घेतली जात आहे. या परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू झाल्या आहेत.

दरम्यान, या परीक्षांमध्ये गैरप्रकार करून अवैधरीत्या परीक्षा कशी द्यावी, याबाबत बेजबाबदार व बेकायदेशीरपणे विद्यार्थ्यांची ७ मिनिट ३२ सेकंदाच्या व्हिडिओद्वारे दिशाभूल करण्यात येत आहे. याद्वारे विद्यापीठ आणि विद्यापीठासाठी काम करणाऱ्या सेवा पुरवठादारांची व सर्व संबंधितांची बदनामी करण्याचा प्रयत्न आहे. यामुळे प्रचलित कायद्याचा भंग झाला आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची असून, यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी तक्रार विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी नोंदविली आहे.

### २४ तास हेल्पलाइन उपलब्ध करण्याची मागणी

अंतिम वर्ष विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या अडचणीसंदर्भात २४ तास हेल्पलाइन उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे केली. विशेषत: ग्रामीण भागात नेटवर्क नसणे, प्रश्न किंवा पर्याय न दिसणे, उत्तर लवकर सबमीट न होणे, वेळेत पेपर सुरू न होणे, इ-मेल व लॉगइन आयडी चुकीचा जाणे, पेपर बदलून येणे, भाषा बदलून येणे, यासारख्या तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यावर होऊ शकतो याकडे अधिसभा सदस्य संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर आणि शशिकांत तिकोटे यांनी लक्ष वेधले. अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे.

**Prabhat: 16.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

पुढारी

# ऑनलाइन परीक्षेत यश मिळविण्याचा व्हिडिओ व्हायरल

## विद्यापीठाची पोलिसांकडे कारवाईची मागणी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अंतिम वर्ष, बॅकलॉग विषयांच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येत आहे. यातील ऑनलाइन परीक्षेत सर्वाधिक गुण कसे मिळवता येतील, याचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे. त्यामुळे खळबळ उडाली असून संबंधित प्रकार गंभीर आहे, यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी चतु:शृंगी पोलिस स्टेशनच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांकडे केली आहे.

विद्यापीठाच्या १२ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी साधारण अडीच लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे दोन लाख विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने, तर उर्वरित साधारण ५० हजार विद्यार्थी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देत आहेत. ऑनलाइन आणि ऑफलाइन पान ४ वर

### काय आहे व्हिडिओत...

■ सर्वाधिक गुण कसे मिळवायचे मार्गदर्शन ■ चिटींग करीत असताना काय करू नये याचे नियम ■ इंटरनेट बंद - चालू करून स्क्रिनशॉटशिवाय प्रश्नपत्रिकेचे फोटो काढून गुण मिळवण्याचे तंत्र ■ ६० प्रश्नांचा पेपर ४५ मिनिटांत सोडविण्याचे तंत्र ■ परीक्षा होल्ड करून प्रश्नपत्रिकांचे फोटो काढण्याचे तंत्र ■ सात पायऱ्यांमध्ये पेपर सोडविण्याचे तंत्र ■ कोणताही स्कॅम नसल्याचा व्हिडिओ बनवणाऱ्याचा दावा

### अतिवृष्टीमुळे आजचे पेपर लांबणीवर

बुधवारी पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यासह राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि चक्रीवादळामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुरुवारी (दि. १५) होणाऱ्या नियोजित सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या असून, त्यांचे सुधारित वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी दिली. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, की विद्यापीठाकडून गुरुवारी पदवी, पदव्युत्तर पदवी स्तरावरील विविध अभ्यासक्रमांच्या ३३५ विषयांच्या परीक्षा घेण्याचे नियोजन केले होते. मात्र पावसामुळे या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा लागला. या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल.

Pune Edition
Oct 16, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# दसरा आला तरी प्रवेश प्रक्रियेची कोंडी फुटेना

## राज्यातील अकरावी, डिप्लोमाचे विद्यार्थी हैराण

म. टा. प्रतिनिधी, पुणे

### डिप्लोमा प्रवेश प्रक्रिया रेंगाळत सुरू

तंत्रशिक्षण संचालनालयाकडून (डीटीई) दहावीनंतर आणि बारावीनंतरच्या डिप्लोमा अभ्यासक्रमांची प्रक्रियाही रेंगाळत सुरू आहे. प्रवेशाच्या आरक्षणाबाबत सरकारने कोणतेच धोरण जाहीर केलेले नाही. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेत पहिली गुणवत्ता यादी जाहीर केल्यानंतरही प्रवेश प्रक्रिया राबविता येणार नाही, याची माहिती असल्याने डीटीई डिप्लोमा अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत अर्ज करण्याला मुदतवाढ मिळत आहे. प्रवेश प्रक्रियेला आतापर्यंत सात वेळेस मुदतवाढ मिळाली आहे. मात्र, प्रवेश अर्जात वाढ होत नसल्याचे चित्र आहे.



### अभ्यासक्रम सुरू होणार का?

अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या आणखी तीन फेऱ्या पूर्ण बाकी आहेत. तशीच काहीशी परिस्थिती आयटीआय प्रवेश प्रक्रियेची आहे. त्यामुळे यंदा दिवाळीनंतरही प्रवेश प्रक्रिया सुरू राहण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत ज्युनियर कॉलेज आणि आयटीआयचे अभ्यासक्रम यंदा तरी सुरू होणार का, असा प्रश्न पालकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. डिप्लोमा अभ्यासक्रमांचे अजून अर्जच भरणे सुरू आहे. त्यामुळे तेथील प्रवेश प्रक्रिया आणखी रेंगाळण्याची शक्यता आहे.

करोनाचा फैलाव, त्यामुळे लागू झालेले लॉकडाउन आणि त्यानंतर मराठा आरक्षणप्रश्नी न्यायालयाचा निर्णय आदींमुळे राज्यातील इयत्ता अकरावी, डिप्लोमा आणि आयटीआयची प्रवेश प्रक्रिया महिनाभरापेक्षा अधिक काळ उलटूनही अद्याप सुरू झालेली नाही. एकीकडे दसरा जवळ आला, तरी अजूनही प्रवेश न झाल्याने दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

त्यामुळे प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीतून प्रवेशित; तसेच प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असणारे हजारो विद्यार्थी अजूनही संभ्रमावस्थेतच आहे. अशा वेळी राज्य सरकारने प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थी-पालकांना योग्य माहिती देऊन संभ्रम दूर करावा अशी मागणी येत आहे. अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेची दुसरी गुणवत्ता यादी १० सप्टेंबरला आणि आयटीआय प्रवेश प्रक्रियेची दुसरी फेरी १४ सप्टेंबरनंतर जाहीर होणार होती. मात्र, मराठा आरक्षणाच्या स्थगितीबाबत सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम निर्णय दिल्यानंतर, राज्य सरकारने विविध प्रवेश प्रक्रियांबाबत कोणताही ठोस निर्णय घेतला नाही किंवा पावले उचलली नाहीत. त्यामुळे दहावीनंतर इयत्ता अकरावीत प्रवेश घेण्यासाठी राबविण्यात येणारी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया; तसेच आयटीआयमध्ये प्रवेश घेण्यासाठी सुरू असणारी आयटीआय प्रवेश प्रक्रिया पहिल्या फेरीच्या प्रवेशानंतर ठप्प झाली आहे.

प्रवेश प्रक्रियेत नेमके कोणते बदल होणार, आरक्षणानुसार झालेल्या प्रवेशांचे काय, प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांचे प्रवेश कसे आणि कधी होणार असे, अनेक प्रश्न विद्यार्थी-पालकांच्या मनात गर्दी करीत आहेत. मात्र, राज्य सरकारकडून कोणत्याही सूचना न आल्याने शालेय शिक्षण विभागातील; तसेच व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाचे अधिकारी बोलण्यास तयार नाहीत. त्यामुळे या दोन्ही महत्त्वाच्या प्रवेश प्रक्रियांबाबत राज्य सरकारने योग्य आणि सविस्तर माहिती विद्यार्थी-पालकांना देऊन, त्यांच्या मनातील गोंधळ कमी करावा, अशी मागणी समोर आली आहे. दोन्ही प्रवेश प्रक्रियांची केवळ एकच प्रवेशफेरी झाल्यामुळे, अजूनही हजारो विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत.

**Maharashtra times: 16.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## ऑनलाइन परीक्षेत तांत्रिक घोळ सुरुच

### विद्यापीठाचा मात्र सुरळीत सुरुचा दावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेत सलग चौथ्या दिवशी विद्यार्थ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागला. दुसऱ्याच विषयाचा पेपर दिसणे, लॉगीन न होणे, प्रश्नांना पर्याय नसणे आदी तांत्रिक घोळ आढळून आले. दरम्यान, विद्यापीठ प्रशासनाने मात्र ऑफलाईनसह ऑनलाईन परीक्षाही सुरळीतपणे पार पडल्याचा दावा केला आहे.

मागील चार दिवसांपासून विद्यापीठामार्फत पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने सुरु आहेत. विद्यार्थ्यांना प्रामुख्याने ऑनलाईन परीक्षांना सामोरे जाताना पहिल्या दिवसापासून अडचणी येत आहेत. या अडचणी दुर करण्यात येणार असल्याचे पहिल्या दिवशी विद्यापीठाकडून सांगण्यात आले होते. पण सलग चौथ्या दिवशी विद्यार्थ्यांना अडचणींना सामोरे जावे लागेल. तांत्रिक घोळ दुर करण्यास यंत्रणेला अद्याप यश आलेले नाही. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी ६० हजार ८२२ विद्यार्थी ऑनलाइन परीक्षेसाठी, तर १५ हजार १९६ विद्यार्थांनी ऑफलाइन परीक्षा देणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात अनुक्रमे ५४ हजार ३८४ व १३ हजार ५०१ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा दिली. स्टुडंट हेल्पिंग हँडचे अध्यक्ष कुलदीप आंबेकर यांनी ऑनलाइन परीक्षेचे काम दिलेल्या एजन्सीची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

#### रद्द परीक्षेच्या तारखा जाहीर

तांत्रिक घोळामुळे दि. १३ ऑक्टोबरच्या पाच विषयांच्या ऑनलाईन परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या होत्या. या परीक्षा आता १७ व २४ ऑक्टोबर व ३ नोव्हेंबर रोजी होणार आहेत. एमएस्सी केमिस्ट्री - इनऑर्गेनिक रिॲक्शन मेकॅनिझम, टीवायबीएस्सी - रीअल ॲनॅलिसीस, एमएस्सी मॅथेमॅटिक्स ॲडव्हान्स्ड कॅलक्युलस, एसवायबीकॉम- बिझनेस मॅनेजमेंट (मराठी) आणि टीवाय बीएस्सी - सॉलिड स्टेट फिजिक्स हे पाच विशय आहेत.

**Lokmat: 17.10.2020**

## विद्यापीठ परीक्षेत पुन्हा अडचणी

पुणे, ता. १६ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेतील तांत्रिक अडचणींची मालिका चौथ्या दिवशीही सुरूच राहिली. पहिल्या सत्रातील पेपर सुरळीत पार पडले.

पुणे विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाची परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन-एमसीक्यू) पद्धतीने ऑनलाइन व ऑफलाइन माध्यमातून परीक्षा घेतली जात आहे. बुधवारी रात्री मुसळधार पाऊस झाल्याने अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडून गुरुवारीही परीक्षा पुढे ढकलण्यात यावी अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली होती. परंतु, विद्यापीठाने नियोजित वेळापत्रकानुसार गुरुवारी परीक्षा घेतली.

सकाळच्या सत्रात बॅकलॉगच्या एकूण १० हजार ७९९ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन लॉगइन केले. तर, दुपारच्या दोन सत्रात नियमित अभ्यासक्रमांच्या ४३ हजार ६४८ विद्यार्थ्यांनी लॉगइन केले, असे महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी बोलताना सांगितले. दरम्यान पुणे विद्यापीठाने परीक्षा विनाअडथळा पार पडल्याचे सांगितले.

> **सकाळच्या सत्रातील परीक्षा सुरळीत पार पडली. पण दुपारच्या सत्रात काही तांत्रिक अडचणी पेपरमध्ये अडचणी आल्याने ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेला उशीर झाला. त्यामुळे विद्यार्थ्यांना वेळ वाढवून देण्यात आला.**
> **- डॉ. महेश काकडे, संचालक,**
> परीक्षा व मूल्यमापन विभाग

### नेमक्या कोणत्या अडचणी आल्या

- ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या बीएच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्याला अर्थशास्त्राऐवजी सांख्यिकीचा पेपर आला.
- एमएससी बॉटनीच्या पेपरला तांत्रिक प्रॉब्लेम आले.
- इंग्रजी स्पेशलच्या पेपरला परीक्षेपूर्वीच परीक्षा दिल्याचे लॉगइन केल्यानंतर दिसत होते.
- एमसीक्यूचे प्रश्न न दिसणे किंवा पर्याय न दिसणे असेही काहीठिकाणी प्रकार.
- ऑफलाइन परीक्षा देणाऱ्या राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना मराठी ऐवजी इंग्रजीतून पेपर.
- सायंकाळच्या चारच्या अर्थशास्त्राच्या पेपरला दुसराच पेपर आला.
- एमए मराठीच्या पेपरला दोनच पर्याय दिसत होते.

**Sakaal: 17.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

पुढारी

# ऑनलाइन परीक्षा अडचणीत; विद्यापीठ म्हणते सुरळीत

## परीक्षेचे कामकाज पाहणाऱ्या एजन्सीचा कारभार चव्हाट्यावर



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून घेण्यात येत असलेल्या अंतिम वर्षाची, बॅकलॉग विषयांची ऑनलाइन परीक्षा सुरू झाल्यापासून एकही दिवस असा गेला नाही, ज्या दिवशी विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले नाही. त्यामुळे परीक्षेचे कामकाज पाहणाऱ्या एजन्सीचा कारभार चव्हाट्यावर आला आहे. या एजन्सीची चौकशी करण्याऐवजी विद्यापीठ प्रशासन परीक्षा सुरळीत सुरू असल्याचे छातीठोकपणे सांगत आहे. त्यामुळे ऑनलाइन परीक्षा तांत्रिक अडचणीत सापडली आहे, तर विद्यापीठ मात्र परीक्षा सुरळीत सुरू असल्याचा दावा करत आहे.

विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या परीक्षा १२ ऑक्टोबरपासून घेण्यात येत आहेत. परीक्षा सुरू झाल्यानंतर पहिल्या दिवशी झालेल्या तांत्रिक गोंधळानंतर विद्यापीठाकडून यापुढे कोणतीही अडचण येणार नसल्याचा दावा करण्यात आला. परंतु विद्यार्थ्यांना दरदिवशी काही ना काही तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

शुक्रवारी झालेल्या परीक्षेत आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचा विद्यार्थी आकाश शेलार याचा अर्थशास्त्र विषयाचा पेपर होता. त्याला सांख्यिकी या विषयाचा पेपर देण्यात आला. तर सचिन मालवीकरचा पब्लिक फायनान्सचा पेपर होता आणि त्याला स्टॅटिस्टिक पेपर दिला गेला. त्यानंतर विद्यापीठाकडून चूक दुरुस्त करून सुधारित प्रश्नपत्रिका देण्यात आली.

विद्यार्थ्यांना अशा विविध तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यामध्ये सुधारणा होणे अपेक्षित असताना प्रशासानाकडून परीक्षा सुरळीत सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान शुक्रवारी ऑनलाइन परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या ६० हजार ८२२ विद्यार्थ्यांपैकी ५४ हजार ३८४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर १५ हजार १९६ विद्यार्थ्यांपैकी १३ हजार ५०१ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा दिली असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

### *पाच विषयांचे वेळापत्रक जाहीर...*

*विद्यापीठाने १३ ऑक्टोबरला तांत्रिक अडचणींमुळे पाच परीक्षा पुढे ढकलल्या होत्या. त्याचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार विज्ञान पदव्युत्तर पदवी (एम.एस्सी.) गणित शाखेतील विषयातीलअॅडव्हान्स्ड कॅलक्युलस विषयाची आणि एम.एस्सी. केमिस्ट्री शाखेतील ऑर्गेनिक रिअॅक्शन मॅकेनिझम विषयाची परीक्षा २४ ऑक्टोबर, विज्ञान पदवी गणित शाखेतील रिअल अॅनालिसिस १ विषयाची आणि विज्ञान पदवी भौतिकशास्त्र शाखेतील सॉलिड स्टेट फिजिक्स विषयाची परीक्षा ३ नोव्हेंबर आणि द्वितीय वर्ष वाणिज्य शाखेतील बिझनेस मॅनेजमेंट विषयाची परीक्षा १७ ऑक्टोबरला होणार आहे.*

My Pune Edition
Oct 17, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# 'नेट'चे सुधारित वेळापत्रक जाहीर

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. १६ - सहायक प्राध्यापकांसाठी अनिवार्य संयुक्त सीएसआयआर- नेट परीक्षेचे सुधारित वेळापत्रक नॅशनल टेस्टिंग एजन्सीने शुक्रवारी प्रसिद्ध केले. आता ही परीक्षा १९, २१ आणि २६ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

वरिष्ठ महाविद्यालये आणि विद्यापीठात सहायक प्राध्यापक पदांसाठी राष्ट्रीय पात्रता परीक्षा अर्थात नेट परीक्षा नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत (एनटीए) देशभरात घेतली जाते. ही परीक्षा जूनमध्ये होणार होती.

मात्र, करोनामुळे ती पुढे ढकलली होती. त्याच्या सुधारित तारखा प्रसिद्ध केल्या आहेत. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणितसह पाच विषयांसाठी सीएसआयआर ही परीक्षा घेतली जाते.

या परीक्षेसाठी हॉलतिकीट परीक्षेच्या काही दिवस आधी उपलब्ध करून दिले जाणार असून, त्याची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळावेळी 'एनटीए'च्या अधिकृत संकेतस्थळास माहिती पाहावी, असे आवाहन 'एनटीए'ने केले आहे. करोना पार्श्वभूमीवर सर्व दक्षता घेत ही परीक्षा घेतली जाणार असल्याचे 'एनटीए'ने स्पष्ट केले आहे.

**Prabhat: 17.10.2020**

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

प्रभात १८।१०।२०२०

# तांत्रिक अडचणी दूर करीत ऑनलाइन परीक्षा

प्रभात वृत्तसेवा



**७ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाइन, तर ३ हजार जणांकडून ऑफलाइनद्वारे अंतिम वर्षाची परीक्षा**

पुणे, दि. १७ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन परीक्षेत तांत्रिक अडचणी आता दूर होण्याच्या मार्गावर आहेत. काही किरकोळ तांत्रिक अडचणी वगळता अंतिम वर्षाच्या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा शनिवारी योग्य पद्धतीने होत असल्याचे दिसून आले.

विद्यापीठामार्फत पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाची परीक्षा गेल्या पाच दिवसांपासून नगर, नाशिक व पुणे जिल्ह्यांतील कार्यक्षेत्रात सुरू आहे. परीक्षेत तांत्रिक अडचणी येत होत्या. मात्र, आता पाचव्या दिवशी अडचणी दूर होत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, सकाळच्या सत्रात बीए-एलएलबी सिव्हिल प्रोसिजरचा पेपर विद्यार्थ्यांना लॉगइन केले आहे, पण पेपर दिसत नसल्याच्या तक्रारी होत्या. काही विद्यार्थ्यांनी पेपर दिला, पण ते नेटवर्कअभावी सबमीट होऊ शकले नाहीत. काही प्रश्नपत्रिकेत पर्याय स्पष्टपणे दिसून येत नव्हते. चारऐवजी दोनच पर्याय, लॉगइन वेळेत होत नव्हती, अशा तक्रारी विद्यार्थ्यांच्या होत्या. एमए मराठीच्या 'प्रसारमाध्यमे व मराठी साहित्य' या विषयाच्या परीक्षेत ४० ते ४२ बहुपर्यायी प्रश्नातील दोन पर्याय दिसत नसल्याच्या अनेक तक्रारी होत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांची धाकधूक वाढली होती. ही बाब विद्यापीठाच्या हेल्पलाइनशी संपर्क साधून कळविली.

शनिवारी ९ हजार ७२ विद्यार्थी ऑनलाइन परीक्षेसाठी, तर ४ हजार ३६८ जण ऑफलाइन परीक्षेसाठी अपेक्षित होते. त्यापैकी ७ हजार २६८ विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे ऑनलाइन पद्धतीने परीक्षा दिली. तर, ३ हजार ५०२ विद्यार्थ्यांनी ऑफलाइनद्वारे परीक्षा दिल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून देण्यात आली.

**Prabhat: 18.10.2020**

# मराठीच्या पेपरला पर्यायच गायब

## शेकडो विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला; पुणे विद्यापीठाकडून अस्पष्टता

पुणे, ता. १७ : एम. ए. मराठीच्या 'प्रसारमाध्यमे व मराठी साहित्य' या विषयाच्या परीक्षेत ४० ते ४२ बहुपर्यायी प्रश्नातील (मल्टिपल च्वाइस क्वेश्चन-एमसीक्यू) दोन पर्याय गायब असल्याचा प्रकार समोर आला आहे. या तांत्रिक चुकीमुळे शेकडो विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागलेला असताना विद्यापीठाने याबाबत अजून स्पष्टता आणलेली नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे 'एमसीक्यू' पद्धतीने ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा घेतल्या जात आहेत. यासाठी विद्यापीठाने खासगी एजन्सीची निवड केली आहे. पण पहिल्या दिवसापासून तांत्रिक अडचणी येत आहेत. परीक्षा सुरू होऊन पाच दिवस झाले तरी यात दुरुस्ती होऊ शकलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांसह संबंधित विषयांचे प्राध्यापक, महाविद्यालयेही चिंतेमध्ये आहेत.

शुक्रवारी दुपारच्या सत्रात एम. ए. मराठीचा 'प्रसारमाध्यमे व मराठी साहित्य' या विषयाची परीक्षा ऑफलाइन व ऑनलाइन सुरू झाली. विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यास सुरवात केल्यानंतर अनेक प्रश्नांच्या उत्तराचे चार पर्यायाऐवजी दोनच पर्याय दिले आहेत, हे समोर आले. विद्यार्थ्यांनी याबाबत महाविद्यालयांकडे तक्रार केली असता, त्यांनी याबाबत आम्हाला काही माहिती नाही असे सांगितले. मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे म्हणाल्या, "परीक्षेसाठी प्रश्न व्यवस्थित काढून दिले होते. पण तांत्रिक चुकीमुळे विद्यार्थ्यांना दोनच पर्याय दिसले. इतर विषयांच्या परीक्षा असल्याने त्याच्या पुनर्परीक्षेबाबत निर्णय झाला नाही, पण विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ दिले जाणार नाही.

**शनिवारी झालेल्या परीक्षेची आकडेवारी**

९०७२ ऑनलाइनसाठी अपेक्षित

७२६८ परीक्षा देणारे

४३६८ ऑफलाइनसाठी अपेक्षित

३५०२ परीक्षा देणारे

**पेपर होण्याबाबत धाकधूक**

शनिवारी सकाळी बीए एलएलबीचा सिव्हिल प्रोसिजरचा पेपर होता. विद्यार्थ्यांनी लॉगइन केले पण त्यांना पेपर येत नव्हता. एका विद्यार्थ्याने हेल्पलाइनला फोन केला तर आज पेपरच नाही, असे सांगण्यात आले. दुपारी एकच्या सुमारास हा पेपर ऑनलाइन झाला. तोपर्यंत विद्यार्थ्यांना परीक्षा होणार की नाही याची धाकधूक होती, असे डेक्कन जिमखाना परिसरातील महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीने सांगितले.

**मोबाईल - लॅपटॉपचा घोळ**

शिवाजीनगर येथील एका महाविद्यालयातील एमएससीच्या विद्यार्थ्याने 'मॉलिक्युलर बायोलॉजी'चे ५५ प्रश्न सोडवले पण प्रॉब्लेम येत असल्याने हेल्पलाइनवर कॉल केला. त्यावेळी तेथून मोबाईलवर लॉगइन करण्यास सांगितले. मोबाईलवर लॉगइन करून नवा पेपर सोडवत असताना लॅपटॉपवरील तांत्रिक अडचण दूर होऊन, अवघ्या १० सेकंदात पेपर सबमीट झाला. मोबाइलवरही पेपर देता आला नाही, त्यामुळे माझे नुकसान होईल. माझ्या इतर मित्रांनाही अशीच समस्या आली, असे त्याने सांगितले.

**Sakaal: 18.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# उत्तरासाठी पर्याय दिसेना; पेपर मिळतोय उशिरा

## अंतिम वर्षाच्या परीक्षा : विद्यार्थी करतायेत हेल्पलाइनवर तक्रार

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जात असलेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत येणा-या तांतिक अडचणी काहीशा कमी झाल्या असल्या तरी विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून पाठविल्या जाणा-या ऑनलाईन प्रश्नपत्रिकेची तासंतास वाट पहावी लागत आहे.तसेच काही विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेत चार पर्यायाऐवजी दोनच पर्याय दिसत असल्याने विद्यापीठाच्या हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार करावी लागत आहे.

पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जात असलेल्या अंतिम वर्षाच्या ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षांचे वेळापत्रक पहिल्या तीन दिवसांपर्यंत चांगलेच कोलमडले होते. मात्र,विद्यापीठाच्या आय-टी विभागाने आणि परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या एजन्सीने त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही अपवाद वगळता विद्यापीठाच्या ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षा सुरळीतपणे सुरू झाल्या आहेत,असे विद्यापीठातील अधिका-यांकडून जात सांगितले.

### केवळ एकालाच आली अडचण



१ शनिवारी सकाळी १० वाजता सुरू होणारा विधी अभ्यासक्रमाचा ऑनलाईन पेपर काही विद्यार्थ्यांना दुपारी १ वाजता मिळाला. मात्र, ऑनलाईन परीक्षा देणा-या विद्यार्थ्याने ऐनवेळी ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देण्याचा निर्णय घेतल्याने केवळ एकाच विद्यार्थ्याला याबाबत अडचण आली,असा दावा काही अधिकारी करत आहेत.

२ शुक्रवारी एम. ए. मराठीचा 'प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा' या विषयाच्या प्रश्नपत्रिकेत काही प्रश्नांना केवळ दोनच पर्याय दिसत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.त्यास विद्यापीठाच्या अधिका-यांनी दुजोरा दिला आहे.त्यामुळे अजूनही विद्यापीठ परीक्षेतील अडचणी कमी झाल्या नाहीत.

३ शनिवारी ऑनलाईन परीक्षा देणा-या ९ हजार ७२ विद्यार्थ्यांपैकी ७ हजार २६८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर ४ हजार ३६८ ऑफलाईन परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांपैकी ३ हजार ५०२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

**Lokmat: 19.10.2020**

# परीक्षेतील अडचणी कायम

## एजन्सीच्या क्षमतेचा खुलासा करण्याची संघटनांची मागणी

पुणे, ता. १८ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत तांत्रिक अडचणी विद्यार्थ्यांची पाठ सोडेनात, अशीच अवस्था झाली आहे. रोज त्याच त्या समस्यांचा सामना करावा लागत असल्याने विद्यार्थी हैराण झाले आहेत. त्यामुळे परीक्षा घेणाऱ्या एजन्सीची परीक्षा घेण्याची क्षमता होती का याचा खुलासा करा, अशी मागणी नेट, सेट पीएचडीधारक संघर्ष समितीने पुणे विद्यापीठाकडे केली आहे. तर, परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे विद्यापीठाने सांगितले आहे.

रविवारी सकाळी परीक्षा सुरू झाल्यानंतर एमकॉमचा 'मर्कंटाईल लॉ'चा पेपर होता. विद्यार्थ्यांना पेपर येत नसल्याने तो नंतर ११ वाजता घेण्यात येणार असल्याचे सांगितले. मात्र, दुपारी १ वाजून गेला तरी अनेक विद्यार्थ्यांना लॉगइन होत नसल्याने पेपर सोडवता आला नसल्याने ते चिंताग्रस्त झाले होते. या विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणी सांगण्यासाठी गुगल फॉर्म भरा, त्यानंतर विद्यापीठाकडून इमेल येईल, त्यानुसार परीक्षा होईल असे सांगण्यात आले. पण अनेक विद्यार्थ्यांना इमेल आला नाही, असे एका प्राध्यापकाने सांगितले. इतर विषयांच्या पेपरलाही लॉगइनची समस्या आली आहे.

### रविवारी झालेल्या परीक्षेची आकडेवारी

| | |
|---|---|
| १२५२७६ ऑनलाइन अपेक्षित विद्यार्थी | १५४२३ ऑफलाइनसाठी अपेक्षित विद्यार्थी |
| ११५२३३ ऑनलाइन परीक्षा देणारे | १३८८१ ऑफलाइन परीक्षा देणारे |

२२३ पेपर संख्या

"परीक्षा सुरू होताना विद्यार्थ्यांना लॉगइन करताना अडचणी येत आहेत, त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न आहे, अनेकांनी व्यवस्थित पेपर दिला आहे. तरीही विद्यार्थ्यांनी त्यांना येणाऱ्या अडचणी गुगल फॉर्मद्वारे विद्यापीठाकडे नोंदवाव्यात, त्यांचे निराकरण केले जाईल. विद्यार्थ्यांनी चिंता करू नये.

- डॉ. पराग काळकर, अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

"ऑनलाइन परीक्षेत सातत्याने अडचणी येत असल्याने विद्यार्थी, प्राध्यापकांना मानसिक त्रास होत आहे. तसेच, निकालावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. जी एजन्सी परीक्षा घेत आहे, त्यांची क्षमता नसतानाही काम दिले आहे का, याचा खुलासा विद्यापीठाने करावा, तोपर्यंत परीक्षा स्थगित करावी.

- सुरेश देवडे पाटील, नेट-सेट पीएचडीधारक संघर्ष समिती

### विद्यार्थ्यांसमोरील अडचणी

- अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न आल्याचा विद्यार्थ्यांना आरोप
- लॉगइन होण्यासाठी तीन तासांपेक्षा जास्त काळ लागला
- एकाच विषयाचा पेपर दोन वेळा सोडविला; पण सबमीट पाच वेळा
- लॉगइन केले तरी, पेपर उपलब्ध होत नाही.
- परीक्षा देत असताना अचानक पेपर बंद पडतो, पुन्हा नव्याने प्रश्न येतात.

**Sakaal: 19.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

## Sort out the exam helpline: Students, senate tell varsity

**Complaints have been made that line is often busy and if it does connect, the answers are hardly satisfactory**

| Sukhada.Khandge @timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

With final-year examinations at Savitribai Phule Pune University (SPPU) starting, students and senate members are concerned over the helpline number of the varsity that handles queries from students.

SPPU announced its helpline a few days before the exam process started. Many students complained that it is constantly busy and in case one gets through, answers are not satisfactory.

A student from the law department said on condition of anonymity, "The other day, I had my exam at 10 am, but it did not start till two hours later. I called the helpline, but the responder just noted my name and said they will get back—they didn't. Finally, the login happened at noon and the exam began."

A final-year BCom from HV Desai College said, "For the first two days, papers did not take place at the scheduled time. While we tried to call the helpline, it was continuously busy."

Students complained to SPPU senate members, whose representatives have taken the problem to the university administration and asked it to keep the helpline active for as long as possible every day.

An MSc student from Garware College said, "While I was appearing for my exam online, I solved 55 questions, but the paper was not getting submitted. When I called the helpline, they told me to change the device. I logged in from my smartphone and was told all my solved question data will be retrieved, but a few answers were lost. The helpline should have offered better assistance."

Santosh Dhore, an SPPU senate member, said, "We have been getting complaints from many students. There are a few students who have queries not related to the ongoing exams, but those can wait. SPPU should keep the helpline open for maximum hours. We have demanded that it stay on till late night."

Shashikant Tikote, another senate member, said, "Students are facing many technical issues, but the helpline number is not capable of solving each and every problem. The varsity should ensure that the helpline facility is strengthened and proper measures should be taken."

Prafulla Pawar, registrar, SPPU, said, "We already had a helpline number with 15 people available at a time to answer calls. Now, we have doubled the team to 30. At least 2.5 lakh students are appearing for exams, so the load is more. Students repeatedly ask questions like when will exams take place if postponed. Such queries keep the line busy and students with technical problems are forced to wait."



FILE PHOTO

**SPPU senate members have asked for the helpline to be open till late; varsity officials said many students clog it with unnecessary queries**

**Pune mirror: 19.10.2020**

पुढारी

## लाखांवर विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाइन परीक्षा

### तांत्रिक अडचणींसंदर्भात आज विद्यापीठ प्रशासनाला संघटना विचारणार जाब

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येत असलेल्या अंतिम वर्षाच्या बॅकलॉग एकूण २२३ विषयांच्या परीक्षा रविवारी पार पडल्या. १ लाख २५ हजार २७६ विद्यार्थी ऑनलाइन परीक्षेसाठी, तर १५ हजार ४२३ विद्यार्थी ऑफलाइन परीक्षेसाठी अपेक्षित होते. त्यापैकी १ लाख १५ हजार २३३ विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे ऑनलाइन पद्धतीने परीक्षा दिली. १३ हजार ८८१ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा दिली आहे. परीक्षा सुरू झाल्यापासून विद्यार्थ्यांना सतत वेगवेगळ्या तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याचा विद्यापीठ प्रशासनाला उद्या, सोमवारी काही संघटना जाब विचारणार आहेत.



विद्यापीठाकडून अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने १२ ऑक्टोबरपासून घेण्यात येत आहे. ऑनलाइन परीक्षा सुरू झाल्यापासून एकही दिवस असा गेला नाही, ज्यादिवशी विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले नाही. त्यामुळे परीक्षेचे कामकाज पाहणाऱ्या एजन्सीचा कारभार चव्हाट्यावर आला आहे. विद्यापीठाच्या या नियोजनशून्य कारभाराचा जाब विचारण्यासाठी विद्यार्थी संघटना आंदोलन करणार आहेत.

My Pune Edition
Oct 19, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

## अंतिम वर्ष परीक्षेत 'सर्व्हर क्रॅश'

### विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मनस्ताप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षेदरम्यान सोमवारी दोन वेळा सर्व्हर क्रॅश होण्याचा प्रकार घडला. त्यामुळे सोडवलेली प्रश्नपत्रिका सबमिट न होणे, सोडवलेली प्रश्नपत्रिका पुन्हा सोडवावी लागणे अशा प्रकारांमुळे विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागला.

विद्यापीठाकडून अंतिम वर्ष परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येत आहे. मात्र ऑनलाइन परीक्षेदरम्यान तांत्रिक अडचणी उद्भवण्याचे प्रकार अद्याप थांबलेले नाहीत. सोमवारच्या परीक्षेदरम्यान १ लाख १९ हजार विद्यार्थ्यांपैकी १ लाख १४ हजार ९९५ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. परीक्षेदरम्यान दोन वेळा सर्व्हर क्रॅश होण्याचा प्रकार घडला. सोडवलेली प्रश्नपत्रिका सबमिट होत नव्हती. प्रश्नपत्रिका पुन्हा सोडवावी लागली, तर प्रश्नच दिसण्यातही अडचणी होत्या. त्यामुळे परीक्षेला बराच उशीरही झाला. या मनस्तापामुळे हेल्पलाइनला संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही, असे विद्यार्थ्यांनी सांगितले.

**प्राध्यापकांकडून तांत्रिक चुका**

विद्यापीठ कर्मचाऱ्यांचा संप, कमी दाबाच्या पट्ट्यामुळे मोठ्या प्रमाणात पडणारा पाऊस, मोबाइल नेटवर्कच्या अडचणी अशा आव्हानांसह प्राध्यापकांनी प्रश्नसंच देताना केलेल्या तांत्रिक चुका हेही एक आव्हान असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या २ लाख ५० हजार विद्यार्थ्यांच्या, तीन हजार तीनशे विषयांच्या परीक्षा घेण्यात येत आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्या मार्गदर्शनानुसार उर्वरित परीक्षांचे नियोजन करण्यात येत आहे. परीक्षेदरम्यान प्रचंड मनुष्यबळासह तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर झाला आहे. भविष्याच्या दृष्टीने हे सकारात्मक पाऊल आहे, असे विद्यापीठाचे म्हणणे आहे.

"अंतिम वर्ष परीक्षेदरम्यान काही ना काही तांत्रिक अडचणी उद्भवत आहेत. मात्र त्याचवेळी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही वाढत आहे. सर्व्हर क्रॅश होण्याचा प्रकार टाळण्यासाठी आपत्कालीन सर्व्हरची व्यवस्था करण्याची सूचना देण्यात आली आहे.

– डॉ महेश काकडे, संचालक

लोकसत्ता Tue, 20 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55794687

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

mislead the police investigation. continue to face ...

## SPPU online exams: Server glitches crop up again, helpline flooded with complaints

ALIFIYA KHAN
PUNE, OCTOBER 19

TECHNICAL GLITCHES have continued to bring down the online examination system of Savitribai Phule Pune University (SPPU) with no solution in sight. On Monday, complaints flooded the helpline as students across faculties and cities reported that the server was refusing to accept solved papers even after students had finished with the examination.

According to students, while the online examination saw several interruptions, they managed to complete the exam but at the time of submission, the system would not accept the answers and, eventually, students were forced to reappear.

Shubham Gunjal, a final-year MBA marketing student who appeared for his exam on sustainable marketing, said, "Actually, the problem cropped up at the time of submission. I had finished solving the entire paper, but it just suddenly hanged. I kept calling the helpline, but there was no response. Our college also said they can't help because the online system is managed by the university. They simply advised me to appear for the exam again. I called up many students from my batch later and everyone was facing the same issue. One student took the exam thrice. Another student said his laptop showed that the paper was submitted, but his mobile phone showed that it wasn't, and, ultimately, there was a lot of confusion."

A student of MSc (organic chemistry), who was appearing for his exam on advanced synthetics, said, "In the first round, it took me an hour and a half to solve the one-hour exam because after every four to five questions, the screen would hang and take nearly a minute to restart. Finally, after I finished the exam, the system hanged and showed another error. I called the helpline and, initially, they did not respond but later they took my complaint and asked me to keep trying. Finally, I took the exam again, but the second paper had a new set of questions and was far tougher," he said.

A student of LLB three-year course from MMCC, who also took her first online exam on Monday, said the incident had left students worried. "It's not fair to force us to write an exam twice. After finishing the entire paper, the system hanged and there was no support from the university. Even on our second attempt, the questions were tougher and people on the helpline were so casual about it," she said.

Despite repeated attempts, Mahesh Kakade, director of examinations and evaluation, SPPU, could not be reached for a comment. Ind. Exp




Students said that while the online examination saw several interruptions, they managed to complete the exam. But at the time of submission, the system would not accept the answers.

20/10/2020

The Indian Express: 20.10.2020

## पुरवणी परीक्षेसाठी आजपासून अर्ज

पुणे, ता. १९ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीची पुरवणी परीक्षा आता नोव्हेंबर-डिसेंबर २०२० दरम्यान होणार आहे. या परीक्षेसाठी नियमित, पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी 'www.mahahsscboard.in' या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करू शकतात, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली.

विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा - कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाइन अर्ज मंगळवार (ता. २०) पासून भरता येणार आहेत. विद्यार्थ्यांना नियमित शुल्कासह २९ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करता येईल. त्यानंतर २ नोव्हेंबरपर्यंत विद्यार्थ्यांना विलंब शुल्कासह ऑनलाइन अर्ज करणे शक्य होणार आहे, असेही मंडळाने पत्रकाद्वारे कळविले आहे.

Sakaal: 20.10.2020

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

पुढारी

# विद्यापीठ कायद्यात सुधारणेसाठी समिती



- डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली १४ सदस्य
- सर्व खर्च करण्याची जबाबदारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर

पुणे : पुढारी वृत्तसेवा

उच्च शिक्षणातील नवे प्रवाह सामावून घेण्यासाठी, तसेच राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहेत. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीने तीन महिन्यांच्या आत अंतरिम अहवाल सादर करायचा आहे. या समितीला सर्व प्रकारचे प्रशासकीय साहाय्य करण्याची, तसेच या समितीसाठी येणारा सर्व खर्च करण्याची जबाबदारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर सोपविण्यात आली आहे.

विद्यार्थी हाच उच्च शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून त्या दृष्टीने नियोजन करण्यासाठी ही समिती काम करेल. सध्याच्या अधिनियमातील सर्व कलमांचा अभ्यास करून सुधारणा सुचविण्याची जबाबदारी या समितीवर आहे. सुधारित नवीन अधिनियम हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत असावा, त्यातील कलमे स्वयंस्पष्ट व सुटसुटीत असावीत, व्यवहार्य, वस्तुनिष्ठ व अंमलबजावणी करता येतील अशाच शिफारशी या समितीने कराव्यात, असेही शासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातील बदलते प्रवाह, नवे शैक्षणिक धोरण याला अनुसरून या कायद्यात बदल केले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत होती. या पार्श्वभूमीवर या कायद्यातील बदलांसाठी समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजन वेळूकर व डॉ. विजय खोले, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बी. टी. साबळे, मुंबई विद्यापीठाचे माजी उपकुलगुरू डॉ. नरेशचंद्र, उच्च न्यायालयातील वकील हर्षद भडभडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विधी अधिकारी परवीन सय्यद, शासकीय विधी महाविद्यालयातील डॉ. रचिता एस. राथो, मुंबई विद्यापीठाच्या सिनेट सदस्य शीतल देवरुखकर शेठ, दत्ता मेघे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. प्रसाद दोडे, राज्याचे तंत्रशिक्षण संचालक हे समितीचे सदस्य असतील, तर उच्चशिक्षण संचालक हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

My Pune Edition
Oct 20, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी समिती

## अध्यक्षपदी डॉ. सुखदेव थोरात; १३ सदस्यांचा समावेश

म. टा. प्रतिनिधी, मुंबई



सुखदेव थोरात

महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचा दर्जा आणखी उंचावण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांनी केलेल्या नवीन शैक्षणिक सुधारणांच्या बाबी तपासून २०१६च्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमात सुधारणा करणे अपरिहार्य आहे. यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली १३ सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

उच्च शिक्षण क्षेत्रात झालेला आमूलाग्र बदल, नवीन शैक्षणिक प्रवाह आदींच्या पार्श्वभूमीवर शिक्षण अधिक सुसंगत, संशोधनात्मक, रोजगारक्षम असणे व ते समाजातील सर्व घटकांना सहजरित्या उपलब्ध होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाद्वारे उच्च शिक्षण देणाऱ्या विविध शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे आदींमध्ये निकोप व पोषक वातावरण निर्माण करून विद्यार्थी हाच उच्च शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून त्यादृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सूत्रांनी सांगितले.

डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखालील समितीत कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. के. शिर्के, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजन वेळूकर, माजी कुलगुरू डॉ. विजय खोले, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बी. टी. साबळे, माजी प्रकुलगुरू डॉ. नरेशचंद्र, विधिज्ञ हर्षद भडभडे, पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील विधी अधिकारी परवीन सय्यद, मुंबईतील शासकीय विधी महाविद्यालयाच्या डॉ. रचिता एस. राथो, सिनेट सदस्य शीतल देवरुखकर शेठ, दत्ता मेघे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. प्रसाद दोडे, पुण्यातील तंत्र शिक्षण व उच्च शिक्षणचे संचालक सदस्य हे या समितीवर सदस्य असतील.

### 'तीन महिन्यांत अहवाल द्यावा'

या समितीने व्यवहार्य, वस्तुनिष्ठ व अंमलबजावणी करता येतील अशा शिफारशी कराव्यात. या समितीने आपला अहवाल राज्य सरकारला तीन महिन्यात सादर करावा, असे यासंबंधीच्या शासननिर्णयात नमूद आहे. या समितीला आवश्यक ती सर्व प्रशासकीय मदत पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठाने करून द्यावी. तसेच समितीसाठी बैठक भत्यांसह येणारा संपूर्ण खर्च विद्यापीठाने त्यांच्या निधीतून विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे करावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**Maharashtra times: 20.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# विद्यापीठ कायद्यात सुधारणांसाठी समिती

## डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली १४ सदस्यीय समिती

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** राज्यातील अकृषक विद्यापीठांमध्ये मागील सहा वर्षांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप परिवारातील व्यक्तींची कुलगुरूपदी व विविध प्राधिकरणांवर झालेल्या निवडीविरोधात काँग्रेसच्या मंत्र्यांनी बंड पुकारले होते. यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही विद्यापीठ कायद्यात बदलाचे संकेत दिले होते. त्यानुसार सोमवारी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली १४ सदस्यीय समिती स्थापन केली आहे.

राज्यातील अकृषक विद्यापीठांसाठी फडणवीस सरकारच्या काळात १ मार्च २०१७ पासून नवीन विद्यापीठ कायदा लागू करण्यात आला होता. मात्र, राज्यात महाविकास आघाडी सरकार सत्तेत येताच तीन वर्षांतच या कायद्यात सरकारला बदल करण्याची गरज भासू लागली आहे. नवीन विद्यापीठ कायदा अस्तित्वात आल्यावर विद्यापीठांच्या विविध प्राधिकरणांमध्ये भाजप परिवारातील व्यक्तींचे नामनिर्देशन करण्यात आल्याचा आरोप आहे. याशिवाय विविध विद्यापीठांमध्ये झालेल्या कुलगुरूंची निवडही विशिष्ट विचारधारेने प्रेरित व्यक्तींची झाल्याचा आरोप करीत कुलगुरू निवडीचे अधिकार राज्यपालांऐवजी राज्य शासनाला असले पाहिजेत, अशी आग्रही मागणी नितीन राऊत, सुनील केदार आणि विजय वडेट्टीवार यांनी ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत केली होती. याला इतर मंत्र्यांनी होकार दिला होता. तर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही सकारात्मकता दाखवली होती. त्यानुसार विद्यापीठ कायद्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने सोमवारी शासन निर्णय जाहीर करीत समिती स्थापन केली आहे.

डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समितीला नवीन शैक्षणिक धोरणाशी सुसंगत असे बदल करीत तीन महिन्यांच्या आत आपला अहवाल सादर करावा लागणार आहे.

### का आहे कायद्याला विरोध?

विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार नामनिर्देशित सदस्यांची सर्वाधिक निवडीचा अधिकार आहे. यामुळे फडणवीस सरकारच्या काळात भाजप परिवारातील व्यक्तींनी विद्यापीठाच्या विविध प्राधिकरण आणि अभ्यास मंडळांवर कब्जा केला आहे. यामुळे विद्यापीठांमध्ये एका विशिष्ट विचारधारेशी संबंधित धोरण राबविले जात असल्याचा आरोप होत होता. याशिवाय कायमस्वरूपी अधिष्ठात्यांच्या नेमणुकीलाही अनेकांचा विरोध आहे. त्यामुळे नवीन विद्यापीठ कायद्यातील या बाबींना अनेकांचा विरोध असल्याने नवीन सुधारणांमध्ये यात बदल होण्याची शक्यता आहे.

> सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. विद्यापीठ कायद्याचा सखोल अभ्यास करून योग्य त्या सुधारणा केल्या जातील.
>
> \- डॉ. सुखदेव थोरात,
> अध्यक्ष,विद्यापीठ अधिनियम २०१६ सुधारणा समिती.

लोकसत्ता Tue, 20 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55783838

# विद्यापीठ अधिनियमात सुधारणा होणार

## डॉ. थोरात यांच्या अध्यक्षतेखालील समितीत १३ सदस्य



प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १९ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमात सुधारणा करण्यासाठी आणि उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी राज्य शासनाने विशेष समिती गठीत केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे 'यूजीसी'चे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखालील समितीत १३ सदस्यांची निवड झाली आहे.

उच्च शिक्षणातील बदल विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी तसेच विद्यापीठ कायद्यानुसार शिक्षण देणाऱ्या विविध शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठात

### राज्य शासनाकडून विशेष समिती गठीत

पूरक वातावरण निर्माण करून विद्यार्थी हाच उच्च शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून त्यादृष्टीने नियोजन करण्यासाठी समिती काम करेल. नव्या विद्यापीठ कायद्याची अंमलबजावणी फारशी योग्यप्रकारे होत नाही. तसेच राज्यपाल, लोकप्रतिनिधी व विद्यार्थी संघटनांकडून विद्यापीठाच्या अधिनियमात दुरुस्तीची मागणी होत होती. ही बाब लक्षात घेऊन कायद्यात सुधारणा करण्यासाठी समिती गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला.

थोरात यांच्या अध्यक्षतेखालील समितीत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजन वेळुकर, डॉ. विजय खोले, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बी. टी. साबळे, मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. नरेशचंद्र, उच्च न्यायालयाचे ॲड. हर्षद भडभडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विधी अधिकारी परवीन सय्यद, शासकीय विधी महाविद्यालयातील डॉ. रचिता एस. राथो, सिनेट सदस्य शितल देवरुखकर शेठ, दत्ता मेघे अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. प्रसाद दोंडे, तंत्रशिक्षण संचालक, मुंबई आणि उच्च शिक्षण संचालक हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

### समिती कार्यकक्षा

- सध्याच्या अधिनियमातील सर्व कलमांचा अभ्यास करून सुधारणा करणे आवश्यक
- सुधारित नवीन अधिनियम हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत असावा
- अधिनियमातील कलम स्वयंस्पष्ट व सुटसुटीत असावीत
- व्यवहार्य, वस्तुनिष्ठ व अंमलबजावणी करता येतील अशा शिफारशी कराव्यात
- समितील अंतरिम अहवाल ३ महिन्यांत सादर करावा

### राज्य शासनाने नेमली समिती अन् खर्च पुणे विद्यापीठावर

राज्य शासनाने नेमलेल्या समितीला प्रशासकीय मदत ही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने करायची आहे. तसेच समितीसाठी बैठक, भत्त्यासह येणारा खर्चही विद्यापीठाला त्यांच्या निधीतून द्यावा लागणार आहे, असे राज्य शासनाने स्पष्ट केले आहे. राज्य शासनाने समिती नेमली असली तरी त्याचा खर्च शासनाकडून होणे अपेक्षित आहे. मात्र, समितीचा सर्व खर्च पुणे विद्यापीठामार्फत होणे हीच बाब आश्चर्यकारक आहे.

**Prabhat: 20.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education



# Panel to tweak Public Univ Act in line with NEP

TIMES NEWS NETWORK

**Mumbai:** The state government has decided to amend the public universities act last revisited in 2016. The higher education department deemed it essential to align Maharashtra Public Universities Act to keep it in line with changes the higher education sector must ring in after the National Education Policy (NEP).

A panel headed by Sukhdeo Thorat, former UGC chairman, comprises current vice-chancellors (VC) DT Shirke of Shivaji University, Kolhapur and Uddhav Bhosale of Marathwada University; former VCs of Mumbai University Vijay Khole and Rajan Welukar and former pro-VC Naresh Chandra; Pune University's law officer Praveen Sayeed. It has been asked to study current provisions and ensure that the new state Act weaves in points of the NEP. Members have been told to study best practices followed nationally and internationally and recommend them to be part of the Act. They have three months to submit their report.

A government official said the NEP is vast and a lot of enabling provisions that align the state act with the central policy need inclusion. "NEP recommends scrapping university affiliation system in phases and setting up of a multidisciplinary research varsity. These things need major policy decisions to be included in the act. The panel will consider experiences universities shared in last four years about the current act," said the official.

MNVS state vice president Santosh Gangurde said that since five years, there was much discussion on Maharashtra Public Universities Act. "Even after it was enacted in 2017, some lacunae remain like, rotation system in reservation policy which is unconstitutional, there is lack of clarity about autonomous college regulation, as also there is lack of representation of PG students in the senate," said

A Mumbai University senate member said the previous government had tweaked Public Universities Act to reduce numbers of elected members in the universities senate and included more nominated members, a provision many were opposed to..."

## NIIT pupils get degrees online

**Mumbai:** Following in the footsteps of IIT Bombay, NIIT University organised its tenth convocation ceremony in the virtual reality mode, keeping in view safety measures triggered by the Covid-19 pandemic. The virtual convocation ceremony was attended by outgoing students and their parents while current students were also present.

The ceremony was real-time and was created using a combination of three-dimensional data and panoramic photos collected from the campus. The students, with their families at home, joined the convocation and interacted with their friends live using their 3D personalized avatars inside a virtual NIIT university campus. A total of 298 students were awarded degree certificates. TNN

**The times of India: 20.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

पुढारी

## शैक्षणिक वर्ष दोन महिने पुढे जाणार?

### १० वी, १२ वी बोर्ड परीक्षाही फेब्रुवारीऐवजी एप्रिलमध्ये शक्य

**अलिबाग : जयंत धुळप**

यंदाचे २०२०-२१ चे शैक्षणिक वर्ष कोरोनामुळे पाच महिने झाले तरी अद्याप सुरू झालेले नाही. नोव्हेंबरनंतर हे शैक्षणिक वर्ष सुरू करण्याच्या हालचाली सुरू आहेत. १० वी, १२ वी बोर्डाच्या परीक्षांच्या तारखादेखील अद्याप निश्चित झालेल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने हे शैक्षणिक वर्ष दोन महिने पुढे ढकलण्याचा विचार सुरू केल्याचे अधिकृत सूत्रांनी सांगितले.

पुढारी विशेष

१० वी, १२ वी परीक्षांचे वेळापत्रक दरवर्षी जुलै-ऑगस्टदरम्यान निश्चित होते. बोर्ड परीक्षेचे अर्ज भरण्याचे (रजिस्ट्रेशन) कामदेखील जुलै-ऑगस्टदरम्यानच होते. मात्र, यावर्षी ऑक्टोबर संपत आला तरी कोणतेच नियोजन झालेले नाही. दिवाळीनंतर शाळा सुरू करण्याचे राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत निश्चित करण्यात आले. केंद्र सरकारने १५ ऑक्टोबरपासून शाळा सुरू करण्यास परवानगी दिली होती. मात्र, राज्य **पान २ वर**

> १० वी, १२ वीच्या परीक्षा घेणे अटळ आहे. या परीक्षा झाल्या नाहीत तर शैक्षणिक चक्र (एज्युकेशन सायकल) तुटेल आणि त्याचे विपरीत परिणाम पुढील सर्व महाविद्यालयीन शिक्षण सत्रावर होतील. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा घेण्यासाठी अभ्यासक्रम कमी करणे आणि विद्यार्थी उपस्थितीबाबत शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. राज्यातील १० वी, १२ वीच्या विद्यार्थ्यांची मोठी संख्या विचारात घेता या परीक्षा ऑनलाइन घेणे शक्य नाही. परिणामी, परीक्षा या प्रत्यक्षच घ्याव्या लागतील.
>
> \- **सूर्यकांत पाटील,** माजी अध्यक्ष, एसएससी बोर्ड, महाराष्ट्र

Pune Edition
Oct 20, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

## शैक्षणिक वर्ष दोन महिने पुढे जाणार?

सरकारने राज्यातील कोरोना प्रादुर्भाव लक्षात घेऊन १५ नोव्हेंबरपासून शाळा सुरू करण्याबाबत हालचाली सुरू केल्या. मात्र, शिक्षक संघटना आणि शिक्षक आमदार कपिल पाटील यांनी कोरोना प्रतिबंधक लस दिल्याशिवाय शाळा सुरू करणार नाही, अशी भूमिका घेतल्यामुळे हा प्रश्न आणखीनच जटिल झाला. कोरोना लस कधी येणार, याबाबत अनिश्चितता आहे. लस आल्यानंतर पहिल्यांदा परिचारिका व डॉक्टर्स यांना दिली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षकांना ती मिळण्यास किती वेळ लागेल हे निश्चित नाही. त्यामुळे राज्य सरकारने ऑनलाईन शिक्षण अधिक कार्यक्षम करण्याचे आदेश दिले आहेत.

सप्टेंबरपासून सर्व शिक्षकांचे ऑनलाईन शिक्षण दिल्याचे अहवाल राज्य सरकारच्या वेबसाईटवर अपडेट करावे लागत आहेत. त्यामुळे सर्व शाळांना ऑनलाईन शिक्षण सुरू करणे अनिवार्य झाले आहे. मात्र, विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षा घेणे पुढील पाच महिन्यांत शक्य नाही. त्यामुळे १० वी, १२ वी बोर्डाच्या फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या परीक्षा एप्रिल-मे या कालावधीत घेण्याबाबत शासनस्तरावर विचार सुरू आहे. यापूर्वी अभ्यासक्रम पूर्ण व्हावा म्हणून स्वतंत्र शैक्षणिक पोर्टल तयार करून ऑनलाईन शिक्षणाचा आढावा घेण्यास सरकारने सुरुवात केली. त्यासाठी 'टिचर ॲप' विकसित करण्यात आले. त्यामुळे ऑनलाईन शिक्षणाबरोबर प्रत्यक्ष वर्ग सुरू होण्यास डिसेंबर उजाडला, तरी मे-जून या कालावधीत या शैक्षणिक वर्षाच्या परीक्षा घेण्याचे धोरण शालेय शिक्षण विभागाकडून तयार करण्यात येत आहे. हे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत.

Pune Edition
Oct 20, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

पुढारी

## दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षा पुढील महिन्यात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**नियमित शुल्कासह ऑनलाइन अर्ज - २० ते २९ ऑक्टोबर**

**विलंब शुल्कासह ऑनलाइन अर्ज - ३० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर**

**महाविद्यालयांनी बँकेत शुल्क भरण्याची तारीख - ३ आणि ४ नोव्हेंबर**

**विद्यार्थ्यांच्या याद्या मंडळाकडे जमा करायची तारीख - ५ नोव्हेंबर**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दरवर्षी जुलै-ऑगस्टमध्ये दहावी, बारावी पुरवणी परीक्षा घेण्यात येते. यंदा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुरवणी परीक्षांची शक्यता धूसर झाली होती. परंतु मंडळाने या परीक्षांची तयारी केली असून, नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यासाठी २० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत परीक्षेसाठी महाविद्यालयांमार्फत ऑनलाइन अर्ज करण्याची सूचना राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली आहे.

दहावी, बारावी उत्तीर्णांचा यंदा टक्का वाढला आहे. तरीदेखील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे निकालानंतर होणाऱ्या पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकाकडे लक्ष असते. त्यामुळे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देखील दहावी, बारावीमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या तसेच एटीकेटीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुरवणी परीक्षा आयोजित करण्यास राज्य शासनाकडून मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार ऑक्टोबर महिन्यात पुरवणी परीक्षा घेण्यात येणार होती, परंतु कोरोना प्रादुर्भावामुळे ऐनवेळी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय झाला. आता मात्र संबंधित परीक्षा घेण्यावर शिक्कामोर्तब झाले असून, विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालयांमार्फत ऑनलाइन पद्धतीने www.mahahsscboard.in या वेबसाईटवर अर्ज भरण्यासाठीचे वेळापत्रक राज्यमंडळाकडून जाहीर करण्यात आले आहे.

Pune Edition
Oct 20, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# पुरवणी परीक्षा पुढील महिन्यात

## दहावी-बारावी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना संधी; राज्य मंडळाकडून अर्ज प्रक्रिया सुरू

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील दहावी आणि बारावीच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षेची संधी मिळणार आहे. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये पुरवणीपरीक्षा घेतली जाणार असून, या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची प्रक्रिया राज्य मंडळाकडून सुरू करण्यात आली आहे. २० ते २९ ऑक्टोबरदरम्यान नियमित शुल्कासह आणि ३० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरदरम्यान विलंब शुल्कासह अर्ज करता येईल.

करोना संसर्गामुळे दरवर्षी दहावी-बारावीच्या निकालानंतर अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्टमध्ये होणारी पुरवणी परीक्षा यंदा करोना संसर्गामुळे होऊ शकली नाही. तसेच परीक्षा होणार की नाही किंवा कधी होणार, याबाबत राज्य मंडळ किंवा शासन स्तरावरूनही स्पष्टता देण्यात येत नव्हती. त्यामुळे अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या संधीचे काय असा प्रश्न उपस्थित केला जात होता. या पार्श्वभूमीवर राज्य मंडळाने पुरवणी परीक्षेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. पुरवणी परीक्षा होणार असल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

> “ दहावी आणि बारावीच्या अनुतीर्ण, श्रेणीसुधारण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा घेतली जाणार आहे. पुरवणी परीक्षेचे वेळापत्रक अंतिम झाल्यानंतर जाहीर करण्यात येईल.
>
> - डॉ. अशोक भोसले, सचिव, राज्य मंडळ

पुरवणी परीक्षा आणि श्रेणीसुधारसाठी इच्छुक विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीनेच अर्ज करता येणार आहे. श्रेणीसुधारसाठी विद्यार्थ्यांना नोव्हेंबर-डिसेंबर २०२० आणि फेब्रुवारी मार्च २०२१ अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध असतील.

ऑनलाइन पद्धतीने अर्ज करताना फेब्रुवारी मार्च २०२०च्या परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेची माहिती आवेदन पत्रात ऑनलाइन पद्धतीने घेता येईल. विद्यार्थ्यांनी अर्ज भरल्यानंतर शाळांनी दिलेल्या मुदतीत ऑनलाइन पैसे भरून त्याची पोचपावती आणि विद्यार्थ्यांची यादी विभागीय मंडळाकडे सादर करावी. अर्ज करण्यास मुदतवाढ दिली जाणार नाही, असे मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी स्पष्ट केले आहे.

## प्रवेशांसाठी ३० नोव्हेंबरची मुदत; प्रथम वर्षाचे वर्ग १ डिसेंबरपासून

### अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**पुणे :** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षाचे वर्ग १ डिसेंबरपासून सुरू होणार असून, प्रवेशासाठीची मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.

करोना संसर्गामुळे एआयसीटीईने या पूर्वी दोन वेळा वेळापत्रक बदलले आहे. एआयसीटीईने १३ ऑगस्टला जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुकला आणि अन्य तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांचे द्वितीय वर्षांपासून पुढील वर्ग १६ ऑगस्टपासून तर नव्या विद्यार्थ्यांचे वर्ग १५ सप्टेंबरपासून सुरू करण्यात येणार होते. पदवीपूर्व अभ्यासक्रमाचे निकाल करोना संसर्गामुळे जाहीर होण्यात अडचणी आल्यास विद्यार्थ्यांना तात्पुरते प्रवेश देण्याबाबत एआयसीटीईने महाविद्यालयांना सूचना दिल्या होत्या. तसेच विद्यार्थ्यांना ३१ डिसेंबरपर्यंत प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा देण्यात आली होती. मात्र आता अभियांत्रिकीच्या वेळापत्रकात पुन्हा बदल करण्यात आला आहे.

एआयसीटीईचे सदस्य सचिव राजीवकुमार यांनी सुधारित वेळापत्रक परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध केले आहे. 'करोनाचा देशभरातील संसर्ग आणि आयआयटी, एनआयटीमध्ये सुरू असलेल्या प्रवेशांमुळे विविध राज्य सरकारांकडून करण्यात आलेल्या विनंतीनुसार परिषदेने अभियांत्रिकी पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठीची मुदत ३० नोव्हेंबर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रथम वर्षाचे वर्ग १ डिसेंबरपासून सुरू होतील,' असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Tue, 20 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55788609

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# पुरवणी परीक्षा २० नोव्हेंबरपासून

## वेळापत्रक जाहीर; प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा १८ नोव्हेंबरपासून

**पुणे, ता. २० : फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेतलेल्या दहावी-बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण न झालेल्या तसेच 'एटीकेटी'साठी पात्र विद्यार्थ्यांसाठी पुरवणी लेखी परीक्षा २० नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. तर प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा १८ नोव्हेंबरपासून घेण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली.**

### दहावी-बारावीच्या लेखी परीक्षेचे वेळापत्रक

- इयत्ता : लेखी परीक्षेचा कालावधी
- दहावी : २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२०
- बारावी (सर्वसाधारण व द्विलक्षी अभ्यासक्रम) : २० नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२०
- बारावी (व्यवसाय अभ्यासक्रम) : २० नोव्हेंबर ते ७ डिसेंबर २०२०

21/10/2020

राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावी-बारावीची पुरवणी परीक्षा घेण्यात येत आहे. दरवर्षी फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षेचा मे-जून महिन्यात जाहीर केला जातो. त्यानंतर लगेचच जुलैमध्ये ही पुरवणी परीक्षा घेतली जाते. मात्र यंदा कोरोनाच्या परिस्थितीत या परीक्षांचा निकाल जुलै महिन्यात जाहीर झाला. त्यानंतर पुरवणी परीक्षा ऑक्टोबरमध्ये घेण्यात येतील, असे सुरवातीला सांगण्यात आले होते. परंतु कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे पुरवणी परीक्षा दिवाळीनंतर घेण्यात येतील, असे शिक्षण विभागातर्फे जाहीर करण्यात आले होते.

त्यानुसार दहावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा १८ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर दरम्यान, तर बारावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा १८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर दरम्यान आयोजित केली आहे. परीक्षांचे विषय आणि दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या 'www.mahahsscboard.in' या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकाची सुविधा ही फक्त माहितीसाठी असणार आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांच्याकडे विभागीय मंडळामार्फत देण्यात आलेले छापील वेळापत्रकच अंतिम असेल.

# विद्यापीठाच्या परीक्षेत पुन्हा व्यत्यय

## यंत्रणा दहा मिनिटांसाठी ठप्प; वेगवेगळ्या 'स्लॉट'मध्ये घेतले पेपर

**पुणे, ता. २० :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेत मंगळवारी सकाळी सर्व्हर हँग झाल्याने परीक्षा काही काळासाठी थांबली होती. मात्र, एकाचवेळी अनेक विद्यार्थ्यांनी लॉगइन केल्याने ही समस्या निर्माण झाली. हे स्पष्टीकरण विद्यापीठ प्रशासनाने दिले असून, त्यावर उपाय म्हणून मंगळवारी रात्री अकरापर्यंत विविध स्लॉटमध्ये विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली.

### अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न

अभियांत्रिकीच्या 'पीडीडी' विषयाच्या ऑनलाइन पेपरमध्ये निम्म्यापेक्षा अधिक प्रश्न अभ्यासक्रमाच्या बाहेरील आल्याने प्रश्नच सोडविता आले नसल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे.

- सकाळ

21/10/2020

पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची ऑनलाइन पद्धतीने परीक्षा होती. यापैकी सायंकाळी सहा वाजेपर्यंत एक लाख ५४ हजार ६३४ विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे परीक्षा दिली. तर, तांत्रिक अडचणी उद्भवलेल्या विद्यार्थ्यांना रात्री उशिरापर्यंत परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली होती. विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत मंगळवारी विद्यार्थिसंख्या साधारण एक लाख ७० हजारांच्या दरम्यान आणि ३१७ विषयांच्या परीक्षा होत्या. सकाळी अनेक विद्यार्थ्यांनी एकाचवेळी लॉगइन केले होते. त्यामुळे क्लाउड बेस सिस्टिम दहा ते पंधरा मिनिटांसाठी हँग झाली होती. त्यामुळे गोंधळ उडाला. तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची परीक्षा रात्री नऊ वाजेपर्यंत विद्यापीठाच्या मंगळवारच्या परीक्षा सुरू होत्या.

**Sakaal: 21.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## 'एनएसएस' विद्यापीठनिहाय विद्यार्थी संख्या मंजूर

**पुणे विद्यापीठासाठी ४७ हजार विद्यार्थी संख्या मंजूर**

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २१ - राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) ही केंद्रशासित योजना असून या योजनेसाठी दरवर्षी विद्यापीठनिहाय विद्यार्थी संख्या मंजूर करण्यात येते. या वर्षासाठी राज्यातील २७ अनुदानित विद्यापीठांसाठी नियमित कार्यक्रमांकरिता ३ लाख २७ हजार ७००, तर विशेष शिबिरासाठी १ लाख ६३ हजार ८५० विद्यार्थी संख्या मंजूर आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेसाठी विद्यापीठनिहाय व प्रवर्गनिहाय विद्यार्थी संख्या मंजूर करून घेण्याची आवश्यकता असते. अनुसूचित जातीसाठी ११.८ टक्के व अनुसूचित जमातीसाठी ९.४ टक्के व इतरांसाठी ७८.८ टक्के याप्रमाणे विभागणी केली आहे. अनुसूचित जातीसाठी ३८ हजार ६७०, अनुसूचित जमातीसाठी ३० हजार ८०० व इतरांसाठी २ लाख ५८ हजार २३० याप्रमाणे विद्यार्थी संख्येला मान्यता मिळाली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासाठी नियमित कार्यक्रमासाठी ४७ हजार ७५० एवढी विद्यार्थी संख्या मंजूर आहे. यात अनुसूचित जातीचे ५ हजार ३०८, अनुसूचित जमातीचे ३ हजार ९६२, तर इतरांसाठी ३८ हजार ४८० एवढी विद्यार्थी संख्या आहे. विशेष शिबिरासाठी २३ हजार ८७५ विद्यार्थी संख्या मान्य करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. विद्यापीठ व संस्थांनी शासनाने मंजूर केलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थी संख्या नोंदवून घेऊ नये. संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांना प्रवर्गनिहाय विद्यार्थी संख्येचे वाटप करावे व त्याची प्रत शासनाला पाठविणे आवश्यक आहे. विद्यापीठांनी प्रत्यक्षात नोंदविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या शासनाला ३१ ऑक्टोबरपर्यंत कळविणे गरजेचे आहे. विद्यार्थी संख्येनुसार अनुदानाचा प्रथम हप्ता लवकरच मंजूर होणार आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. अतूल साळुंके यांनी आदेश दिले.

**स्वयंनिर्वाहित एककांसाठी अनुदान मिळणार**

राज्यातील स्वयंनिर्वाहित एकक अंतर्गतच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र अथवा राज्य शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होणार नाही. या विद्यार्थी संख्येसाठी विद्यापीठांकडे जमा होणाऱ्या शुल्कातून अनुदानाचे वाटप करणे आवश्यक आहे. यात नियमित कार्यक्रमांसाठी ६५ हजार ५०० व विशेष शिबिरासाठी ३२ हजार ७५० अशी विद्यार्थी संख्या मंजूर आहे. यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासाठी नियमित कार्यक्रमांसाठी १३ हजार व विशेष शिबिरासाठी ६ हजार ५०० एवढी विद्यार्थी संख्येला मान्यता मिळाली आहे.

**Prabhat: 22.10.2020**

## विद्यापीठात तक्रारींची परीक्षा

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २१ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना येत असलेल्या अडचणी नोंदविण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या गुगल फॉर्मच्या माध्यमातून विद्यापीठाकडे १३ हजार ५०० तक्रारी आल्या आहेत. त्यावर निर्णय घेण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन केली असून येत्या आठवड्याभरात अहवाल प्रशासनाकडे प्राप्त होणार आहे. त्यानंतर तक्रारींबाबत अंतिम निर्णय होणार आहे.

पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयातील अडीच लाख विद्यार्थ्यांची ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षा देताना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विद्यापीठाने संकेतस्थळावर गुगल फॉर्म उपलब्ध करून दिला.

(पान २ पहा) »

**अंतिम वर्ष परीक्षेबाबत साडेतेरा हजार तक्रारी**

**निर्णय घेण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन**

**येत्या आठवड्याभरात अहवाल प्रशासनाकडे प्राप्त होणार**

"तांत्रिक कारणामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी विद्यापीठातर्फे सर्व प्रयत्न केले जात आहेत. गुगल फॉर्मद्वारे विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणी स्वीकारल्या असून आतापर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांचे विलगीकरण करण्याचे काम सुरू आहे. विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणी लवकरच मार्गी लावण्यात येणार आहेत.

– डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, विद्यापीठ

### विद्यापीठात तक्रारींची परीक्षा

परीक्षेबाबतच्या अडचणी विद्यार्थी गुगल फॉर्ममधून विद्यापीठाकडे पाठवू शकतात. प्राप्त तक्रारींचे सहा प्रकारांमध्ये विभाजन केले आहे. लॉगिन न होणे, चुकीची प्रश्नपत्रिका मिळणे, प्रश्न किंवा पर्याय न दिसणे, पेपर सबमीट न होणे या तक्रारी गुगल फॉर्मच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे दाखल केल्या. पेपर सबमीट न होण्याबाबतच्या सर्वाधिक ७ हजार ५०० तक्रारी आहेत. त्या वेगळ्या करून आधी त्या निकाली काढण्यात येणार आहेत. या विद्यार्थ्यांच्या परीक्षा पुन्हा घेता येतील का याचे नियोजनही करण्यात येणार आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

**Prabhat: 22.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## परीक्षेतील तांत्रिक अडचणी झाल्या दूर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी निवडलेल्या एजन्सीच्या संस्थापकांबरोबर विद्यापीठाच्या पदाधिकाऱ्यांनी चर्चा केल्यानंतर बुधवारपासून विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा सुरळीतपणे सुरू झाल्या.

एजन्सीचा आणखी एक वरिष्ठ अधिकारी दिल्लीहून पुण्यात आल्यामुळे यापुढील परीक्षांना सुध्दा कोणत्याही अडचणी येणार नाहीत, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. अंतिम वर्षाच्या परीक्षांसाठी दिल्ली येथील 'पीपल स्ट्रॉंग टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड' या एजन्सीची ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षेसाठी नियुक्ती केली. एजन्सीचे काही कर्मचारी विद्यापीठात वॉर रूम उभारुन परीक्षेचे काम करत आहेत.

परीक्षेसाठी निवडलेल्या एजन्सीने 'डेटा बॅलन्सिंग', ऑप्टिमायजेशन टेक्निकचा वापर करून उपलब्ध रिसोर्सेसच्या मदतीने अधिक चांगल्या पद्धतीने परीक्षा घेणे शक्य होईल, अशी सिस्टीम उभी केली. विद्यापीठाने सुद्धा विद्यार्थ्यांना सकाळी १० ते १२ या कालावधित केव्हाही लॉग-इन करण्याची की मुभा दिली. त्यामुळे बुधवारी परीक्षा सुरळीतपणे पार पडल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

**Lokmat: 22.10.2020**

## अंतिम वर्षाच्या परीक्षांचा निकाल नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना समोरे जावे लागत आहे. बुधवारी झालेल्या विविध विषयांच्या परीक्षेत किरकोळ अडचणी वगळता परीक्षा यशस्वीपणे झाली. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या उच्चशिक्षणाचा विचार करता, परीक्षा व मूल्यमापन मंडळाने निकालाच्या कामकाजाला सुरुवात केली असून, नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून निकाल जाहीर होण्याची शक्यता.

विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर अंतिम वर्षाच्या परीक्षा बहुपर्यायी स्वरुपात ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने १२ ऑक्टोबरपासून सुरु आहेत. ऑनलाइन परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, या अडचणी कमी झाल्याचे, परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांच्या आकडेवारीहुन समोर आले आहे. ऑनलाइन परीक्षेसाठी बुधवारी एक लाख ६ हजार ७९९ विद्यार्थी अपेक्षित होते. त्यापैकी एक लाख ६ हजार २१० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर, २० हजार ३८३ विद्यार्थी ऑफलाइन परीक्षेसाठी अपेक्षित होते. त्यापैकी १८ हजार १४१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

> पुणे विद्यापीठाने परीक्षेचा निकाल लवकर लावण्यासाठी तयारी सुरू केली आहे. त्यानुसार पहिल्या आठवड्यात झालेल्या परीक्षेतील उत्तरपत्रिकांची तपासणीची प्रक्रिया सुरू केली आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विविध अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्याला सुरुवात होणार आहे. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून देण्यात आली आहे.

**Kesari: 22.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education



पुणे विद्यापीठ : अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत विद्यार्थ्यांचे गुगल फॉर्म

## परीक्षेबाबत १३ हजार ५०० तक्रारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना येत असलेल्या अडचणी नोंदविण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या गुगल फॉर्मच्या माध्यमातून विद्यापीठाकडे सुमारे १३ हजार ५०० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींवर निर्णय घेण्यासाठी विद्यापीठाने त्रिसदस्यीय समिती स्थापन केली असून येत्या आठवड्याभरात समितीचा अहवाल विद्यापीठ प्रशासनाकडे येणार आहे. त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल.

पुणे विद्यापीठातर्फे पुणे अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयांतील अडीच लाख विद्यार्थ्यांची ऑनलाइन ऑफलाइन परीक्षा घेतली जात आहे. मात्र, विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षा देताना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे विद्यापीठाने संकेतस्थळावर गुगल फॉर्म उपलब्ध करून दिला. परीक्षेबाबतच्या सर्व अडचणी विद्यार्थी गुगल फॉर्ममधून विद्यार्थी विद्यापीठाकडे पाठवू शकतात.

सुरवातीला ऑनलाइन सोडवलेला पेपर सबमिट न होणे ही अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज वेगळे काढून त्यांची परीक्षा पुन्हा घेता येऊ शकते का? याचे नियोजन केले जात आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

### विविध तक्रारी : सहा प्रकारांमध्ये विभाजन केले

गेल्या काही दिवसांत विद्यापीठाकडे सुमारे १३ हजार ५०० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्याचे सहा प्रकारांमध्ये विभाजन करण्यात आले आहे.

लॉगिन न होणे, चुकीची प्रश्नपत्रिका मिळणे, प्रश्नपत्रिकेत प्रश्न किंवा पर्याय न दिसणे, पेपर सबमिट न होणे, अशा प्रकारच्या तक्रारी 'गुगल फॉर्म'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे केल्या आहेत.

"तांत्रिक कारणामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये; यासाठी विद्यापीठातर्फे सर्व प्रयत्न केले जात आहेत. गुगल फॉर्मद्वारे विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणी स्वीकारल्या असून, आत्तापर्यंत प्राप्त १३ हजार ५०० अर्जांचे विलगीकरण करण्याचे काम सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या अडचणी लवकरच सोडवल्या जातील.

- **डॉ. महेश काकडे**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Lokmat: 22.10.2020**



## निकालाच्या कामाला सुरुवात

### विद्यापीठाची बुधवारची परीक्षा सुरळीत

विद्यापीठाची 'परीक्षा'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी कमी झाल्या असून, बुधवारी झालेल्या विविध विषयांच्या परीक्षेत किरकोळ अडचणी वगळता परीक्षा यशस्वीपणे पार पडली. विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाचा विचार करता, परीक्षा व मूल्यमापन मंडळाने निकालाच्या कामकाजाला सुरुवात केली असून, नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून निकाल जाहीर होण्यास सुरुवात होणार आहे.

विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर अंतिम वर्षाच्या परीक्षा एमसीक्यू स्वरूपात ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने १२ ऑक्टोबरपासून सुरू आहेत. ऑनलाइन परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना विविध तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, या अडचणी कमी झाल्याचे, परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांच्या आकडेवारीवरून समोर आले आहे. ऑनलाइन परीक्षेसाठी बुधवारी एक लाख ६ हजार ७९९ विद्यार्थी अपेक्षित होते. त्यापैकी एक लाख ६ हजार २१० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर २० हजार ३८३ विद्यार्थी ऑफलाइन परीक्षेसाठी अपेक्षित होते. त्यापैकी १८ हजार १४१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. आतापर्यंत झालेल्या परीक्षांत विद्यार्थ्यांची सर्वाधिक उपस्थिती बुधवारच्या परीक्षेत होती. त्यामुळे 'इंटरनेट कनेक्टिव्हिटी'च्या समस्यांसारख्या किरकोळ अडचणींव्यतिरिक्त ऑनलाइन परीक्षा सुरळीतपणे पार पडली.

"विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे. परीक्षांचे निकाल लवकर जाहीर होण्यासाठी, उत्तरपत्रिका तपासणीची प्रक्रियादेखील सुरू करण्यात आली आहे.

– **डॉ. महेश काकडे**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

### नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून निकाल

पुणे विद्यापीठाने परीक्षेचा निकाल लवकर लावण्यासाठी तयारी सुरू केली आहे. त्यानुसार पहिल्या आठवड्यात झालेल्या परीक्षेतील उत्तरपत्रिकांची तपासणीची प्रक्रिया सुरू केली आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विविध अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यास सुरुवात होणार आहे. त्यानंतर नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत निकाल जाहीर होतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून देण्यात आली आहे.

### प्राध्यापकांवर कारवाई

पुणे : सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या सत्र परीक्षेत चुका केल्यामुळे १५ प्राध्यापकांवर कारवाई करण्यात आली असून, या प्राध्यापकांना चालू शैक्षणिक वर्षात परीक्षेशी संबंधित कामकाज करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. या कारवाईमुळे प्राध्यापकांच्या चुकांचा भुर्दंड बसण्याचे प्रकार कमी होण्याची शक्यता आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी जाहीर केलेल्या परिपत्रकानुसार, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार परीक्षा व त्याच्याशी संबंधित कामात प्रमाद केल्याचे निष्पन्न झाल्याने परीक्षा प्रमाद समितीच्या निर्णयानुसार १५ प्राध्यापकांना २०२०-२१ मध्ये परीक्षेचे कोणतेही काम करण्यास बंदी घातली आहे. एका महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर घातलेली बंदी उठविण्यात आली आहे, तर तीन प्राध्यापकांना देण्यात आलेल्या शिक्षेच्या पुनर्विचाराच्या निवेदनावर निर्णय घेऊन त्यांना परीक्षेचे नियमित कामकाज करण्यास परवानगी दिली आहे.

प्राश्निक म्हणून काम करत असताना जमा केलेल्या प्रश्नसंचामध्ये आढळून आलेल्या त्रुटी, बहिस्थ पॅटर्नऐवजी नियमित पॅटर्नची प्रश्नपत्रिका देणे, बारकोड चुकीचा लावणे आदी प्रकारांसाठी प्राध्यापकांवर कारवाई करण्यात आली आहे. परीक्षेच्या कामकाजात चुका झाल्याचा फटका विद्यार्थ्यांना परीक्षेच्या निकालात बसतो. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया शक्यता असते. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या या धडक कार्यवाहीमुळे परीक्षेच्या कामकाजात प्राध्यापकांकडून चुका कमी होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**Maharashtra times: 22.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## अंतिम वर्ष परीक्षांबाबत १३ हजार तक्रारी

पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना येत असलेल्या अडचणी नोंदविण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या गुगल फॉर्मच्या माध्यमातून विद्यापीठाकडे १३ हजार ५०० तक्रारी आल्या आहेत. त्यावर निर्णय घेण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन केली असून, येत्या आठवड्या भरात अहवाल प्रशासनाकडे प्राप्त होणार आहे. त्यानंतर तक्रारींबाबत अंतिम निर्णय होणार आहे.

पुणे, नगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयांतील अडीच लाख विद्यार्थ्यांची ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षा देताना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.



विद्यापीठाने संकेतस्थळावर गुगल फॉर्म उपलब्ध करून दिला. परीक्षेबाबतच्या अडचणी विद्यार्थी गुगल फॉर्ममधून विद्यापीठाकडे पाठवू शकतात. प्राप्त तक्रारींचे सहा प्रकारांमध्ये विभाजन केले आहे. लॉगीन न होणे, चुकीची प्रश्नपत्रिका मिळणे, प्रश्न किंवा पर्याय न दिसणे, पेपर सबमिट न होणे या तक्रारी गुगल फॉर्मच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी दाखल केल्या.

**परीक्षा संपेपर्यंत दिल्लीतले अधिकारी पुण्यात राहणार**

अंतिम वर्षाची परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू झाली; पण गेल्या नऊ दिवसांपासून अनेक तांत्रिक अडचणींना विद्यार्थ्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यातच एजन्सीचे सर्व्हर दोन दिवस क्रॅश झाल्याने टीका झाली. विद्यापीठाने लंडनमध्ये असलेल्या एजन्सीच्या प्रमुखांशी आणि दिल्लीतील अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधला. परीक्षा आणखी काही दिवस चालणार असल्याने कोणतीही अडचण त्वरित सुटावी, यासाठी दिल्लीतील तज्ज्ञ विद्यापीठात दाखल झाले आहेत. परीक्षा संपेपर्यंत ते इथेच राहणार आहेत.

**Saamana: 23.10.2020**

## SPPU committee to analyse complaints

### Some 13,500 students had exam-related grievances

After receiving numerous complaints from students via a form circulated online about ongoing final-year exams, Savitribai Phule Pune University (SPPU) has set up a committee to ensure that grievances are studied properly and resolved for affected pupils.

The varsity received 13,500 complaints from students on a Google form, which officials are classifying. Many complained about difficulties in logging in, while others rued that they were unable to submit their paper or could not view options and questions, among other things.

SPPU pro vice chancellor NS Umarani said, "As we received complaints from students through our helpline and online forms, an expert committee under each faculty's dean is analysing them. They will be sorted and studied, and a decision will be taken by the committee concerned."

Students facing genuine issues will be given a fair chance to re-appear for the special exam, said Umarani, adding, "Once routine exams are over, special exams will be announced within two days."

An engineering student shared, "Two days ago, I had to restart my paper due to a technical error. The questions were different and selected answers the same. Now I am clueless of the result." A commerce student said, "My paper was submitted after a technical delay. Now I am wondering if it will be evaluated accordingly."

—SUKHADA KHANDGE

**Pune mirror: 23.10.2020**

## अकरावीचे वर्ग केव्हा सुरू होणार?

### विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर पालक अनुत्तर; शासनाला कोणत्याही प्रकारचे नाही गांभीर्य २३/१०/२०२०

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सर्व विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने घरबसल्या शिक्षण घेत आहेत. माझे अकरावीचे वर्ग केव्हा सुरू होणार? दहावीची परीक्षा दिल्यानंतर आम्हाला कोणतेही शैक्षणिक मार्गदर्शन मिळाले नाही; आणखी किती दिवस आम्ही नुसतेच घरी बसून काढायचे? असा प्रश्न दहावी उत्तीर्ण झालेले सर्व विद्यार्थी आता पालकांना विचारू लागले आहेत. परंतु, पालकांकडे या प्रश्नाचे उत्तर नाही. राज्य शासनाला याबाबत कोणतेही गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे.

दिवाळी तोंडावर आली तरीही अद्याप इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाल्यापासून विद्यार्थी घरी बसून कंटाळले आहेत. तर प्रत्यक्ष वर्ग केव्हा सुरू होणार? अशी चिंता विद्यार्थी व पालकांना सतावत आहे. शासन स्तरावर याबाबत कोणत्याही हालचाली नाहीत.

न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्यामुळे शासनाने प्रवेश प्रक्रिया थांबविण्याचा निर्णय घेतला. परिणामी पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, कोल्हापूर आदी प्रमुख शहरांमधील इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली. सध्या इयत्ता पहिलीपासून दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून ऑनलाइन शिक्षण मिळत आहे. इयत्ता बारावीतील विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून दररोज ऑनलाइन मार्गदर्शन केले जाते. परंतु, इयत्ता अकरावीचे विद्यार्थी मार्च महिन्यापासून शिक्षणापासून वंचित असल्याने मुले शिक्षणापासून दूर जातील का अशी भीती पालकांना सतावते.

> माझी अकरावीची प्रवेश प्रक्रिया केव्हा पूर्ण होणार, असा प्रश्न दररोज माझी मुलगी मला विचारते. प्रवेशाबाबतची अनिश्चितता आणखी किती दिवस कायम राहणार? तोपर्यंत विद्यार्थ्यांनी काय करायचे? शासनाने प्रवेशाबाबत लवकर निर्णय घ्यावा.
>
> \- अनिल लोखंडे, पालक

> दहावी परीक्षेनंतर मुलांना कोणताही शैक्षणिक टास्क मिळालेला नाही. पहिल्या फेरीत मिळालेला प्रवेश घ्यावा किंवा कसे याबाबत माझ्यासह अनेक पालकांमध्ये संभ्रम आहे. त्यामुळे शासनाने अकरावी प्रवेशाचा तिढा लवकर सोडवावा.
>
> -यशश्री पवार, पालक

लोकमत

**Lokmat: 23.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## परीक्षेतील अडचणींबाबत १३ हजारांहून अधिक तक्रारी

### अडचणी दूर करण्याचे काम विद्यापीठाकडून सुरू



लोकसत्ता प्रतिनिधी

**निकालाची तयारी सुरू**

अंतिम वर्ष परीक्षेचा निकाल जाहीर करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाकडून तयारी सुरू करण्यात आली आहे. पहिल्या आठवड्यात झालेल्या परीक्षांचा निकाल तयार करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात येणार आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून देण्यात आली.

“परीक्षेतील अडचणीबाबत १३ हजारांहून अधिक तक्रारी आल्या आहेत. या तक्रारी सोडवण्याचे कामही सुरु करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करण्याचीच विद्यापीठाची भूमिका आहे.

– डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षेतील अडचणींबाबत विद्यार्थ्यांकडून १३ हजारांहून अधिक तक्रारी आल्या आहेत. विद्यार्थ्यांनी नोंदवलेल्या अडचणी दूर करण्याचे काम विद्यापीठाकडून सुरू करण्यात आले आहे.

विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या अडीच लाख विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जात आहे. ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने ही परीक्षा सुरू आहे, मात्र परीक्षेदरम्यान लॉगिन न होणे, प्रश्न न दिसणे, आकृत्या न दिसणे, प्रश्नपत्रिका सबमिट न होणे, सर्व्हर क्रॅश होणे अशा अडचणींचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणी समजून घेण्यासाठी गुगल फॉर्म उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यानुसार आतापर्यंत १३ हजारहून अधिक तक्रारी दाखल झाल्या आहेत. विद्यार्थ्यांकडून नोंदवण्यात आलेल्या तक्रारींचे विभाजन करून त्यावर निर्णय घेण्याचे काम विद्यापीठाकडून करण्यात येत आहे.

गेले काही दिवस परीक्षेदरम्यान येणाऱ्या अडचणी आता कमी झाल्या आहेत. बुधवारी आणि गुरुवारी विद्यार्थ्यांकडून अडचणींबाबत तक्रारी आल्या नाहीत. गुरुवारच्या परीक्षेत ऑनलाइन परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या ८४ हजार २८३ पैकी ८० हजार ९२५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर २० हजार ३८२ पैकी १२ हजार ३१३ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली, अशी माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली.

लोकसत्ता Fri, 23 October 2020 https://epaper.loksatta.com/c/55865778

## पदव्युत्तर प्रवेश पाच नोव्हेंबरनंतर

### कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

**१३ हजार विद्यार्थ्यांच्या तक्रारी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेतील तांत्रिक अडचणी जवळपास दूर झाल्याचे गेल्या दोन दिवसांच्या आकडेवारीतून स्पष्ट होत आहे. बुधवारी किरकोळ तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. गुरुवारी ८४ हजार २८३ विद्यार्थ्यांपैकी ८० हजार ९२५ विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे परीक्षा दिली. २० हजार ३८२ विद्यार्थ्यांपैकी १२ हजार ३१३ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन पद्धतीने यशस्वी परीक्षा दिल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून सांगण्यात आले. गेल्या आठवड्यात व सोमवारी आणि मंगळवारी परीक्षेत निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणींबाबत सुमारे १३ हजार विद्यार्थ्यांनी गुगल अर्जाद्वारे तक्रारी नोंदवल्या आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया ५ नोव्हेंबरनंतर सुरू करण्याची तयारी आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी गुरुवारी दिली. येत्या दिवसांत ज्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे निकाल जाहीर होतील, त्यांच्यासाठी ही प्रक्रिया सुरू केली जाणार असल्याचे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षांचे नियोजन लांबल्याने, विद्यापीठ अनुदान आयोगाने नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात महाविद्यालयीन अभ्यासक्रमांचे पहिले सत्र सुरू करण्याची सूचना विद्यापीठांना दिली आहे. नंतर विद्यापीठांच्या परीक्षांचे निकाल लागण्यास नोव्हेंबरअखेर उजाडणार असल्यामुळे हे शैक्षणिक नियोजन कोलमडण्याची शक्यता आहे.

**विद्यापीठाची 'परीक्षा'**

या पार्श्वभूमीवर कुलगुरु डॉ. करमळकर म्हणाले, की ज्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा लागू आहेत, त्यांना प्रवेश परीक्षेतील गुणांवरच प्रवेश दिला जातो. अंतिम परीक्षेचा निकाल केवळ त्याच्या पदवी पूर्ततेसाठी ग्राह्य धरला जातो. अनेकदा अन्य राज्यांतील मुलांचे अंतिम वर्ष परीक्षेचे निकाल बाकी असतात. त्यांना प्रवेश परीक्षेच्या गुणांवर पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रोव्हिजनल प्रवेश दिला जातो. अंतिम परीक्षेचे गुणपत्रक मिळाल्यानंतर त्यांचा प्रवेश निश्चित केला जातो. यंदा ज्या प्रवेश परीक्षांचे निकाल नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होतील, त्यांची प्रवेशप्रक्रिया ५ नोव्हेंबरनंतर सुरू करण्याचा विचार सुरू आहे. मराठा आरक्षणासाठी असणाऱ्या जागा राखीव ठेवून ही प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येईल.

**Maharashtra times: 23.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# ऑनलाइन शिक्षणासाठी सकाळच्या सत्राकडे विद्यार्थ्यांचा कल

## विद्यापीठातील ऑनलाइन शिक्षणासाठीच्या सर्वेक्षणातील निष्कर्ष

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ६१ टक्के विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण दिवसाच्या पहिल्या सत्रात होण्याची अपेक्षा आहे. तर दिवसातील चारपेक्षा जास्त तास ऑनलाइन शिक्षणासाठी देऊ शकत नसल्याचे सर्वेक्षणातून आढळून आले.

विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. शंतनू ओझरकर आणि इतिहास विभागाच्या प्रमुख डॉ. श्रद्धा कुंभोजकर यांनी ऑनलाइन शिक्षणासाठी सर्वेक्षण केले. विद्यापीठाच्या १ हजार ८५४ विद्यार्थ्यांनी या सर्वेक्षणात सहभाग घेतला. त्यात ऑनलाइन शिक्षणासाठीच्या साधनांची उपलब्धता, विद्यार्थ्यांचे भौगोलिक स्थान अशा विविध निकषांवर सर्वेक्षण करण्यात आले.

सर्वेक्षणातील सहभागी विद्यार्थ्यांपैकी ७७ टक्के विद्यार्थ्यांनी स्वतःचा स्मार्टफोन असल्याचे सांगितले. तर अन्य १९.८ टक्के विद्यार्थ्यांना स्मार्टफोन घरातील अन्य सदस्यांनाही द्यावा लागतो. तर स्मार्टफोन नसलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ३.२ टक्के आहे. स्मार्टफोन व्यतिरिक्त लॅपटॉप असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ४९ टक्के आहे.



### ऑनलाइन वर्गापेक्षा ऑफलाइन वर्ग

विजेची अनियमितता, इंटरनेट जोडणी अशा समस्यांमुळे ॲप्लिकेशनद्वारे थेट ऑनलाइन वर्ग घेतले जाऊ नयेत असा विद्यार्थ्यांचा कल आहे. थेट वर्गांपेक्षा शिक्षणासाठीच्या दृकश्राव्यचित्रफिती उपलब्ध करून दिल्यास ते अधिक सोपे होईल आणि त्या दिवस-रात्री केव्हाही, इंटरनेट, विजेच्या उपलब्धतेनुसार पाहता येतील असे विद्यार्थ्यांचे मत असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले.

"सर्वेक्षणातील निष्कर्ष, सुप्रतिष्ठ प्राध्यापक आणि अन्य तज्ज्ञांच्या सहकार्याने विद्यापीठाने ऑनलाइन शिक्षणाचे धोरण निश्चित केले. त्यानुसार एकाचवेळी सर्वांना लॉगिन करावे लागणारे (सिन्क्रोनस) आणि सवडीनुसार पाहता येणारे (असिन्क्रोनस) अशा संमिश्र पद्धतींनी ऑनलाइन शिक्षण सुरू करण्यात आले आहे.

– डॉ. शंतनू ओझरकर, मानवशास्त्र विभागप्रमुख

मात्र सर्वेक्षणातील ५१.७ टक्के विद्यार्थ्यांनी अनियमित वीजपुरवठा ही अडचण असल्याचे सांगितले. तर केवळ ३६ टक्के विद्यार्थ्यांकडेच पूर्ण क्षमतेची इंटरनेट जोडणी असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले. मात्र विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा हा विषय अधिक प्रभावीपणे शिकवण्याची गरज असल्याचेही सर्वेक्षणातून स्पष्ट झाले.

लोकसत्ता Fri, 23 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55869444

# नोव्हेंबरमध्ये फेरपरीक्षा

## परीक्षेतील गोंधळामुळे नुकसान झालेल्या विद्यार्थ्यांना संधी

सकाळ पाठपुरावा




पुणे, ता. २३ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षेतील गोंधळामुळे अनेक विद्यार्थ्यांना पूर्ण प्रश्न सोडविता आले नाहीत. काहींचे पेपर सबमिट झाले नाहीत; अशा विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी विद्यापीठाकडे तक्रार केलेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात घेतली जाणार आहे.

पुणे विद्यापीठाची पदवी व पदव्युत्तर पदवांच्या अंतिम वर्षाची परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू झाली आहे. या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेत प्रश्नांचे सुमार दर्जाचे भाषांतर, प्रश्न किंवा उत्तरांचे पर्याय न दिसणे, फॉंट बदलल्याने प्रश्न वाचता न येणे, अचानक परीक्षा बंद होणे, लॉगइन न होणे, पेपर सबमिट न होणे, अशा समस्यांना विद्यार्थ्यांना तोंड द्यावे लागले आहे. अनेकांना पेपर सोडविता आला नसल्याने नापास होण्याची भीती वाटत आहे. हा गोंधळ समोर आल्याने विद्यापीठाने विद्यार्थ्यांकडून गुगल फॉर्म भरून घेऊन विद्यार्थ्यांच्या अडचणी नोंदवून घेण्यास सुरवात केली. गुगल फॉर्ममधील समस्यांचे विश्लेषण करण्यासाठी एक उपकुलसचिव दर्जाचे अधिकारी व कर्मचारी यांचे पथक नियुक्त केले आहे.

विद्यापीठाकडे आतापर्यंत साडेतेरा हजारांपेक्षा जास्त तक्रारी आल्या आहेत. या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा १ ते ५ नोव्हेंबरदरम्यान होणार आहे. याबाबत लवकरच वेळापत्रक जाहीर होईल, असे सूत्रांनी सांगितले. परीक्षेत अडचणी आल्या आहेत, त्यांनी www.unipune.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाऊन तेथील गुगल फॉर्ममध्ये समस्या नोंदवाव्यात.

### ५० मिनिटे सोडविलेला पेपर ग्राह्य

ऑनलाइन परीक्षा देताना अचानक तांत्रिक समस्या येऊन परीक्षा थांबल्याच्या घटना घडल्या आहेत. अशा विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी ज्यांनी ५० मिनिटांपेक्षा जास्त वेळ पेपर सोडविला आहे किंवा ७५ टक्क्यांपेक्षा जास्त प्रश्न सोडविले आहेत अशी विद्यार्थ्यांची परीक्षा ग्राह्य धरली जाणार असून, त्यांना पुन्हा परीक्षा देण्याची गरज पडू नये, याबाबत विद्यापीठ विचार करत आहे.

24/10/2020

### शुक्रवारी झालेल्या परीक्षेची आकडेवारी

| | |
|---|---|
| ७२३१४ ऑनलाइन परीक्षेसाठी अपेक्षित विद्यार्थी | १८७२४ ऑफलाइनसाठी अपेक्षित विद्यार्थी |
| ७२६८० परीक्षा देणारे | १३५४७ परीक्षा देणारे |

Sakaal: 24.10.2020

# News Paper Clippings During October 2020

## Section: Education

# फेरपरीक्षा नोव्हेंबरमध्ये




प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २३ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षेत तांत्रिक अचडणींमुळे परीक्षा पूर्णपणे देता आली नाही, अशा विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.**

पुणे विद्यापीठाची पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षा दि. १२ ऑक्टोबरपासून सुरू झाली. ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेत प्रश्नांचे सुमार भाषांतर, प्रश्न किंवा उत्तरांचे पर्याय न दिसणे, फॉन्ट बदलल्याने प्रश्न वाचता न येणे, अचानक परीक्षा बंद होणे, लॉगइन न होणे, पेपर सबमिट न होणे अशा समस्यांना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागले. अनेकांना पेपर सोडवता आले नसल्याने अनुत्तीर्ण होण्याची भीती आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने विद्यार्थ्यांकडून गुगल फॉर्म भरून घेऊन अडचणी नोंदवून घेण्यास सुरूवात केली. या समस्यांचे विश्लेषण करण्यासाठी एक उपकुलसचिव दर्जाचे अधिकारी व कर्मचारी यांची समिती नेमली आहे.

दरम्यान, विद्यापीठाकडे आजमितीस साडेतेरा हजारांपेक्षा जास्त तक्रारी आल्या आहेत. त्यामध्ये जवळपास ८ हजार विद्यार्थ्यांनी त्यांचा पेपर सबमिट झाला नाही, अशी तक्रार केली आहे. त्यासह प्रश्न चुकीचे येणे, मराठी किंवा इंग्रजी माध्यमातून पेपर न दिसणे, लॉग-इन न होणे अशा प्रकारच्याही तक्रारी मोठ्या प्रमाणात आहेत. एकाही विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ द्यायचे नाही, अशी भूमिका विद्यीपाठाने घेतली आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा दि.१ ते ५ नोव्हेंबरदरम्यान घेण्यात येणार आहे. त्याचे लवकरच वेळापत्रक जाहीर होईल.

### ...'त्या' विद्यार्थ्यांची परीक्षा ग्राह्य

ऑनलाइन परीक्षा देताना अचानक तांत्रिक समस्या येऊन परीक्षा थांबल्याचे निदर्शनास आले. अशा विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी ज्यांनी ५० मिनिटांपेक्षा जास्त वेळ पेपर सोडवला आहे किंवा ७५ टक्क्यांपेक्षा जास्त प्रश्न सोडविले आहेत, अशा विद्यार्थ्यांची परीक्षा ग्राह्य धरली जाणार आहे. त्यांना पुन्हा परीक्षा देण्याची गरज पडू नये याबाबत विद्यापीठ प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे.

### ऑनलाइन परीक्षा अखेर सुरळीत

शुक्रवारी ७२ हजार ३९४ विद्यार्थी ऑनलाइन परीक्षेसाठी, तर १८ हजार ७२४ विद्यार्थी ऑफलाइन परीक्षेसाठी अपेक्षित होते. त्यापैकी ७२ हजार ६८० विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे ऑनलाइन परीक्षा दिली. तर १३ हजार ५४७ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा दिली. आज ऑफलाइनकडील २८६ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. त्यामुळे आता ऑनलाइन परीक्षेकडे विद्यार्थी पसंती देत आहेत. प्रभात 24·10·2020

**Prabhat: 24.10.2020**

# वंचित विद्यार्थ्यांना फेरपरीक्षेची संधी

## डिप्लोमा : २६ आणि २७ ऑक्टोबर

म. टा. प्रतिनिधी, पुणे

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या (एमएसबीटीई) इंजिनीअरिंग, फार्मसी आदी डिप्लोमा अभ्यासक्रमांची अंतिम वर्षाची परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा येत्या सोमवारी आणि मंगळवारी (२६ आणि २७ ऑक्टोबर) घेण्यात येणार आहे, अशी माहिती 'एमएसबीटीई'च्या अधिकाऱ्यांनी दिली.

'एमएसबीटीई'शी संलग्न अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा एमसीक्यू स्वरूपात ऑनलाइन पद्धतीने ६ ते १७ ऑक्टोबरदरम्यान पार पडल्या. वंचित विद्यार्थ्यांची परीक्षा आता २६ आणि २७ ऑक्टोबरला सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत घेण्यात येणार आहे. 'विद्यार्थ्यांनी परीक्षा देताना त्यांना यापूर्वी देण्यात आलेले लॉगइन आयडी आणि पासवर्ड वापरणे गरजेचे आहे. परीक्षा देताना काही तांत्रिक अडचणी आल्यास विभागीय समन्वयकांशी संपर्क साधावा,' असे आवाहन मंडळाने केले आहे.

विविध कारणांमुळे गैरहजर राहिलेल्या विद्यार्थ्यांची यादी संस्थेच्या डॅशबोर्डवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना ही अंतिम संधी असून, कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेश तंत्रशिक्षण मंडळाचे प्रभारी सचिव वि. र. जाधव यांनी 'एमएसबीटीई'शी संलग्न कॉलेजांच्या प्राचार्यांना दिले आहेत.

### संगणक सुविधा नसलेल्यांसाठी...

विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन परीक्षा देण्यासाठी इंटरनेट, संगणक, मोबाइल आदी सुविधा नसतील; तसेच त्या उपलब्धही होऊ शकणार नाहीत, अशी परिस्थिती असेल, अशा विद्यार्थ्यांना जवळच्या 'पॉलिटेक्निक'मध्ये परीक्षा देता येणार आहे. विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी कॉलेज प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## विद्यापीठ : नोव्हेंबरचा पहिला आठवडा

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षेत तांत्रिक अडचणींमुळे परीक्षा देता न आलेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. त्याचे वेळापत्रक येत्या काही दिवसांत जाहीर होणार आहे.

विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाची परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू झाली. ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेत विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. त्या पार्श्वभूमीवर, विद्यापीठाने विद्यार्थ्यांकडून 'गुगल फॉर्म' भरून घेऊन विद्यार्थ्यांच्या अडचणी नोंदवून घेण्यास सुरुवात केली. या 'गुगल फॉर्म'मधील समस्यांचे विश्लेषण करण्यासाठी एक उपकुलसचिव दर्जाचे अधिकारी व कर्मचारी यांची समिती नेमण्यात आली आहे. दरम्यान, विद्यापीठाकडे प्रश्न चुकीचे येणे, मराठी किंवा इंग्रजी माध्यमातून पेपर न दिसणे, लॉग-इन न होणे अशा प्रकारच्याही तक्रारी मोठ्या प्रमाणात आहेत. परीक्षेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा १ ते ५ नोव्हेंबरदरम्यान घेण्यात येणार आहे. त्याचे लवकरच वेळापत्रक जाहीर करण्यात येणार असल्याचे परीक्षा विभागाने स्पष्ट केले.



काही विद्यार्थ्यांना ऑनलाइन परीक्षा देताना अचानक तांत्रिक समस्या आल्याने परीक्षा अर्ध्यावरच सोडावी लागली. त्यापैकी ज्या विद्यार्थ्यांनी ५० मिनिटांपेक्षा जास्त वेळ पेपर सोडवला आहे किंवा ७५ टक्क्यांपेक्षा जास्त प्रश्न सोडविले आहेत, अशा विद्यार्थ्यांची परीक्षा ग्राह्य धरली जाणार आहे. त्यांना पुन्हा परीक्षा देण्याची गरज पडू नये, यासाठी विद्यापीठाकडून उपाययोजना आखण्यात येत आहे.

**Maharashtra times: 24.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

'नियम व अटी लागू

## दहावी, बारावीसाठी 'ज्ञानगंगा' कार्यक्रम

पुणे : शालेय शिक्षण विभागातर्फे राज्यातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञानगंगा हा शैक्षणिक कार्यक्रम येत्या सोमवारी २६ ऑक्टोबरपासून सकाळी साडेसात ते साडेबारा या वेळेत सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर काही दिवसांत इयत्ता नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी अशाच प्रकारचा कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहे. मात्र, काही अडचणीमुळे दहावी मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रम उशिराने सुरू होणार आहे.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणापासून वंचित असल्याचे चित्र आहे. या सर्वांवर उपाय म्हणून शालेय शिक्षण विभागाने काही दिवसांपूर्वी जिओ वाहिनीवर ज्ञानगंगा उपक्रम सुरू केला. याचाच पुढचा टप्पा म्हणून सह्याद्री वाहिनीवर ज्ञानगंगा शैक्षणिक उपक्रम सुरू करण्यात येत आहे. या शैक्षणिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांना तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे.

**किती विद्यार्थ्यांना फायदा होणार ?**

शैक्षणिक वर्षाचे पहिले सत्र संपत आले असताना दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रम सुरू करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे दहावी मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी सध्या शैक्षणिक कार्यक्रम उपलब्ध नाही. येत्या काही दिवसांनी हे कार्यक्रम सुरू होणार आहेत. त्यामुळे या शैक्षणिक कार्यक्रमांचा किती विद्यार्थ्यांना फायदा होणार, हे येत्या काही दिवसांत समजणार आहे.

**वेळापत्रक - सोमवार ते शनिवार**

- **बारावी वाणिज्य** : सकाळी साडेसात ते साडेआठ
- **बारावी विज्ञान** : नऊ ते दहा
- **बारावी व्यावसायिक शिक्षण** : दहा ते साडेदहा
- **बारावी कला** : साडेदहा ते अकरा
- **दहावी इंग्रजी माध्यम** : साडेअकरा ते दुपारी साडेबारा

Maharashtra times: 24.10.2020

## State board syllabus up for overhaul to suit NEP needs

### Focus on readying for competitive exams of professional, foreign courses

Drawing on the National Education Policy (NEP), the state committee set up to adopt it wants a complete overhaul of the syllabus under the state board, for which they are working on a curriculum framework. The focus of the new curriculum would be to prepare students for competitive examinations, including for international courses.

The State Council Educational Research and Training (SCERT) has joined efforts to reorient the syllabus. "There is a need to introduce students to competitive exams that will further their academic trajectory. It is observed that students go into training for these, pursuant to Class X. But now, taking a cue from NEP, we plan to design the framework to acquaint students with the demands of competitive exams like UPSC and MPSC, or exams they will have to take to pursue studies off-shore, such as IELTS, TOEFL and GRE," informed Ayush Prasad, CEO of Pune Zilla Parishad (ZP), who is helming the state committee for implementing NEP.

Along with SCERT, the committee is also looking to standardise syllabus and pedagogy followed in state board schools, with help from educational experts and ground-level experiments. "NEP has given pointers on designing syllabus for minimum and maximum proficiency levels. We are also discussing how to incorporate information on industrial expertise to aid students in academic endeavours," said Vikas Garad, deputy director, SCERT.

The committee is also perusing the 1,000-odd government resolutions passed by the school education department, in comparison to NEP pointers. It is exploring categorising all of them under eight basic resolutions on lines of NEP suggestions. Pune ZP has deployed services of BBA students, under the earn-and-learn scheme, to help with this study of the state's education policies and do administrative paperwork involved. —SUKHADA KHANDGE

Pune mirror: 24.10.2020

## विद्यापीठातील पदव्युत्तर पदवी प्रवेश प्रक्रिया ५ नोव्हेंबरनंतर

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ५ नोव्हेंबरनंतर सुरू करण्याची तयारी करण्यात येत असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी गुरुवारी दिली. पुढील काही दिवसांत प्रवेश परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

राज्यातील विद्यापीठांच्या अंतिम वर्ष परीक्षा करोना संसर्गामुळे लांबणीवर पडल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंतिम वर्ष परीक्षा सुरू झाल्या आहेत. तर, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून १८ नोव्हेंबरपासून शैक्षणिक प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे पदव्युत्तर पदवीची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून १८ नोव्हेंबरपासून शैक्षणिक प्रक्रिया सुरू करण्याचे विद्यापीठासमोर आव्हान आहे.

पदव्युत्तर पदवी प्रवेशाबाबत कुलगुरू डॉ. करमळकर म्हणाले, की ज्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा लागू आहेत त्यांचे प्रवेश प्रवेश परीक्षातील गुणांनुसार होतात. अंतिम वर्षाचा निकाल बाकी असल्यास तात्पुरता प्रवेश देऊन अंतिम वर्षाचे गुणपत्रक जमा केल्यावर प्रवेश निश्चित होतो. त्यामुळे ज्या प्रवेश परीक्षांचे निकाल नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होतील, त्यांची प्रवेश प्रक्रिया ५ नोव्हेंबरनंतर सुरू करण्याचा विचार आहे. मराठा आरक्षणाचा विषय न्यायप्रविष्ट असल्याने त्या आरक्षणाच्या जागा राखीव ठेवून प्रवेश प्रक्रिया राबवता येईल का याबाबतही विचार केला जात असल्याचे डॉ. करमळकर यांनी स्पष्ट केले.

Loksatta: 24.10.2020

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# परीक्षेस ऑनलाइन पर्याय निवडा; पास होण्यासाठीचा सोपा फंडा !

**गैरप्रकार करण्यास संधी।** विद्यापीठाच्या परीक्षेतही झाल्या सुधारणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत एक-एक गुण मिळवण्यासाठी धडपडणा-या विद्यार्थ्यांना कोरोनामुळे घरी बसून ऑनलाईन परीक्षा देता येत आहे.या उलट परीक्षा केंद्रात प्राध्यापक जराही हलू देत नाही की बोलू देत नाही.त्यामुळे ऑनलाईन परीक्षेचा पर्याय स्वीकारून गुगलवर किंवा पुस्तकात प्रश्नांची उत्तरे शोधून पेपर सोडवण्याच्या मिळालेल्या आयत्या संधीचा पुरेपुर लाभ घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याचे शनिवारी विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारी वरून दिसून आले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाची ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणारे विद्यार्थी ऑनलाईन परीक्षेला अधिक पसंती देत असल्याचे गेल्या काही दिवसांपासून दिसून येत आहे. शनिवारी ४७ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा देणे अपेक्षित होते. मात्र, अक्षेतित विद्यार्थ्यांपेक्षा १ हजार अधिक म्हणजे ४८ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. तर शुक्रवारी ऑनलाईन परीक्षा देणा-या अपेक्षित विद्यार्थी संख्येत २६८ विद्यार्थ्यांची भर पडली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या आणि सुरक्षेचा विचार करून विद्यापीठाने विद्यार्थ्यांसमोर आऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही परीक्षांचा पर्याय समोर ठेवला.

तसेच विद्यार्थी कोणती परीक्षा देणार याबाबतचा अर्ज विद्यापीठाने भरून घेतला. त्यानुसार सुमारे २ लाख विद्यार्थी ऑनलाईन तर ५० हजार विद्यार्थी ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणार असल्याची माहिती समोर आली. मात्र,ऑफलाईन परीक्षेचा पर्याय निवडला असला तरी या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन परीक्षा देण्याचा पर्याय खुलाच ठेवला.

विद्यार्थ्यांनी वर्षभर मिळवलेल्या ज्ञानाचे मुल्यमापन करण्यासाठी परीक्षा घेतली जाते. त्यामुळे त्याने कोणत्याही साधनांचा वापर करून किंवा गैरप्रकार करून परीक्षा देऊ नये,असे अपेक्षित आहे. परंतु, ऑनलाईन परीक्षा घरी बसून देता येत. पुस्तकात पाहून किंवा मित्रांना विचारून पेपर सोडवता येतो.ही बाब लक्षात आल्याने गेल्या काही दिवसांपासून ऑनलाईन परीक्षा देणा-यांचा आकडा वाढल्याची चर्चा शिक्षण वर्तुळात केली जात आहे.

## हा पर्याय सोयीचा; ऑनलाइनच्या अडचणी झाल्या दूर



गेल्या काही दिवसांपासून ऑनलाईन परीक्षेतील अडचणी दूर झाल्या असून परीक्षा सुरळीतपणे देता येत आहे. तसेच पावसामुळे केंद्रावर परीक्षा देण्याऐवजी ऑनलाईन परीक्षा देण्याचा पर्याय सोईस्कर वाटत आहे. या कारणामुळेही ऑनलाईन परीक्षा देणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही विद्यापीठातील अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

| दिनांक | ऑनलाईन परीक्षेचे अपेक्षित विद्यार्थी | परीक्षा देणारे विद्यार्थी |
|---|---|---|
| २३ ऑक्टोबर | ७२,३९४ | ७२,६८० |
| २४ ऑक्टोबर | ४७,०६८ | ४८,०६८ |

**Lokmat: 25.10.2020**

# विद्यापीठ घेणार ३२ हजार विद्यार्थ्यांची फेर परीक्षा

**विद्यापीठाचा निर्णय ।** वंचित विद्यार्थ्यांना पुन्हा संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जात असलेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षेदरम्यान तांत्रिक कारणांमुळे परीक्षा देताना अडचणी आलेल्या तब्बल ३२ हजार विद्यार्थ्यांची विद्यापीठातर्फे फेर परीक्षा घेतली जाणार आहे. येत्या २ ते ४ नोव्हेंबर या कालावधीत ही परीक्षा होणार असल्याने अनेक विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांची १२ ऑक्टोबर पासून ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेतली जात आहे. परंतु, ऑनलाईन परीक्षा देताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. काही विद्यार्थ्यांना प्रश्नच दिसले नाही तर काहींना प्रश्नांचे पर्याय दिसले नाहीत. काहींना चूकीची प्रश्नपत्रिका मिळाली.पेपर अचानक सबमिट होणे,अशा सर्व कारणांमुळे परीक्षा न देऊ शकलेल्या विद्यार्थ्यांची विद्यापीठातर्फे फेर परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यार्थ्यांची कोणतीही चूक नसताना त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, अशी भूमिका विद्यापीठाने सुरुवातीपासून घेतली. त्यानुसार फेरपरीक्षा घेऊन विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला जाणार आहे.



परीक्षा देताना अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांनी गुगल फॉर्मच्या माध्यमातून विद्याद्यापीठाला कळवाव्यात, असे आवाहन विद्यापीठातर्फे केले होते. त्यानुसार तीनही जिल्हामधील तब्बल ३२ हजार विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे तक्रारी नोंदविल्या आहेत. विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींची पाच ते सहा प्रकारात विभागणी करून विद्यापीठाने परीक्षेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी फेर परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. मात्र, या ३२ हजारातील गंभीर स्वरूपाची अडचण आलेल्या विद्यार्थ्यांनाच पुन्हा परीक्षा देता येणार आहे.

> अंतिम वर्षाची परीक्षा देण्यात अडचणी आलेल्या ३२ हजार विद्यार्थ्यांच्या तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झाल्या आहेत.या तक्रारींचे विभाजन करून परीक्षेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना येत्या २ ते ४ नोव्हेंबर या कालावधीत पुन्हा परीक्षा देण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल. - **डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु**

**Lokmat: 25.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## विद्यापीठ परीक्षेला ६ टक्के विद्यार्थ्यांची दांडी

### ऐनवेळी अर्ज भरणारे गैरहजर; बहि:स्थांच्या अनुपस्थितीचे प्रमाण अधिक

पुणे, ता. २४ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा शेवटच्या टप्प्यात आलेल्या असताना विद्यार्थ्यांची उपस्थितीही वाढत असून, आत्तापर्यंत सरासरी ९४ टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे. तर, परीक्षा न होता पदवी मिळणार या विचाराने जून व जुलै महिन्यात अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी दांड्या मारल्याची माहिती सूत्रांनी दिली.

पुणे विद्यापीठाने पदवी व पदव्युत्तर पदवींची अंतिम वर्षाची परीक्षा १२ ऑक्टोबर घेण्यास सुरवात केली आहे. नवी परीक्षा पद्धती, नियोजनातील व सॉफ्टवेअरमधील त्रुटींमुळे पहिल्या दिवशीपासून परीक्षेत गोंधळ सुरू झाला. त्यामुळे पहिले दोन दिवस ८० टक्क्यांपेक्षा कमी उपस्थिती होती. १७ ऑक्टोबर रोजी देखील ७७ टक्के विद्यार्थ्यांनीच ऑफलाइन, ऑनलाइन परीक्षा दिली आहे. मात्र, त्यानंतर विद्यार्थ्यांची उपस्थिती ९५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे.

सर्व अभ्यासक्रमांच्या एकूण २ हजार ९०० विषयांपैकी २ हजार १४३ विषयांची परीक्षा २१ ऑक्टोबरपर्यंत पार पडली आहे. या परीक्षेसाठी ८ लाख विद्यार्थी परीक्षा देणार होते. त्यापैकी ६ लाख ८२ हजार २४५ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली, तर ७१ हजार ४६४ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा दिली. दोन्ही प्रकारच्या परीक्षेत ३७ हजार ५११ विद्यार्थी अनुपस्थित राहिले आहेत. परीक्षा न होता पदवी मिळण्याची शक्यता निर्माण झाली होती. ज्या विद्यार्थ्यांनी तीन चार वर्षांपूर्वी शिक्षण सोडून दिले होते, अशा १५ हजार जणांनी जून जुलै महिन्यात अर्ज भरले होते, त्यांनी परीक्षा दिली नाही.

**अद्याप ५०० विषयांची परीक्षा शिल्लक**

पुणे विद्यापीठाने २४ ऑक्टोबरपर्यंत सुमारे २ हजार ४०० विषयांच्या परीक्षा घेतल्या आहेत. आता पुढच्या टप्प्यात ५०० विषयांच्या परीक्षा आहेत. त्यामध्ये विज्ञान शाखेचे विषय जास्त आहेत. पुढील काही दिवसांत रोज १०० पेक्षा कमी विषयांच्या परीक्षा असणार आहेत.

| दिनांक | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|
| १२ ऑक्टोबर | ७८.८७ टक्के |
| १३ ऑक्टोबर | ७९.८७ टक्के |
| १४ ऑक्टोबर | ९१.८८ टक्के |
| १५ ऑक्टोबर | अतिवृष्टीमुळे परीक्षा स्थगित |
| १६ ऑक्टोबर | ८७.४७ टक्के |
| १७ ऑक्टोबर | ७७.०७ टक्के |
| १८ ऑक्टोबर | ९६.०८ टक्के |
| १९ ऑक्टोबर | ९७.०८ टक्के |
| २० ऑक्टोबर | ९९.६३ टक्के |
| २१ ऑक्टोबर | ९७.७८ टक्के |

**Sakaal: 25.10.2020**

## हुश्श... विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत

### ९४ टक्के विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाइन परीक्षा : तांत्रिक अडथळे जवळपास दूर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑफलाइन व ऑनलाइन परीक्षा आता सुरळीत होत आहे. सुरुवातीच्या तीन दिवसांच्या तांत्रिक अडचणीनंतर विद्यापीठाने परीक्षेची योग्य पद्धतीने नियोजन केल्याने आजमितीस तब्बल ९४ टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्याची माहिती समोर आली आहे.



विद्यापीठामार्फत पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाची परीक्षा सुरू झाली आहे. दि. १२ ते २१ ऑक्टोबर कालावधीत परीक्षेसाठी ८ लाख विद्यार्थी अपेक्षित होते. त्यापैकी ६ लाख ८२ हजार २४५ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. याच कालावधीत ७१ हजार ४६४ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा दिली. तर ३७ हजार ५११ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची उत्तीर्णांची टक्केवारी ९४ इतकी आहे. विद्यापीठाने दि. १२ ऑक्टोबरपासून ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेला सुरुवात केली. त्यानंतर सुरुवातीच्या तीन दिवसांत विद्यार्थ्यांच्या तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले. ऑफलाइन परीक्षा दोन दिवसांत सुरळीत झाली. मात्र ऑनलाइन परीक्षा सुरळीत होण्यास पाच-सहा दिवसाचा कालावधी लागला. यात विद्यार्थ्यांना मात्र तांत्रिक अडचणींचा मनस्ताप सहन करावा लागला. तांत्रिक अडचणींमुळे ही परीक्षा सुरळीत होणार की नाही, अशी चिंता विद्यार्थी व पालकांना भेडसावत होती. मात्र विद्यापीठाने सर्वांना विश्वासात घेत तांत्रिक अडचणी एजन्सीद्वारे दूर करीत विद्यार्थ्यांना योग्य पद्धतीने परीक्षा देण्यासाठी पुढाकार घेतला.

**२,२०० विषयांच्या परीक्षेचा टप्पा संपला**

पुणे विद्यापीठामार्फत सुमारे २ हजार ९00 विषयांची परीक्षा घेण्यात येत आहे. त्यात आतापर्यंत २ हजार २१७ विषयांची परीक्षा झाली आहे. दि. २८ ऑक्टोबरपर्यंत जवळपास बहुतांश महत्त्वाच्या विषयाच्या परीक्षा होतील. उर्वरित काही तुरळक विषयाची परीक्षा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात येणार आहे. त्यानुसार निकालाचे कामास सुरुवात केली आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या दहा दिवसांत निकाल अंतिम टप्प्यात असेल, अशी माहिती परीक्षा विभागाने दिली.

**Prabhat: 25.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## बी.एस्सी.च्या 'त्या' विषयाची परीक्षा दि.२९ रोजी - प्रभात

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत तांत्रिक कारणामुळे बी.एस्सी.अभ्यासक्रमाच्या 'एअर अॅन्ड सॉइल क्वालिटी' या विषयाची २०१३ पॅटर्नची परीक्षा होऊ शकली नाही. या विषयाची परीक्षा दि. २९ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ ते ५ या वेळेत ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने पुन्हा घेण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली. विद्यापीठामार्फत दि. १२ ऑक्टोबरपासून परीक्षा सुरू आहेत. मात्र, तांत्रिक कारणावरून बहुतांश विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास अडचणी होत्या. त्यामुळे या विषयाची परीक्षा पुन्हा घेण्याचा निर्णय परीक्षा विभागाने घेतला आहे.

**Prabhat: 25.10.2020**

## परीक्षा घेणाऱ्या कंपन्या 'ब्लॅकलिस्ट'

- विद्यापीठस्तरीय परीक्षांत 'टेक्निकल प्रॉब्लेम' भोवला
- विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई होणार
- उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४- राज्यातील सर्व विद्यापीठांकडून 'आऊटसोर्सिंग'द्वारे खासगी कंपन्यांद्वारे ऑनलाइन परीक्षा होत आहे. मात्र, विद्यापीठाने परीक्षेचे काम दिलेल्या कंपन्यांकडून सहकार्य न मिळाल्याने विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागला. अशा कंपन्यांवर विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्याचा निर्णय कुलगुरूंच्या बैठकीत घेण्यात आला आहे, अशी माहिती उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. त्यामुळे परीक्षेचे काम योग्य पद्धतीने न केलेल्या कंपन्यांचे धाबे दणाणले आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही ऑनलाइन परीक्षेत पहिले तीन दिवस तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले. त्यानंतर मुंबई, अमरावती, सोलापूरसह अन्य विद्यापीठांत ऑनलाइन परीक्षेचा बोजवारा उडाला आहे. ऑनलाइन तक्रारीच्या पार्श्वभूमीवर शनिवारी उदय सामंत यांनी फेसबुक लाईव्हद्वारे संवाद साधत शासनाची भूमिका मांडली. विद्यार्थ्यांना अडचणीत आणणाऱ्या कंपन्यांना तातडीने 'ब्लॅकलिस्ट'मध्ये टाकावे. त्यांना यापुढे परीक्षेचे कोणतेही काम देण्यात येऊ नये, असे आदेश सामंत यांनी सर्व कुलगुरूंना दिले आहेत.

'ऑनलाइन परीक्षेत विद्यार्थ्यांना अडचणीत आणलेल्या कंपन्यांची चौकशी करण्यासाठी सत्यशोधन समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. चार जणांची समिती असेल.

या समितीद्वारे ज्या ज्या विद्यापीठात ऑनलाइन परीक्षेत अडचणी आल्या, अशा विद्यापीठात समिती पडताळणी करेल. मात्र, ही समिती कुलगुरूंनी केलेल्या मागणीनुसार दि. १० नोव्हेंबरपासून कामकाजाला सुरुवात करणार आहे. त्याचा अहवाल शासनामार्फत कंपन्यावर कारवाई करण्यासाठी शिफारस राज्यपालांकडे सादर केली जाणार आहे. राज्यपालांच्या निर्णयानुसार संबंधित कंपनी आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे,' असे उदय सामंत यांनी स्पष्ट केले. त्यामुळे या कंपन्यांचे धाबे दणाणले आहे.

> "पूरस्थिती, करोना, तांत्रिक अडचणीमुळे अनेक विद्यार्थ्यांना अंतिम वर्षाची परीक्षा देता आली नाही. अशा विद्यार्थ्यांना दि. १० नोव्हेंबरपूर्वी पुन्हा परीक्षा देण्याची संधी मिळणार आहे. सीईटी न देऊ शकलेल्या विद्यार्थ्यांनाही पुन्हा एक संधी दिली जाणार आहे.
> – उदय सामंत, उच्च शिक्षणमंत्री.

**Prabhat 25.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## विद्यापीठ करणार परीक्षांमध्ये सुधारणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षा घेताना आलेल्या अडचणी यापुढील काळात घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये येऊ नये, या दृष्टीने पुणे विद्यापीठाने आवश्यक सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. ऑनलाइन परीक्षांसाठी स्वतःची सक्षम यंत्रणा उभी करण्याच्यादृष्टीने सकारात्मक पावले टाकण्यास सुरुवात केली आहे, असे विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठाला सुमारे अडीच लाख अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घ्यावे लागली. १२ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या परीक्षेदरम्यान पहिल्या दोन-तीन दिवसांत ऑनलाईन परीक्षेमध्ये अनेक त्रुटी जाणवल्या. त्यामुळे काही विषयांची परीक्षा पुढे ढकलावे लागली. मात्र, विद्यापीठाच्या आयटी विभागाने परीक्षेदरम्यान नेमक्या कोणत्या अडचणी येतात. त्या अडचणींवर कशी मात करायची याचा गेल्या काही दिवसांमध्ये अभ्यास केला आहे.

विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या प्रत्येक विषयाच्या परीक्षेसाठी प्राध्यापकांकडून प्रश्नपत्रिका तयार करून घेण्यात आली. प्राध्यापकांनी एका विशिष्ट फॉन्ट मध्ये प्रश्नपत्रिका तयार करणे अपेक्षित होते. परंतु, काही प्राध्यापकांनी प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी वेगळा फॉन्ट वापरला. तसेच मराठी व इंग्रजी या दोन माध्यमांच्या प्रश्नपत्रिका एकत्रितपणे तयार करून दिल्या. गणित विषयाच्या 'फिगर्स'ची साईज जास्त असल्यामुळे आणि एकाच प्रश्नपत्रिकेत दोन इमेज दिल्याने प्रश्नपत्रिकेची साइज वाढली. परिणामी तांत्रिकदृष्ट्या बिनचूक प्रश्नपत्रिका विद्यापीठापर्यंत पोहोचू शकली नाही. प्रत्येक विषयाच्या प्रश्नपत्रिकेसाठी वेगळा कोड असला तरी विषयाचे नाव मिळते जुळते होते. त्यामुळेसुद्धा विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रश्नपत्रिका पाठवताना अडचणी जाणवल्या. त्यामुळे यापुढील काळात विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका कशा काढाव्यात यासंदर्भातील प्राध्यापकांना लहान-मोठ्या गोष्टींचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

विद्यापीठाची ऑनलाईन परीक्षा घेण्याची आणि विद्यार्थ्यांची परीक्षा देण्याची पहिलीच वेळ होती. मात्र, विद्यार्थी व प्राध्यापक दोघांनाही परीक्षेचा सराव करता येईल, यादृष्टीने विद्यापीठ सक्षम यंत्रणा उभी करणार आहे. यापुढील ऑनलाईन परीक्षेसाठी कुठल्याही एजन्सीची निवड करणार नाही, असे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

**Lokmat: 27.10.2020**

## प्राध्यापकांनी गिरवले कौशल्याचे धडे

### लॉकडाउन सत्कारणी ; पुणे विद्यापीठाचा उपक्रम

**पुणे, ता. २६ : कोरोनाने प्रत्येकाच्या मानसिकतेमध्ये बदल झाला, तो समजून घेऊन स्वतःमध्ये बदल करून त्यातून मार्ग काढणे आवश्यक आहे. याच विचाराने प्राध्यापकांसाठी घेतलेल्या प्रशिक्षण शिबिरात देशाच्या सर्व भागांतील ६५० जण सहभागी झाले होते. नवीन कौशल्य शिकण्यासाठी लॉकडाउनचा काळ सत्कारणी लागला, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पर्यावरण विभागातील प्राध्यापिका रजनी पंचांग सांगत होत्या.**

'पुणे विद्यापीठाने भाषा व साहित्य या विषयावर, नवे शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा घेतली, त्यामध्ये तज्ज्ञ मार्गदर्शक असल्याने दर्जेदार कोर्सेस झाले होते. त्याचा प्राध्यापकांना चांगला फायदा झाला आहे, असे नगरच्या न्यू आर्ट, कॉमर्स, सायन्स कॉलेजचे डॉ. बाळासाहेब सागडे यांनी सांगितले.

पुणे विद्यापीठात विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे 'प्राध्यापक विकास केंद्र' (फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर) कार्यरत आहे. येथे प्राध्यापकांना विविध विषयांवर प्रशिक्षण देऊन काळानुरूप कौशल्य आत्मसात व्हावी यासाठी प्रयत्न केले जातात. प्राध्यापकांना सेवेत अंतर्गत बढतीसाठी अशा 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' (एफडीपी)मध्ये सहभागी होणे आवश्यक असते.

लॉकडाउनमुळे महाविद्यालये, विद्यापीठे बंद आहेत. प्राध्यापक त्यांना जमेल त्या पद्धतीने ऑनलाइन शिक्षण देण्याचा प्रयत्न करत आहेत. याचाच विचार करून पुणे विद्यापीठातील 'फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर'ने विविध प्रकारच्या ऑनलाइन कोर्सचे नियोजन केले होते. मे ते ऑक्टोबर २०२० या कालावधीत २० प्रशिक्षण शिबिर झाले असून, त्यामध्ये ५ हजार ४७९ प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले आहे. यासाठी समन्वयक डॉ. सचिन साठे यांनी नियोजन केले होते.

प्रशिक्षण वर्गात आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम विकास, शिक्षक आणि नीतिमूल्य, ग्रीन एनर्जी अँड रिनोएबल एनर्जी, योगासने आणि मानसिक आरोग्य, मॅथेमॅटिक्स ऑफ बायो सायन्स, 'डेव्हलपमेंट, डिलिव्हरी अँड इव्हॅल्युएशन ऑफ ई-कंटेन्ट फॉर कॉमर्स फॅकल्टी' यासह २० विषयांवर कार्यशाळा झाल्या आहेत. ई-कंटेन्ट निर्मितीवर ४ कार्यशाळा झाल्या आहेत.

> **शिक्षकांची ज्ञानवृद्धी आणि उच्च शिक्षणातील क्षमताविकास यासाठी प्राध्यापकांनी लॉकडाउन सत्कारणी लावला आहे. नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षणास महत्त्व देण्यात आले आहे. शिक्षकांची क्षमता विकसित होत नाही, तोपर्यंत उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढणार नाही, त्यामुळेच प्रशिक्षण शिबिरांचे नियोजन केले होते. शिक्षकांच्या मागणीप्रमाणे 'मॅथेमॅटिक्स फॉर बायोलॉजी' या विषयावर देशभरात फक्त पुणे विद्यापीठाने कार्यशाळा आयोजित केली होती.**
>
> **– डॉ. संजीव सोनवणे**, संचालक, प्राध्यापक विकास केंद्र, पुणे विद्यापीठ

**Sakaal: 27.10.2020**

## विद्यापीठाची सेट परीक्षा २७ डिसेंबरला होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे महाराष्ट्र व गोवा राज्यात अधिव्याख्याता पदासाठी घेण्यात येणारी सेट परीक्षा येत्या २७ डिसेंबर रोजी घेतली जाणार असल्याचे विद्यापीठातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या सेट विभागातर्फे २८ जून २०२० रोजी सेट परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती.

तसेच परीक्षेची तारीख लवकरच कळवले जाईल, असे विद्यापीठाने स्पष्ट केले होते. त्यानुसार आता ही परीक्षा येत्या २७ डिसेंबर रोजी घेतली जाणार आहे.

परीक्षेबाबतची माहिती http://setexam.unipune.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल, असे विद्यापीठातर्फे कळविण्यात आले आहे. विद्यापीठाने संकेतस्थळावर सर्व माहिती उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे त्याबाबत खात्री करून घ्यावी.

तसेच याबाबत पुढे काही बदल असल्यास तातडीने संकेतस्थळावर कळविण्यात येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमितपणे संकेतस्थळाचा वापर करावा.

**Lokmat: 27.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## परीक्षांसाठी पुणे विद्यापीठ 'आत्मनिर्भर'

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २६ - राज्यातील सर्वच विद्यापीठात ऑनलाइन परीक्षा या आऊटसोर्सिंगद्वारे कंपनी अथवा एजन्सीद्वारे होत आहे. मात्र, भविष्यात ऑनलाइन परीक्षेचे महत्त्व लक्षात घेता परीक्षेसाठी अन्य कंपन्यांवर अवंलवून न राहता स्वत:ची यंत्रणा उभारण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. पुढच्या सत्रातील ऑनलाइन परीक्षाही विद्यापीठाच्या विकसित केलेल्या यंत्रणेद्वारे होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक तत्वानुसार करोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वच विद्यापीठात ऑनलाइन परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षा ऑक्टोबरपर्यंत घेण्याच्या सूचना आहेत. त्यामुळे विद्यापीठांना कमी वेळेत ऑनलाइन परीक्षा होण्यासाठी कंपन्यांची मदत घ्यावी लागली. त्यानुसार ऑनलाइन परीक्षा सुरू असून, ती अंतिम टप्प्यात येत आहे. मात्र कंपन्यांद्वारे होत असलेल्या परीक्षेत तांत्रिक अडचणींचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

(पान २ पहा) ▸▸

- अन्य कंपन्यांवर अवलंबून न राहण्याचा निर्णय
- स्वत:ची परीक्षा यंत्रणा उभारण्यासाठी पुढाकार
- तांत्रिक अडचणींच्या प्रश्नावर कायमचा तोडगा

### अडचणी तत्काळ दूर होतील

आऊटसोर्सिंगद्वारे होत असलेल्या ऑनलाइन परीक्षेत तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यास संबंधित कंपन्यांना ही बाब निदर्शनास आणून द्यावी लागते. त्यांच्याकडून तत्परतेने त्रुटी दूर होतील, याची खात्री नसते. त्यामुळे स्वत:ची यंत्रणा असेल, तर तातडीने दुरुस्ती करणे शक्य आहे. त्यासाठी इतरांवर अवलंबून राहण्याची वेळ येणार आहे. सर्वच डाटा आपल्याकडे उपलब्ध होणार असल्याने परीक्षा योग्य पद्धतीने घेणे शक्य होणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या विश्वसनीय सूत्रांनी दिली.



परीक्षांसाठी पुणे विद्यापीठ 'आत्मनिर्भर'

अशा परिस्थितीत चांगली पद्धतीने ऑनलाइन परीक्षेसाठी स्वत:ची सक्षम यंत्रणा निर्माण करण्यासाठी पुणे विद्यापीठाने पाऊल उचलले आहे. ऑनलाइन परीक्षेसाठी प्रश्नसंच हा महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी प्राध्यापकांना तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. सध्याच्या ऑनलाइन परीक्षेत गणित विषयातील 'आकृती' प्रश्नसंचात दिसून येत नव्हते. तसेच काही परीक्षांचे टायटल, विषय एकसारखेच असतात. त्यामुळे परीक्षेत गोंधळ निर्माण होताना दिसतो. त्यामुळे प्राध्यापकांना तांत्रिक प्रशिक्षण देणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे परीक्षेत कोणताही अडचणी निर्माण होणार नाहीत. त्यादृष्टीने विद्यापीठाकडून प्रयत्न केले जाणार आहे.

**Prabhat: 27.10.2020**

## SPPU re-exams likely from Nov 2

Ardhra.Nair
@timesgroup.com

**Pune**: The Savitribai Phule Pune University (SPPU) will permit final-year re-examinations for interested students.

Director of examination and evaluation Mahesh Kakade said they are planning to hold the re-examination in November for those students who wish to appear.

"The modalities are being worked out. We plan to conduct the re-examination from November 2, but the final date-sheet will be communicated," he added.

Online examinations conducted for the final-year students across the state universities have had problems.

The university, after receiving complaints from the students, had uploaded a Google Form, urging students to give information about issues they faced during the examination.

Kakade said around 8,000 students have said that they were unable to submit their online examination answer sheets despite attempting the questions.

"There were many other problems and we are in the process of analysing these complaints. All the stakeholders met on Monday at the university," he added.

**The times of India: 27.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## DD Sahyadri to air lessons for SSC, HSC board papers

TIMES NEWS NETWORK

**Pune:** The state board students from standards X and XII will now get lessons on Doordarshan Sahyadri channel as they prepare for the board examinations from home.

The classes will be conducted in the morning hours under the 'Dnyanganga' series aired on the national television channel. The same service will begin for standards IX and XI students of the state board, soon.

**From Monday To Saturday**

- HSC Commerce | 7.30am to 8.30am
- HSC Science | 9am to 10am
- HSC Vocational Education | 10am to 10.30am
- HSC Arts | 10.30am to 11am
- SSC English Medium | 11.30am to 12.30pm

The education department has kept in view the board exams for secondary school certificate (SSC, std X) and higher secondary certificate (HSC, std XII) exams.

The Maharashtra State Council of Education Research and Training (MSCERT) has designed the lessons and recorded them to be aired on the channel for students.

Vikas Garad, a member of the council, said, "We have made available the lecture schedule on the website, subjectwise starting from Tuesday. All sessions will begin at 7.30am and go one for one to two hours."

**The times of India: 27.10.2020**

## दहावी-बारावीच्या परीक्षांबाबत अनिश्चितता

### शाळा, महाविद्यालये सुरू झाल्यानंतरच निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी



**पुणे :** करोनाचा यंदाच्या शैक्षणिक वर्षाला मोठा फटका बसला आहे. त्यामुळे फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या दहावी, बारावीच्या परीक्षेबाबतही अनिश्चितता आहे. शाळा, महाविद्यालये कधी सुरू होतात, यावर याबाबतचा निर्णय अवलंबून आहे.

करोना संसर्गामुळे यंदा राज्यातील शाळा आणि महाविद्यालये अद्याप सुरू करण्यात आलेली नाहीत. ऑनलाइन पद्धतीने आणि शक्य तिथे शिक्षक गावात जाऊन विद्यार्थ्यांना शिकवतात. दहावी आणि बारावीतील अनुत्तीर्ण आणि श्रेणी सुधारू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा जुलै-ऑगस्टमध्ये होते. मात्र, करोना संसर्गामुळे दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल जुलैमध्ये जाहीर झाल्याने फेरपरीक्षा पुढे ढकलण्यात आली. आता ही परीक्षा २० नोव्हेंबरपासून होणार आहे. या बदललेल्या वेळापत्रकाचा परिणाम दहावी आणि बारावीच्या मार्च-एप्रिलमध्ये होणाऱ्या परीक्षांवरही होऊन परीक्षा उशिरा होण्याची शक्यता आहे.

'राज्य मंडळाकडून घेतल्या जाणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्याची प्रक्रिया ऑक्टोबरमध्ये सुरू होते. मात्र, यंदा परीक्षेबाबत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्यांच्या शाळा-कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकांकडून भरून, तपासून घेतले जातात. यंदा करोना संसर्गामुळे शाळा-महाविद्यालये सुरू झालेली नाहीत आणि कधी सुरू होतील हे सरकारने अद्याप स्पष्ट केलेले नाही. विद्यार्थ्यांनी परीक्षेचे अर्ज भरल्याशिवाय *(पान २ वर)*

**ऑनलाइन अर्ज भरणे अशक्य**

दहावी आणि बारावीच्या परीक्षांची अर्ज प्रक्रिया संवेदनशील आहे. विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज शाळा स्तरावर तपासून विभागीय मंडळ आणि राज्य मंडळाकडे पाठवले जातात. त्यामुळे परीक्षेदरम्यान गैरप्रकार टाळण्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवणे शक्य नाही, असेही या अधिकाऱ्याने नमूद केले.

लोकसत्ता Tue, 27 October 2020 https://epaper.loksatta.com/c/5



## दहावी-बारावीच्या परीक्षांबाबत अनिश्चितता

*(पान १ वरून)*

परीक्षेचे वेळापत्रक करता येणार नाही,' अशी माहिती राज्य मंडळातील अधिकाऱ्यांनी दिली.

करोना संसर्गामुळे गेल्या वेळी दहावीच्या परीक्षेतील भूगोल विषयाची परीक्षाच रद्द करण्यात आली. या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी-मार्चमधील दहावी आणि बारावीच्या परीक्षेचे काय होणार याबाबत पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आहे. 'सद्यःस्थितीत परीक्षा कधी होतील याबाबत काहीही सांगता येणार नाही. कारण त्याबाबत अद्याप निर्णयही झालेला नसल्याने नियोजन करण्यात आलेले नाही. मात्र दहावी आणि बारावीच्या परीक्षा शाळा सुरू होण्यावर अवलंबून आहेत,' असे या अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

लोकसत्ता Tue, 2 https:



# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

Ind. Exp. 28/10/2020

## After question on 'jihadi terrorism' in SPPU third-year exam, university issues apology

ALIFIYA KHAN
PUNE, OCTOBER 27

A MULTIPLE-CHOICE question on the "main cause of jihadi terrorism" in an exam paper for third-year B.Com students of Savitribai Phule Pune University (SPPU) on Friday left university officials red-faced, and prompted them to issue an apology for the same.

The question was part of the subject 'Defence Budgeting', one of the 3,300 subjects offered by SPPU. The university claimed that the paper is offered by only one college, and only a few students had taken the exam on Friday.

The multiple-choice question read, 'Which one of the following is the main cause of jihadi terrorism?', and the multiple answer choices were (a) globalisation, (b) spread of communism (c) armament proliferation and (d) use of violence in the name of Islamic radicalism. Nearly 2.5 lakh students are currently taking the online-offline third-year exams being conducted by SPPU. This particular question paper on Friday, however, drew strong reactions on social media, which was flooded with screenshots of the exam paper. Taking exception to the use of religious reference in the question and the mention of Islam, students' organisations also approached the university over it.



The question was part of the subject 'Defence Budgeting'.

In an official statement, the SPPU administration said a "wrong word" was inadvertently used in the question paper. "The administration has expressed its regret for the same. The person heading the committee, which prepared the question paper, has been asked to give an explanation for the same and the persons concerned have been reprimanded," read the statement.

SPPU Vice-Chancellor Dr Nitin Karmalkar said the particular subject was offered by only one college in Nashik district, which is under the SPPU's ambit, and only a few students had taken the exam.

"We also discovered some doctored images (on social media) where the question was twisted. It was circulated on some social media pages by people. However, we have already expressed regret for the same. The concerned college personnel prepared the question paper but since the online examination portal is hosted by the SPPU, we are taking responsibility for the same," said Karmalkar.

The Indian Express: 28.10.2020

## वादग्रस्त प्रश्नावरून विद्यापीठाची दिलगिरी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेमध्ये दहशतवादाशी संबंधित प्रश्न शुक्रवारी विचारल्याने वाद निर्माण झाला. दहशतवादाचे मुख्य कारण कोणते, या प्रश्नाच्या उत्तरासाठी दिलेले पर्यायही खटकणारे असल्याने वादात भर पडली. या प्रश्नाबाबत विद्यापीठ प्रशासनाने दिलगिरी व्यक्त केली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी स्तरावर झालेल्या एका परीक्षेत विचारलेल्या एका प्रश्नामुळे सामाजिक व धार्मिक भावना दुखावल्या गेल्याबाबत तक्रारी विद्यापीठास प्राप्त झाल्या आहेत. यासंबंधात संबंधितांकडून खुलासा मागविण्यात आला असून, विद्यापीठ योग्य ती कार्यवाही निश्चितपणे करेल. परंतु, या संपूर्ण प्रकाराबद्दल विद्यापीठ दिलगिरी व्यक्त करत आहे, असे विद्यापीठाने म्हटले आहे. याच अनुषंगाने अशा प्रकारचे काही बनावट प्रश्न तयार करून समाज माध्यमांमध्ये व्हायरल करून विद्यापीठाची बदनामी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात असल्याचे निदर्शनास आले असून, त्या संदर्भात कायदेशीर कारवाईला सुरुवात केल्याचेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. शुक्रवारी झालेल्या अंतिम वर्षाच्या बीकॉमच्या डिफेन्स बजेटिंगच्या ऑनलाइन परीक्षेत हा प्रश्न विचारण्यात आला होता.

### दहा हजार विद्यार्थ्यांनी मंगळवारी दिली परीक्षा

शुक्रवारी परीक्षेसाठी ८ हजार ८३६ विद्यार्थी ऑनलाइन परीक्षेसाठी, तर ६१३ विद्यार्थी ऑफलाइन परीक्षेसाठी अपेक्षित होते. मात्र, १५ ऑक्टोबरला स्थगित केलेल्या पेपरचे काही विद्यार्थी आणि मंगळवारी झालेल्या परीक्षेचे विद्यार्थी अशा एकूण १० हजार १८९ विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे ऑनलाइन पद्धतीने परीक्षा दिली, तर ३२८ विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षा दिली, असे विद्यापीठ प्रशासनाने सांगितले.

Maharashtra times: 28.10.2020

## पुणे विद्यापीठाचा 'जिदाही दहशतवाद'

'क्रांतिकारी', 'राजकीय' आणि 'राज्य पुरस्कृत' असे चार पर्याय देण्यात आले होते. मात्र, त्यानंतर हा प्रश्न सोशल मीडियावरून व्हायरल झाल्यानंतर विद्यापीठावर टीका होऊ लागली. यामुळे विद्यापीठाने याबाबत तातडीने खुलासा केला आहे. 'विद्यापीठ ३ हजार ३०० विषयांची परीक्षा घेत आहे, पण एका विषयाच्या प्रश्नपत्रिकेत अनावधानाने चुकीच्या शब्दाचा उल्लेख झाला आहे. त्याबाबत विद्यापीठ प्रशासनातर्फे दिलगिरी व्यक्त केली आहे. संबंधित विषयाच्या संदर्भात प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या समितीच्या अध्यक्षाकडून खुलासा मागविण्यात आला आहे. प्रभात २८/१०/२०२०

Prabhat: 28.10.2020

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

# FYJC students from state board fret about academics & time lost

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Apprehension, and a state of being resigned has taken root in parents and state board students seeking admission to the First Year of Junior College (FYJC).

The admission process was put on hold after the Supreme Court stayed the Maratha reservations. The FYJC admissions could not progress beyond the first round.

Three months have gone by without any classes for the state board students going to standard XI, whereas other boards like CBSE and CISCE have already completed their admissions and begun classes in August.

Principals across education boards said standard XI syllabus is more tough for students and it is important to begin the classes and teaching at the earliest.

A parent, whose son is in standard XI, said, "Most parents have admitted their children to tuition centres because they are afraid that there will be no time to finish the syllabus once the college starts. Many others have not got admission to any college, and hence do not even know if they will get into their choice of college, and faculty or if they would need to change their choice of stream. There is all-round confusion."

Another parent, whose daughter got admission in the zero round, said she is worried that teachers will rush through the syllabus if there is not enough time to complete it.

"The syllabus has been slashed but it is not enough. In many subjects, they have left out cut introductions to chapters. They may have cut some portion which may be important for JEE or NEET. I have not sent my daughter for tuitions and I am worried that she would not be able to cope with the syllabus. Teachers will want to finish the syllabus without checking whether there is any understanding among students," she said.

A student said this long gap in their studies was not healthy for the studious ones.

Their exams got over in March, and the vacation has stretched beyond six months.

"Studies need a rhythm. We do not know when colleges will start for us. Time spent away from studies can foster laziness, and an attitude that hampers hard work," said a student. Many have started self-study bu borrowing books from senior students they know.

Megha Sinnarkar, principal of Laxmanrao Apte Prashala, said she has been getting calls from parents wanting about beginning of classes for standard XI.

"Only one-fourth of the students have been admitted after the first round. We cannot begin classes without clear orders from the state government. It is a slightly disadvantageous for the state board students as there have been no classes. Other students from the other boards have some regular classes. One good thing is that no classes have started across the state board schools/junior colleges. So parents are hoping that the government will take a decision which will be in favour of all the students," Sinnarkar said.

C Madhavi, principal of CBSE board affiliated DAV Public School, said their classes began in August. After the results were announced, the admission process was completed swiftly by the school and classes began by the end of August.

"There is a huge transformation in the content of the syllabus after standard X in the three streams in standard XI. It appears tough in the beginning, but students cope. Since NEET and IIT JEE are based on standard XI-XII syllabi, the difficulty levels are higher. The board has cut 30% syllabus keeping in mind the lost time, so students will be able to cope without any trouble," she added.

MISSION ADMISSION

## START, STOP PROCESS SPURS DIFFIDENCE

Pic: Aditya Waikul

THE CENTRALISED ONLINE ADMISSION PROCESS FOR FYJC STARTED IN AUGUST

- **The first round has been completed and the declaration of allotment list for second round was scheduled on September 10**
- Supreme Court stayed the socially and economically backward class reservation
- **The rest of the admission process was postponed till further notice**
- CAP committee's notice said the time-table for the online admission process will be announced after the government's permits it



A woman helps students with studies in Wakdewadi

### QUOTA AND CAP ADMISSIONS

AFTER ROUND 1

| | |
|---|---|
| 304 | COLLEGES |
| 30,556 | ADMITTED |
| 76,474 | VACANCY |
| 1,07,030 | INTAKE |

### CAP FIGURES WITHOUT QUOTA

INTAKE, ALLOTTED, ADMITTED

| | ARTS | COMMERCE | SCIENCE | HSVC |
|---|---|---|---|---|
| Intake | 12,614 | 33,336 | 34,179 | 3,979 |
| Allotted | 4,332 | 16,223 | 16,643 | 815 |
| Admitted | 2,541 | 9,345 | 11,031 | 685 |

The times of India: 28.10.2020

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

# अकरावी प्रवेश लांबणीवर

## 'मराठा' आरक्षणावरील सुनावणी तहकूब

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

मराठा आरक्षण कायदा लागू करण्यास नऊ सप्टेंबरला दिलेली स्थगिती उठवावी, अशी मागणी करणाऱ्या राज्य सरकारच्या याचिकेवरील सुनावणी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात चार आठवडे तहकूब करण्यात आली. त्यामुळे राज्यभरात अकरावीचे प्रवेश लांबणीवर पडले आहेत.

मराठा आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य सरकारने आरक्षणाच्या समर्थनार्थ सर्वोच्च न्यायालयात भूमिका मांडणार असल्याचे स्पष्ट केले होते, मात्र अद्याप त्याची कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे अकरावी प्रवेश, एमपीएससी परीक्षा इतकेच नव्हे, तर इंजिनीअरिंग, डिप्लोमा प्रवेश प्रक्रियाही खोळंबल्या आहेत. मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाने पुढील सुनावणी चार आठवड्यांनी ठेवल्याने त्यांच्या पदरी पुन्हा निराशाच आली.

अकरावी ऑनलाइन प्रवेशाच्या पहिल्या गुणवत्ता यादीचे प्रवेश पूर्ण झाल्यावर मराठा आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने अकरावी प्रवेश प्रक्रिया थांबली आहे. पहिल्या यादीतील ७८,६१० विद्यार्थ्यांनी आतापर्यंत प्रवेश घेतले आहेत. त्यात एसईबीसी आरक्षणानुसार ४,१९९ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत. हे सर्व प्रवेश कायम राहणार की नाही, याबाबत पालकांच्या मनात शंका आहेत. यामुळे सरकारने सर्वोच्च न्यायालयात तातडीने सर्वांच्या हिताचा निर्णय येईल, अशा प्रकारे दाद मागावी आणि विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी पालक व विद्यार्थी करीत आहेत.

### पुण्यातील लाखभर विद्यार्थ्यांचे प्रवेश खोळंबले

**पुणे :** पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील ३०४ ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी प्रवेशाच्या १,०६,७७५ जागांसाठी १,००,३७२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. पहिल्या फेरीत ३०,५५६ जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले असून, प्रवेशासाठी ७६,२१९ जागा उपलब्ध आहेत. दुसऱ्या फेरीसाठी ७८ हजार ५२५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातील ७७ हजार ४३ विद्यार्थ्यांनी अर्जाचा दुसरा भाग भरून अर्ज पूर्ण केले आहेत. आतापर्यंत ७५,६३० विद्यार्थ्यांनी अर्ज लॉक केले असून, हे विद्यार्थी प्रवेशाची यादी जाहीर होण्याची वाट पाहत आहेत.

"मराठा आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयातील प्रत्येक सुनावणीवेळी राज्य सरकारच्या विभागांमध्ये समन्वयाचा अभाव होता. आरक्षणप्रश्नी अन्य राज्यांच्या प्रलंबित याचिकांप्रश्नी सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही. महाराष्ट्राबाबत राज्य सरकारमधील समन्वयाच्या अभावानेच स्थगिती आदेश आला. गायकवाड आयोगाचा अहवाल प्रभावीपणे दाखवला असता, तरी स्थगिती आली नसती.

- ॲड. निशांत कातनेश्वरकर,
माजी मुख्य सरकारी वकील,
सर्वोच्च न्यायालय



### सुनावणी चार आठवड्यांनी

मराठा आरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीला ९ सप्टेंबर रोजी दिलेल्या स्थगिती आदेशाचा फेरविचार करून स्थगिती उठवावी, अशा विनंतीच्या राज्य सरकारच्या अर्जावरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी चार आठवड्यांसाठी तहकूब केली.

▸▸ संबंधित वृत्त...६

**Maharashtra times: 28.10.2020**

# मंत्रिमंडळ निर्णयानंतरच अकरावी प्रवेशप्रक्रिया

## शिक्षण अधिकाऱ्यांचे मत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य मंत्रिमंडळात मराठा आरक्षणासंदर्भात निर्णय घेतला जात नाही ; तोपर्यंत इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू होणार नसल्याचे शिक्षण विभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे राज्य शासन अकरावी प्रवेश प्रक्रिया याबाबत केव्हा आणि काय निर्णय घेणार याकडे विद्यार्थी व पालकांचे लक्ष लागले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिली.त्यामुळे पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी राबविली जाणारी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलण्याचा करण्याचा निर्णय घेण्यात आला. परिणामी पुण्यासह राज्यातील इतर जिल्ह्यांमधील इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली.

पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांमधील १ लाख ३० हजार जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. पहिल्या फेरीतून सुमारे तीस हजार पाचशे विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे ७६ हजाराहून अधिक विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत.अकरावी प्रवेश प्रक्रियाची दुसरी फेरी झाल्यानंतर प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्येही प्रवेशाबाबत चिंतेचे वातावरण आहे.

दिवाळीपूर्वी इयत्ता अकरावीच्या पहिल्या सत्राची परीक्षा घेतली जाते. मात्र, यंदा कोरोना आणि मराठा आरक्षणाला मिळालेली स्थगिती यामुळे दिवाळी काही दिवसांवर आली तरीही प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली नाही. इयत्ता पहिलीपासून पदवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले जात आहे. शालेय शिक्षण विभागाने सह्याद्री वाहिनीवरून त्यासाठी विविध शैक्षणिक कार्यक्रम सुरू केले आहेत.

मात्र, इयत्ता अकरावी वगळून सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले जात आहे. प्रवेशच न झाल्यामुळे विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारचे मार्गदर्शन मिळत नाही. इयत्ता दहावीची परीक्षा दिल्यानंतर हे विद्यार्थी शिक्षणापासून दूर आहेत.




### प्रवेश प्रक्रिया ठप्प होण्यापूर्वीची स्थिती

अकरावी प्रवेशासाठी अर्ज करणारे विद्यार्थी :
**१ लाख ३७२**

प्रवेश अर्ज भरून लॉक केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या :
**८३ हजार ७२७**

व्हेरिफाय केलेले अर्ज :
**८३ हजार ३२८**

ऑप्शन फॉर्म भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या :
**७५ हजार ६३१**

**Lokmat: 28.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

विद्यापीठातील राष्ट्रीय संस्थांमध्ये भर

## पुणे नॉलेज क्लस्टरचे विद्यापीठातून कामकाज

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुण्यातील शिक्षण संस्था, संशोधन संस्था आणि उद्योग क्षेत्राला एकत्र आणणाऱ्या पुणे नॉलेज क्लस्टरचे कामकाज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून चालणार आहे. विद्यापीठाच्या संकुलात पुणे नॉलेज क्लस्टरच्या कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, पुणे नॉलेज क्लस्टरच्या रूपाने विद्यापीठात कार्यरत राष्ट्रीय स्तरावरील संस्थांमध्ये भर पडली आहे.

> विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राजवळ उभारलेल्या नव्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर पुणे नॉलेज क्लस्टरचे कार्यालय असेल. या कार्यालयाच्या उभारणीचे काम सध्या सुरू आहे.
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> पुणे नॉलेज क्लस्टरचे कार्यालय दोन महिन्यांत सुरू होऊ शकेल. विद्यापीठासह करोना संसर्गाच्या अनुषंगाने प्रकल्प राबवला जात आहे. क्षमतावृद्धीसाठी काही अभ्यासक्रम राबवले जाणार आहेत. इलेक्ट्रिक मोबिलिटी, पर्यावरण अशा प्रकल्पांमध्ये विद्यापीठाचा सहभाग असेल.
> - प्रा. अजित कैंभावी, प्रिन्सिपल इन्व्हेस्टिगेटर, पुणे नॉलेज क्लस्टर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे नॉलेज क्लस्टर, आंतरविद्यापीठीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी केंद्र (आयुका) यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, आयुकाचे संचालक डॉ. सोमक रॉयचौधरी, पुणे नॉलेज क्लस्टरचे प्रिन्सिपल इन्व्हेस्टिगेटर प्रा. अजित केंभावी आदी या वेळी उपस्थित होते. या सामंजस्य कराराद्वारे या तीन संस्थांतर्फे महत्त्वाच्या सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक विषयावरील संशोधनाबरोबरच शैक्षणिक उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

दरम्यान, केंद्र सरकारने मान्यता दिलेल्या पुणे नॉलेज क्लस्टरच्या पुण्यातील कार्यालयासाठी जागेचा शोध सुरू होता. मात्र विद्यापीठाकडून या संस्थेसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लवकरच पुणे नॉलेज क्लस्टरचे स्वतंत्र कार्यालय सुरू होणार आहे.

लोकसत्ता Wed, 28 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55963777

## पुणे विद्यापीठाच्या बॅकलॉगच्या परीक्षा दिवाळीनंतर

प्रभात वृत्तसेवा

**ऑनलाइनद्वारे बहुपर्यायी प्रश्न पद्धतीने घेण्याचा निर्णय**

पुणे, दि. २८ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील गतवर्षाच्या किंवा सत्राच्या बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या परीक्षा गेल्या सात महिन्यांपासून रखडल्या होत्या. अखेर दिवाळीनंतर ऑनलाइनद्वारे बहुपर्यायी प्रश्न पद्धतीने (एमसीक्यु) त्या घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची बैठक झाली. त्यात अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा, बॅगलॉगची परीक्षा व पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केलेल्यांची परीक्षा घेण्यासंदर्भात चर्चा करून निर्णय घेण्यात आला. करोनामुळे अंतिम वर्ष वगळता इतर वर्षाच्या विद्यार्थ्यांना वर्षभरातील कामगिरीवरून सरासरी गुण देऊन पुढच्या वर्गात प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. विद्यापीठ कायद्यानुसार बॅकलॉग परीक्षा रद्द करता येत नाहीत. त्या १२० दिवसांत घेणे आवश्यक होते.

पारंपरिक पदवीसह फार्मसी, इंजिनिअरिंगच्या प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षातील सुमारे ४५ टक्के विद्यार्थ्यांचे एक आणि त्यापेक्षा जास्त विषय बॅकलॉग राहिले आहेत. त्यांची संख्या ३ लाखांपर्यंत असणार आहे. सरासरी गुणांवर पुढच्या वर्गात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी १७ हजार जणांनी श्रेणी सुधारसाठी अर्ज केला आहे. त्यांची परीक्षाही बॅकलॉग विद्यार्थ्यांसोबतच घेण्याचे नियोजन आहे.

अंतिम वर्ष परीक्षेत काही विद्यार्थ्यांना अडचणी आल्या. त्यांनी गुगल फॉर्मद्वारे त्यांच्या तक्रार नोंदविल्या आहेत. या संबंधित विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात होणार आहे. बॅकलॉग परीक्षांच्या तारखा लवकरच जाहीर होणार आहेत, असे प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी यांनी स्पष्ट केले.

Prabhat: 29.10.2020

## बुधवारच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षा सुरळीत

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २८ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षेत बुधवारी (दि.२८) ३ हजार ६६६ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. विद्यापीठाच्या १२ ऑक्टोबरपासून ऑनलाइन व ऑफलाइनद्वच्या माध्यमातून परीक्षा सुरु आहेत. यात बऱ्याचदा तांत्रिक अडचणींसह इतर अडथळे निर्माण झाल्याने गोंधळ उडाला होता. बुधवारच्या ऑनलाइन परीक्षेसाठी ४ हजार ५८६ विद्यार्थी अपेक्षित होते. त्यातल्या ९२० विद्यार्थ्यांनी परीक्षाच दिली नाही. ऑफलाइन परीक्षेसाठी ६१३ विद्यार्थी अपेक्षित होते. त्यातील ४०२ जणांनीच परीक्षा दिली.

Prabhat: 29.10.2020

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

# प्राध्यापक भरतीला मुहूर्त कधी?

## सामंत यांच्या घोषणेनंतरही प्रक्रिया रखडलेलीच

**पस्तीस हजार प्राध्यापक नियुक्तीविना**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'प्राध्यापक भरतीला येत्या काही दिवसांत सुरुवात होईल,' अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केल्यानंतरही भरती प्रक्रियेबाबत अद्याप कोणताच ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे उमेदवारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

'अनलॉक'मध्ये ग्रंथालये आणि प्राध्यापक भरती सुरू करण्यात येईल, अशी माहिती उदय सामंत यांनी सहा ऑक्टोबर रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दिली होती. त्यानंतर काही दिवसांत ग्रंथालये सुरू करण्याचा निर्णय झाला. मात्र, प्राध्यापक भरतीबाबत अजूनही कोणताच निर्णय झालेला नाही. त्यामुळे या निवड प्रक्रियेची वाट पाहणाऱ्या शेकडो नेट व सेट पात्रताधारकांची निराशा झाली आहे.

'राज्य सरकारने ४ मे रोजी निर्णय जाहीर करून पदभरतीला बंदी घातली आहे. सरकारच्या निर्णयामुळे महाविद्यालयांतील ४० टक्के रिक्त जागांवरील प्राध्यापक भरती थांबली आहे. या निर्णयातून प्राध्यापक भरतीला वगळण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा झाली असून, ते सकारात्मक आहेत. त्यामुळे प्राध्यापक भरतीचा नवा निर्णय लवकर जाहीर होईल,' असे सामंत यांनी सांगितले होते. राज्यात गृह, आरोग्य अशा विविध विभागांमधील रिक्त पदांवर पदभरती होऊ शकते, तर उच्च व तंत्रशिक्षण विभागात भरती का होऊ शकत नाही, असा प्रश्न उमेदवारांकडून उपस्थित करण्यात येत आहे. दरम्यान, 'सीएचबी' तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नेमणुकादेखील तातडीने करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही भरती प्रक्रिया झालेली नाही.

### एकूण २७ हजार पदे रिक्त

राज्यातील ११७१ अनुदानित महाविद्यालयांमध्ये ०१ ऑक्टोबर २०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार व आजपर्यंत सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांच्या रिक्त जागा धरून किमान १६ हजार प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत; तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या किमान ११ हजार अशा एकूण २७ हजार जागा रिक्त आहेत. मागील सरकारने तीन नोव्हेंबर २०१८ च्या निर्णयात (उच्च शिक्षण) नमूद केल्याप्रमाणे ४० टक्क्यांप्रमाणे प्राध्यापकांच्या एकूण ३,५८० रिक्त जागांपैकी सुमारे १५०० जागाच भरण्यात आलेल्या आहेत.




**"विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापकांच्या रिक्त जागांवर तातडीने भरती झाली पाहिजे. सत्ताधारी; तसेच पदवीधर आमदारांकडून आतापर्यंत रखडलेली भरती होण्याबाबत आश्वासने दिली गेली. मात्र, प्रत्यक्षात निर्णय कोणताच होत नाही. त्यामुळे आगामी काळात राज्यातील बेरोजगार पदवीधारकांच्या रोषाला लोकप्रतिनिधींना जावे लागेल.**

**– डॉ. संदीप पाथ्रीकर,**
अध्यक्ष, महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटना

**Maharashtra times: 29.10.2020**

# उच्च शिक्षणमंत्र्यांची घोषणा हवेतच विरली

## तासिका तत्वावर सहायक प्राध्यापक पदे भरण्यासाठी मान्यताच मिळेना

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८ - राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात तासिका तत्वावर (सीएचबी) सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी उच्च शिक्षण संचालक कार्यालयाने तीन महिन्यांपूर्वी राज्य शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविला आहे. त्यावर निर्णय घेण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांना अद्याप मुहूर्तच सापडलेला नाही. ही पदभरती करण्याबाबत २१ दिवसांपूर्वी शिक्षणमंत्र्यांनी केलेली घोषणाच हवेत विरली आहे.**

राज्यात मार्चपासून वरिष्ठ महाविद्यालये बंद आहेत. अंतिम वर्ष परीक्षेचे कामकाज सुरु आहे. ऑनलाइन शिक्षणही सुरु झाले आहे. बहुसंख्य अनुदानित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांची पदे गेल्या अनेक वर्षांपासून रिक्त आहेत. त्याचा विपरित परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होत आहे.

राज्य शासनाने ३ नोव्हेंबर २०१८ रोजी ४0 टक्के पूर्णवेळ सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यास मान्यता दिली. त्यानुसार ३ हजार ५८0 पदे भरण्यास मंजुरीही मिळाली. राज्यातील १ हजार ७७ पैकी केवळ ३१७ अनुदानित महाविद्यालयांनी भरतीची 'एनओसी' मिळवून १ हजार ३५१ पदांचीच भरती पूर्ण केली. उर्वरित पदांसाठीची प्रक्रिया काही ना काही कारणांनी रखडली आहे. त्यानंतर राज्य शासनाच्या वित्त विभागाने ४ मे २०२0 रोजी कोणतीही नवीन पदभरती करण्यास बंदी घातली.

गेल्या अनेक वर्षांपासून पूर्णवेळ सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यात अडचणी येत असल्याने महाविद्यालयांनी तासिका तत्वावर पदभरती करण्याचा धडाका लावला होता. यंदा मात्र, या नियुक्त्यांमध्येही अडथळे येत आहेत. राज्य शासनाची आर्थिक स्थिती ढासळली असल्याने काटकसरीचे धोरण अवलंबले आहे. त्यामुळे निधी मिळण्यासही अडचण येत आहे. तासिका तत्वावर तरी सहायक प्राध्यापकांची भरती करा, अशी मागणी सेट, नेट, पीएच. डी. झालेल्या उमेदवारांकडून होत आहे.

**प्रस्ताव मान्यतेच्या प्रतिक्षेत**

महाविद्यालयांनी पदभरतीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयांकडे सादर केला आहे. तो मिळविण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे प्रस्ताव पाठवूनही बराच कालावधी लोटला आहे. मात्र, त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री ६ ऑक्टोबरला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी पदभरतीचा लवकरच निर्णय घेऊन त्याची जाहिरातही काढण्याची घोषणा केली होती. मात्र, ही घोषणा घोषणाच ठरली आहे.

**Prabhat: 29.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

## बौद्धिक संपदा वृद्धीसाठी शिक्षण मंत्रालयाचा 'कपिला' कार्यक्रम

# पुढील दोन वर्षांत दहा हजार बौद्धिक संपदा नोंदणीचे उद्दिष्ट

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : देशात बौद्धिक संपदा नोंदणी वाढवण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने कपिला (कलाम प्रोग्रॅम फॉर आयपी लिटरसी) हा कार्यक्रम हाती घेतला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत एकस्व अधिकारांच्या (पेटंट) नोंदणीवर भर देण्यात येणार असून, पुढील दीड ते दोन वर्षांत दहा हजार बौद्धिक संपदा नोंदणीचे उद्दिष्ट आहे.



जगभरातील देशांमध्ये बौद्धिक संपदा नोंदणीमध्ये भारताची कामगिरी फारशी चांगली नाही. भारतात वर्षभरात जेमतेम पन्नास हजार बौद्धिक संपदा नोंदणी होते. त्यातील पन्नास ते साठ टक्के बौद्धिक संपदा परदेशातून नोंदली जाते. तर चीनमध्ये वर्षाला पंधरा लाख, अमेरिकेत सहा ते साडेसहा लाख बौद्धिक संपदा नोंदणी होते. देशात संशोधन संस्था, शिक्षण संस्था मोठ्या प्रमाणात असूनही बौद्धिक संपदेच्या बाबतीत भारत मागे आहे. बौद्धिक संपदा नोंदणीत भारत मागे असण्याची वेगवेगळी कारणे आहेत. या पार्श्वभूमीवर बौद्धिक संपदा नोंदणीचे महत्त्व पटवण्यासाठी, नोंदणी वाढवण्यासाठी, संशोधनाची मालकी मिळण्यासाठी कपिला ही मोहीम राबवली जाणार आहे, अशी माहिती शिक्षण मंत्रालयाचे मुख्य नवसंकल्पना अधिकारी डॉ. अभय जेरे यांनी दिली.

'आतापर्यंत बौद्धिक संपदा नोंदणी वाढवण्यासाठी योजना मुख्यत्वे विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून राबवण्यात आल्या होत्या. त्यांनी त्यांच्या संलग्न संशोधन संस्थांमध्ये त्या योजना राबवल्या. मात्र पहिल्यांदा शिक्षण मंत्रालयाकडून बौद्धिक संपदा वाढवण्यासाठीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे देशभरातील विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये, विद्यार्थी, प्राध्यापक अशा घटकांपर्यंत जाऊन बौद्धिक संपदेचे महत्त्व पटवून दिले जाईल. आपल्या संशोधनाची मालकी आपल्याकडे असावी हा विचार दिला जाणार आहे. बौद्धिक संपदा नोंदणीसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संलग्न संस्थांना निधीही उपलब्ध करून दिला जाणार आहे. कपिला कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र मनुष्यबळही असेल. पुढील दोन वर्षे एकस्व अधिकारांच्या नोंदणीवर भर दिला जाणार असून, किमान दहा हजार बौद्धिक संपदा नोंदणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे,' असे डॉ. जेरे यांनी स्पष्ट केले.

> बौद्धिक संपदा वाढवण्यासाठी आतापर्यंत अनेक कार्यक्रम राबवले गेले. मात्र त्यांची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. आता कपिला कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी स्वतंत्र आणि पूर्णवेळचे मनुष्यबळ कार्यरत असण्याची गरज आहे.
>
> - डॉ. गणेश हिंगमिरे, बौद्धिक संपदा नोंदणी तज्ज्ञ

> नवनव्या संकल्पना विकसित करणे, संशोधन करणे, ते संशोधन आपल्या नावावर नोंदणीकृत असणे महत्त्वाचे आहे. मात्र आपल्याकडे अजूनही प्राध्यापक, विद्यार्थ्यांना केलेल्या संशोधनाचा शोधनिबंध संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध होणे महत्त्वाचे वाटते. पण त्या पलीकडे जाऊन संशोधनाचे एकस्व अधिकार किंवा तत्सम बौद्धिक संपदा नोंदणीकृत करणे काळाची गरज आहे. त्या दृष्टीने कपिला योजना महत्त्वाची ठरेल अशी अपेक्षा आहे.
>
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Thu, 29 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55982599

# चुका करणाऱ्या प्राध्यापकांवर विद्यापीठाकडून कारवाईचा बडगा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षांमध्ये प्रश्नपत्रिका तयार करताना चुका करणाऱ्या प्राध्यापकांवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्ष परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने घेतल्या आहेत. मात्र परीक्षेच्या पहिल्या काही दिवसांत अनेक तांत्रिक अडचणी उद्भवल्या होत्या. त्यात प्रश्नपत्रिका तयार करताना झालेल्या चुका कारणीभूत ठरल्या होत्या. तसेच जिदाही दहशतवादसारख्या संवेदनशील विषयावर प्रश्न विचारल्याच्या प्रकारामुळे विद्यापीठाला दिलगिरी व्यक्त करावी लागली. तर परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका व्हॉट्स ॲपद्वारे विद्यार्थ्यांना दिल्याचे, नगर जिल्ह्यात ऑफलाइन परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिकेची छायाचित्रे काढून व्हॉट्स ॲपद्वारे पाठवल्याचे प्रकार समोर आले. त्यामुळे परीक्षांच्या आयोजनावर परिणाम झाला. या पार्श्वभूमीवर कामात चुका करणाऱ्यांवर विद्यापीठ कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

'करोना संसर्गाच्या काळात परीक्षांचे आयोजन ही आव्हानात्मक बाब होती. त्यामुळे प्राध्यापकांनी प्रश्नपत्रिका तयार करताना संवेदनशीलपणे काम करणे आवश्यक होते. मात्र प्रश्नपत्रिका तयार करताना चुका झाल्या, त्यानंतर प्रश्नपत्रिकांच्या गुणवत्ता आणि पुनर्पडताळणीमध्येही अनेक चुका दुरुस्त झाल्या नाहीत. या चुकांचा परिणाम परीक्षांच्या आयोजनावर झाला. त्यामुळे या प्रकारांची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. परीक्षा मंडळाच्या अधिकारानुसार संबंधितांना प्रमाद समितीसमोर बोलावले जाईल. त्यानंतर त्यांच्यावरील कारवाईचा निर्णय घेतला जाईल,' असे या अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

लोकसत्ता Thu, 29 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55987551

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

## विद्यापीठाकडून बॅकलॉग परीक्षेची तयारी

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २९ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रथम व द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात एक अथवा दोन विषय राहिलेल्या बॅकलॉग परीक्षांची तयारी सुरू केली आहे. परीक्षा विभागाकडून नोव्हेंबर महिना अखेरीस किंवा डिसेंबर महिन्यात या परीक्षा घेतल्या जाणार आहे. त्यासाठी लवकरच प्राध्यापकांना प्रश्नसंच तयार करावे लागणार आहे.

प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निकाल मागील परीक्षांमध्ये मिळवलेल्या गुणांच्या आधारे जाहीर करण्यात आला. विद्यापीठाने सुमारे दोन महिन्यांपूर्वी हा निकाल जाहीर केला. या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकालाबाबत समाधानी नसल्यामुळे क्लास इम्प्रुमेंटसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचा विषय प्रस्तावित होता. बुधवारी परीक्षा मंडळाच्या बैठकीत त्यावर अंतिम निर्णय झाला. दरम्यान, अंतिम वर्ष परीक्षा घेताना तांत्रिक अडचणींना तोंड द्यावे लागले. बॅकलॉग परीक्षेदरम्यान पुन्हा या अडचणी येणार नाहीत याची काळजी घ्यावी लागणार आहे.

**Prabhat: 30.10.2020**

## सीएसबी प्राध्यापक भरतीची घोषणा हवेतच

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : राज्यातील तासिका तत्त्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांची भरती प्रक्रिया सुरू करणार असल्याची घोषणा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पुण्यात काही दिवसांपूर्वी केली होती. मात्र, त्यास सुमारे २० ते २५ दिवसांचा कालावधी उलटून गेला; तरीही याबाबत कोणत्याही हालचाली झाल्या नाहीत. त्यामुळे शिक्षणमंत्र्यांच्या घोषणेची प्रत्यक्षात अंमलबजावणी होणार आहे? का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

> शिक्षक हितकारी संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व शिक्षण मंत्री उदय सामंत यांना सीएचबीच्या जागा तत्काळ भराव्यात याबाबतचे निवेदन दिलेले आहे. गेल्या दोन महिन्यापासून ऑनलाइन पद्धतीने शिकवणे सुरु असून अध्याप राज्य शासनाने सीएचबीच्या जागा भरण्यास महाविद्यालयांना परवानगी दिली नाही. त्यामुळे उपलब्ध शिक्षकांवर मोठा ताण पडतो. तसेच पुरीसे शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तत्काळ निर्णय घ्यावा.
>
> **- प्रकाश पवार**, अध्यक्ष, शिक्षक हितकारी संघटना

राज्यातील पूर्णवेळ प्राध्यापकांची हजारो पदे रिक्त आहेत. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून तासिका तत्त्वावर प्राध्यापकांची नियुक्ती करून शैक्षणिक कामकाज केले जात आहे. परंतु, चालू शैक्षणिक वर्षात सीएसबी प्राध्यापक पदाच्या भरतीस शासनाने मान्यताच दिली नाही. परिणामी यंदा महाविद्यालयांना शैक्षणिक कामकाज करण्यात अडचणी येत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात काही दिवसांपूर्वी आयोजित पत्रकार परिषदेत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सीएसबी प्राध्यापक भरतीची जाहिरात प्रसिद्ध होईल, अशी घोषणा केली होती. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून पूर्णवेळ रिक्त असलेल्या प्राध्यापकांच्या भरतीबाबत मार्ग काढला जाईल, असेही स्पष्ट केले होते.

**Lokmat: 30.10.2020**

## विद्यापीठाकडून पुन्हा परीक्षेची तयारी

### प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षा : प्राध्यापकांवर प्रश्नसंच काढण्याची जबाबदारी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रथम व द्वितीय वर्षाच्या बॅकलॉगच्या परीक्षांची तयारी सुरू केली आहे. 30/10/2020

विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून नोव्हेंबर महिनाअखेरीस किंवा डिसेंबर महिन्यात या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. परिणामी लवकरच प्राध्यापकांना प्रश्नसंच तयार करण्याची जबाबदारी दिली जाणार आहे, असे विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

पुणे विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांमधील अंतिम वर्षाच्या सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांची ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्याची प्रक्रिया राबविली जात आहे. बहुतांश विद्यार्थ्यांची परीक्षा झाली आहे. मात्र, विद्यापीठ अनुदान आयोग व शासन आदेशानुसार विद्यापीठाने प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निकाल मागील परीक्षांमध्ये मिळवलेल्या गुणांच्या आधारे जाहीर केला. विद्यापीठाने सुमारे दोन महिन्यांपूर्वी हा निकाल जाहीर केला. या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकालाबाबत समाधानी नसल्यामुळे क्लास इम्प्रुमेंटसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचा विषय प्रस्तावित होता. बुधवारी विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत त्यावर अंतिम निर्णय घेण्यात आला.

विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा एमसीक्यू प्रश्नांच्या आधारे घेतली. प्रथम व द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची परीक्षासुद्धा एमसीक्यू प्रश्नांच्या आधारे घेतली जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या विविध विषयांच्या अभ्यास मंडळांकडून त्या त्या विषयाच्या प्राध्यापकांना प्रश्नसंच तयार करण्याची जबाबदारी दिली जाणार आहे.

#### एजन्सी नियुक्त करणार की स्वतःची यंत्रणा उभी करणार?



अंतिम वर्षाची परीक्षा घेताना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला. प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षेदरम्यान पुन्हा या अडचणी येणार नाहीत याची काळजी घ्यावी लागणार आहे. सध्या घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेमधून विद्यापीठाला बरेच काही शिकता आले. त्यामुळे परीक्षेसाठी एजन्सी नियुक्त करणार की स्वतःची यंत्रणा उभी करणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. - लोकमत

**Lokmat: 30.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Education

## मुख्यमंत्र्यांचे संकेत; महाधिवक्त्यांशी चर्चेनंतर लवकरच निर्णय

# अकरावी प्रवेशाचा पेच सुटणार?

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**मुंबई :** मराठा आरक्षण कायद्याला सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिल्याने रखडलेली अकरावीची प्रवेश प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याचे संकेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी दिले. राज्याच्या महाधिवक्त्यांचा अभिप्राय घेऊन याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगितल्याचे समजते.

करोना संकटामुळे दहावीच्या परीक्षेत व्यत्यय आला होता. अखेर परीक्षा झाली आणि जुलैअखेर परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. त्यानंतर अकरावीच्या ऑनलाइन व थेट (ऑफलाईन) प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले. त्यानुसार प्रवेश सुरु करण्यात आले. पहिली फेरी पार पडली. दुसरी फेरी सुरु होणार असताना सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण कायद्याला अंतरिम स्थगिती दिली. २०२०-२१ चे मराठा आरक्षणानुसार शैक्षणिक प्रवेश करण्यासही न्यायालयाने मनाई केली. त्यामुळे राज्य सरकारपुढे पेच निर्माण झाला. परिणामी अकरावीची प्रवेश प्रक्रिया मध्येच थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

अकरावी प्रवेशाची पहिली फेरी पूर्ण होऊन जवळपास दीड महिना झाला. प्रवेश प्रक्रिया ठप्प आहे. दहावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रमाणपत्रे घेऊन घरी बसले आहेत. अकरावी प्रवेशाचे काय होणार, याबाबत विद्यार्थी व पालक संभ्रमात आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अकरावी प्रवेशाचे काय करायचे, असा प्रश्न काही मंत्र्यांनी उपस्थित केला. त्यावर महाधिवक्त्यांचा कायदेशीर सल्ला घेऊन, प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी बैठकीत सांगितल्याचे कळते.

> “अकरावीच्या प्रवेशाबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली. १८ लाख विद्यार्थ्यांपैकी ऑनलाईन आणि थेट असे ११ लाख विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत. अद्याप ७ लाख विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रश्न कायम आहे. मात्र, त्याबाबत लवकरच निर्णय होईल. - प्रा. वर्षा गायकवाड, शालेय शिक्षण मंत्री

### विद्यार्थी-पालक हवालदिल

अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेबाबत अद्यापही तोडगा निघाला नसल्यामुळे पालक आणि शिक्षकही हवालदिल झाले आहेत.

७० टक्के प्रवेश झाल्यानंतर महाविद्यालय सुरू करण्यात येते. यंदा मात्र, काही महाविद्यालयांतील ७० टक्के प्रवेश झालेले असूनही अकरावीचे अध्यापन सुरू करण्यात आलेले नाही. 'पहिल्या फेरीतील प्रवेशाचे काय याबाबतही शंका आहे.

त्यामुळे अध्यापन सुरू करण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे दहावीला चांगले गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांनाही पहिल्या फेरीत प्रवेश मिळालेले नाहीत.

अर्ध्याच विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय सुरू करणे अन्यायकारक ठरेल. खरेतर यापूर्वीच प्रवेश प्रक्रियेबाबत ठोस निर्णय घेणे आवश्यक होते,' असे एका महाविद्यालयाच्या उपप्राचार्यांनी सांगितले.

लोकसत्ता Fri, 30 October 2020 https://epaper.loksatta.com/c/56010230

## दहावी, बारावीच्या खासगी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन प्रक्रिया

### २ ते २८ नोव्हेंबर दरम्यान अर्ज भरण्याची संधी

लोकसत्ता प्रतिनिधी



**पुणे :** राज्य मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेसाठी १७ क्रमांक अर्ज भरून खासगी रीत्या प्रविष्ट होण्यासाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. २ ते २८ नोव्हेंबर दरम्यान विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीनेच अर्ज भरता येणार आहे.

राज्य मंडळाकडून प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती देण्यात आली. करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर अर्ज प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवली जाणार आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांना http //form17.mh.hsc.ac.in 2020 या संकेतस्थळाद्वारे आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना http //form 17.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावरून अर्ज भरता येईल. विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर ३ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत मूळ अर्ज, ऑनलाइन नावनोंदणी शुल्क जमा केल्याच्या पावतीच्या दोन छायाप्रती आणि मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क शाळेच्या किंवा कनिष्ठ महाविद्यालयात जमा करायची आहेत. त्यानंतर ४ नोव्हेंबरला संपर्क शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी जमा केलेली कागदपत्रे आणि विद्यार्थ्यांची यादी विभागीय मंडळांकडे जमा करायची आहे, असे राज्य मंडळाने स्पष्ट केले आहे.

### करोना संसर्गामुळे बदल...

करोना संसर्गामुळे दहावी आणि बारावीचा निकाल जुलैमध्ये जाहीर करण्यात आला असल्याने खासगी विद्यार्थी ऑनलाइन नावनोंदणीबाबत शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या दाखल्यावर शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याची तारीख ३० सप्टेंबर २०२० ही ग्राह्य धरावी. हा बदल करोना संसर्गामुळे केवळ २०२१च्याच परीक्षेपुरता लागू असेल. तर विद्यार्थ्यांच्या वयासाठी ३० जून २०२० ही तारीख असेल, असेही राज्य मंडळाने स्पष्ट केले आहे.

लोकसत्ता Fri, 30 October 2020 https://epaper.loksatta.com/c

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## परीक्षा देता न आलेल्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : परीक्षा ५ ते ७ नोव्हेंबरदरम्यान केवळ ऑनलाइन होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : विविध अडचणींमुळे ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देता न आलेल्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा घेण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला आहे. या परीक्षा ५ ते ७ नोव्हेंबरदरम्यान केवळ ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. परीक्षेबाबत तक्रार केलेल्या विद्यार्थ्यांनाच ही परीक्षा देता येणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाच्या ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षा १२ ऑक्टोबरपासून सुरू झाल्या आहेत. पण ऑनलाईन परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना विविध तांत्रिक समस्यांना सामोरे जावे लागले. लॉगीन न होणे, इंग्रजी-मराठी माध्यमाच्या प्रश्नपत्रिका न मिळणे, सर्व्हर हँग होणे, आकृत्या व सूत्रे न दिसणे, टेस्ट सबमिट न होणे, चुकीच्या प्रश्नपत्रिका मिळणे, दोन परीक्षा एकाच दिवशी येणे, विद्यार्थ्यांना कोरोनाची बाधा आदी तक्रारी आल्या आहेत. या तक्रारींबाबत २८ ऑक्टोबर रोजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली. त्यामध्ये अडचणींमुळे परीक्षा देता न आलेल्या विद्यार्थ्यांच्या पुनर्परीक्षा ५ ते ७ नोव्हेंबरदरम्यानबाबत शिक्कामोर्तब केले. या परीक्षा केवळ ऑनलाईन



तक्रारी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या ई-मेल आयडीवर पुनर्परीक्षेबाबतची माहिती २ नोव्हेंबरपर्यंत पाठविली जाईल. तक्रार केलेल्या ज्या विद्यार्थ्यांना पुनर्परीक्षेसाठी विद्यापीठाचा ई-मेल मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांनी ३ नोव्हेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील गुगल फॉर्ममध्ये माहिती भरावी, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी स्पष्ट केले आहे.

पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. विनाअडथळा परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना पुनर्परीक्षा देता येणार नाही. ऑफलाईन पद्धतीने परीक्षेचा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पुनर्परीक्षा देता येईल. त्यांच्याकडे संगणक, लॅपटॉप आदी सुविधा नसल्यास महाविद्यालयांनी या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना महाविद्यालयांना दिल्या आहेत.

**Lokmat: 31.10.2020**

## विद्यापीठ फेरपरीक्षा ५ नोव्हेंबरपासून



### तांत्रिक अडचणींमुळे पेपर देता न आलेल्या विद्यार्थ्यांना संधी

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ३० - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षेत तांत्रिक अडचणी व अन्य कारणांमुळे परीक्षा देता आली नाही, अशा विद्यार्थ्यांच्या फेरपरीक्षेच्या तारखा जाहीर केले आहे. या विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा दि. ५, ६ आणि ७ नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने आज स्पष्ट केले.

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची ऑफलाइन व ऑनलाइन परीक्षा दि. १२ ऑक्टोबरपासून सुरू आहेत. ऑनलाइन परीक्षा देत असताना विद्यार्थ्यांना लॉग-इन न होणे, इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध न होणे, सर्व्हर डाऊन, आकृत्या व सूत्रे न दिसणे, पेपर सबमिट न होणे, चुकीच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध होणे, विद्यापीठाच्या दोन विषयाच्या परीक्षा एकाच वेळी असणे,

> “ ज्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी आल्या आहेत, अशाच विद्यार्थ्यांनी फेरपरीक्षा देणे अपेक्षित आहे. त्याबाबतचा तपशील दि. २ नोव्हेंबरपर्यंत पाठवला जाईल. ज्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, परंतु ज्यांना फेरपरीक्षेसाठी ई-मेल प्राप्त झालेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी दि.३ नोव्हेंबर रात्री १२ वाजेपर्यंत विद्यापीठाच्या वेबपोर्टलवरील उपलब्ध असलेल्या गुगल फॉर्ममध्ये माहिती भरावी.
>
> – महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

विद्यार्थ्यास करोनाची बाधा इत्यादी तक्रारी विद्यापीठाकडे आल्या आहेत. त्यावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली. त्यानंतर अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांच्या

(पान २ पहा) ▸▸

## विद्यापीठ फेरपरीक्षा ५ नोव्हेंबरपासून

पुन्हा परीक्षा दि. ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत घेण्याचा निर्णय झाला. फेरपरीक्षा ही ऑनलाइन पद्धतीनेच होतील. ज्यांची परीक्षा योग्यरीत्या व विना अडथळा झाली, अशा विद्यार्थ्यांना फेरपरीक्षा देता येणार नाही. ज्या विद्यार्थ्यांकडे ऑनलाइनद्वारे परीक्षा देण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसतील, त्यांनी आपापल्या महाविद्यालयात अथवा जवळच्या महाविद्यालयात फेरपरीक्षा देण्यासाठी सुविधांचा वापर करून परीक्षा द्यावी, असेही परीक्षा विभागाने म्हटले आहे.

**Prabhat: 31.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Education

## विद्यापीठाची फेरपरीक्षा पाच नोव्हेंबरपासून

### परीक्षा मंडळाच्या संचालकांची माहिती

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अंतिम वर्षाची परीक्षा देण्यापासून विविध तांत्रिक कारणांमुळे वंचित राहिलेल्या; तसेच परीक्षांबाबत तक्रार असणाऱ्या विद्यार्थ्यांची ऑनलाइन पद्धतीने ५ ते ७ नोव्हेंबर दरम्यान पुनर्परीक्षा घेण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा १२ ऑक्टोबरपासून ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येत आहेत. समकक्ष विषयामुळे किंवा इतर कारणांमुळे विद्यापीठाच्या दोन विषयांच्या परीक्षा एकाच वेळी असणे, सीइटीची परीक्षा, सरकारी स्पर्धा परीक्षांचे आयोजन विद्यापीठ परीक्षेच्या दिवशी असणे, विद्यार्थ्याला करोनाची बाधा होणे इत्यादी तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने २८ ऑक्टोबर रोजी झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत संबंधित तक्रारींवर चर्चा होऊन ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीने विकल्प निवडलेल्या आणि संबंधित अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा ५ ते ७ नोव्हेंबरदरम्यान केवळ ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेण्यात आला. ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा व्यवस्थित आणि विनाअडथळा पार पडलेली आहे, अशांना पुनर्परीक्षा देता येणार नाही. ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देण्याचा विकल्प निवडलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन पुनर्परीक्षा देण्यासाठी संगणक, मोबाइल, लॅपटॉप अशा सुविधा उपलब्ध नसेल, तर विद्यार्थ्यांना आपापल्या महाविद्यालयात किंवा जवळच्या महाविद्यालयात पुनर्परीक्षा देता येणार असल्याचे डॉ. काकडे यांनी स्पष्ट केले आहे.

### 'तक्रार केलेल्या विद्यार्थ्यांनाच संधी'

'परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या विद्यार्थ्यांना त्यांच्या अधिकृत ई-मेल आयडीवर ज्या विषयांची पुनर्परीक्षा देणे अपेक्षित आहे, त्याची माहिती २ नोव्हेंबरपर्यंत पाठविण्यात येणार आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांनी तक्रार केली आहे; मात्र त्यांना परीक्षेसंदर्भातील माहिती प्राप्त झाली नाही. अशा विद्यार्थ्यांनी ३ नोव्हेंबरला रात्री १२ वाजेपर्यंत विद्यापीठाच्या वेबपोर्टलवरील उपलब्ध असलेल्या गुगल फॉर्ममध्ये माहिती भरावी,' असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत करण्यात आले आहे.

**Maharashtra times 31.10.2020**

---

पुढारी

## अंतिम वर्ष परीक्षेपासून वंचितांची होणार पुनर्परीक्षा

### ५ ते ७ नोव्हेंबरदरम्यान केवळ ऑनलाइन

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षेपासून विविध तांत्रिक कारणांमुळे वंचित राहिलेल्या आणि ज्यांनी विद्यापीठाकडे तक्रार केली आहे, अशा विद्यार्थ्यांची ५ ते ७ नोव्हेंबरदरम्यान केवळ ऑनलाइन पुनर्परीक्षा घेण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

अंतिम सत्र, अंतिम वर्षात शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा १२ ऑक्टोबरपासून घेण्यात येत आहेत. ऑनलाइन परीक्षा देत असताना विद्यार्थ्यांना असंख्य तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्याअनुषंगाने २८ ऑक्टोबर रोजी झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत संबंधित तक्रारींवर चर्चा होऊन ऑनलाइन, ऑफलाइन विकल्प निवडलेल्या आणि संबंधित अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा केवळ ऑनलाइन घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

पुनर्परीक्षा सुविधा ही सर्व ऑनलाइन, ऑफलाइन परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली असून, केवळ ऑनलाईनच ती घेण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा व्यवस्थित आणि विनाअडथळा पार पडलेली आहे त्यांना पुनर्परीक्षा देता येणार नाही. ज्या विद्यार्थ्यांनी पूर्वी ऑफलाइन परीक्षा देण्याचा विकल्प निवडलेला होता, अशा विद्यार्थ्यांकडे पुनर्परीक्षा ऑनलाइन देण्यासाठी संगणक, मोबाईल, लॅपटॉप इत्यादी सुविधा उपलब्ध नसेल, तर अशा विद्यार्थ्यांना आपापल्या महाविद्यालयात किंवा जवळच्या महाविद्यालयात पुनर्परीक्षा देता येणार असल्याचे डॉ. काकडे यांनी स्पष्ट केले आहे.

#### तक्रार केलेल्या विद्यार्थ्यांनाच संधी

ज्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत अशाच विद्यार्थ्यांना त्यांच्या अधिकृत ईमेल आयडीवर ज्या विषयांची पुनर्परीक्षा देणे अपेक्षित आहे त्याची माहिती २ नोव्हेंबरपर्यंत पाठविण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी तक्रार केली आहे, परंतु त्यांना परीक्षेसंदर्भातील माहिती प्राप्त झाली नाही, अशा विद्यार्थ्यांनी ३ नोव्हेंबरला रात्री १२ वाजेपर्यंत विद्यापीठाच्या वेबपोर्टलवर उपलब्ध असलेल्या गुगल फॉर्ममध्ये माहिती भरावी, असे आवाहन विद्यापीठामार्फत करण्यात आले आहे.

Pune Edition
Oct 31, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

---

## विद्यापीठाकडून पुनर्परीक्षा ऑनलाइन पद्धतीनेच

### ५ ते ७ नोव्हेंबर दरम्यान पुनर्परीक्षा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षेत तांत्रिक अडचणींमुळे परीक्षा देऊ न शकलेल्या, तांत्रिक अडचणींबाबत विद्यापीठाकडे तक्रार केलेल्या विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेतली जाणार आहे. ५ ते ७ नोव्हेंबर दरम्यान ऑनलाइन पद्धतीनेच पुनर्परीक्षा घेतली जाणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

विद्यापीठाकडून अंतिम सत्र, अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा १२ ऑक्टोबरपासुन सुरू आहेत. मात्र, विद्यार्थ्यांकडून परीक्षेबाबत लॉगीन न होणे, सर्व्हरमध्ये बिघाड होणे, सोडवलेली प्रश्नपत्रिका सबमिट न होणे, आकृत्या न दिसणे, दोन विषयांच्या परीक्षा एकाच वेळी असणे, सीईटी परीक्षा, शासकीय स्पर्धा परीक्षा विद्यापीठ परीक्षेच्या दिवशी असणे, करोनाबाधित होणे अशा तक्रारी विद्यापीठाकडे करण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ऑनलाइन, ऑफलाइन परीक्षेचे पर्याय निवडलेल्या, अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा घेण्याचा निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे, अशी माहिती काकडे यांनी दिली.

#### महाविद्यालयांनी सुविधा उपलब्ध करण्याची सूचना

पुनर्परीक्षेची सुविधा ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीने झालेल्या सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. मात्र पुनर्परीक्षा ऑनलाइन पद्धतीनेच होणार आहे. व्यवस्थितपणे परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना पुनर्परीक्षा देता येणार नाही. परीक्षेसाठी आधी ऑफलाइनचा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन परीक्षा देण्यासाठी संगणक, मोबाइल, लॅपटॉप उपलब्ध नसल्यास संबंधित विद्यार्थ्यांना आपापल्या किंवा जवळच्या महाविद्यालयातून परीक्षा देता येणार आहेत, असे डॉ. काकडे यांनी सांगितले.

लोकसत्ता Sat, 31 October 2020
https://epaper.loksatta.com/c/56

# News Paper Clippings During October 2020

Section: Education



# Final-yr pupils with jobs in hand to get results first

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Savitribai Phule Pune University's (SPPU) examination department has decided to expedite the result of students whose job confirmation is dependent on the final-year results issued by the university. Such students must contact the examination department along with supporting documents.

Mahesh Kakade, director of the department of examination and evaluation at SPPU, said, "Some students have got jobs and need their results to join or those who are currently in probation or training period and want their results for confirmation of their jobs can approach the examination department. We will speed up the process of issuing their results after a scrutiny of the supporting documents."

Kakade said they have already received requests from three students. "Two have joined the Air Force and one has joined the Army. We will issue their results as their parents have approached us. All three appeared online for the examination and none of them faced any problems during the examination," he added.

The remaining students will get their results by November-end. "After the re-examination ends on November 7, we will start compiling the results for all the subjects. It would take a fortnight to," Kakade said.

The detailed schedule of the respective examinations will be sent to their registered mail IDs by November 2. Students who submitted their problems online, but have not received a mail from the university about the examination schedule must fill up the Google Form which would be made available on November 3 on university's website by midnight the same day.

## POINTS TO REMEMBER

- The re-examination of students who faced technical or other problems during the final examination held post-October 12, would be conducted on November 5, 6 and 7 in an exclusively online format, a notification issued by SPPU on October 29 said
- If the students had previously given offline examination or do not have the required network connection or gadgets to appear for online examination, they should contact their own college or the college nearest to them to use the facilities available
- Students who faced problems were told to submit their queries online from October 28 onwards. Only those students who have submitted their problems would be allowed for a re-examination

The times of India: 31.10.2020

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Work of Appreciation

## पुणे विद्यापीठात औषधी वनस्पती सुविधा केंद्र

**पुणे, दि. १** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विभागीय औषधी वनस्पती सुविधा केंद्राचे उद्घाटन आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा यांनी केले. या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत औषधी वनस्पती लागवडीत वाढ करावी आणि त्यातून अधिकाधिक उत्पन्नात वाढ करावी, अशी अपेक्षाही कोटेचा यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेदचे संचालक डॉ. तनुजा नेसरी, विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, वैद्य आप्पा खडीवाले, डॉ. विजय डोईफोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर होते. प्र-कुलगुरू डॉ. एस. एन. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, वित्त व लेखाधिकारी अतुल पाटणकर, विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, डॉ. गिरिश टिळू आदी उपस्थित होते.

**Prabhat:2.10.2020**

## पुणेकर दाम्पत्याकडून अमेरिकेत मल्लखांबाचे धडे

**पंतप्रधान मोदींनी केले 'मन की बात'मध्ये कौतुक**

मटा विशेष

Gopal.Gurav
@timesgroup.com
Tweet : gopalgMT

"आपल्या अनेक खेळांनी जगाला आकर्षित केले आहे. त्यापैकी एक खेळ म्हणजे मल्लखांब. मल्लखांब अनेक देशांत लोकप्रिय होत आहे. अमेरिकेत चिन्मय पाटणकर आणि प्रज्ञा पाटणकर यांनी घरून मल्लखांब शिकवायला सुरुवात केली. अमेरिकेत आता अनेक मल्लखांब ट्रेनिंग सेंटर सुरू झाले आहेत. अमेरिकेतील अनेक तरुण खेळाडू मल्लखांब शिकत आहेत. मलेशिया, पोलंड, जर्मनी यासारख्या २० देशांत मल्लखांबाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्याची आता वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धाही होणार आहे. कदाचित आताच्या पिढीला मल्लखांबाबाबत फारसे माहिती नसेल; पण तुम्ही याची माहिती इंटरनेटवरून घेऊ शकता आणि खेळ बघू शकता.

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान ('मन की बात'मधील अंश)



आमचा संघ मल्लखांबचा प्रचार-प्रसार करण्याचे काम करतो. या खेळाचे महत्त्व सगळ्यांनाच ठाऊक आहे. अमेरिकेतील तरुणांना हा खेळ आकर्षित करीत आहे. आता पंतप्रधानांनीच आमच्या कार्याची दखल घेतल्यावर हुरूप मिळाला आहे. ही कौतुकाची थाप नक्कीच प्रोत्साहन देणारी आहे.

- चिन्मय पाटणकर



अमेरिकेत मल्लखांबाची सुरुवात केली, तेव्हा उद्देश खेळाची आवड जोपासणे व प्रसार करणे होता. हळूहळू खेळाडूंची संख्या वाढली. आम्ही जागतिक स्पर्धा आयोजित करण्याच्या विचारात आहोत. पंतप्रधान मोदींनी आमच्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविला आहे.

- प्रज्ञा पाटणकर

**पुणे :** आपल्या मातीतील खेळ मल्लखांब अमेरिकेत लोकप्रिय करण्यासाठी पुणेकर चिन्मय पाटणकर आणि प्रज्ञा पाटणकर हे पती-पत्नी गेल्या अनेक वर्षांपासून मेहनत घेत आहेत. त्यांच्या कार्याची दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या 'मन की बात' या कार्यक्रमात घेतली असून, यामुळे अमेरिकेत राहणाऱ्या पाटणकर दाम्पत्याचा आत्मविश्वास वाढला आहे.

चिन्मय आणि प्रज्ञा या दोघांना लहानपणापासूनच मल्लखांबची आवड आहे. चिन्मय (वय ४२) यांचे शिक्षण पुण्यातील रमणबाग, एस. पी. कॉलेज आणि भारती विद्यापीठात झाले. त्यांनी अनेक राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेत आपला ठसा उमटविला आहे. बाळकृष्ण थत्ते यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले आहे. २००३मध्ये त्यांना शिवछत्रपती पुरस्कारानेदेखील गौरविण्यात आले आहे. त्यांच्या पत्नी प्रज्ञा (३८) यांनीदेखील मल्लखांबमध्ये अनेक स्पर्धा गाजवल्या आहेत. त्या मॉडर्न कॉलेजच्या विद्यार्थिनी. २००३मध्ये चिन्मय यांनी मल्लखांब खेळणे सोडले आणि ते प्रशिक्षणाकडे वळले. पत्नीची साथ त्यांना लाभली. नोकरीनिमित्त ते अमेरिकेत स्थायिक झाले. ते 'बँकिंग अँड फायनान्स सर्व्हिसेस'मध्ये प्रोग्राम मॅनेजर आहेत. २००९ पासून ते अमेरिकेत आहेत. ७० जणांना ते मल्लखांबचे प्रशिक्षण देत आहेत.

**Maharashtra times: 28.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Work of Appreciation

## आता फुलणार डिजिटल शेती

### पुणे विद्यापीठाचा 'आयडियालॅब्स फ्युचरटेक'सोबत करार

**पुणे, ता. २७ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'नव्या तंत्रज्ञानासह डिजिटल शेती' या विषयावरील उत्कृष्टता केंद्र सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, संशोधक, स्टार्टअप्सला नवीन क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यासाठीच्या करारावर कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर आणि आयडियालॅब्स फ्युचरटेक व्हेंचर्सचे संस्थापक पंकज दिवाण यांनी नुकतीच स्वाक्षरी केली.

यावेळी ऑनलाइनच्या माध्यमातून कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड एंटरप्राईजेसच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, आंत्रप्रिनरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे (इडीआयआय) संचालक मंडळ सदस्य मिलिंद कांबळे आदी यावेळी उपस्थित होत.



या उत्कृष्टता केंद्रामार्फत डिजिटल शेती या विषयावर काम करणाऱ्या स्टार्टअप्सला मार्गदर्शन केले जाईल, यामध्ये डिजिटल प्रयोगशाळा आणि मेकर स्पेसचा समावेश असेल. उत्कृष्टता केंद्रातर्फे नव्या तंत्रज्ञानाशी निगडित कौशल्य अभ्यासक्रम सुरू केले जातील. विद्यार्थ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळेल व त्याद्वारे शेतीशी निगडित समस्यांवर उपाय शोधणारी उत्पादने तयार करता येतील.

आयडियालॅब्स फ्युचरटेक व्हेंचर्सचे संस्थापक पंकज दिवाण यांनी 'उदयोन्मुख तंत्रज्ञानासह डिजिटल शेती' या विषयावरील सेंटर फॉर एक्सलन्स सुरू करण्याबाबत पुढाकार घेतल्याबद्दल इनक्युबेशनचे आभार मानले. हे उत्कृष्टता केंद्र चालवताना आयडियालॅब्सकडे असलेल्या कौशल्याचा विद्यापीठाला फायदा होईल, असे पालकर यांनी सांगितले.

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इनक्युबेशन सेंटरने नवनवीन संशोधन करण्याकरिता शेतीवर लक्ष केंद्रित केले आहे. आयडियालॅब्स यांच्या सहकार्याने शेती क्षेत्रात पुणे विद्यापीठ नक्कीच उल्लेखनीय कार्य करेल.
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू

सकाळ 28/10/2020

**Sakaal: 28.10.2020**

## 'डिजिटल शेती'ला विद्यापीठाचे प्रोत्साहन

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २७ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ 'नव्या तंत्रज्ञानासह डिजिटल शेती' या विषयावरील 'उत्कृष्टता केंद्र' सुरू करणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, संशोधक, स्टार्टअप्सला नवीन क्षेत्रात काम करण्याची संधी निर्माण होणार आहे.

कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि आयडियालॅब्स फ्युचरटेक व्हेंचर्सचे संस्थापक पंकज दिवाण यांनी सोमवारी याबाबतच्या करारावर स्वाक्षरी केली. यावेळी ऑनलाइनच्या माध्यमातून कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, मिलिंद कांबळे उपस्थित होते. या केंद्रामार्फत स्टार्टअप्सला मार्गदर्शन केले जाणार आहे. यात डिजिटल प्रयोगशाळा आणि मेकर स्पेसचा समावेश असेल. या केंद्रातर्फे नव्या तंत्रज्ञानाशी निगडित कौशल्य अभ्यासक्रम सुरू केले जातील. विद्यार्थ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळेल व त्याद्वारे शेतीशी निगडित समस्यांवर उपाय शोधणारी उत्पादने तयार करता येतील. हे उत्कृष्टता केंद्र चालवताना आयडिया लॅब्सकडे असलेल्या कौशल्याचा विद्यापीठाला फायदा होणार आहे.

> विद्यापीठाच्या इनक्युबेशन सेंटरने नवनवीन संशोधन करण्याकरिता शेतीवर लक्ष केंद्रित केले आहे. आयडिया लॅब्स यांच्या सहकार्याने शेती क्षेत्रात पुणे विद्यापीठ नक्कीच उल्लेखनीय कार्य करेल, असा विश्वास आहे.
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, पुणे विद्यापीठ

**Prabhat 28.10.2020**

## विद्यापीठ फुलवणार 'डिजिटल शेती'

**पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) -** शेती या विषयावरील उत्कृष्टता केंद्र' विद्यापीठात सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, संशोधक, स्टार्टअप्सला नवीन क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यासाठीच्या करारावर कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर आणि आयडिया लॅब्स फ्युचर टेक व्हेंचर्सचे संस्थापक पंकज दिवाण यांनी नुकतीच स्वाक्षरी केली.



पुणे विद्यापीठाचा 'आयडिया लॅब्स फ्युचर टेक' सोबत करार. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नव्या तंत्रज्ञानासह 'डिजिटल शेती' या विषयावरील उत्कृष्टता केंद्र विद्यापीठात सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, संशोधक, स्टार्टअप्सला नवीन क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. करारावर कुलगुरू प्रा.डॉ. नितीन करमळकर आणि आयडिया लॅब्स फ्युचर टेक व्हेंचर्सचे संस्थापक पंकज दिवाण यांनी स्वाक्षरी केली. यावेळी ऑनलाइनच्या माध्यमातून कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अॅण्ड एंटरप्राईजेसच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, आंत्रप्रिन्युरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संचालक मंडळ सदस्य मिलिंद कांबळे आदी यावेळी उपस्थित होते.

या उत्कृष्टता केंद्रामार्फत 'डिजिटल शेती' या विषयावर काम करणाऱ्या स्टार्टअप्सला मार्गदर्शन केले जाणार आहे. पंकज दिवाण यांनी 'उद्योन्मुख तंत्रज्ञानासह डिजिटल शेती' या विषयावरील सेंटर फॉर एक्सलन्स सुरू करण्याबाबत पुढाकार घेतल्याबद्दल इनक्युबेशनचे आभार मानले.

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इनक्युबेशन सेंटरने नवनवीन संशोधन करण्याकरिता शेतीवर लक्ष्य केंद्रित केले आहे. आयडिया लॅब्स यांच्या सहकार्याने शेती क्षेत्रात पुणे विद्यापीठ नक्कीच उल्लेखनीय कार्य करेल.
> -डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Saamana: 29.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Work of Appreciation

## विद्यापीठात डिजिटल शेती विषयावरील केंद्र

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोवेशन, इनक्यूबेशन अँड एंटरप्राईजेस या विभागाने आयडियालॅब्स फ्युचरटेक व्हेंचर्स यांच्यासोबत करार केला असून 'उदयोन्मुख तंत्रज्ञानासह डिजिटल शेती' या विषयावरील सेंटर फॉर एक्सेलन्स विद्यापीठात सुरु करणार आहे.

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर व आयडियालॅब्स फ्युचरटेक व्हेंचर्सचे संस्थापक पंकज दिवाण यांनी याबाबतच्या 'लेटर ऑफ इंटेंट'वर स्वाक्षऱ्या केल्या. ऑनलाईन कार्यक्रमात कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, सेंटर फॉर इनोवेशन, इनक्यूबेशन अँड एंटरप्राईजेसच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, आंत्रप्रिनरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संचालक मंडळ सदस्य मिलिंद कांबळे उपस्थित होते.

'उदयोन्मुख तंत्रज्ञानासह डिजिटल शेती' यावर काम करणाऱ्या स्टार्टअप्स करिता या नवीन केंद्रातर्फे मार्गदर्शन केले जाणार आहे. या केंद्रात उदयोन्मुख तंत्रज्ञानावरील डिजिटल प्रयोगशाळेत आणि मेकर स्पेस यांचा समावेश असेल. याशिवाय हॅकेथॉन्स, ॲक्सेलरेटर असे इनोव्हेशन मधील इव्हेंट्सचे वर्षभर आयोजन केले जाणार आहे. सेंटर फॉर एक्सेलन्सतर्फे उदयोन्मुख तंत्रज्ञानाशी निगडित कौशल्य अभ्यासक्रम घेतले जातील.

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोवेशन, इनक्यूबेशन अँड एंटरप्राईजेस या विभागाद्वारे नवनवीन संशोधन करण्याकरिता आम्ही प्रामुख्याने शेती या विषयावर लक्ष्य केंद्रित केले आहे. आयडिया लॅब्स यांच्या सहकार्याने शेती क्षेत्रात विद्यापीठ उल्लेखनीय कार्य करू शकेल याची खात्री वाटते.
>
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले विद्यापीठ

**Lokmat: 31.10.2020**

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Work of Appreciation

पुढारी

# विषाणू संशोधन केंद्र महिनाभरात

■ लसनिर्मितीतील नामांकित कंपनीचे घेणार सहकार्य ■ केंद्रातील पायाभूत सुविधांचे काम प्रगतिपथावर



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कोरोनासह अन्य विषाणूंचे संशोधन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विषाणू संशोधन केंद्राचे काम प्रगतिपथावर आहे. संशोधन केंद्राबरोबर काम करण्यासाठी लस निर्मितीतील नामांकित कंपनीचे सहकार्य घेणार असून येत्या महिनाभरात केंद्र सुरू करणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली आहे.

डॉ. करमळकर म्हणाले, सेंटर फॉर मॉल्युकूलर डायग्रोस्टिक ॲण्ड रिसर्च सेंटरसाठी (विषाणू संशोधन केंद्र) आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे काम चालू आहे. केंद्रासाठी आवश्यक साधनसामग्री मागवण्यात आली आहे. शहरातील नामांकित लसनिर्मिती करणाऱ्या कंपनीला विषाणूंचा अभ्यास करून लसनिर्मिती करण्याचा अनुभव असल्यामुळे त्यांचे सहकार्य घेण्यासंदर्भातील सकारात्मक बोलणी सुरू आहेत. विषाणू संशोधनासाठी काही अन्य संस्थांचे सहकार्यदेखील घेण्यात येणार आहे.

### विद्यापीठाकडे विषाणू हाताळण्याची क्षमता येणार

विद्यापीठाकडे आतापर्यंत बॅक्टेरिया म्हणजे जीवाणूंच्या बाबतीतील सर्व क्षमता आहे. त्यासाठी बायोसेफ्टिलेव्हल दोनच्या प्रयोगशाळा विद्यापीठात उपलब्ध आहेत. परंतु विषाणूंना जर हाताळायचे असेल तर बायोसेफ्टिलेव्हल तीनच्या प्रयोगशाळा आवश्यक आहेत. विद्यापीठ जीवाणू हाताळण्याची क्षमता पुढे घेऊन जात विषाणू हाताळण्याची क्षमता प्राप्त करणार आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे कार्य ठरणार आहे.

पुढारी वॉच

त्याचबरोबर इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च अर्थात आयसीएमआरचे संचालक डॉ. रमण गंगाखेडकर निवृत्त झाले असून त्यांनादेखील केंद्राच्या कार्यात सहभागी करूनघेण्यातयेणारआहे. विषाणूवर संशोधन करण्यासाठी विशेष गरजांची पूर्तता करणारी इमारत आवश्यक आहे. त्या दृष्टीने काम करण्यात येत आहे. विषाणू एका खोलीतून दुसऱ्या खोलीत घेऊन जाण्यासाठी विशिष्ट प्रकारचे दरवाजे तयार करण्यात आले आहेत. त्याचबरोबर अन्य सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत. विषाणूचे संशोधन करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यासाठी भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था अर्थात आयसर या केंद्रात लोकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. केंद्रासाठी आवश्यक परवानगीचे काम अंतिम टप्प्यात असून महिनाभरात हे केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

### विषाणू संशोधन केंद्राचे फायदे...

१) साथीच्या काळात रोग्यांचे निदान करता येणार
२) विषाणू संशोधन करणाऱ्या मोजक्याच संस्थांच्या पंक्तीत विद्यापीठ बसणार
३) अनेक संशोधकांना विषाणूंवर संशोधन करण्याची संधी मिळणार
४) मायक्रोबायोलॉजी, बायोटेक्नोलॉजी विभागातील प्राध्यापकांना संशोधनासाठी मदत
५) विषाणूसंदर्भातील प्रशिक्षित मनुष्यबळ विकसित होण्यास मदत
६) परिसरातील वेगवेगळ्या विषाणूंवर संशोधन करण्याची संधी

My Pune Edition
Oct 31, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Health



# वर्क फ्रॉम होममुळे पाठीच्या, मानेच्या आजारात झाली वाढ!

## जागतिक मणकेविकार दिन : फिजिओथेरपिस्टकडून ऑनलाइन सल्ला; साधा मसाज घ्यावा, व्यायाम करावा

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : लॉकडाऊनमुळे सतत घरी राहून लोकांच्या शारीरिक हालचाली मंदावल्या. अनेकांचे वर्क फ्रॉम होम सुरू आहे. ऑफिसप्रमाणे बरेचदा घरी बैठक व्यवस्था करणे शक्य नसते. चुकीच्या पद्धतीने बसून तासनतास काम केल्याने मानेच्या आणि पाठदुखीच्या समस्या वाढल्या आहेत.

'पाठीच्या दुखण्यावर मसाज करतात. गंभीर त्रास असल्यास मसाज घेऊ नये. सौम्य प्रकारातील आर्थरायटीस किंवा वयस्कर व्यक्तींमध्ये पाठीचे दुखणे असेल तर साधा मसाज घ्यावा, व्यायाम करावा. त्यामुळे शरीरातील स्नायू मजबूत होण्यास मदत होते', असा सल्ला डॉ. अजय कोठारी यांनी दिला.

फिजिओथेरपिस्ट डॉ सौरभ साने म्हणाले, "या काळात मणक्याचे त्रास वाढल्याचे दिसत आहे. फिजिओथेरपिस्ट ऑनलाइन सेशन्स घेत आहेत. खुर्चीची उंची कमी असेल आणि टेबलाची उंची जास्त असेल, तर खुर्चीवर उशी ठेऊन बसावे. तुम्ही वापरत असलेला कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप डोळ्यांच्या समोर ठेऊन काम केल्यास उत्तम ठरेल.

लॉकडाऊनमध्ये घरून काम करताना दर ४५ मिनिटांनी जागेवरून उठून थोडे स्ट्रेचेस करा, पाणी प्या आणि पुन्हा कामाला बसा. काही वेळासाठी दीर्घ श्वास घ्या. कामाच्या वेळी मध्ये घेतलेल्या ब्रेकमध्ये ताडासनही फायदेशीर ठरेल."

45 मिनिटांनी जागेवरून उठून थोडे स्ट्रेचेस करा, पाणी प्या आणि पुन्हा कामाला बसा.

"मान आणि पाठदुखीच्या समस्या वाढत आहेत. रोज सूर्यनमस्कार, सीटअप्स, पुशअप्स तसेच प्राणायाम करावा. मान आणि पाठ दुखत असेल तर भुजंगासन, पवन मुक्तासन, नौकासन ही तीन आसने महत्त्वाची आहेत. घरात आपण कसेही बसून काम करतो. हे टाळण्यासाठी खुर्चीच्या थोडे टोकावर बसा आणि पायावर पाय ठेवा. यामुळे आपोआपच तुम्ही ताठ बसाल, पाठीत वाकणार नाही.

- डॉ अजय कोठारी, कन्सल्टंट स्पाईन सर्जन, संचेती रुग्णालय

"दोन महिन्यांपासून घरून काम करताना पाठ आणि मानेचा त्रास होत असेल तर तो नियमित व्यायामाने बरा होऊ शकतो. वेळेवर सावधगिरी बाळगल्यास अशा प्रकारची वेदना तीव्र होत नाही. खुर्चीवर बसताना खाली एखादी जाड उशी घ्यावी. त्याप्रमाणे लठ्ठपणा वाढणार नाही याचीही काळजी घ्यावी.

- प्रा. डॉ. श्रीनिवास शिंत्रे, ऑर्थोपेडिक्स विभागप्रमुख, बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

Lokmat:16.10.2020



## पुणे विद्यापीठात करोनाबाबत जनजागृती

पुणे, दि. २६ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये करोना विषाणू संसर्गाबाबत जनजागृती केली जाणार आहे. सुरक्षेचे नियम व अटी याची माहिती सोशल मीडिया आणि महाविद्यालयातील सूचना फलकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहविण्यात येणार आहे. करोनाविषयी घ्यावयाची खबरदारी यासंदर्भात उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाने विद्यापीठाला पत्र पाठवले होते.

Prabhat: 27.10.2020

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Health

पुढारी

# ऑनलाइन अभ्यासामुळे मुलांमध्ये वाढतोय 'मायोपिया'

## जवळचे दिसतेय, मात्र दूरचे दिसेना; आयटी कर्मचाऱ्यांमध्येही वाढतेय प्रमाण

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना, लॉकडाउन यामुळे शाळा बंद, मात्र शिक्षण (ऑनलाइन) चालू. पण, त्याचे डोळ्यांवर होणारे दुष्परिणाम आता दिसून येऊ लागले आहेत. ऑनलाइन शिक्षणासाठी मोबाईलचा वापर होत असल्याने मुलांमध्ये, तसेच घरीच लॅपटॉपवरून वर्क फ्रॉम होम करणा-या आयटी कर्मचा-यांमध्ये 'मायोपिया' (अंधुक दिसणे, दूरचे न दिसणे) या प्रकारच्या रुग्णांच्या संख्येत वेगाने वाढ होत असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे.

पुढारी विशेष

'मायोपिया' हा डोळ्यांचा एक दृष्टीदोष आहे. यामध्ये रुग्णाला जवळचे दिसते, मात्र दूरचे दिसत नाही. एखादी वस्तू डोळ्याजवळ आणल्याशिवाय ती स्पष्ट दिसत नाही. दूर असल्यास ती अंधुक दिसते. मोबाईल, लॅपटॉप, कॉम्प्युटर, आयपॅड यांसारख्या इलेक्ट्रॉनिक साधनांचा वाढता वापर यामुळे शहरातील मुले, आयटी कर्मचारी यांच्यामध्ये 'मायोपिया' होण्याची शक्यता अधिक असते. बऱ्याचदा लहान वयातच मोबाईल किंवा गॅझेटचा वापर केल्याने जवळच्या वस्तू सहज दिसतात. परंतु, दूरचे काहीच दिसत नाही, अशा समस्या सध्या वाढू लागल्या आहेत.

**काय आहे 'मायोपिया'**

मायोपिया एक दृष्टीदोष असून यामध्ये डोळ्यांच्या कार्यामध्ये दूरवरच्या वस्तूंमध्ये बदल दिसून येतात. डोळ्यांचे स्नायू कमकुवत होण्यामुळे हा आजार होतो. मायोपिया असणा-या प्रौढांमध्ये अंधुक दृष्टी, डोकेदुखी आणि रात्रीच्या वेळी वस्तू पाहण्यात अडचण यांसारखी लक्षणे दिसून येतात, तर मुले सतत डोळे मिचकावतात किंवा वारंवार डोळे चोळतात.

> ऑनलाइन अभ्यासामुळे, तसेच जास्त वेळ मोबाईल, लॅपटॉपवर घालवल्यामुळे मायोपिया होणा-या लहान मुलांचे प्रमाण वाढलेले आहे. दररोज २५ पैकी ३ ते चार रुग्ण या प्रकारचे आढळून येत आहेत. हा विकार टाळण्यासाठी इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा वापर मर्यादित करायला हवा. डोळ्यांपासून या वस्तूंचे अंतर योग्य हवे.
>
> - **डॉ. अनिल दुधभाते,** नेत्ररोगतज्ज्ञ तथा नेत्रशल्यचिकित्सक, सिंहगड रोड

> सध्या १०० पैकी ४ जणांना शारीरिक कारणांमुळे व १०० पैकी १२ जणांना जीवनशैलीशी संबंधित चुकीच्या पद्धतीमुळे 'मायोपिया' हा आजार होत असल्याचे दिसून येत आहे. जीवनशैलीत चांगला बदल करणे आणि मोठ्यांसह लहान मुलांनी गॅझेटचा वापर किती करावा, हे ठरवायला हवे. याची समस्या किती गंभीर आहे, यावर अवलंबून डॉक्टर शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला देतात.
>
> - **डॉ. हेमंत तोडकर,** नेत्ररोगतज्ज्ञ

**मायोपिया दूर करण्यासाठी हे करा**

- मोबाइल फोनचा वापर मर्यादित ठेवणे, व्यायाम करणे
- डोळ्यांची वेळोवेळी तपासणी करा
- इलेक्ट्रॉनिक साधनांवर काम करताना सलगपणे काम न करता अधून-मधून चक्कर मारावी.
- डोळ्यांची वारंवार उघडझाप करा
- धावणे, चालणे आणि योगा करणे फायदेशीर ठरू शकते.
- नियमित नेत्रतपासणीसाठी जा आणि योग्य चष्मा किंवा लेन्स



My Pure Edition
Oct 29, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During October 2020

Section: Research

## Agharkar Institute scientists claim discovery of 2 species of pipeworts

**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE** : Scientists from Agharkar research institute, Pune (ARI) discovered two new species of 'pipeworts' in the Western ghats of Maharashtra and Karnataka – one of the 35 hotspots of biological diversity in the world.

These new species belong to a plant group known for their varied medicinal properties. It completes its life cycle within a small period during monsoon, and exhibits the great diversity of the Western ghats, with 111 species in India.

Scientists from Agharkar Research Institute (ARI), Pune, found these new species while exploring the biodiversity of the ghats. They wanted to trace the evolutionary history of the genus Eriocaulon and made extensive efforts to collect as many species as possible from India, especially from the Western ghats.

"While critically examining our collection, we came across two accessions, which showed different floral characters than earlier known species. Hence, we studied morphology and its DNA to confirm the novelty," said Ritesh Kumar Choudhary, lead author of the study.

"Identification of the species belonging to Eriocaulon is very difficult as they all look similar, which is why the genus is often referred to as 'Taxonomist's nightmare'. Its tiny flowers and seeds make it difficult to distinguish between different species," Choudhary pointed out.




Two new species of 'pipeworts' discovered. HT PHOTO

> We came across two accessions, which showed different floral characters.
> **RITESH CHOUDHARY,** lead author of the study

> Future studies will focus on elucidating the evolutionary history.
> **ASHWINI DARSHETKAR,** Ph.D student

Their study was published in the journals 'Phytotaxa' and 'Annales Botanici Fennici'.

The one reported from Sindhudurg district of Maharashtra was named as Eriocaulon parvicephalum (due to its minute inflorescence size), and the other reported from Kumta, Karnataka was named as Eriocaulon karaavalense (named after Karaavali = coastal Karnataka region).

"Future studies will focus on elucidating the evolutionary history of the genus in India.

A thorough investigation of the phylogenetic relationship between all Indian species would also help in prioritizing the conservation of threatened species in India.

We are also trying to develop DNA barcodes, which will enable us to identify the species with just a portion of the leaf.," said PhD student Ashwini Darshetkar.

**Hindustan times: 5.10.2020**

## 2 new species of pipeworts found

### Scientists from Agharkar Research Institute made the discovery

Scientists from the Agharkar Research Institute in Pune have recently discovered two new species of pipeworts in the Western Ghats of Maharashtra and Karnataka, the Department of Science and Technology (DST) said on Sunday.

The species reported from Sindhudurg district of Maharashtra has been named Eriocaulon parvicephalum (due to its minute inflorescence size), and the other reported from Kumta, Karnataka is called Eriocaulon karaavalense (named after Karaavali, Coastal Karnataka region), it said.

Pipeworts (Eriocaulon) is a plant group which completes its life cycle within a small period during monsoon. It exhibits great diversity in the Western Ghats. PTI

**Pune mirror: 5.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Research

# सजीवांसाठी पृथ्वीपेक्षा योग्य २४ ग्रह

**वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीचे संशोधन**

**वृत्तसंस्था, वॉशिंग्टन**

पृथ्वी आता राहण्यायोग्य ग्रह राहिला नाही, अशा चर्चा होत असतात. पण त्याच वेळी भविष्याच्या दृष्टीने वेध घेण्यास शास्त्रज्ञांनी सुरुवात केली असून, सजीवांच्या वास्तव्यासाठी आपल्या सूर्यमालेबाहेर पृथ्वीपेक्षा अधिक योग्य २४ ग्रह असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. 'अॅस्ट्रोबायॉलॉजी' या नियतकालिकेत हे संशोधन प्रसिद्ध झाले असून, पृथ्वीपेक्षा वयाने अधिक, आकाराने मोठे, थोडे अधिक उष्ण आणि अधिक आर्द्रतायुक्त ग्रहांचा यात समावेश आहे.

आपल्या सूर्यापेक्षा जास्त काळ आयुष्यमान असलेल्या संथ गतीने बदलणाऱ्या ताऱ्यांभोवती भ्रमण करणाऱ्या ग्रहांवर सजीव अधिक सहजतेने वाढू शकतात, असे अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीच्या (डब्ल्यूएसयू) संशोधकांनी नमूद केले आहे. वास्तव्यासाठी सर्वाधिक योग्य असलेले हे सर्व २४ ग्रह पृथ्वीपासून १०० प्रकाशवर्षांपेक्षा जास्त अंतरावर आहेत, परंतु अभ्यासामुळे 'नासा'च्या जेम्स वेब स्पेस दुर्बिणीसारख्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भविष्यात या प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करता येईल, असे त्यांचे मत आहे.

सूर्य हे आपल्या सूर्यमालेचे केंद्र आहे. त्याचे आयुष्यमान १० अब्ज वर्षांपेक्षा कमी आहे. पृथ्वीवर कोणत्याही प्रकारचा सजीव अस्तित्वात येण्यास सुमारे चार अब्ज वर्षे लागली. या संशोधनादरम्यान सूर्यापेक्षा काहीसे थंड, लहान आणि कमी तेजस्वी ताऱ्यांचाही अभ्यास करण्यात आला. सर्वसाधारणपणे ताऱ्यांचे आयुष्य २० अब्ज ते ७० अब्ज वर्षे असते. त्यामुळे अशा ताऱ्यांभोवती फिरणाऱ्या ग्रहांचा शोध घेतला गेला.

पृथ्वीपेक्षा दहा टक्क्यांपेक्षा मोठे असणाऱ्या ग्रहांवर जमीन अधिक असू शकेल. पृथ्वीपेक्षा सुमारे पाच अंश सेल्सिअस अधिक तापमान योग्य ठरू शकेल, असे या संशोधनात नमूद केले आहे.

**'जीवनासाठी अनुकूल स्थिती'**

प्रातिनिधिक छायाचित्र



'दुसऱ्या पृथ्वी'च्या शोधात अडकून न पडण्याची काळजी घेत आम्हाला अशा काही ग्रहांवर लक्ष केंद्रित करावे लागेल, जिथे गुंतागुंतीची रचना असलेल्या सजीवांसाठी सर्वांत आशादायक परिस्थिती आहे. कारण पृथ्वीपेक्षा जीवनासाठी योग्य असे ग्रह असू शकतात. संशोधकांनी निवास करण्यासाठीचे योग्य निकष ओळखून चांगल्या ग्रहांसाठी आपल्या सूर्यमालेपलीकडे ज्ञात ४,५०० ज्ञात ग्रहांमधून शोध घेतला. निवास करण्यायोग्य याचा अर्थ या ग्रहांवर निश्चितच जीवन असेल, असा नाही, तर जीवनासाठी अनुकूल स्थिती आहे,' असे डब्लूएसयू आणि बर्लिनमधील टेक्निकल युनिव्हर्सिटीतील डर्क शल्झ-माकुच म्हणाले.

**Maharashtra times: 6.10.2020**

## ऑल्टर, राइस आणि हॉटन वैद्यकशास्त्रातील पुरस्काराचे मानकरी

# 'हेपॅटायटिस सी' विषाणू संशोधनास नोबेल

**वृत्तसंस्था, स्टॉकहोम**

**यकृताचा कर्करोग** आणि यकृताची सूज या रोगांना कारणीभूत ठरणाऱ्या 'हेपॅटायटिस सी' या विषाणूच्या शोधाबद्दल अमेरिकी शास्त्रज्ञ हार्वे जे. ऑल्टर, चार्ल्स एम. राइस आणि ब्रिटिश शास्त्रज्ञ मायकेल हॉटन यांना वैद्यकशास्त्रातील नोबेल पुरस्कार सोमवारी संयुक्तपणे जाहीर करण्यात आला.

ऑल्टर, राइस आणि हॉटन यांच्या कार्यामुळे रक्तातील 'हेपॅटायटिस सी' या रोगाचे मुख्य कारण स्पष्ट होण्यास मदत झाली. त्याचबरोबर चाचण्या आणि औषधे विकसित करून लाखो लोकांचे प्राण वाचवणे शक्य झाले, अशा शब्दांत नोबेल समितीने शास्त्रज्ञांचा गौरव केला. वैद्यकशास्त्रातील या ऐतिहासिक शोधाबद्दल नोबेल समितीने तिन्ही शास्त्रज्ञांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. ''त्यांच्या शोधामुळे 'हेपॅटायटिस सी' विषाणूविरोधी औषधांची निर्मिती वेगाने करता आली. हा रोग आता बरा करता येतो आणि जगातून या विषाणूचे समूळ उच्चाटन होऊ शकते,'' अशी आशा नोबेल समितीने व्यक्त केली.

ऑल्टर, राइस आणि हॉटन यांच्या शोधामुळे 'हेपटायटिस सी'च्या रक्तचाचण्या उपलब्ध झाल्या. चाचण्यांमुळे जगाच्या अनेक भागांमध्ये रक्तसंक्रमणातून होऊ शकणारा रोगाच्या प्रादुर्भावाचा धोका संपुष्टात आला आणि जागतिक आरोग्यात सुधारणा झाली, असेही नोबेल समितीने नमूद केले.



■ हार्वे जे. ऑल्टर ■ मायकेल हॉटन ■ चार्ल्स एम. राइस

**लाखो लोकांसाठी जीवनदान :** जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार जगात दरवर्षी सात कोटी लोकांना 'हेपॅटायटिस सी' विषाणूचा संसर्ग होतो, तर या रोगामुळे चार लाख लोकांचा मृत्यू होतो. या विषाणूच्या संसर्गानंतर यकृताचा कर्करोग होतो किंवा यकृताला सूज येते. हे दोन्ही आजार गंभीर मानले जातात.

ऑल्टर, राइस आणि हॉटन यांच्या ऐतिहासिक शोधामुळे प्रथमच 'हेपॅटायटिस सी' मुळे होणाऱ्या यकृताच्या रोगांवर उपचार करणे शक्य झाले आणि लाखो लोकांचे प्राण वाचवता आले. - नोबेल पुरस्कार समिती

epaper.loksatta.com

लोकसत्ता Tue, 06 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55463138

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Research

पुढारी

## इमॅन्युएल, जेनिफर डोडना यांना रसायनशास्त्राचे नोबेल



इमॅन्युएल कार्पेंटिएर, जेनिफर ए. डोडना

### जनुकीय बदलांतून गंभीर आजारांवर उपचार शक्य केल्याबद्दल सन्मान

**स्टॉकहोम : वृत्तसंस्था**

रसायनशास्त्रातील संशोधनात महिलांनी बाजी मारली असून या विद्या शाखेसाठीचे यंदाचे नोबेल, फ्रेंच मूळ असलेल्या जर्मनीच्या इमॅन्युएल कारपेंटिएर आणि अमेरिकेच्या जेनिफर ए. डोडना यांना जाहीर झाले आहे. दोन्ही जर्णींच्या संशोधनामुळे आगामी काळात डीएनएमध्ये अपेक्षित बदल घडवून गंभीर आजारांवर उपचार करणे शक्य होऊ शकेल. मानवी प्रगतीच्या इतिहासात हे संशोधन एक महत्त्वाचा टप्पा ठरले आहे, असे स्विडनच्या नोबेल निवड समितीने म्हटले आहे.

जनुकातून विशिष्ट घटक काढून घेऊन जनुकीय संरचनेत बदल करण्याची पद्धत (जेनेटिक सिझर) या दोघींनी शोधून काढली. त्यामुळे प्राणी, वनस्पतींच्या जनुकीय संरचनेत बदल करता येणे शक्य झाले आहे. कारपेंटिएर या बर्लिन (जर्मनी) येथील 'मॅक्स प्लांक युनिट फॉर सायन्स ऑफ पॅथोजन्स'च्या संचालिका आहेत, तर डोडना या कॅलिफोर्निया विद्यापीठात (अमेरिका) कार्यरत आहेत. याआधी ५ ऑक्टोबर रोजी औषधीशास्त्र तर ६ ऑक्टोबर रोजी पदार्थ विज्ञान या विषयांतील नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आलेले आहेत.

**जनुक तंत्रज्ञानात मोलाचा वाटा**

ईमॅन्युएल कारपेंटिएर आणि अमेरिकेच्या जेनिफर ए. डोडना यांनी जिनोम तंत्रज्ञानांतर्गत CRISPR/Cas9 विकसित केले असून, त्याला जेनेटिक सिझर (जनुकीय कात्री) हे नाव देण्यात आले आहे. या तंत्रज्ञानामुळे जनावरे, वनस्पती आणि सूक्ष्म जीवांमधील डीएनएत बदल घडवून आणले जाऊ शकतील. कर्करोगासह अनेक गंभीर तसेच आनुवंशिक आजारांवर उपचार, प्रतिबंध घालणे आगामी काळात शक्य होणार आहे.

**रसायनातील नोबेलबद्दल...**

- १९०१ ते २०१९ दरम्यान या विद्या शाखेसाठी १११ नोबेल पुरस्कार दिले गेले.
- आजवर ५ महिलांना हा पुरस्कार मिळाला आहे.
- फ्रेडरिक सँगर यांना दोनदा (१९५८ व १९८०) हा पुरस्कार मिळाला.
- फ्रेडरिक ज्युलियेट यांना ते ३५ वर्षांचे असतानाच नोबेल मिळाले.
- फ्रेडरिक यांना मेरी क्युरी यांची मुलगी आयरिन हिच्यासह हा पुरस्कार विभागून मिळाला होता.
- जॉन बी गुडइनफ यांना हा पुरस्कार मिळाला तेव्हा त्यांचे वय ९७ होते.

Pune Edition
Oct 8, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

### आत्मानुभवांना विश्वरूप देणाऱ्या कवयित्रीचा सन्मान

## लुईस ग्लुक यांना साहित्याचे नोबेल

**एपी, स्टॉकहोम**

**साधेपणात सौंदर्याचा** शोध घेत आत्मकाव्याला वैश्विक परिमाण देणाऱ्या अमेरिकी कवयित्री लुईस ग्लुक यांना साहित्याचे नोबेल पारितोषिक जाहीर करण्यात आले.

१९६० च्या दशकात साहित्य आणि पत्रकारितेत बंडखोरी आणि नवतेचे धुमारे फुटत असताना आपल्या आयुष्यातील घटनांची काव्यमाला रचणाऱ्या महत्त्वाच्या कवयित्री म्हणून ग्लुक यांची ओळख. डझनांहून अधिक काव्यग्रंथांची निर्मिती करणाऱ्या ग्लुक यांना यापूर्वी कवितेसाठी पुलित्झरसह सारे महत्त्वाचे अमेरिकी पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या कविता आणि निबंध यांनी दोन पिढ्यांना जीवनाकडे पाहण्याची नवी सौंदर्यदृष्टी दिली.

स्वीडिश अकादमीचे स्थायी सचिव मॅट्स माम यांनी गुरुवारी स्टॉकहोममध्ये याबाबत घोषणा केली. या पारितोषिकाची रक्कम १० दशलक्ष क्रोनर, म्हणजे १.१ अब्ज अमेरिकी डॉलरहून अधिक आहे.





१९६८ साली 'फर्स्टबॉर्न' या संग्रहाद्वारे त्यांनी अमेरिकी काव्यवर्तुळात प्रवेश केला. या काव्यसंग्रहाने समीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. १९७५ साली आलेल्या त्यांच्या 'द हाऊस ऑन मार्शलॅण्ड' पुस्तकानंतर त्या देशातील महत्त्वाच्या कवयित्री म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. सध्या त्या येल विद्यापीठामध्ये साहित्याच्या प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

नोबेल पारितोषिकाच्या ११२ वर्षांच्या इतिहासात साहित्याचा पुरस्कारावर कादंबरीकारांचे वर्चस्व राहिले. अत्यंत थोड्या अमेरिकी कवींना हे पारितोषिक मिळाले. नोबेल पारितोषिक मिळविणाऱ्या त्या १६ व्या महिला साहित्यिक आहेत.

न्यूयॉर्कमध्ये १९४३ साली जन्मलेल्या ग्लुक यांनी आपल्या कौटुंबीक सुख-दुःखांतील साध्या प्रसंगांनाही काव्यरूप दिले. तिरकस दृष्टीने जगण्यातील सारा व्यवहार अवलोकन करीत त्यांनी बालपण, तारुण्याला ग्रीक मिथकांशी जोडत काव्यरचना केल्या. बालपणी अग्निमांद्य (ॲनोरेक्सिया) या भूक मंदावणाऱ्या आजाराचा सामना करताना त्यांच्या कवितेचा आरंभ झाला. काव्यातून बोचरा विनोद निर्माण करीत त्यांनी आपल्या शैलीला धार केली.

९/११ च्या हल्ल्यानंतर अमेरिकन नागरिकांच्या मनाची भयग्रस्त अवस्था त्यांनी 'ऑक्टोबर' या दीर्घकाव्यातून मांडली. सहा भागांमध्ये विभागलेल्या या काव्यामध्ये मिथकांचा वापर करून आधुनिक जगण्याचे प्रतिबिंब मांडले. कवितेचे सौंदर्य उलगडून सांगणारे त्यांचे निबंधग्रंथही लोकप्रिय झाले आहेत. त्यांच्या सहा दशकातील काव्यसेवेचा गौरव म्हणून नोबेल पारितोषिकासाठी निवड करण्यात आली.

**काव्यविशेष... :** कौटुंबिक नातेसंबंध, लादलेले एकटेपण, घटस्फोट आणि मृत्यू या आयुष्यातील घटकांचा ग्लुक आपल्या काव्यकलाकृतींसाठी वापर करतात. त्यांच्या कवितेत आत्मवृत्ताच्या छटा अतिशय सुंदररीत्या चितारल्या जातात, असे समीक्षकांनी गौरविले आहे. त्यांच्या कविता या ग्रीक मिथकांना जगण्यातील घटकांशी जोडत असल्याने वैश्विक ठरतात, असे नोबेल समितीने म्हटले आहे.

लोकसत्ता Fri, 09 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55528383

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Research

{ BENGAL VARSITIES' RESEARCHERS } FROM SEDIMENTARY BED IN CHOTANAGPUR PLATEAU

## Scientists find dragonfly fossil, 2.5mn years old, in J'khand

**Joydeep Thakur**

joydeep.thakur@htlive.com

**KOLKATA:** A team of scientists from West Bengal has discovered the first dragonfly fossil found in India in Jharkhand's Latehar district, according to a study published in Current Science. The fossil is said to be at least 2.5 million years old.

"This is the first dragonfly fossil from India. It is a well-preserved one. The fossil belongs to the late Neogene period which dates between 2.5 million and five million years ago," said Subir Bera, a professor with the Centre for Advanced Study in the botany department of Calcutta University, and one of the authors of the study.

The study, published in the October 10 edition of the journal said the dragonfly fossil has a well-preserved head, thorax and a long cylindrical abdomen with terminalia (nether regions) and four wings with longitudinal veins, cross-veins and a characteristic small pterostigma (a pigment spot) at the apex. The fossil is around 3 cm long and has a wing-span of around 2.5 cm. This is much smaller than the fossils of giant dragonflies, which have been found elsewhere in the world, it said.

Experts said the wing-span of one of the giant dragonflies, *Meganeuropsis permiana*, measured around 2.5 feet; it was found by Frank Carpenter in Elmo, Kansas in the US in 1939. It dated back to the Permian era which made it around 300 million years old. In 2013, a giant, well-preserved dragonfly fossil, dating back 200 million years, was discovered in China.

The researchers from four universities in West Bengal were looking for fossils in the sediments of the Chotanagpur plateau for almost a year when, in January, they found the dragonfly fossil at a depth of around 5m below the soil.



The fossil is around 3cm long and has a wingspan of around 2.5cm, much smaller than the fossils of giant dragonflies. BY SPECIAL ARRANGEMENT

**Hindustan times: 10.10.2020**

पॉल मिलग्रोम आणि रॉबर्ट विल्सन मानकरी

## लिलाव सिद्धांतातील सुधारणांसाठी नोबेल

**वृत्तसंस्था, स्टॉकहोम**

**लिलाव सिद्धांतातील** सुधारणा आणि नवीन लिलाव पद्धतींच्या आकृतिबंधांच्या संशोधनासाठी अमेरिकेचे पॉल आर. मिलग्रोम आणि रॉबर्ट बी. विल्सन यांना यंदाचा अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

रॉयल स्वीडिश विज्ञान अकादमीचे महासचिव गोरान हॅन्सन यांनी स्टॉकहोम येथे पुरस्काराची घोषणा केली. हा पुरस्कार ११ लाख डॉलर्सचा आहे. जागतिक महायुद्धानंतर जगात प्रथमच करोनामुळे मोठी मंदी असताना अर्थशास्त्राचे नोबेल जाहीर करण्यात आले.

नोबेल निवड समितीचे प्रमुख पीटर फ्रेडरिकसन यांनी सांगितले, की यंदाच्या नोबेल विजेत्यांनी नवे आर्थिक सिद्धांत शोधून काढले आहेत. ते लिलाव पद्धतींबाबत असून त्यांचा प्रत्यक्ष वापर करण्यात आला. जगभरात त्यांचा वापर किफायतशीर ठरल्याचे दिसून आले. त्यांच्या या संशोधनातून समाजाला मोठा लाभ झाला आहे. १९९४ मध्ये अमेरिकेत रेडिओ लहरींचा लिलाव करताना या दोघांनी शोधलेल्या लिलाव पद्धतीचा वापर करण्यात आला होता. त्यांच्या या अचूक पद्धतीमुळे करदात्यांना रेडिओ लहरींच्या विक्रीतून फायदा झाला, कारण ते लिलाव योग्य किमतीला झाले. त्याचबरोबर मोबाइल सेवा पुरवठादार कंपन्यांचाही फायदा झाला.

आल्फ्रेड नोबेल यांच्या सन्मानार्थ दिल्या जाणाऱ्या अर्थशास्त्राच्या नोबेलचे नाव 'स्वेरिजस रिक्सबँक प्राइज' असे आहे. अर्थशास्त्रात नोबेल पुरस्कार १९६९मध्ये सुरू करण्यात आला. गेल्या वर्षी मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे दोन आणि हार्वर्ड विद्यापीठाचा एक अशा तीन संशोधकांना जगातील दारिद्र्य कमी करण्यासाठी संशोधन केलेल्या उपायांसाठी नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. त्यात भारतीय वंशाचे अभिजित बॅनर्जी, इस्तर डफलो, मायकेल क्रेमर यांचा समावेश होता.

### पॉल आर. मिलग्रोम



- जन्म १९४८, डेट्रॉइट, अमेरिका.
- पीएचडी १९७९ - स्टॅनफर्ड विद्यापीठ.

### रॉबर्ट बी. विल्सन



- जन्म १९३७, जीनिव्हा.
- डीबीए १९६३- हार्वर्ड विद्यापीठ (केंब्रिज, अमेरिका), स्टॅनफर्ड विद्यापीठात व्यवस्थापन विषयाचे मानद प्राध्यापक.

### संशोधन काय?

मिलग्रोम आणि विल्सन हे दोघेही कॅलिफोर्नियाच्या स्टॅनफर्ड विद्यापीठात प्राध्यापक आहेत. त्यांनी मांडलेल्या लिलाव सिद्धांतामुळे लिलावाची प्रक्रिया सुधारली. त्यांनी लिलाव पद्धतीचे नवे आकृतिबंध तयार करताना वस्तू आणि सेवा विक्रीचे नवे मार्ग दाखवले, जे पारंपरिक लिलाव पद्धतीत अशक्य होते.

लोकसत्ता Tue, 13 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55629437

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Research

पुढारी

# पुण्यातील संशोधकांनी शोधल्या विंचवाच्या दोन नवीन प्रजाती



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुणे शहरातील इनहर (इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरल हिस्ट्री एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च ) या संशोधन संस्थेतील प्राणी शास्त्रज्ञांनी कोल्हापूर व रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमेवरील अंबा घाट आणि पुणे जिल्ह्यातील वरंधा घाट भागातून विंचवाच्या दोन नवीन जाती शोधून काढल्या आहेत.

## इनहर संस्थेच्या शास्त्रज्ञांचे यश

डॉ. आनंद पाध्ये डॉ. देशभूषण बस्तावडे, शौरी सुलाखे, शुभंकर देशपांडे, या प्राणी शास्त्रज्ञांच्या टीमने आपला हा शोध निबंध आंतरराष्ट्रीय स्कॉर्पिओलॉजीच्या जर्नलला पाठवला होता. या संशोधनाची दखल घेत या प्रजातींना मान्यता देण्यात आली आहे. विंचवाच्या या जाती 'कायरोमॅचिटस' या कुळातील आहेत. त्यांना अनुक्रमे 'कायरोमॅचीट्स पराक्रमी' आणि 'कायरोमॅचीट्स रामदासस्वामी' अशी नावे देण्यात आली आहेत.

आंबा घाटातून संशोधित केलेल्या 'पराक्रमी' या प्रजाती नामाबद्दल अधिक सांगताना मुख्यसंशोधक शौरी सुलाखे यांनी सांगितले की, हे विंचू आम्ही सर्वप्रथम जिथे पाहिले ती जागा पावन खिंडीपासून अगदी जवळ आहे. पावनखिंडीचा गौरवशाली इतिहास मराठी माणसासाठी सदैव वंदनीय आहे. म्हणून तिथल्या पराक्रमाच्या आदरा प्रित्यर्थ आम्ही या विंचवाचे नाव 'पराक्रमी' असे ठेवले. वरंधा घाटालासुद्धा ऐतिहासिक महत्त्व आहे. घाटामध्ये कावळ्या नावाचा किल्ला आहे. तसेच, घाटाच्या पायथ्याला शिवथरघळ ही रामदासस्वामींच्या वास्तव्याने पुनित झालेले ठिकाण आहे. म्हणून या स्थानावरून प्रेरित होऊन आम्ही या प्रजातीला 'रामदासस्वामी' असे नाव दिले आहे.

या दोन्ही प्रजातींवरआधारित संशोधन निबंध 'युस्कॉर्पियस' या अमेरिकन वैज्ञानिक नियतकालिकाच्या ऑक्टोबर महिन्याच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. या संशोधन मोहिमेत सहसंशोधक निखील दांडेकर यांच्या सोबतच मकरंद केतकर, सृष्टी भावे, चैतन्य रिसबूड व अक्षय मराठे यांचे सहकार्य लाभले.



My Pune Edition
Oct 15, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# चिंचवडमध्ये सापडले तीन दुर्मीळ शिलालेख

**पिंपरी, ता. २२ :** चिंचवड गावातील श्री मोरया गोसावी समाधी मंदिर परिसरातील गांधी पेठ सिद्धेश्वर मंदिर गाभारा, नंदी मंडप व नारायण महाराज मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावर मध्ययुगीन काळातील शिलालेख सापडले आहेत. याचा उल्लेख पुणे जिल्ह्याच्या जुन्या गॅझेटमध्येही आढळला आहे. छत्रपती शाहू महाराज थोरले यांच्या कारकीर्दीतील हे बांधकाम असून, १६ व्या शतकातील हे शिलालेख असल्याचे वीरगळ व स्मृतिशिळा अभ्यासक अनिल दुघाणे यांनी संशोधनातून सांगितले आहे.



चिंचवडगाव : सिद्धेश्वर मंदिराच्या बाहेर नंदी मंडपावर कोरलेला प्राचीन शिलालेख.

नारायण महाराज मंदिराचे काम कार्तिक शुद्ध १० शके १६४१, १० नोव्हेंबर १७१९ ते आश्विन शुद्ध ३ शके १६४२ ते २३ सप्टेंबर १७२० या कालावधीत दहा महिने १३ दिवसांत पूर्ण झाल्याचा उल्लेख शिलालेखावर आहे. या ठिकाणी गणपती कोरलेला आहे. त्यावरील भागात हा शिलालेख आहे. सिद्धेश्वर मंदिराच्याबाहेर गाभाऱ्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर दुसरा शिलालेख कोरलेला आहे. हे मंदिर सध्या विठ्ठल मंदिर म्हणून ओळखले जाते. रोघोरुद्र मेकुल यांनी आश्विन शके १६७८ ते १६७९ मध्ये मंदिराचे काम केल्याचा उल्लेख आहे. हा चार ओळींचा शिलालेख असून काही अक्षरे वगळलेली आहेत. मात्र, बांधकाम पूर्ण झाल्याचा उल्लेख यामध्ये आहे.

सिद्धेश्वर मंदिराच्या बाहेर असलेल्या नंदी मंडपावर तिसरा शिलालेख आहे. होनराव यांनी आश्विन वैद्य १३ शके १७२४ दुंदंभ संवत्सरात नदी मंडप बांधला. नानासाहेब पेशवेंच्या काळातील हे मंदिर आहे. या ठिकाणी जुनी टांकसाळही होती. मात्र, ती नष्ट झाली आहे. मंदिराच्या रंगकामात ही अक्षरे बुजलेली होती. रंग पूर्णपणे घासून काढण्यात आल्यानंतर हे शिलालेख आढळून आले आहेत.

**Sakaal: 23.10.2020**

*News Paper Clippings During October 2020*

Section: Research

# उत्तर-पश्चिम घाटात काटेचेंडू वनस्पतीच्या नव्या प्रजातीचा शोध

## 'इचिनॉप्स सह्याद्रीकस' असे नामकरण

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** महाराष्ट्रातील उत्तर पश्चिमी घाटामधून काटेचेंडू वनस्पतीच्या नव्या प्रजातीचा शोध लावण्यात संशोधकांना यश आले आहे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, साठ्ये महाविद्यालय तसेच इटलीतील कॅमेरिनो विद्यापीठातील संशोधकांनी हा शोध लावला आहे. 'इचिनॉप्स सह्याद्रीकस' असे या प्रजातीचे नामकरण करण्यात आले आहे. नॉर्डिक जर्नल ऑफ बॉटनी या आंतरराष्ट्रीय संशोधनपत्रिकेत हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

उत्तर पश्चिम घाटाच्या स्थानिक जैवविविधतेबाबतच्या 'उत्तर पश्चिमी घाटातील उंच पठारांच्या स्थानिक जैवविविधतेचे मूल्यांकन' या प्रकल्पावर काम करताना क्षेत्रीय सर्वेक्षणादरम्यान संशोधकांना ही प्रजाती सापडली. या प्रकल्पाचे नेतृत्व बीएनएचएसचे संवर्धन अधिकारी हर्षल भोसले यांनी केले आहे.

या संशोधन चमूत वनस्पतीशास्त्रज्ञ सुशांत मोरे, कॅमेरिनो विद्यापीठातील संशोधक फॅबिओ कॉन्टी यांचा समावेश आहे. मुंबईतील बृहद भारतीय समाजाचे श्रीपाद हळबे यांनी



या प्रकल्पासाठी अर्थसहाय्य केले. या चमूने आतापर्यंत भारतातील महाराष्ट्र, गुजरात तसेच कर्नाटक राज्यात शोधमोहीम राबवली. ऑगस्ट २०१९ मध्ये उत्तर पश्चिम घाटासाठीच नवे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही प्रजाती नवीन असल्याचे संशोधन चमूला आढळले.

ही नवी प्रजाती वनस्पतींच्या 'इचिनॉप्स' कुळातील आहे. जगभरात या कुळात १३० प्रजाती सापडतात. त्यापैकी पाच प्रजाती देशात आणि त्यातील दोन महाराष्ट्रात आढळतात.

महाराष्ट्रात ही प्रजाती नव्याने सापडल्यामुळे या जागेवरून 'इचिनॉप्स सह्याद्रीकस' असे त्याचे नामकरण करण्यात आले आहे. नाशिकमधील साल्हेरच्या उत्तरेपासून ते दक्षिणेस कोल्हापूरपर्यंत ही प्रजाती प्रदेशनिष्ठ आहे. जगभरात ती केवळ याच भागात आढळते. सह्याद्री खोऱ्यातील पुरातन किल्ल्यांवरील उतारांवर ती आढळते. ही प्रजाती साधारण २०० सेंटीमीटरपर्यंत वाढते आणि त्याचा व्यास गोलाकार चेंडूसारखा नऊ सेंटीमीटरचा असतो. काटेचेंडू प्रजातीतील सर्वात मोठा हा फुलोरा आहे. पावसाळ्यात जून ते सप्टेंबर महिन्यादरम्यान ही वनस्पती उगवते. दरम्यानच्या काळात त्यांची मुळे जमिनीतच असतात. नोव्हेंबरमध्ये त्यांना फुलांचा बहर येतो आणि डिसेंबरमध्ये त्यांना फळ येतात. फुलांना गोड सुवास असल्याने कीटक आणि विशेषकरून मधमाशा आकर्षित होतात.

घाटांमधील रस्ता रुंदीकरण, किल्ल्यांची दुरुस्ती यासारख्या विकास प्रकल्पांचा विघातक परिणाम या प्रजातीवर होऊ शकतो. ही प्रजाती केवळ महाराष्ट्रातच सापडत असल्याने तिच्या संवर्धनाची गरज असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे.

लोकसत्ता Tue, 27 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55941518

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Miscellaneous

## नानासाहेब पेशव्यांच्या काळाचा वेध

### डॉ. उदय कुलकर्णी यांच्याकडून अभ्यासपूर्ण दस्तावेज

सकाळ EXCLUSIVE

गणाधीश प्रभुदेसाई : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ३० : "बचेंगे तो और भी लडेंगे" या उद्गारांमुळे इतिहासात आजरामर झालेल्या दत्ताजी शिंदे यांना नानासाहेब पेशवे यांनी पाठविलेले स्वहस्ताक्षरातील पत्र प्रथमच उजेडात आले आहे. 'The Extraordinary Epoch Of Nanasaheb Peshwa' या डॉ. उदय कुलकर्णी यांच्या पुस्तकात ते समाविष्ट करण्यात आले आहे.

अठराव्या शतकातील मध्यास भारतात घडलेल्या अनेक राजकीय व लष्करी हालचालींचे संदर्भासह विवरण डॉ. कुलकर्णी लिखित पुस्तकातून पाहायला मिळते. या पुस्तकाचे प्रकाशन मध्यप्रदेशमधील मंत्री यशोधरा राजे शिंदे यांच्या हस्ते नुकतेच झाले. १७३६ ते १७६१ या पेशवे कालखंडातील हिंदुस्थान कसा होता, हे अभ्यासण्यासाठी या पुस्तकाचा उपयोग होणार आहे.

मराठा साम्राज्याचा प्रसार अटकपासून कावेरीपर्यंत व गुजरातपासून बंगालपर्यंत झाला. मराठ्यांच्या या काळातील उलाढाली व्यतिरिक्त युरोपीयनांचा कर्नाटक व बंगालमधील प्रवेश यावर देखील या पुस्तकात बरीच माहिती वाचायला मिळते. मराठी, इंग्रजी, फार्सी, पोर्तुगीज व फ्रेंच साधनांचा उपयोग डॉ. कुलकर्णी यांनी या पुस्तकासाठी केला आहे. डॉ. कुलकर्णी यांचे अठराव्या शतकावरील हे सहावे पुस्तक आहे. भारतीय इतिहास व विशेषतः अठराव्या शतकातील मराठा इतिहासावर त्यांनी अभ्यास केला आहे. डॉ. कुलकर्णी यांनी मार्च २०१८ मध्ये पुस्तकासाठी अभ्यासाला सुरुवात केली. मे २०१८नंतर त्यांनी दुसरे पुस्तक हाती घेतल्याने या पुस्तकाचे काम थांबले. पण नंतर फेब्रुवारी २०२०मध्ये काम पुन्हा सुरू करून ते पूर्ण केले व पुस्तक इतिहास अभ्यासकांसाठी उपलब्ध केले. अभ्यासकांसाठी हा एक संदर्भग्रंथ असून ५००पानी पुस्तकात तब्बल ३८ प्रकरणे आहेत. २७ नकाशे, छायाचित्रे, पत्रे याचाही वापर करून परिपूर्ण माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. नानासाहेब पेशव्यांच्या काळातील वादग्रस्त व संघर्षमय प्रकरणांचा उल्लेखही पुस्तकात आहे. या पुस्तकाच्या निर्मितीसाठी कर्नाटक, तमिळनाडू, बंगाल व इंग्लंडमध्येही प्रवास करावा लागला.

**पत्रात काय आहे?**

नानासाहेब पेशवे यांनी दत्ताजी शिंदे यांना १७५७ मध्ये लिहिलेले स्वहस्ताक्षरातील पत्र डॉ. उदय कुलकर्णी यांनी लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीमधून मिळविले आहे. त्यात पेशवे दत्ताजी शिंदे यांना "इब्राहिम खान गारदी यास नोकरीवर ठेवून घ्यावे," असे लिहिताना दिसतात. नंतर इब्राहिम खान पानिपत येथे मराठा सैन्याबरोबर तोफखाना घेऊन गेला होता.





**राजकारणात बरोबर, चूक काही नसतं. म्हणून या पुस्तकात पेशवेकालीन इतिहासातील घटनांवर कोणताही निष्कर्ष काढलेला नाही. ज्या घटना घडल्या त्यांची पार्श्वभूमी, कारणे व इतर माहिती दस्तावेजाचा संदर्भ देऊन दिलेली आहे. अभ्यासकांनी त्याच्याआधारे निष्कर्ष काढावा.**
**- डॉ. उदय कुलकर्णी**, लेखक



नानासाहेब पेशवे यांनी दत्ताजी शिंदे यांना लिहिलेले पत्र.

**Sakaal: 1.10.2020**

## आता हिंदीतही 'ळ' चा होणार वापर!

**पिंपरी** : टिळक, लोणावळा, खंडाळा, वरळी, बेळगाव असे 'ळ' चा समावेश असलेले शब्द हिंदीत 'ल' वापरून लिहिले जातात. त्यांचा उच्चारही लोणावला, खंडाला, वरली, बेलगाव असा केला जातो. मात्र आता 'ळ' मूळरूपात हिंदीतही वापरण्यात येणार आहे. याबाबतचा केंद्र सरकारच्या हिंदी विभागाने रेल्वे, बँकांसह सर्व सरकारी कार्यालयांना पाठविला आहे. यासाठी रावेतमधील भाषा अभ्यासक प्रकाश निर्मळ यांनी पाठपुरावा केला आहे. त्यांनी केंद्र सरकारशी दोन वर्ष पाठपुरावा केला. अखेर त्यांना यश आले आहे.

हिंदीत 'ळ' चा वापर व उच्चार असताना ल वापरला जातो. तो 'ळ' त वापरावा यासाठी केंद्रीय गृहमंत्रालयाचा राजभाषा विभाग, उच्च शिक्षण मंत्रालयाचा हिंदी विभाग, प्रसारण मंत्रालय, पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रपती व राज्यपाल यांच्यासह विविध भाषांमधील विद्वान आणि राजकीय नेत्यांना वारंवार पत्र लिहून, फोन करून व प्रत्यक्ष भेटीद्वारे निर्मळ यांनी सातत्याने पाठपुरावा केला. विविध लेख व व्याख्यानातून राजभाषा हिंदीत 'ळ' ऐवजी लचा वापर चुकीचे असल्याचे पुराव्यांसह त्यांनी पटवून दिले आहे.

**Kesari: 1.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Miscellaneous

# तिलक, बालासाहेब असे लिहू नका

## हिंदीतही 'ळ' मुळाक्षर रुजविण्यासाठी भाषातज्ज्ञांचे आवाहन

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

हिंदीमध्ये 'ळ' मुळाक्षर लिहिण्यामुळे मराठीसह इतर भाषेतील मूळ शब्द हिंदीमध्ये स्वीकारले जातील. भाषा समृद्ध होण्याच्या दृष्टीने हा चांगला बदल आहे. हिंदीमध्ये 'ळ' हे मुळाक्षर रुजवायचे असेल, तर लोकांनी लिहिण्या-बोलण्यात अक्षराचा वापर वाढला पाहिजे.

'ळ'चा 'ल' करून लोकमान्य टिळक हे नाव हिंदीत लोकमान्य तिलक, बाळासाहेब हे नाव बालासाहेब असे लिहू नये, असे स्पष्ट मत भाषा अभ्यासक आणि हिंदी साहित्यिकांनी 'महाराष्ट्र टाइम्स'शी बोलताना मांडले.

मराठीतील आणि इतर भाषांमधील शब्दाचा उच्चार हिंदीत करताना किंवा देवनागरीमध्ये लिहिताना 'ळ' हे मुळाक्षर डावलून 'ल'चा वापर आता करता येणार नाही. केंद्र सरकारच्या हिंदी विभागाने 'ळ'च्या वापराबाबतचे परिपत्रक रेल्वे, बँकांसह सर्व सरकारी कार्यालयांना पाठविले आहे. 'ळ'चा 'ल' करणे सुचनांचा भंग करणारे ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर भाषा अभ्यासकांची मते जाणून घेतली.

**भाषा ही लोक तांत्रिकी संस्था आहे. एका संस्थेनी नियम केला म्हणजे बदल होईल, असे मानण्यापेक्षा लोकांनी लिहिण्या-बोलण्यात बदल केला पाहिजे. इकडे-तिकडे हे कन्नड शब्द आज मराठी झाले आहेत. शब्द एका भाषेतून दुसऱ्या भाषेत जाण्यामुळे भाषा समृद्ध होते.**

**- डॉ. गणेश देवी**, भाषा तज्ज्ञ

**टिळक हे मूळ आडनाव हिंदीतही तसेच लिहिले पाहिजे. नवीन नियमाप्रमाणे पाठ्यपुस्तकात हा बदल झाला पाहिजे. पूर्वी टंकलेखनात वर्णांची सोय नसल्याने बदल केले जात होते. आता संगणकामुळे सर्व वर्ण उपलब्ध आहेत. भाषा समृद्ध करण्यासाठी हा बदल गरजेचा आहे.**

**- डॉ. दामोदर खडसे**, ज्येष्ठ साहित्यिक

**इतर भाषेतील शब्द स्वीकारल्याशिवाय भाषा समृद्ध होऊ शकत नाही. उच्चारणात त्रास नको म्हणून बदल टाळले जातात. मराठी भाषकांनी जाणीवपूर्वक 'ळ'चा वापर केला पाहिजे. लेखकांनी मूळ शब्द लिहावेत. पूर्वी टंकलेखन सुविधा नसल्याने 'ळ'चा 'ल' केला जायचा.**

**- प्रा. ओमप्रकाश शर्मा**, निवृत्त प्राध्यापक

### मराठी 'ळ' हिंदीतही अनिवार्य



**राजस्थानी, हरयानवी, गढवाली, कुमायुणी, नेमाडी, कन्नड, तेलुगू, मल्याळम, तमिळ, मराठी, कोकणी, गुजराती, ओडिया अशा १४ भाषांमध्ये 'ळ' आहे. तो हिंदी लेखनात व उच्चारणात कायम ठेवला पाहिजे. हिंदीमध्ये 'ळ' नाही म्हणून शब्दाचे मूळ रूप बदलता येणार नाही.**

**- प्रकाश निर्मळ**, भाषा अभ्यासक

भाषा अभ्यासक प्रकाश निर्मळ यांनी हिंदीमध्ये 'ळ'चा वापर करण्यात यावा, यासाठी राष्ट्रपती, पंतप्रधान व राज्यपाल कार्यालय, तसेच केंद्रीय गृहमंत्रालयाचा राजभाषा विभाग, उच्च शिक्षण मंत्रालयाचा हिंदी विभाग, प्रसारण मंत्रालय यांना वारंवार पत्र लिहिले. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री रमेश पोखरियाल यांना ट्विट केले. यानंतर हिंदी विभागाने याबाबतचे स्पष्टीकरण दिले.

**Maharashtra times: 5.10.2020**

# News Paper Clippings During October 2020

Section: Miscellaneous

**ऑनलाइन नोंदणी, मागेल तेच पुस्तक : घरपोच पुस्तक सुविधा यावर भर**

## पुस्तकं 'चाळण्याची' सवय होणार इतिहासजमा; ग्रंथालय संस्कृती बदलणार

प्रज्ञा केळकर-सिंग ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** ग्रंथालय संचालनालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून राज्यातील ग्रंथालये १५ ऑक्टोबरपासून सुरु होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र 'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर ग्रंथालयांमधल्या वावरावर कोरोना काळात वाचक आणि पुस्तके आता नियमावलीच्या नव्या धाग्याने जोडले जाणार आहेत. ग्रंथालयात पूर्वीसारखा मोकळा वावर, हवे ते पुस्तक निवडण्याची मुभा यावर काही काळापुरती मर्यादा येणार आहे.

पुणे शहर, तालुक्यात साधारण ९० ग्रंथालये आहेत. गेल्या सात महिन्यांपासून शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाचे दोन हफ्ते प्रलंबित आहेत. शासनाने परवानगी दिल्यास नव्या नियमांचे पालन करत ग्रंथालये वाचकांच्या सेवेसाठी सज्ज होणार आहेत.

कोरोना संकटामुळे ग्रंथालय संस्कृती बदलणे स्वाभाविक आहे. पुरेशा मनुष्यबळाचा अभाव जाणवणार आहे. पूर्वीसारखा मोकळा वावर नसेल. वाचकांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त आहे. सध्या त्यांच्या बाहेर पडण्यावरही मर्यादा आहेत. घरपोच पुस्तके देण्याची सुविधा, ऑनलाइन नोंदणी हाच सध्याचा उपाय आहे, ग्रंथपाल प्रसाद भडसावळे यांनी सांगितले.



> ग्रंथालयात सुरक्षितता आणि स्वच्छतेला प्राधान्य असेल. एका वेळी एक किंवा दोनच वाचकांना आत सोडले जाईल. वाचकांकडून परत आलेली पुस्तके सॅनिटाईज करुन किमान तीन दिवस वेगळी ठेवली जातील. ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर पुस्तकांची यादी उपलब्ध करुन दिली जाईल. त्यामुळे वाचकांना ऑनलाईन निवड करणे सोपे होईल. भविष्यात फिरते ग्रंथालय सुरु करण्याचा विचार आहे.
>
> \- शरद घाणेकर, पुणे मराठी ग्रंथालय

> शासनातर्फे ग्रंथालये सुरु करण्याची तारीख वारंवार पुढे ढकलली जात आहे. शासनाला मद्यालये चालतात, ग्रंथालये नाही, याचे आश्चर्य वाटते. गेल्या सात महिन्यात सातत्याने साफसफाई चालू आहे. तारीख जाहीर झाल्यावर पुढील निर्णय घेऊ.
>
> \- किरण शेटे, त्वष्टा कासार ग्रंथालय

> वाचकांच्या पुस्तक निवडीवर आता मर्यादा येतील. पुस्तके पहिल्यासारखी हाताळता येणार नाहीत. पुस्तकांचे सॅनिटायझेशन, स्वच्छता, तपासणी उपकरणांवरचा ग्रंथालयांचा खर्च वाढणार आहे. नोंदणी करून मग वाचकांना पुस्तके मिळतील.
>
> \- दिलीप भिकुले, सिद्धार्थ वाचनालय

**Lokmat: 8.10.2020**

## *News Paper Clippings During October 2020*

Section: Miscellaneous

# मसाप, मराठी ग्रंथालयाच्या पाठपुराव्याला आले यश

**वाचन प्रेरणा दिन :** परवानगी मिळाल्याने आनंदोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** ग्रंथालये सुरू करण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेसह पुणे, मराठी ग्रंथालय तसेच अनेक वाचनालयांनी शासनाला पत्र पाठवून ग्रंथालये सुरू करण्याची मागणी केली होती. सार्वजनिक ग्रंथालय संचालनालयाच्या प्रभारी संचालक शालिनी इंगोले यांनीही शासनाकडे पाठपुरावा करून नियमावलीचा मसुदा सादर केला होता. या सर्वांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले आहे. ग्रंथालये आणि वाचनालये सुरू करण्यासाठी दोन महिन्यांपासूनच संचालकांनी जय्यत तयारी ठेवली होती. त्यामुळे शासन निर्णयाचे सर्वांनी स्वागत करीत ग्रंथालयांचे पुनश्च हरिओम करण्यास सर्वजण सज्ज झाले आहेत. माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम याचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. मात्र, हा दिन साजऱ्या करणाऱ्या शासनाच्या ग्रंथालये बंदच्या विसंगत धोरणावरच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

वाचन प्रेरणा दिनाच्या पूर्वसंध्येला शासनाने सार्वजनिक ग्रंथालये आणि वाचनालये सुरू करण्याची परवानगी दिल्याने ग्रंथालय चळवळीमधील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कोरोनाबाबत शासनाच्या नियमावलीचे योग्य प्रकारे पालन करून तब्बल सात महिन्यानंतर उद्यापासून (१५ ऑक्टोबर) नव्या जोमात ग्रंथालये आणि वाचनालये सुरू केली जाणार आहेत.

ग्रंथालय संचालनालय हा विभाग उच्च व तंत्र शिक्षण खात्याच्या अंतर्गत येत असल्याने शिक्षण क्षेत्राला लागू असलेले टाळेबंदीचे नियम ग्रंथालयांनाही लागू केले होते. यातच टप्प्याटप्प्याने अनलॉक करताना शासन प्राधान्यक्रमाने हॉटेल, मद्यालये सुरू करण्यास परवानगी देते. मात्र ग्रंथालये बंद ठेवते यावर वाचकांनी देखील टीकेची झोड उठवली होती.



राज्य शासनाने सार्वजनिक ग्रंथालय सुरू करण्याची परवानगी दिल्याने पुणे शहरातील अनेक ग्रंथालय वाचकांच्या सेवेसाठी सज्ज झाली आहेत.

### ग्रंथालय सुरू करण्याच्या निर्णयाचे स्वागत

वाचन प्रेरणा दिनानिमित्त आम्हाला सात महिन्यानंतर खूप छान भेट दिली आहे. त्यामुळे अतिशय आनंद झाला आहे. सार्वजनिक ग्रंथालय संचालक, ग्रंथपाल, वाचक सातत्याने याचा पाठपुरावा करीत होते. त्याला एक प्रकारे यश मिळाले आहे. उद्या आम्ही नक्कीच वाचकांसाठी कोरोनाबाबत संपूर्ण खबरदारी घेऊन नियमाचे योग्यप्रकारे पालन करून ग्रंथालय खुले करू.

- **दिलीप भिकुले**, ग्रंथपाल, सिद्धार्थ वाचनालय

ग्रंथालये सुरू करावी यासाठी पाठपुरावा केला होता. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत ऑनलाइन कार्यक्रम आयोजित केला आहे.

- **शालिनी इंगोले**, प्रभारी संचालक, राज्य सार्वजनिक ग्रंथालय संचालनालय

ग्रंथालये उघडण्याचा निणय स्वागतार्ह आहे. ग्रंथालये सुरु होण्यासाठी आम्ही याआधी सरकारला पत्र पाठविले होते. पण, त्याची शासन दरबारी दखल घेतली गेली नाही.

- **शरद घाणेकर**, उपकार्याध्यक्ष, पुणे मराठी ग्रंथालय

महाराष्ट्र साहित्य परिषदेने पाठविलेल्या पत्राची दखल घेतली आणि मुख्यमंत्री कार्यालयातून विचाराधीन आहे असे परिषदेला कळविले. ग्रंथालय सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे अभिनंदन. पूर्वीच ग्रंथालये सुरू व्हायला हवी होती. पण अजूनही वेळ गेलेली नाही. योग्य निर्णय घेतला आहे. ग्रंथालयात येणारा वाचक हा मद्यालयात जाणाऱ्यापेक्षा नक्कीच सुज्ञ नि काळजी घेणारा आहे.

- **प्रा. मिलिंद जोशी**, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद

**Lokmat: 15.10.2020**

# *News Paper Clippings During October 2020*

Section: Miscellaneous

मटा अँकर 'नासा'च्या 'सोफिया' हवाई वेधशाळेने लावला महत्त्वाचा शोध

## चंद्राच्या सूर्यप्रकाशित भागावर पाणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अमेरिकी अंतराळ संशोधन संस्थेच्या (नासा) 'स्ट्रॅटोफेरिक ऑब्झर्व्हेटरी फॉर इन्फ्रारेड अॅस्ट्रोनॉमी' (सोफिया) या हवाई वेधशाळेने चंद्राच्या सूर्यप्रकाशित भागामध्ये पाण्याचे अंश असल्याचा शोध लावला आहे. सोमवारी ऑनलाइन पत्रकार परिषदेत 'नासा'ने या बाबतची घोषणा केली. या शोधामुळे चंद्राच्या ध्रुवीय, अंधाऱ्या भागांखेरीज त्याच्या भूपृष्ठावर इतरत्रही पाणी असू शकते, असे सूचित होत असल्याचेही संस्थेने म्हटले आहे.

'सोफिया' ही बोइंग विमानात बसविलेली हवाई वेधशाळा आहे. जमिनीपासून ४५ हजार फुटांवर जाऊन विश्वातील विविध घटकांकडून येणाऱ्या इन्फ्रारेड लहरींचे निरीक्षण या वेधशाळेमार्फत केले जाते. 'सोफिया'द्वारे २०१८ मध्ये प्रथमच चंद्राच्या पृष्ठभागाचे निरीक्षण केले असता, शास्त्रज्ञांना चंद्राच्या दक्षिण गोलार्धात असणाऱ्या आणि पृथ्वीवरून दिसणाऱ्या 'क्लॅव्हियस' विवरामध्ये पाण्याचे रेणू आढळले, असे 'नासा'च्या खगोल भौतिकी अवकाश मोहिमांचे संचालक पॉल हर्टझ आणि 'सोफिया'च्या प्रकल्प संशोधक नसीम रंगवाला यांनी सांगितले. रंगवाला भारतीय आहेत.

या सूर्यप्रकाशित विवरामध्ये पाण्याच्या रेणूंचे प्रमाण दशलक्ष कणांमध्ये १०० ते ४१२ भाग इतके असून, ते चंद्राच्या एका घनमीटर मातीमध्ये ३४० मिलीलीटर इतके भरू शकते. या आधी भारताच्या 'चांद्रयान-१'ने चंद्राच्या पृष्ठभागावर पाण्याचे रेणू असल्याचा शोध लावला होता.



सोफिया वेधशाळा आणि चंद्राच्या पृष्ठभागावरील पाण्याच्या रेणूंचे ग्राफिक्स.

### चंद्रावरील पाण्याचे संभाव्य स्रोत

चंद्राच्या पृष्ठभागावर आदळणाऱ्या सूक्ष्म उल्कांमधील पाण्याचे अंश मातीत मिसळले असण्याची शक्यता आहे. सूर्याकडून येणाऱ्या हायड्रोजनच्या कणांचा आणि चंद्राच्या मातीत संयुगांच्या स्वरूपात असणाऱ्या ऑक्सिजनचा संयोग होऊन पाण्याचे रेणू तयार झाले असावेत.

### संशोधनाचे पुढे काय?

'नासा'तर्फे २०२४ मध्ये चंद्रावर पुन्हा मानवी मोहीम आखण्याची योजना आहे. भविष्यातील मानवी मोहिमांसाठी चंद्राच्या पृष्ठभागावरील पाण्याचा थेट वापर करता येईल का, या दिशेने संशोधन करणार असल्याचे संस्थेने म्हटले आहे.

**Maharashtra times: 27.10.2020**

# Upcoming Events

## November 2020

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | **14** *Pandit Nehru Jayanti*  |
| **15** *Birsa Munda Jayanti*  | 16 | 17 | 18 | **19** *Indira Gandhi Jayanti va Rashtriya Ekatmata Din*  | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | **26** *Samvidhan Divas*   | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |




*Other than the College Photos, Event Photos, Newspaper clipping images, all other mages in this Bulletin Issue are downloaded from Google Images., PInterest, Freepik.Com.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.*